वैभव विशेषांक

डिसेंबर



ठा इतिहासाचे गौरवशाली प्रतिक — शनिवारवाडा

( श्री—वैभवी आर्टस् )



# मार्मिक

REFBK-0023109

# भारत वैभव 卐

मार्गदर्शक विशेषांक | सप्टेंबर ते डिसेंबर | १९७९



(M-U-D-K-A-V-I)

Regd No M. H 831

स्थापना : १ मे १९७०

☎ २०९९

# महाराष्ट्र वैभव

## मार्गदर्शक

### * पुणे जिल्हा *

ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, प्रवासिक, औद्योगिक, व्यापारी, नामवंत संस्था व उल्लेखनीय व्यक्ती परिचयासह सर्वांगीण माहिती असलेले प्रकाशन


* संस्थापक प्रधान संपादक — श्री. वसंत मुदकवी B G L (मराठी) M D C S (India) [माजी सैन्याधिकारी]
* कार्यकारी संपादक — कु. शरयु मुदकवी. B Com (L L B Gen )
* रचना — श्री वैभवी आर्टस
* प्रकाशक, मुद्रक — सौ. भाग्यश्री मुदकवी.
* मुद्रणस्थळ — श्री समर्थ प्रेस, ठाणे.
* मुद्रण सल्लागार — ह. पां जोशी
* ऑ. लीगल ॲडव्हायझर — श्री. गणेश पाठक B. Com L L B
* प्रकाशन स्थळ — मातृ पितृ छाया १३ एम. सी. एच. एस पनवेल.
* बँकर्स — स्टेट बँक ऑफ इंडिया, पनवेल. बँक ऑफ महाराष्ट्र, पनवेल. अर्बन को.-ऑप बँक, पनवेल.


जिल्हा पुणे

दिपावली १९७९

मुल्य २० रुपये

या मार्गदर्शकातील … पुस्तके यातून संकलित केली आहे. काही जशीच्या … आधारावर आहे. त्या सर्व लेखकाचे आम्ही आभारी …

REFBK-0023109

-: संपूर्ण हक्क :-
प्रकाशिकेच्या स्वाधीन

भारत वैभव मासिकाच्या 'महाराष्ट्र वैभव' मार्गदर्शकाचा पुणे जिल्हा विशेषांक मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल तर्फे अपंग सेवार्थ प्रकाशित केला आहे.

✱ M-U-D-K-A-V-I's Universal Disables & Kripples Advisory Vanguard INDIA ✱


## मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल.

१३, मिडल क्लास हौसिंग सोसायटी, पनवेल (म. रे.)

(जि. कुलाबा), नवी मुंबई, ४१० २०६, भारत.

# अपंग भ



वसंत मुदकवी, BGL,

| | |
|---|---|
| ¤ माजी चीफ वारंट ऑफिसर | फिल्ड्‌ इंटेलि |
| ¤ माजी अध्यक्ष | . महाराष्ट्र सैनिक स |
| ¤ सभासद | . महाराष्ट्र |
| ¤ आजीव सभासद | . मराठी विज्ञा |
| ¤ आजीव सभासद | . नवजीवन मंड |
| ¤ संस्थापक | . मु द-क वी, पन |
| ¤ प्रधान संपादक | महाराष्ट्र वैभव<br>भारत वैभव<br>विश्व वैभव |
| ¤ संस्थापक | : मु-द--क-वी, पुरुषा |
| ¤ आजीव सभासद | : महाराष्ट्र स्टेट प्रोवेशन आफ्टर केअर असो |
| ¤ आजीव सभासद | : नॅसो. (नॅशनल सोस इक्वल ऑपॉर्च्युनिटी हॅण्डीकॅप्ड) |
| ¤ आजीव सभासद | : टिळक महाराष्ट्र विद्या |
| ¤ आजीव सभासद | : कोकण एज्युकेशन सो |

- मी स्वत. अपंग आहे, अपंग नवजीवन' ह्यासाठी जगायचे आहे, हा निर्धार करुनच, मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशनाचे कार्य सुरु केले आहे. तो सुदिन १ मे १९७०.
- मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन पनवेल, तर्फे " महाराष्ट्र वैभव " जिल्हानिहाय मार्गदर्शनाचा १ ला भाग जि. कुलाबा हा अक २६ जानेवारी १९७१ या प्रजासत्ताक दिनी प्रकाशित करुन प्रकाशनाचा " श्री गणेशा " केला
- भारताच्या स्वातंत्र्य रौप्य महोत्सवी पर्वातच प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी १९७३ रोजी महाराष्ट्र वैभव मार्गदर्शकाचा भाग दुसरा " कोकण विभाग " प्रकाशित केला आहे.
- भारतीय संस्कृतीचा प्रचार व प्रसार करणारे आणि लोकशाहीचा पुरस्कार करणारे मराठी मासिक " भारत वैभव " २६ जानेवारी १९७३ प्रजासत्ताक दिनी सुरु केले.
- २० जुलै १९७८ गुरु पौर्णिमा या दिवशी पश्चिम महाराष्ट्र विभाग प्रसिद्ध केला आहे.
- ६ सप्टेंबर १९७८ गणेशचतुर्थीस विदर्भ विभाग प्रसिद्ध केला.
- १५ ऑगष्ट १९७९ मराठवाडा विभाग प्रकाशित केला आहे
- दिपावली १९७९ पुणे जिल्हा प्रकाशित केला आहे.

- आमचे साहित्य वाचकाच्या उंचावलेल्या अपेक्षा आणि जाहिरातदाराना आमच्या अंकात जाहि अभिमानास्पदच वाटेल, तसेच सहकाऱ्याना प दिल्याचा निश्चितच आनंद वाटेल अशी शास्त आह
- अपंग सेवार्थ हे कार्य आम्ही करीत आहोत अपंगाना वॉकींगस्टिक्स, क्रचेस्, आर्टिफिशल, प्र साठी आम्ही मदत केली आहे व करीत आह स्वावलंबी जीवन जगावे, काहीतरी स्वत ला स्वतंत्र व्यवसाय करावा म्हणून त्या व्यवसा थोडा प्राथमिक माल, चाकाच्या गा त्यासाठी व्यवस्था, शिवाय स्व त्याचा योग्य मोबदला मिळेल अ शिवाय वेळोवेळी मदत व योग्य सल्ला
- विनामूल्य कायदेशीर सल्लाही दिला जाईल
- अपंग माणूस काय करू शकतो ! याचे दिव्य दर्श भावी काळात या विश्वाला घडेलच !
- या कार्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, ही वि सहकार्याचे आम्ही सहर्ष स्वागतच करू.

## मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

मु--द--क--वी, युनिव्हर्सल डिसेबल्स् अँड क्रिपल्स् अँडव्हायझरी व्हॅन

**M-U-D-K-A-V-I Universal Disabels' & Kripples Advisary Vang**

# अंतरंग


- सप्रेम आभार
- शुभेच्छा-अभिनंदन
- पुणे - संपादकीय
- पुणे जिल्हा परिचय
- पुणे शहर
- हवेली
- खेड
- बारामती
- इंदापूर
- मावळ
- मुळशी
- भोर
- वेल्हे
- शिरुर
- आंबेगाव
- जुन्नर
- पुरंदर
- दौंड




मु-द-क-नी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

८०८
मू=प्रवास
२३९०८



स्वातंत्र्याचा यज्ञ ज्यांनी आपल्या रक्ताने चेतविला,
आणि आपल्या आहुतीने सफल केला त्यांच्या,
तसेच आमच्या कार्यात ज्यांनी सक्रीय
सहकार्य केले त्या जनता जनार्दनाच्या चरणी

**सप्रेम नमस्कार**

**दिपावली १९७९**

## सप्रेम आभार

शारीरिक व आर्थिक प्रतिकूल परिस्थितीतूनही, ऐतिहासिक, भौगोलिक, औद्योगिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, प्रशासिक, कृषिविषयक ह्या क्षेत्रातील उद्दिष्टाच्या मानसिक तृप्तीसाठी तीव्र तळमळीने " भारत वैभव " मासिकाच्या महाराष्ट्र वैभवचा " पुणे जिल्हा " मार्गदर्शक विशेषांक प्रकाशित करीत आहोत. यात अनेक त्रुटींच्या उणिवा असल्याची आम्हाला जाणीव आहेच, तरीही वाचकांच्या उंचावलेल्या अपेक्षा हा अंक तृप्त करील अशी रास्त आशा आहे. आमच्या योजनेप्रमाणे व आमच्या कल्पनेप्रमाणे चांगला अंक, वाचकांच्या हाती, आम्ही मोठ्या समाधानाने देत आहोत.

गेले अनेक दिवस आमच्या अंकाचा गाजावाजा सर्वत्र होतच आहे. आम्ही ज्या ज्या ठिकाणी जातो त्या त्या ठिकाणी आमचा अंक लोकप्रिय झालेला आढळतो. इतक्या कमी किंमतीत, इतका सर्वांगिण माहितीयुक्त सुंदर अंक आजपर्यंत निघालेला नाही, असे अनेक मान्यवर व्यक्तींचे मत आहे. अंकाची उत्कृष्ट छपाई सुरेख बांधणी, आकर्षक सजावटीचे कव्हर आणि सर्वांना अत्यंत उपयुक्त होईल अशी माहिती अंकात असल्याबद्दलची आतापर्यंत निरनिराळ्या थरातील अनेक नामवंत लोकांची व संस्थांची प्रशस्ती पत्रे आम्हाला आलेली आहेत ती छापणे म्हणजे निव्वळ खर्चाचीच बाब होय हा अंकही सर्वांना आवडेल अशी आमची खात्री आहे हा मार्गदर्शक विशेषांक जास्तीतजास्त माहितीने परिपूर्ण असून इतर वाटाड्यांपेक्षा आगळा नि वेगळाच आहे या मार्गदर्शकात जी माहिती कमी आहे ती माहिती " भारत वैभव " च्या संपूर्ण महाराष्ट्र या अंकात बघावयास मिळेलच

... तयार करण्यात अनेकांचे सहाय्य झाले, त्याचप्रमाणे ज्यांनी जाहिराती देऊन अमूल्य
मदत केली त्याचे व आमच्या इतर सहकाऱ्यांचे ...

हा आदर्श व महत्वपूर्ण मार्गदर्शक अंक तयार करण्यात अनेकांचे सहाय्य झाले, त्याचप्रमाणे ज्यांनी जाहिराती देऊन अमूल्य मदत केली त्याचे व आमच्या इतर सहकाऱ्यांचे आम्ही मनःपूर्वक ऋणी आहोत

तसेच मुद्रणसल्लागार श्री. स. पां. जोशी व त्यांचे इतर सहकारी यांचेही आम्ही आभारी आहोत.

सर्वांनी केलेल्या सक्रीय सहकार्यामुळेच अपंग माणूस कार्य करू शकतो याचे दिव्य दर्शन या अंकामुळे आपल्याला घडेलच.

सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

**मु-द्-क-धी**, आपल्या सहकार्याचे सदैव स्वागतच करील !!!

**भवदीय**
[ संपादक, भारत वैभव ]

# पुणे परिचय

महाराष्ट्राची पुण्यभूमी, भारताची शान।

भारताची आन राखण्या, इथे जन्मले अनेक महान।

वीर माता इथे जन्मल्या, प्रसविले वीर महान।

परंपरेची शान राखण्या !!!

महाराष्ट्राने शर्थ केली·····

यात सिंहाचा वाटा आहे

पुण्याचा ! ! !

# पुणे !

विद्येचे माहेरघर,

महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रतिक,

ऐतिहासिक भूमी,

पर्यटकांचे आकर्षण,

आधुनिक भारताच्या औद्योगिक प्रगतील

अग्रगण्य असलेले पुणे,

तीर्थक्षेत्राच्या परिसरात असलेले पुणे,

उत्कृष्ट हवा, सौंदर्यशाली परिसर असलेले पुणे,

भारतातील एक वैशिष्ट्यपूर्ण शहर पुणे,

पुणे ! ! !



--संपादक



मु द्-क-वी पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

# आमच्या प्रकाशनास आलेल्या थोरामोठ्या व्यक्तिंच्या शुभेच्छा व अभिनंदन

| | |
|---|---|
| १) मा. राष्ट्रपती, भारत सरकार | श्री. व्ही. व्ही. गिरी |
| २) मा. राष्ट्रपती, भारत सरकार | श्री. व्ही. व्ही. गिरी |
| ३) मा. राष्ट्रपती, भारत सरकार | श्री झकीर हुसेन |
| ४) मा ॲक्टींग प्रेसिडेंट, भारत सरकार | श्री. बी. डी. जत्ती |
| ५) मा. ॲक्टींग राष्ट्रपती, भारत सरकार | श्री. बी. डी. जत्ती |
| ६) मा. माजी वित्तमंत्री, भारत सरकार | श्री. सी. डी. देशमुख |
| ७ मा. सरसेनापती, भारत सरकार | जनरल श्री. जी. जी. बेवूर |
| ८) मा. योजनामत्री, भारत सरकार | श्री. मोहन धारिया |
| ९) मा. व्यापारमंत्री, भारत सरकार | ,, मोहन धारिया |
| १०) मा. माजी रेल्वेमत्री, भारत सरकार | ,, स. का. पाटील |
| ११) मा. रेल्वेमत्री, भारत सरकार | ,, मधु दंडवते |
| १२) मा. परराष्ट्रमंत्री, भारत सरकार | ,, अटलबिहारी वाजपेयी |
| १३) मा. राज्यपाल, महाराष्ट्र सरकार | ,, अलीयावर जंग |
| १४) मा. राज्यपाल महाराष्ट्र सरकार | ,, सादिक अली |
| १५) मा. शिक्षणमंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, मधुकरराव चौधरी |
| १६) मा. वित्तमंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, मधुकरराव चौधरी |
| १७) मा. महसूलमंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, मधुकरराव चौधरी |
| १८) मा. विधी व न्यायमंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, बी जे खताळ |
| १९) मा समाज कल्याणमंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, दादासाहेब रुपवते |
| २०) मा. सहकारमंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, शिवाजीराव पाटील |
| २१) मा. सहकारमंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, आर. व्ही. बेत |
| २२) मा. अन्न व नागरी पुरवठामंत्री महाराष्ट्र सरकार | ,, जमनालाल गोयंका |
| २३) मा परिवहन व तुरुंगमंत्री, महाराष्ट्र सरकार | , बाबुराव काळे |
| २४) मा महसूल मंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, उत्तम राठोड |
| २५) मा. परिवहनमंत्री, महाराष्ट्र सरकार | , जगेश देसाई |
| २६) मा पाटबधारे मंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, ए. बी. निंबाळकर |
| २७) मा. दारुबंदी मंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, डॉ शंकरराव राख |
| २८) मा. कामगार व पर्यटनमंत्री, महाराष्ट्र सरकार | श्री. रामनाथ पांडे |
| २९) मा. लहान पाटबंधारेमंत्री, महाराष्ट्र सरकार | ,, शांताराम घोलप |
| ३०) मा. अन्न व नागरी पुरवठामत्री महाराष्ट्र सरकार | ,, शंकरराव गेडाम |
| ३१) मा. ग्रामविकास मंत्री म सरकार | , रावसाहेब जामकर |
| ३२) मा विधी व न्यायमंत्री म. सरकार | हमीद दलवाई |
| ३३) मा शिक्षणमत्री म सरकार | ,, फरुक पाशा |
| ३४) मा नगरविकासमत्री म सरकार | श्रीमती सुशीला बलराज |
| ३५) मा. ग्रामविकास मंत्री, म. सरकार | श्री. के एस. पाटील |
| ३६) मा कामगारमंत्री, म. सरकार | ,, एस. बी. पाटील |
| ३७) मा वित्तमंत्री, म सरकार | ,, यशवतराव मोहिते |
| ३८) मा गृहनिर्माणमंत्री, म. सरकार | ,, वसतराव होशींग |
| ३९) मा सार्वजनिक आरोग्य मंत्री, महाराष्ट्र सरकार | , सुशिलकुमार शिंदे |
| ४०) मा. वनराज्यमंत्री, म. सरकार | ,, रमेश वळवी |
| ४१) मा. वनमंत्री, म सरकार | , आर. जे. देवतळे |
| ४२) मा. उर्जामंत्री, म सरकार | एम. जी. माहुलकर |
| ४३) मा. कृषिमंत्री, म. सरकार | ,, सुधाकर नाईक |
| ४४) मा कुलगुरु, पुणे विद्यापीठ | ,, दत्तो वामन पोतदार |
| ४५) मा. कुलगुरु, पुणे विद्यापीठ | जी. एस. महाजनी |
| ४६) मा. कुलगुरू, नागपूर विद्यापीठ | ,, पी. एस. मेने |
| ४७) मा कुलगुरू, मराठवाडा विद्यापीठ | ,, रे. प नाथ |
| ४८) मा कुलपती, भारतीय विद्याभवन | श्रीमती लिलावती मुन्शी |
| ४९) मा. सभापति विधानसभा, महाराष्ट्र | श्री बाळासाहेब देसाई |
| ५०) मा मुख्यमत्री, महाराष्ट्र सरकार | ,, शंकरराव चव्हाण |
| ५१) मा मुख्यमत्री महाराष्ट्र सरकार | ,, वसतदादा पाटील |
| ५२) मा मेयर, पुणे महापालिका | ,, निळूभाऊ लिमय |
| ५३) मा मेयर, मुंबई महापालिका | ,, आर. के. गणात्रा |
| ५४) मा. महामहोपाध्याय साहित्य वाचस्पती पद्मभूषण | , दत्तो वामन पोतदार |

. यातील अधिकार पदे तत्कालीन आहेत

# आमच्या प्रकाशनास आलेल्या थोरामोठ्या व्यक्तिंच्या शुभेच्छा व अभिनंदन

आचार्य विनोबा भावे

५५) मा आचार्य — श्री. रामभाऊ म्हाळगी

५६) मा खासदार — श्रीमती अहिल्या रागणेकर

५७) मा खासदार — श्रीमती मृणाल गोरे

५८) मा. खासदार — श्री शरद पवार

५९) मा. मुख्यमंत्री व गृहमंत्री, महाराष्ट्र सरकार

६०) मा. महसूल व पुनर्वसन मंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री. उत्तमराव पाटील

६१) मा. कृषि व ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री गणपतराव देशमुख

६२) मा. समाजकल्याण व आदिवासी कल्याणमंत्री मंत्री महाराष्ट्र सरकार — श्री. अर्जुनराव कस्तुरे

६३) मा सरकारी बांधकामे व विधान-कार्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री जगन्नाथराव जाधव

६४) मा. पाटबंधारे, विधी व न्यायमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री गोविंदराव आदिक

६५) मा. कामगार व पर्यटन मंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री. सुशिलकुमार शिंदे

६६) मा वन, दारुबंदी व उत्पादनशुल्क मंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री छेदीलाल गुप्ता

६७) मा. सामान्य प्रशासन व गृहराज्य मंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री भाई वैद्य

६८) मा रोजगार व मनुष्यबळविकास तांत्रिक शिक्षण, प्रशिक्षण व पर्यटन राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री. दत्ता मेघे

६९) मा. ग्रामविकास व पुनर्वसन राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री. प्रतापराव भोसले

७०) मा वन व आदिवासी कल्याण राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री. दिलवरसिंग पाडवी

७१) मा. वित्त, कामगार औकाफ व राजशिष्टाचार राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — डॉ. य इसहाक जमखानावाला

७२) मा महसूल व नियोजन राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री किसनलाल देशमुख

७३) मा. परिवहन अन्न व नागरी पुरवठा आणि विधानकार्य राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री. स. गो. निखाते

७४) मा कृषि राज्यमंत्री, म. सरकार — श्री श्रीपतराव श बोन्द्रे

७५) मा पशुसवर्धन, दुग्धशाळा विकास, खार जमीनी व मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री. बी एस. पाटील

७६) मा. समाजकल्याण व गृहनिर्माण राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्रीमती शांति नाईक

७७) मा. उद्योग, सास्कृतिक कार्यं, युवक सेवा व क्रिडा राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री. विनायकराव पाटील

७८) मा. उर्जा, दारुबंदी व उत्पादन शुल्क राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — डॉ. पद्मसिंह बा. पाटील

७९) मा पाटबंधारे राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री शिवाजीराव बी पाटील

८०) मा. आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार — डॉ. मा. ब. गाडेकर

८१) मा. गृहनिर्माण व कारागृह मंत्री — श्री भाऊसाहेब सुब

८२) मा. अन्न व नागरी पुरवठा, परिवहनमंत्री, महाराष्ट्र शासन — श्री हसमुख उपाध्याय

८३ मा. नगरविकास राज्यमंत्री, म सरकार — श्री माऊ मूळक

८४) मा. सहकार राज्यमंत्री म.सरकार — श्री. शंकरराव काळे अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा

८५) मा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री, महाराष्ट्र सरकार — डॉ. प्रमिला वि टोपले


८६) मा सहकार मंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री. एन डी. पाटील

८७) मा समाज कल्याण व आदिवासी कल्याण मंत्री, महाराष्ट्र सरकार — श्री अर्जुनराव श्री. कस्तुरे

८८) मा. मंत्री, — श्री राजारामबापू पाटील

**टीप** :–यातील अधिकार पदे तत्कालीन आहेत

मु द-क-श्री, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल


जिल्हा - पुणे
संदर्भ:-
१) दवाखाना
२) प्राथमिक आरोग्य केंद्र
३) हेल्थ युनिट
४) हॉस्पिटल्स

# पुणे जिल्हा



पुणे जिल्हा म्हणजे विद्येचे माहेरघर. पराक्रमी मराठ्यांच्या इतिहासाचे आपल्या अनेक स्मृतिचिन्हांनी दर्शन घडविणारा ! शिवरायांच्या वास्तव्याने, बुद्धिदात्या गणेशाच्या अधिष्ठानाने आणि साहित्यिकाच्या साहित्यालंकारांनी नटलेला पुणे जिल्हा ! या पुणे जिल्ह्याने भारताच्या इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविले आहे

सुमारे दोन हजार वर्षांपासूनचा पुणे जिल्हा आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशाचा इतिहास ज्ञात आहे कार्ले, भाजे, नाणे, भेडसे ही घाटमाथ्यावरची व कोंडाणे आणि आंबिवली ही घाटाखालची लेणी आपल्यातील शिलालेखांनी इतिहासाची साक्ष पटवितात पुणे जिल्ह्याचे सर्वांगीण दर्शन घ्यायचे ठरविले तर बराच काळ घालवावा लागेल कारण दोन हजार वर्षांपूर्वीपासूनचा हा जिल्हा. प्रत्येक राजघराणें, प्रत्येक अमल नष्ट होताना, सपताना, आपल्या अमर स्मृती येथे ठेवून गेले आहे. अनेक राजकर्त्यांनी वेगवेगळ्या काळात या भागावर अमल गाजविला आहे पहिल्या शतकात या भागावर शातकर्णी किंवा आंध्रभृत्य वंशाच्या वेदिश्री राजाचे अधिपत्य होते. या परिसरातील लेण्यावरून दुसऱ्या शतकात येथे बौद्ध धर्माचा प्रभाव जास्त होता असे दिसून येते इ सनाच्या चौथ्या शतकापर्यंत येथे आंध्रभृत्य वंशाचा अमल होता.

या नंतर काही काळाचा इतिहास निश्चितपणे ज्ञात नाही. परंतु आजूबाजूच्या भागातील माहितीवरून या भागात इ. स ५५७ ते ९३७ पर्यन्त चालुक्य व राष्ट्रकुट घराण्यानी राज्य केले असावे या काळात जुन्नर भागाला असाधारण महत्व होते. घाटमाथा आणि तळकोकण यामधील व्यापार जुन्नर मार्गेच चालत असे गुजराथ, माळवा आणि राजस्थान यावर सत्ता गाजविणारा क्षत्रप नहपान याची राजधानी जुन्नर हीच होती. राष्ट्रकुटाच्या आठव्या शतकातील शिलालेखातून व ताम्रपटांतून पुण्याचा पुणक अथवा पुण्यक नगरी असा उल्लेख आढळतो. राष्ट्रकुट राजवंशानंतर यादवानी या परिसरात राज्य केले सिंघण यादवाने बांधलेली स्मारके तर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आढळून येतात.

इ. स. १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीच्या यादवावर विजय मिळविल्यानंतर महाराष्ट्रात मुसलमानी अमलास हळुहळु सुरवात झाली. तथापि ठिकठिकाणी असणारे नायक (जहागिरदार) मुसलमानी अमलास विरोध करीत. सिंहगड येथे असणाऱ्या नाग नाईकाने इ. स. १३४० मध्ये महमद तुघ्लखाच्या हल्ल्यास चांगलेच तोंड दिले होते अर्थात तुघ्लखाची फौज मोठी असल्याने नाग नाईकाचा त्याच्यासमोर टिकाव लागला नाही तथापि तुघ्लख सत्ताही लवकरच संपुष्टात आली

१४ व्या शतकात बऱ्या अरब या मुसलमान सरदाराचे अधिपत्य या प्रदेशावर होते या काळात मुसलमान धर्मांचे महत्व खूपच वाढले होते. मुसलमान राजे हिंदूच्या देवळांच्या मशिदी बनवित व फकीर त्यातून रहात. सध्या थोरला–धाकटा शेखसल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मशिदी म्हणजे मुळची पुण्याची पुण्येश्वर आणि नारायणेश्वर ही प्राचीन देवळे होत. येथील देवाची हिंदूनी पुरंदर येथे स्थापना केली

बहामनी राजवटीच्या काळात हिंदूच्याकडूनच राज्य कारभार करून घेतला जात असे यामुळे या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था होती. बहामनी राज्यात महाराष्ट्र हा एक प्रमुख तर्फा असून पुणे भाग त्यात महत्त्वाचा होता. या संथगतीने चाललेल्या भरभराटीच्या काळाला दुर्गादेवीच्या दुष्काळाने चांगलाच हादरा बसला या अकरा वर्षे (१३९६ ते १४०७) चाललेल्या भयंकर दुष्काळात लोकांची अगदी अन्नान्न दशा झाली. बहामनी सरदार मलिक–उल् तुजार याने परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी खूपच प्रयत्न केले. त्याची राजधानी चाकण येथे होती जमिनी कसण्यास तयार असणाऱ्या लोकांना त्याने जमिनी वाटल्या. त्याने 'दादू नरसू काळे' याच्या मदतीने बरीच गावे सुधारली त्यानंतर महमूद गवान हा राज्यव्यवस्था सुधारण्याबद्दल इतिहासात प्रसिद्ध झालेला सेनापती अधिकारपदावर आला त्याने बऱ्याच सुधारणा केल्या. त्याने पुणे, बीड परगण्यात अंतर्भूत केले त्यानंतर राज्यव्यवस्थेचे काम निजाम–उल्–मुल्ककडे सोपविण्यात आले. त्याचा मुलगा मलिक अहमद याने निजामशाहीची स्थापना केली त्यानेच राजधानी चाकणहून जुन्नरला हलविली पुणे प्रांत निजामशाहीच्या अधिपत्याखाली असताना या प्रांताचा कारभार हिंदु अधिकारीच पाहात असत.

इ. स १४८६ मध्ये चाकणचा सुभेदार झैनुद्दीन याने शहाविरुद्ध बंड पुकारले. याच सुमारास अनेक मराठे किल्लेदारांनी निजामशाहीचे वर्चस्व झुगारून देऊन स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. मलिक अहमदने शिवनेरीवर स्वारी करून तेथील हिंदू किल्लेदाराचा पराभव केला. त्यावेळी त्याला तेथे साठवून ठेवलेला पाच वर्षांचा महसूल मिळाला.

मलिक अहमद नंतर निजामशाहीचे गादीवर बुऱ्हाण निजामशहा आला, त्याने भावरसेन नावाच्या हिंदूस आपला मंत्री नेमले. हुसेन

निजामशहा या निजामशाहीच्या तिसऱ्या वारसावर विजयनगर व विजापूरच्या राजांनी स्वारी केली असता त्याला पळ काढावा लागला. तेव्हा त्याने जुन्नर भागातील दऱ्याखोऱ्याचा आश्रय घेतला. (इ. स. १५६२) त्यावेळी झालेल्या जाळपोळीमुळे या भागाचे बरेच नुकसान झाले. त्यानंतर सलाबतखान या सरदाराने पुणे विभागाची अर्थव्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचवेळी म्हणजे साधारण १५९५ च्या सुमारास या भागाकडे मोगलाची वक्रदृष्टी वळली व त्यामुळे या भागास मोगलांच्या स्वाऱ्यांना तोंड द्यावे लागले यावेळी मराठ्यांच्या पराक्रमामुळे निजामशाहीत मराठे सरदाराचे महत्त्व वाढले व त्यांना जास्त अधिकार व स्वातंत्र्य देण्याचे धोरण निजामशाही सरदारांनी आरंभिले. शिवाजी महाराजाचे आजोबा मालोजी भोसले याचेकडे पुणे, सुपे प्रांत व शिवनेरी आणि चाकण हे किल्ले याचा कारभार सोपविण्यात आला. इ. स. १६०० मध्ये मोगलांनी नगर जिंकले यानंतर निजामशाहीचा ऱ्हास होण्यास सुरवात झाली. परंतु इ. स. १६०५ मध्ये अकबराचा मृत्यु झाल्यानंतर मोगलाची पकड शिथिल झाली. व त्यामुळे मलिकंबर या निजामशाहीच्या कर्तबगार सरदाराला आपली कर्तबगारी दाखविण्याची संधि मिळाली. त्याने शहाजी भोसले याच्या मदतीने निजामशाही टिकवून धरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्याने मूर्तझा (दुसरा) याला गादीवर आणून राजधानी पुन्हा जुन्नर येथे हलविली त्याने राज्यव्यवस्थेत आणि अर्थव्यवस्थेत खूपच चांगल्या सुधारणा यशस्वीपणे अमलात आणल्या जमीनधाऱ्याची पद्धत सुरू केली, पुण्यातील पर्वती भागापर्यंत मलिकंबर येऊन गेला मलिकंबरने मोगलाशी चांगली टक्कर दिली परंतु त्याच्या दुर्दैवाने त्याच्या कर्तबगारीचे चीज झाले नाही

इ स. १६२९-३० च्या सुमारास पुणे भागात मोठा दुष्काळ पडला. शहाजी भोसले यानी निजामशाहीचा संबंध तोडून टाकला व ते मुगलांचे सरदार बनले. इ स १६३२ मध्ये ते विजापूरच्या आदिलशहाचे सरदार झाले. इ. स. १६३५ मध्ये मोगलांनी पुण्यावर स्वारी केली तेव्हा निजामशाहीचे अस्तित्व पूर्णपणे संपुष्टात आले व ते राज्य मोगल आणि विजापूरकर याच्यात विभागले गेले. पुणे प्रांत आदिलशाहीत समाविष्ट झाला.

इ. स १६३० मध्ये शिवनेरी किल्ल्यावर पराक्रमी शिवाजीचा जन्म झाला तेव्हा शहाजी विजापूरकराचे सरदार होते आदिलशहासाठी शहाजीराजे कर्नाटकात तेथील व्यवस्था लावण्यासाठी गेले. त्यावेळी त्याचे कारभारी व शिवाजी राजाचे गुरु दादोजी कोंडदेव यानी पुण्याच्या जहागिरीचा कारभार व्यवस्थित रितीने सांभाळला शिवाय काही सुधारणाही केल्या फसली साल त्यांनीच सुरु केले. व सारा १/४ (एक चतुर्थांश) केला. दादोजी कोंडदेव व माता जिजाई यानी शिवरायाना उत्कृष्ट शिक्षण दिले शिवरायाच्या बालपणातील काही काळ पुण्यातच गेला

इ. स. १६४७ मध्ये दादोजीच्या मृत्युनंतर शिवाजीराजेनी स्वतंत्र बाण्याने विजापुरकरांकडील कोंडाणा किल्ला घेतला शहाजहान बादशहाच्या मृत्यूनंतर पुण्याच्या उत्तर व वायव्येस असलेल्या मोगल अमलाखालील भागातील कोळ्यांना शिवाजीने चिथवून दिले. व मोगलाविरुद्ध म्हणजे औरंगजेबाविरुद्ध बंड करायला लावले. यामुळे औरंगजेब संतापला व त्याने क्रूरपणे जुन्नरजवळ अनेक कोळ्यांचा अक्षरशः संहार केला. या अमानुष कत्तलीची साक्ष देत अजूनही जुन्नरचा 'काळा चबुतरा' उभा आहे

१६५७ मध्ये शिवाजी महाराजानी जुन्नर परत मिळविले व औरंगजेबाशी वरवर गोड बोलून मुलुख जिंकण्याचे कार्य चालूच ठेवले. औरंगजेबाशी उघड वैर पत्करल्यानंतर काही काळ या भागात युद्धाचे वातावरण राहिले. औरंगजेबाने जयसिंग व दिलेरखान या सरदाराना शिवाजीवर पाठविल्यानंतर झालेल्या पुरंदरच्या तहात पुणे प्रांतातील पुरंदर व कोंडाणा हे दोन किल्ले शिवाजी महाराजाना सोडावे लागले, तथापि आग्र्याहून आल्यावर त्यांनी ते किल्ले परत मिळविले. जुन्नर मात्र मोगलांकडेच राहिले.

दादोजी कोंडदेवांच्या हाताखाली तरबेज झालेल्या शिवाजी महाराजानी पुणे भागाची अर्थव्यवस्था फारच चांगली राखली. त्याच्या देखरेखीखाली पुण्याची प्रगतीच होत गेली शेतकरी वेगवेगळी पिके तर घेतच परंतु त्याचबरोबर गहू, कापूस या सारखी बाहेरून आलेली पिकेही पिकवू लागले या काळात पुण्याने समृद्धीचे दिवस पाहिले.

यानंतर संभाजी राजे व राजाराम राजे याच्या काळात पुणे भाग मोगलाच्या ताब्यात होता पुण्यातील बोरवण या भागात औरंगजेब येऊन राहिला होता. औरंगजेबाचा नातू मुहि-उल्-मुल्क हा तेथेच मरण पावला कुंभारवेशीजवळच्या दर्ग्यात त्याची कबर पहावयास मिळते. पुण्याचे 'मुहियाबाद' हे नाव त्याची आठवण म्हणून दिले गेले असावे असे म्हणतात. औरंगजेबाने इ. स १७०५ मध्ये पुरंदर घेतले व नंतर तो विजापूरकडे गेल्यावर मराठ्यानी पुणे भाग परत जिंकून घेतला औरंगजेबाने छत्रपती शाहूस-त्याच्या लग्नात जुनी सुप्याची व इंदापूरची जहागिरी आंदण म्हणून परत दिली. शाहूराजेस ताराबाईने विरोध केला खेडच्या लढाईत धनाजी जाधव शाहूराजेना मिळाला. मोगलाचे पुण्याचे सुभेदार बाळाजी विश्वनाथ भट हेही शाहूराजेना मिळाले रंभाजी निंबाळकर या निजाम-उल्-मुल्काच्या सरदाराने पुणे घेतले व तो तेथे सुमारे आठ वर्षे होता तथापि बाळाजीनी त्याचा पराभव करून पुणे परत मिळविले आणि सासवडच्या अंबाजीपंत पुरंदऱ्याच्या मदतीने सर्व व्यवस्था लावली.

इ. स. १७१४ मध्ये बाळाजी विश्वनाथ याना पेशवाई मिळाली. आणि त्यानंतर पुण्याचे महत्त्व सतत वाढतच गेले. इ स. १७४९ पासून पुणे हे मराठी राज्याचे महत्त्वाचे केंद्र बनले इ स. १७५१ मध्ये मराठी राज्य जिंकण्याच्या इच्छेने निजाम पुण्यापर्यन्त चाल करून आला होता. परंतु मराठी सैन्याने त्यास

नामोहरम केले. १७६० मध्ये उदगीर येथे झालेल्या लढाईत निजामाचा पराभव होऊन शिवनेरी किल्ला मराठ्याकडे आला. राक्षसभुवनाच्या लढाईत निजामास पुन्हा एकदा पराभव पत्करावा लागला इ. स १७६९ मध्ये जानोजी भोसले याने पुणे लुटण्याचा प्रयत्न केला परतु त्यात त्याला यश आले नाही.

बाळाजी विश्वनाथ याचे सुपुत्र बाजीराव हेही पराक्रमी होते. त्यांनी पुणे शहरातच वाडा बाधल्यामुळे पुण्याचे महत्व वाढले. मराठ्याचे सरदार पुणे जिल्ह्यातील बारामती, इदापूर, सासवड, तळेगाव याठिकाणी वाडे बाधून राहात. त्यामुळे त्या त्या ठिकाणाचे महत्व वाढत गेले. श्रीमत माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीत पुणे प्रातांचा राज्यकारभार अनेक दृष्टीने सुधारला. १८०३–४ साली मात्र मोठ्या दुष्काळाचा पुण्यास तडाखा बसला, परतु तरीही पुढील दहा वर्षात पुण्याची चागलीच वृद्धी झाली.

बाल सवाई माधवरावाचा राज्यकारभार पुरदर येथून चालत असे इ स १७७६ मध्ये इग्रज व मराठे यांच्यामध्ये पहिला तह पुरदर येथेच झाला. १७७९ मध्ये तळेगाव–वडगाव येथे मराठ्यानी इग्रजाचा पराभव केला तर खडकी–कोरेगाव येथे इग्रजानी मराठ्याचा पराभव केला. पुण्याजवळचे भोर हेही एक इतिहास प्रसिद्ध सस्थान होते. तेथील मुळ पुरुष शकराजी नारायण (पत सचिव) हे राजारामाच्या काळात प्रमुख मुत्सद्दी होते.

नोव्हेंबर १८१७ मध्ये दुसऱ्या बाजीरावाच्या पराभवानंतर पुण्यात इग्रजी अमल सुरू झाला इग्रजानी पुरदर, सिंहगड वगैरे किल्ले घेण्यास सुरवात केली व शेवटच्या बाजीरावास त्यांच्या स्वाधीन व्हावे लागले. इ. स १८१८ याच सालाने मराठेशाहीचा अस्त पाहिला. पुणे प्रांत इंग्रजाच्या ताब्यात गेल्यानतर सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यानी जुन्नर अणि शिरूर येथे सैन्यदल ठेवले. कपनी सरकारतर्फे माऊट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांची पुणे विभागाचे कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याने कॅ. एच. डी रॉबर्टसन याची पुण्याचे कलेक्टर व न्यायाधिश म्हणून नेमणूक केली. या दोघानी फार धोरणाने समाजाला खूष ठवून येथे शातता व सुरक्षितता निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले. त्यानतर इ. स १८२६ ते १८३० च्या काळात पुणे जिल्ह्यात रामोशी व कोळी लोकाची बडे झाली. उमाजी नाईक व राघू भागऱ्या याची बडे प्रसिद्ध झाली वासुदेव बळवत फडके याच्या सैन्यात पुणे जिल्ह्यातील रामोशी लोकाची सख्या खूपच होती. भाऊ खरे, चिमणाजी जाधव, नाना दरबारे यांनीही १८३९ ते ४६ या काळात इग्रजाविरुद्ध बडे केली इ. स. १८५७ च्या स्वातत्र्ययुद्धाचे पडसादही पुण्यावर थोडया फार प्रमाणात उमटले इ स १८७६ नतर पुण्यात सेंट्रल डिव्हिजन कमिशनरची कचेरी उघडण्यात आली. इ. स १८६२ मध्ये पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्ये कायदे मडळाचे पहिले अधिवेशन झाले. यानतरच्या इग्रज आमदानीत पुणे प्रांताचा राज्यकारभार फारच सुधारला.

न्यायमूर्ति रानडे, महात्मा फुले, आगरकर याच्या काळात पुणे हे सामाजिक सुधारणाचे केंद्र बनले होते. या सर्व समाज सुधारकांना पुण्यातील जुन्या मताच्या समाजाकडून विरोध पत्करावा लागला. मा लोकमान्य टिळकाच्या राजकीय क्षेत्रातील कामगिरीमुळे पुण्याचे नाव महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात दुमदुमले पुण्यातील गोखले, चिपळूणकर, सावरकर प्रभृती लोकानीही भारताच्या राजकीय जागृतीत महत्त्वाचा वाटा उचलला यानतर १९४७ साली भारतास स्वातत्र्य मिळाले.

१९४७ ते १९६० पुणे जिल्हा तत्कालीन मुबई राज्यात समाविष्ट होता. १ मे १९६० या दिवशी २६ जिल्हे असलेलें सध्याचे महाराष्ट्राचे स्वतत्र राज्य अस्तित्वात आले. पुणे हा त्यातील एक महत्त्वाचा जिल्हा आहे. शिवजयतीच्या दिवशी म्हणजे २७ एप्रिल रोजी शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळी अर्थात शिवनेरीवर महाराष्ट्र राज्य निर्मिती महोत्सव आनदाने साजरा करण्यात आला.

पुणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६,०२,७०५ चौरस मैल असून पुणे जिल्हा म्हणजे काळ्या दगडाचा भूभाग आहे. पुणे जिल्ह्याच्या पूर्वेस अहमदनगर, अग्नेयेस सोलापूर, दक्षिणेस सातारा, पश्चिमेस कुलाबा आणि वायव्येस ठाणे या महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांच्या सीमा आहेत. पुणे जिल्हा विषुववृत्तापासून १८ ते १९ अशापर्यन्त पसरलेला आहे. ७३.२५ ते ७५ रेखाशात हा जिल्हा येतो. या जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्रीच्या रागा असून त्या समुद्रसपाटीपासून सुमारे १००० ते २००० फूट उच आहेत. त्यातील काही कडे मात्र जास्तच म्हणजे ३ ते ४ हजार फूट उचीचे आहेत. उत्तर सिमेवरील हरिश्चद्रगड सर्वात जास्त उच म्हणजे ४६७० फूट उच आहे.

पुणे जिल्ह्यात शिरूर, पुरदर, दौंड, जुन्नर, इदापूर, मावळ, आंबेगाव, बारामती, वेल्हे, खेड, हवेली, मुळशी, भोर हे तेरा तालुके आहेत भू-शास्त्रीय दृष्ट्या हा भाग तसा आधुनिकच आहे कारण शास्त्रज्ञाच्या मते पृथ्वीचे वय सुमारे दोन अब्ज वर्षे आहे तर महाराष्ट्राचे वय ५ ते ७ कोटी वर्ष आहे. साहजिकच पुणे जिल्ह्याचा भूभागही ५ ते ७ कोटी वर्षे जुना म्हणजे पृथ्वीच्या मानाने आधुनिक आहे. दगडाचा एकावर एक थर बसत जाऊन हा महाराष्ट्र म्हणजे पुणे जिल्हा तयार झाला आहे या थराची जाडी सुमारे १०,००० फूट आहे पृथ्वीच्या पोटातील घडामोडीचा तसेच हजारो वर्षे ऊन, पाऊस, वारा याचा परिणाम होऊन या भागाच्या जडणघडणीत वेगवेगळ्या ठिकाणी बदल होत गेला आहे कात्रजचा घाट, मुळशीचे धरण वगैरे ठिकाणे याचेच उदाहरण म्हणून दाखविता येतील. या भागातील डोगरामध्ये जे पट्टे पट्टे दिसतात ते ही पाण्याच्या प्रवाहामुळे तयार झालेले आहेत नद्या, दऱ्या व खोरीही अशाच तऱ्हेने तयार झाली आहेत.

पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्री हा दक्षिणोत्तर पसरलेला डोंगर आहे. पुणे जिल्ह्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राचा वसती-

दाता असलेल्या या सह्याद्रीच्या उत्तर टोकास शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला 'शिवनेरी' किल्ला आहे. सह्याद्रीच्या दक्षिण टोकास असलेल्या रोहिडेश्वराची शपथ घेऊनच शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली सर्वसामान्यपणे पुणे जिल्ह्याचे तीन स्वाभाविक विभाग पडतात. पहिला भाग म्हणजे अगदी पश्चिमेकडील 'सह्याद्री' चा डोंगर व त्याच्या पूर्वेकडील थोडा भाग या भागाची दक्षिणोत्तर लांबी ८० मैल असून पूर्व-पश्चिम रुंदी १० ते १५ मैल आहे. बराच उतार असलेल्या या भागास 'मावळ' असे नाव आहे. हा भाग डोंगराळ असल्यामुळे अनेक लहान सहान नद्या व ओढे यांनी व्यापलेला आहे. या भागात पाऊस जास्त पडतो.

या नंतरची दुसरी पट्टी म्हणजे या भागाच्या पूर्वेस सुमारे १५ ते २० मैलापर्यंत पसरलेली मध्यपट्टी होय या भागात उतार सुमारे २०० ते ४०० फूटापर्यन्त आहे. या मध्यपट्टीत पावसाचे प्रमाणही मध्यम आहे साधारणपणे पाबळ, लोणी, पुरंदर अशी ही पट्टी येते उत्तरेच्या बाजूस या पट्टीची रूंदी जास्त असून दक्षिणेकडे कमी होत गेलेली आहे

या नंतरचा स्वाभाविक विभाग म्हणजे पूर्व पट्टी होय. हा भाग आग्नेयेच्या बाजूस निमूळता व उतरता होत गेलेला आहे. नरसिंगपूर हे या भागाचे म्हणजे पुणे जिल्ह्याचे पूर्व टोक आहे नीरा व भीमा यांचा संगमही येथेच झालेला आहे या पट्टीत म्हणजे पुण्यापासून नरसिंगपूरपर्यन्तच्या सुमारे ९० मैलाच्या भागात ६०० ते ८०० फूट उतार आहे. या भागात डोंगर वगैरे कमी असून जमीन सपाट आहे. ही पट्टी साधारण त्रिकोणाकृती आहे

पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना पहिला सुमारे २० मैलाचा पट्टा (पश्चिम पट्टी) त्याला लागूनच असलेला दुसरा सुमारे २० मैलाचा पट्टा, (मध्य पट्टी) व पुढे सुमारे ९० मैलाचा त्रिकोणाकृती प्रदेश यामुळे पुणे जिल्ह्याची पश्चिम–पूर्व लांबी सुमारे १३० मैल आहे दक्षिणोत्तर रूंदी पश्चिम बाजूस सुमारे ७० ते ८० मैल असून तीच पूर्व बाजूस सुमारे २० मैल आहे. त्यामुळे या जिल्ह्याच्या नकाशाचे त्रिकोणाकृती स्वरूप चटकन लक्षात यते

पुणे जिल्ह्यातील बहुतेक सर्व नद्या पूर्व वाहिनी असून त्या पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशात उगम पावून पूर्वेकडे वाहात जातात. या जिल्ह्यातील सर्वात मोठी नदी भीमा ही असून तिची लांबी सुमारे १७५ मैल आहे. भीमा नदी भीमाशंकर येथे उगम पावते व जिल्ह्याच्या मध्यभागातून वाहात जाते या नदीस फार वळणें असल्याने एकदर प्रवाहाची लांबी खूपच भरते पुणे जिल्ह्याच्या पूर्व टोकाजवळ भीमा व नीरा यांचा संगम होतो व तेथेच पुणे जिल्ह्याची सरहद्द संपते. पुणे जिल्ह्यातील सर्व नद्या शेवटी भीमेस मिळतात

यानतरची नदी नीरा ही होय. या नदीची लांबी सुमारे १२५ मैल आहे ही नदी म्हणजे पुणे जिल्ह्याची दक्षिण सरहद्द आहे. नीरेस गुंजवणी, शिवगंगा व कन्हा या उपनद्या मिळतात मुळा-मुठा नदीची लांबी सुमारे १०० मैल आहे. ही नदी पुणे जिल्ह्याच्या मध्य भागातून वाहात जावून शेवटी भीमेस मिळते. घोंड नदी ही भीमेची उपनदी असून कुकडी व मीना या जिल्ह्याच्या उत्तर भागातून वाहणाऱ्या नद्या तिच्या उपनद्या आहेत. पवना नदी मुळेला मिळते तर पुष्पावती व माडवी या नद्या कुकडीला मिळतात. इंद्रायणी नदी पश्चिमेकडील डोंगराळ भागात उगम पावून मध्यभागातून थोडी वाहात जावून भीमेस मिळते या नद्यांनी पुणे जिल्हा केवळ अन्न-धान्य दृष्टयाच सुपीक केला आहे असे नाही तर इंद्रायणी, मुळा-मुठा, कुकडी, भीमा यांनी तो ऐतिहासिक दृष्ट्या संस्मरणीय व सांस्कृतिक दृष्ट्या पावन केला आहे

पुणे जिल्ह्यातील महत्त्वाची धरणे म्हणजे नीरा नदीवरील भाटघर धरण, मुळा-मुठेवरील खडकवासले, व मुळशीचे धरण ही होत या जिल्ह्यात नैसर्गिक असा तलाव नसून मळवली–विसापूर तलाव, वेलिंग्टन तलाव व गिब्स तलाव हे कृत्रिम तलाव आहेत. भाटघर व खडकवासले धरणाच्या पाण्याचा उपयोग मुख्यतः शेतीसाठी होतो तर मुळशी धरणावर वीज निर्माण होते. कात्रज व पाषाण या दोन ठिकाणीही धरणे आहेत

पश्चिम पट्टी या स्वाभाविक विभागात म्हणजेच सह्याद्री व मावळ या भागात सर्वात जास्त पाऊस पडतो. हा भाग म्हणजेच भोर, वेल्हे, मुळशी, मावळ, खेड, आंबेगाव आणि जुन्नर हा पश्चिमेकडील तालुक्याचा डोंगराळ भाग होय या भागात वर्षभरात ४० ते २०० इंचापर्यंत पाऊस पडतो. हा पाऊस जेष्ठ ते भाद्रपद या काळात पडतो. मृगपचक व मघापचक या दहा नक्षत्रांत तो वाटला जातो. सह्याद्रीच्या माथ्यावर १२५ इंचापासून जास्त पाऊस पडत असून मृगपचकाचा पाऊस जास्त पडतो. दुसऱ्या पट्ट्यात म्हणजे साधारण माजरीपर्यन्त सुमारे २५ इंच पाऊस पडतो. या भागातही मृगपचकाचा पाऊस जास्त असून मोजपाऊसही पडतो व मागाहून वळवाचा पाऊस पडतो. यानतरच्या पूर्वपट्टीत मात्र अगदीच कमी पाऊस पडत असून तो ही मध्यपचकाचा म्हणजे वळवाचा पडतो. या भागातील दौंड, शिरूर, बारामती आणि इंदापूर या तालुक्यात कमी व अनिश्चित पाऊस पडत असल्याने नेहमीच दुष्काळास तोंड द्यावे लागते

पुणे जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे सम समजले जाते त्यातल्यात्यात पश्चिम भागात व मावळ भागात उष्णतामान कमी असते खंडाळा व लोणावळा ही या भागातील थंड हवेची ठिकाणे सुमारे दोन हजार फूटापेक्षाही जास्त उंचीवर असल्याने ही ठिकाणे उन्हाळ्यात प्रवाशांना आकर्षित करतात येथील उष्णतामान सध्या १००° पेक्षा जास्त जात नाही या नंतरच्या मध्यपट्ट्यात उष्णतामान चढते असते तरीही ते जास्तीत जास्त १५०° पर्यन्त असते. पूर्व पट्ट्यात मात्र इतर दोन पट्ट्याच्या मानाने थोडे जास्त उष्णतामान

असते हवामानाचा विचार करताना उष्णतामानाबरोबरच आर्द्रतामानही पाहणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे जेथे उष्णतामान कमी तेथे आर्द्रतामान (हवेतील बाष्पाचे प्रमाण) जास्त असते यावर अर्थात स्थानिक परिस्थितीचा म्हणजे नद्या व तळी यांचा परिणाम होतो. अशा तऱ्हेने कोकण भागात पाऊस जास्त, उष्णतामान कमी व आर्द्रतामान जास्त, मध्य भागात पाऊस, उष्णता व आर्द्रता मध्यम तर पूर्व भागात पाऊस कमी, उष्णतामान जास्त व आर्द्रतामान कमी असे या जिल्ह्यातील हवामान असते

पुणे जिल्ह्यात काळी, ताबवट, तावडी अशी वेगवेगळ्या प्रकारची जमीन आढळते. येथील जमिनीत विकास लागणारी आवश्यक द्रव्ये— चुना पोटॅश व सेन्द्रिय द्रव्ये योग्य प्रमाणात आढळतात, काही ठिकाणी जास्त पाण्यामुळे क्षार जमिनीवर येऊन जमीन निरुपयोगी झाल्याचे या जिल्ह्यात आढळून आले आहे. तथापि पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होऊ दिल्यास या जमिनी सुधारतात शिवाय अशा जमिनीचे प्रमाण कमी आहे.

नद्यांच्या काठावर मुख्यतः गाळवट जमीन आढळते. पावसाळ्यात या जमिनीतून पिक निघत नाही पावसाळा संपल्यानंतर रब्बीच्या हंगामात या भागात पिक निघू शकते. पाण्याचा पुरवठा उपलब्ध असल्याने या भागात मुख्यतः भाजीची व कलिंगडे, खरबुजे वगैरेंची लागवड करतात.

पुणे जिल्ह्यात बागाईत पिकाचे प्रमाण फारच कमी आहे. ज्वारी, भात, बाजरी, गहू, कपाशी, ऊस, भुईमूग, बटाटे ही या जिल्ह्यातील प्रमुख पिके आहेत. भोर, मुळशी, मावळ, जुन्नर व आंबेगाव या तालुक्यातील डोंगराळ भागात पाऊस भरपूर पडतो म्हणून भात हे येथील मुख्य पीक आहे. या भागात म्हणजे पठारावर काही भागात उथळ जमीन आढळते अशी जमीन फक्त २ ते ४ इंच खोल असते व त्यात सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण कमी असते काही वेळा अशा जमिनीत नुसता मुरुम असतो. अशा जमिनीत पाणी टिकवून धरण्याची शक्तीही फारच कमी असल्याने अशा जमिनीतून फारसे पीक निघत नाही. ज्यांच्या मुळ्या फार खोल जात नाहीत अशी कारळा वगैरे सारखी पिके या जमिनीत निघू शकतात.

शिरूर, दौंड, बारामती, इंदापूर या भागात पाऊस खूपच कमी पडत असल्याने रब्बी ज्वारी हेच मुख्य पिक आहे. आंबेगाव, खेड, मचर या भागात बटाट्याचे पिक महत्त्वाचे असून ते वर्षातून दोनदा घेतले जाते. हवेली, बारामती व इंदापूर भागात पाटस्थळाखालील जमिनीत ऊस पिकविला जातो जिल्ह्यातील सर्व भागात बाजरी, कपाशी, कडधान्ये वगैरे पिके कमी अधिक प्रमाणात घेतली जातात.

पुणे जिल्हा जंगलाच्या वाढीसाठी फारसा उपयुक्त नाही. जिल्ह्याच्या पश्चिम भागात पाऊस जास्त पडत असला तरी हा भाग डोंगराळ असल्याने मोठमोठ्या झाडांची वाढ होऊ शकत नाही तरीही पुणे जिल्ह्यात जी काही थोडीफार जंगले आहेत ती याच भागात आहेत. या भागात असलेल्या जंगलातून हिरडा, आपटा-जांभळी, पिसा, शिकेकाई, मोहेऐन, भेंडा या जातीची झाडे आढळतात भीमाशंकराचे आसपास व आंबेगाव तालुक्यात वरील झाडे प्रामुख्याने आहेत. भोर जवळही थोडे जंगल आढळते, आर्वीच्या डोंगराच्या दोन्ही बाजूस व सिंहगडाच्या पायथ्याशी थोड्या प्रमाणात जंगल आहे जिल्ह्याच्या मध्य भागात लिंबू, बाभूळ, आंबा, चिंच, वड, पिंपळ ही झाडे आढळतात. अशी झाडे मुख्यत सुद्दाम लागवड केल्यामुळे आलेली असतात पूर्व भागात झाडांची संख्या खूपच कमी असून मैलच्या मैल उजाड माळरान आढळून येते. जंगलाच्या कमतरतेमुळे चांगले इमारती लाकूड, ब्राह्मी वगैरे उत्पन्न या जिल्ह्यातून मिळत नाही विरळ जंगलामुळे या जिल्ह्यामध्ये हिंस्त्र जनावरेही फारशी नाहीत क्वचितच लोणावळा, खंडाळा, भीमाशंकर या भागात वाघ दिसतात. रानडुक्कर, तरस, लांडगा, कोल्हा, खोकड, मुंगूस, ससा, साबर, चितळ, हरण, भेकर हे छोटे वन्यपशु अधून मधून दिसतात

नैसर्गिक संपत्तीच्या दृष्टीने विचार करता या जिल्ह्यात खनिज पदार्थही मोठ्या प्रमाणात सापडत नाहीत. पूर्व भागात चुना खडी आणि जिप्सम आढळते येथील खाणीत सापडणारा हिरवट, काळा आणि करड्या रंगाचा दगड टिकाऊ, कठिण व भक्कम असल्याने इमारतीच्या बांधकामात त्याचा उपयोग होतो.

या जिल्ह्याच्या डोंगराळ भागात आदिवासी, ठाकर, महादेव कोळी वगैरे जातींचे लोक रहातात अपुरी जमीन व मर्यादित उद्योग यांच्यामुळे हे लोक गरीब आहेत. बाकी बहुसंख्य मराठी समाज शेतीवर अवलंबून आहे.

धोतर, लांब कोट, डोक्यावर लाल पगडी व पायात जोडा असा पुण्याच्या लोकांचा साधारणपणे ६० वर्षांपूर्वीचा पोषाख होता. स्त्रिया इरकली लुगडे व कटकीच्या चोळ्या वापरीत असत आता मात्र असा पोशाख इतिहास जमा होत असून कालमानाप्रमाणे पोशाखात बदल होत आहे. या जिल्ह्यात मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे प्रमाण साहजिकच सर्वाधिक आहे. पुणेरी मराठी जास्त शुद्ध समजण्यात येते

जिल्ह्यात भीमाशंकर येथे महाशिवरात्रीस श्री शंकराची यात्रा, जेजुरी येथे चैत्र शुद्ध पौर्णिमेस खंडोबाची जत्रा, आळंदी येथे कार्तिक वद्य एकादशीस संत ज्ञानेश्वराची यात्रा, व देहू येथे फाल्गुन वद्य द्वितीयेस संत तुकाराम महाराजांची यात्रा या प्रमुख यात्रा भरतात. या शिवाय चैत्र व वैशाख महिन्यात तर साधारणपणे प्रत्येक गावात जत्रा असते

या शिवाय खरेदी विक्री संघ, सहकारी सोसायट्या, प्राथमिक शाळा, शेतकी शाळा, सरकारी दवाखाने, पोस्ट ऑफिसेस इत्यादी सरकारी सोयी जिल्ह्यात अनेक ठिकाणी उपलब्ध आहेतच.

*With Best Compliments From* —

# QUALITY STEEL CASTINGS

45, Dr. Ambedkar Road, Poone-411 001.

*Manufacturers of*

Spares Components for shot Blasting Machines of various makes

**Stainless Steel Onions for Dairies, Pharmaceuticals etc.**

Alloy Steel Castings
Heat Resistant Steel Castings
Wear Abrasion Resistant Castings

Up to 160 kgs. a piece

# उद्यान कार्यालय

१७१२/१-बी, सदाशिव पेठ, पुणे-३०

व्रतबंध - विवाहादि मंगल कार्ये करणारी

भव्य समागृह : अतिथि निवास

या अत्याधुनिक सोयी असलेली

## पुण्यातील सुसज्ज व प्रचंड वास्तु

टेलिफोन ४४२ ४४१

तारेचा पत्ता कार्योद्यान

'भारत वैभव' मासिकाच्या पुणे जिल्हा विशेषांकास

## हार्दिक शुभेच्छा !

विश्वप्रसिद्ध

बिस्किट, कोको व चॉकोलेटचे निर्माते

# साठे बिस्किट आणि चॉकोलेट कं. लि.

८२०, भवानी पेठ, पुणे - ४११ ००२.

PHONE 22158

ग्राम-बिस्किट, पुणे [बी]



मु-द-क-बी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

पुणे जिल्ह्यातील निरनिराळ्या भागांनी विविध ऐतिहासिक, साहित्यिक व शिल्पकलात्मक भूषणे डौलाने ल्यालेली आहेत. याच परिसरातील आळंदी व देहू संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व वैराग्यशील तुकाराम महाराजांचे दर्शन घडवितात. तर शिवनेरी, सिंहगड, पुरंदर, राजमाची, तोरणा हे किल्ले शिव छत्रपतींचा इतिहास कथन करतात भेडसे, भाजे, कार्ले येथील लेणी प्राचीन 'काळच्या उत्कृष्ट शिल्पकलेची व वैभवाची साक्ष पटवितात थेऊर, लेण्याद्री, रांजणगाव मोरगाव, सिद्धटेक, जेजुरी, नागेश्वर ही ठिकाणे, हा जिल्हा गणेश भक्तांचा आहे हे सुचवितात शिवाजी महाराजांपासून ते लोकमान्य टिळकांपर्यंतच्या भारताच्या इतिहासाचे धागेदोरे पुण्यातच उलगडतात मोरया गोसावींचे चिंचवड, चंडीराम बुवाचे खेड, रामेश्वर भट्टाचे वाघोली येथील वैराग्याची परंपरा सांगतात. शिल्पकलेचे, पराक्रमाचे, वैराग्याचे, भक्तीचे, साहित्याचे असे सर्वांगिण दर्शन हा सांस्कृतिक दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असलेला जिल्हा घडवितो.

## पुणे जिल्हा परिषद

पुणे जिल्ह्यातील पंचायत राज्याची १ मे १९६२ रोजी सुरवात झाली. त्याच दिवशी मुंबई लोकल बोर्ड (१९२३) अधिनियम रद्द झाले. व १ मे १९६२ पासून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (१९६१) या नवीन अधिनियमाची अमलबजावणी महाराष्ट्र राज्यात सुरू झाली. नवीन अधिनियमाप्रमाणे राज्यात असलेली जिल्हा लोकल बोर्ड रद्द झाली व जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्या. आधीची जिल्हा विकास मंडळे व जिल्हा स्कूल बोर्ड हेही जिल्हा परिषदेत समाविष्ट झाले. या नवीन अधिनियमान्वये जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद व तालुका पातळीवर पंचायत समित्यांची स्थापना झाली. स्थानिक नेतृत्वाला वाव देणे व सत्तेचे जास्तीतजास्त विकेंद्रीकरण करून सत्ता जास्तीतजास्त लोकाभिमुख करणे हाच या कायद्यामागील मुळ हेतु होय. पुणे जिल्हा परिषदेचे कार्यक्षेत्र संपूर्ण पुणे जिल्हा असून त्यातून महानगरपालिका कन्टोनमेंट बोर्ड व इतर नगरपालिका वगळण्यात आल्या आहेत जिल्हा परिषद सभासदातील काही सभासद प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेले असतात. काहींची त्यावर नियुक्ती केलेली असते, काही सहकारी संस्थांचे अध्यक्ष असतात तर काही पदसिद्ध असतात. परिषदेच्या कामकाजाच्या सोयीकरता एक स्थायी समिती बांधकाम समिती, शिक्षण समिती, अर्थ समिती, आरोग्य समिती, कृषि समिती, सहकार समिती अशा अनेक समित्या आहेत पुणे जिल्ह्यात हवेली, खेड, बारामती, इंदापूर, मावळ, मुळशी, भोर, वेल्हे, शिरुर, आंबेगाव, जुन्नर, पुरंदर व दौंड अशा एकूण तेरा पंचायत समित्या आहेत पुणे जिल्हा परिषदेने आत्तापर्यंत कृषि, पशुसंवर्धन, जंगल, समाज कल्याण, शिक्षण, वैद्यकिय, आयुर्वेद, सार्वजनिक आरोग्य, इमारती व दळणवळण, इंजिनिअरिंग कामे, पाटबंधारे, उद्योग धंदे, कुटीरोद्योग, सहकार, समाजविकास, समाजशिक्षण इ. विषयात उत्कृष्ट कार्य केलेले असून जिल्हा महाराष्ट्रात प्रगतीपथावर ठेवलेला आहे

## पुणे शहर

ऐतिहासिक, भौगोलीक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, इतिहासाला बदलण्याचे किंवा कलाटणी देण्याचे सामर्थ्य जगातील ज्या काही शहरांना लाभले आहे त्यातील एक अग्रगण्य शहर म्हणजे पुणे· वैभवशाली पुण्याचा इतिहासही वैभवशालीच!

इ स ६१३ च्या सुमारास अगदी लहानशा खेड्याच्या स्वरुपात असलेल्या पुण्यात दोन ब्राम्हणांची, काही कोळ्यांची व काही इतर अशी एकूण १५।१६ घरे होती. अल्लाउद्दीन खिलजीने एकदा या शहरावर स्वारी करून ते लुटले. (इ स. १२९४ सुमारे)

शहाजी राजे यांच्या ताब्यात पुणे जेव्हा जहागिरीच्या स्वरुपात होते तेव्हाचे पुणे म्हणजे हल्लीची कसबापेठ. शहाजी राजे नंतर शिवरायाच्या आमदानीत त्यांच्या तेथील वास्तव्यामुळे पुण्याचे राजकीय महत्व वाढले शनिवारवाड्याजवळ सध्याची जिजामाता बाग जेथे आहे तेथे असलेल्या लालमहालात शिवरायांचे वास्तव्य असे. त्या वेळी पुण्याच्या सभोवताली असलेली तटबंदी आदिलशाहीचा प्रधान मुरारजी जगदेव याने उध्वस्त केली.

इ. स. १७३५ मध्ये पुणे ही मराठी साम्राज्याची राजधानी करण्यात आली. इ.स. १७३२ मध्ये शनिवार वाडा बांधला गेला पेशव्यांच्या काळात विश्रामबागवाडा, बुधवारवाडा वगैरे इमारती बांधण्यात आल्या. पेशव्यांनी पुण्याच्या आसपास अनेक रमणीय स्थळे व उद्याने निर्माण करून पुण्याच्या निसर्ग सौंदर्यात भर घातली. १७६४ साली पुण्यात स्वतंत्र कोतवाल खाते उघडण्यात आले. यानंतर आलेल्या प्रत्येक पेशव्याने आणि मुत्सद्यांनी पुण्याच्या वैभवात भरच घातली. शेवटच्या बाजीरावाने पुणे सोडल्यानंतर मात्र पुण्याच्या वैभवास उतरती कळा लागली शिंदे-होळकर हे मराठी सरदार जरी अधुनमधुन पुण्यास भेट देत असले तरी त्यांच्या आगमनाने पुणे गजबजेनासे झाले. इ स १८१८ मध्ये पुणे ब्रिटिशांच्या ताब्यात गेले. त्यानंतरचा इतिहास म्हणजे चिपळूणकर, म फुले, लोकहितवादी, रानडे, आगरकर, गोखले, लो टिळक यांच्या कामगिरीचा इतिहास होय.

धोंडो केशव कर्वे यांनी स्थापन केलेली हिंगणे येथील स्त्रीशिक्षण संस्था, म. फुले यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज व दीनबंधू पत्र, टिळक यांचे केसरी व आगरकर यांचे सुधारक ही वर्तमानपत्रे याद्वारे पुण्यात सुधारणावादी विचाराचा पुरस्कार केला गेला.

आगाखान पॅलेसमध्ये म गांधी यांनी केलेला उपवास, श्री. महादेवभाई देसाई व पूज्य कस्तुरबा यांचे तेथे झालेले देहावसान या भारताच्या इतिहासातील महत्वाच्या गोष्टींना साक्ष पुणेच आहे.

शिक्षण, दळण वळण व व्यापार या दृष्टीनेही पुण्याची खूपच प्रगती झाली आहे व होत आहे. 'शिक्षणाचे माहेरघर हा मान पुण्याने केव्हाच मिळविला आहे. सध्या पुण्यात बहुतेक सर्व प्रकारची

## आमची नवीन प्रकाशने

| | किंमत |
|---|---|
| समर्थ व्हा, सपन्न व्हा. लेखक यदुनाथ थत्ते | ४–०० |
| वैमानिक काबाळी लेखक गजानन श खोले | ८–०० |
| दक्षिणेतील यक्षभूमि लेखक श्रीपाद जोशी | १२–०० |
| गुणसागर टिळक लेखक : ह. त्र्य देसाई | ९–०० |
| रशियन लोककथा लेखक सौ मालतीबाई दाडेकर | ९–०० |
| घडविले तयाना माऊलींनी लेखक : गजानन श खोले | १०–०० |

| | किंमत |
|---|---|
| गीतेचा दृष्टीकोण–स्वभाव सुधारण्याचा मार्ग लेखक डॉ. ग. श्री खैर | १०–०० |
| स्वास्थ्यासाठी निवडक योगासने लेखक ल. नी. छापेकर, कृ उ. कुलकर्णी | ७-०० |
| समर्थ रामदास, नदादीप नव्हे दीपस्तंभ लेखक : द्वा. पा. केळकर | ९–०० |

लिहा अगर भेटा

**पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन**

१७८६, सदाशिव पेठ, पुणे–४११ ०३०.

---

TEL. : 82312

*With Best Compliments From*

# Poona Pressings Private Limited

PLOT No. S-50, BHOSARI, POONE-411026

FILTERS   SHIMS   PRESS PARTS

Regd. Office : 39/39, Erandavana, Prabhat Road,
Lane No. 9-C, Poone-411026.
Tel. : 56251.

---

PHONE. 83793

*With Best Compliments From —*

# ANANT ENGINEERING WORKS

Plot No. 31, 'S' Block, Bhosari, Poone-26.

*SPECIALISTS IN*

**Non-Ferrous Castings**




मु– द–क–मी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

महाविद्यालये व अनेक शाळा आहेत. या शिवाय पुणे विद्यापीठ, नॅशनल केमिकल लॅबोरेटरीज, खडकवासला येथील लष्करी शिक्षण केंद्र, वानवडी येथील आर्मड् फोर्सेस मेडिकल कॉलेज, दापोडी येथील सिव्हिल मिलिटरी इंजिनिअरींग (सी. एम. ई.) कॉलेज या महत्वाच्या संस्था पुण्याची शैक्षणिक प्रगती दाखवितात त्याबद्दलची अधिक माहिती पुढे पहावयास मिळेलच

पुणे शहराच्या इतिहासातील संस्मरणीय गोष्ट म्हणजे १२ जुलै १९६१ रोजी आलेला पूर होय या दिवशी पानशेत धरण फुटल्यामुळे शहरावर फार मोठी आपत्ती ओढवली. अनेक लोक बेघर झाले. हजारो घरे पडली नवी पेठ, नारायण पेठ, बुधवार पेठ, शनिवार पेठ, कसबा पेठ, मंगळवार पेठ, सोमवार पेठ, डेक्कन जिमखाना, कर्वे रोड, शिवाजी नगर हे नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर असलेले भाग अक्षरशः उध्वस्त झाले खडकवासला तलाव फुटल्याने शहराचा पाणी पुरवठा बंद पडला, वीजपुरवठाही बंद पडला. या आपत्तीला तोंड देण्यासाठी सरकारनेही पुणेकराना खूप मदत केली. पुरग्रस्तासाठी चतु श्रृंगी, एरंडवणा, येरवडा या भागात वसाहती स्थापन झाल्या मात्र या आपत्तीनंतर पुण्याचा औद्योगिक विकास खूपच वेगाने होत गेला.

सध्या औद्योगिक दृष्ट्या पुणे झपाट्याने वाढले आहे, पुणे परिसरात अनेक औद्योगिक वसाहतींचे जाळेच पसरले आहे. हडपसर, गुलटेकडी मुंढवा, एरंडवणा, कोथरूड, भोसरी, खडकी, दापोडी, पिंपरी, चिंचवड, या भागात सर्वत्र कारखानेच कारखाने दिसतात वाढत्या उद्योग धंद्यांमुळे साहजिकच पुण्याची लोकसंख्याही खूपच वाढली आहे. पिंपरी येथील पेनिसिलिनचा कारखाना, अेरोड्रम, ब्रॉडकास्टिंग स्टेशन, दापोडी येथील वर्कशॉप, आकाशवाणी केंद्र या गोष्टी औद्योगिक प्रगतीस हातभारच लावित आहेत.

पुणे शहर सर्व बाजूंनी इतके वाढलेले आहे की पर्वती, पुणे विद्यापीठ ही शहराच्या टोकाला असलेली ठिकाणे पुणे शहराच्या मध्यावर आलेली आहेत २६ ऑगस्ट १९६७ रोजी पुणे येथे पुणे महानगर प्रादेशिक नगर रचना मंडळाची स्थापना झालेली आहे पूना मेट्रोपॉलिटन रिजन मध्ये ६२० मैल (१६५६ चौ. कि. मी.) चे क्षेत्र समाविष्ट केलेले असून त्यात सुमारे १२७ गावे येतात. अनेक पेठांचे बनलेले पुणे शहर खरोखरीच प्रेक्षणीय आहे

## कसबा पेठ

प्राचिन पुणे फक्त कसबा पेठेपर्यंत मर्यादित होते मुसलमानी अमलात ही पेठ वसली. या पेठेत गणपतीचे देऊळ आहे. या गणपतीबद्दल एक आख्यायिका आहे येथील पटांगणात पूर्वी ओढा वाहात असे. व त्याच्या काठी गुराखी गुरे चारण्यास येत असत. एक दिवस एका गुराख्याला तेथे एक गणपतीची कोरलेली मूर्ति दिसली व तिची तो भक्तिभावे पूजा करु लागला लोकानी तेथे एक देऊळ बांधले. पुढे राजमाता जिजाबाईंनी देवाचा मंडप व गाभारा बांधून दिला व नैवेद्य वगैरे करिता वार्षिक ७५ रु. ची नेमणूक करून दिली या भागात पूर्वी उत्तम हस्तीदंती फण्या, कंगवे, फासे वगैरे तयार केले जात. त्या वेळी या गणपतीस फणीआळीचा गणपती असे म्हणत. आता तो व्यवसायही राहिला नाही व ते नावही राहिले नाही

कै राम गणेश गडकरी हे कसबा पेठेतच घर नं. ८७ येथे राहात असत. फणीआळी तालमीजवळ हा तीन मजली वाडा अजूनही दिसतो या पेठेतूनच 'राम गणेश गडकरी' पथ निघतो.

या पेठेतील 'अंबरखाना' हा वाडा शहाजीराजे भोसले यांनी इ स. १६३६ मध्ये बांधला. या वाड्यातील राजमहालात राजमाता जिजाबाई व श्रीशिवाजीराजे राहात असत. या वाड्यात शिवरायांच्या बालपणातील बरीच वर्षे गेली व येथेच त्यांना दादोजी कोंडदेवाकडून शिक्षण मिळाले. याच वाड्यात शाहिस्तेखानाची फजिती झाली लालमहाल या भागात सध्या जिजामाता बाग वसविलेली आहे.

मुठा नदीवरील शेखसल्ल्याच्या दर्ग्यात थोरला शेखसल्ला व धाकटा शेखसल्ला अशी दोन थडगी आहेत येथे पूर्वी नारायणेश्वर व पुण्येश्वर अशी दोन देवळे होती. इ. स १२९० मध्ये दिल्लीहून आलेल्या हिस्सा मोहिद्दीन कलाल नावाच्या फकीराने ही देवळे पाडून मशिद बांधली मुसलमानी राजाकडून या फकिरास येरंडवणे व कळस ही दोन गावे इनाम मिळालेली होती. पुढे मराठी राज्यकर्त्यांनी ती काढून घेतली औरंगजेबाचा नातू मोहि उल मुल्क याचे थडगे धाकट्या शेखसल्याचे दर्ग्यात आहे.

## सोमवार पेठ

सोमवार पेठेचे पूर्वीचे नाव शहापुरा असे होते. त्यावेळी येथे धनिक गोसावी लोकांची वस्ती होती. आता मात्र येथील लोक फारसे श्रीमंत नाहीत. या पेठेत नागेश्वराचे प्राचीन बांधणीचे देऊळ आहे आबा शालुकर यांनी एक लक्ष रुपये खर्चून या मंदिराचा जिर्णोद्धार केला या पेठेतील श्रीविष्णूचे देऊळ नरपतगीर किसनगीर यांनी स्थापन केले आहे. येथील हौद व कारंजे प्रेक्षणीय आहे. येथे सोमवार बाग म्हणजेच छत्रपती शाहू उद्यान आहे या बागेत २०० माणसांना एका वेळी पोहता येईल असा मोठा तलाव आहे याची लांबी ११०' व रूंदी '५०' आहे. या तलावात पाणी शुद्ध करण्याचीही सोय आहे

## मंगळवार पेठ

औरंगजेबाने पाठविलेला शाहिस्तेखान हा मोगल सरदार इ. स. १६६२ मध्ये शिवाजीमहाराजावर चालून आला होता त्याने येथे तळ दिला होता व ही पेठ स्वतःच्या स्मरणार्थ वसविली, म्हणून या

*With Best Compliments From*

# PAPER & PULP CONVERSIONS LIMITED

1183, SHIVAJINAGAR
FERGUSSON COLLEGE ROAD,
PUNE-411 005.

***INDIA***

पेठेचे पूर्वीचे नाव शाहिस्तेपुरा असे होते येथे पूर्वी शहराचा मुख्य बाजार भरत असे. आता मात्र येथे फक्त सरपण, गवत व कडबा याचा बाजार भरतो पानशेत पुरात या पेठेचे खूपच नुकसान झाले. पुणे महानगरपालिकेचे कमला नेहरू रुग्णालयही येथेच आहे. हेच पूर्वीचे प्रसिद्ध सेन्ट मार्गारेट हॉस्पीटल होय स्त्रियांसाठी सर्व साधनांनी युक्त असे हे हॉस्पीटल आहे

## बुधवार पेठ

इ स १६९० मध्ये औरंगजेबाने मोहिताबाद या नावाने ही पेठ वसविली. थोरले माधवराव पेशवे याच्या कारकिर्दीत खाजगीवाले यानी या पेठेचे पुनरुज्जीवन केले व या पेठेचे नाव बुधवार पेठ असे ठेवले शहराचा मुख्य व्यापार जेथे चालतो ती ही पेठ शहराच्या मध्यावर आहे. पेठेत दोन्ही बाजूनी दुकाने असून ही पेठ सकाळ सध्याकाळ गजबजलेली असते. या पेठेतील बेलबागेत विष्णुचे सुदर देऊळ आहे. ते नाना फडणविसांनी बाधलेले आहे येथे पूर्वी बेलाची झाडे होती म्हणून या भागास बेलबाग हे नाव पडले. येथे पूर्वी पेशव्याचे तबेले असत बुधवार पेठेतच पुण्यातील एक ग्रामदेवता श्रीजोगेश्वरीचे प्राचीन देवालय आहे तेथे नेहमी भाविक स्त्रीपुरुषाची गर्दी असते. जोगेश्वरीच्या बोळात पूर्वी श्रीगणपती मदिर होते आता ते तेथून जवळच हलविले आहे जिजामाता बागेपासून निघून पुढे रविवारात निघणारा गणेश रोड याच पेठेतून जातो. गणेश पेठ गेटाजवळ सुरु होऊन सभाजीपूल गेटापर्यंत जाणारा पुण्यातील प्रसिद्ध लक्ष्मी रोड याच पेठेतून जातो या रोडवर सर्व प्रकारची दुकाने असल्यामुळे हा रस्ताही रहदारीने आणि वाहनानी गजबजलेला असतो सिटी पोस्ट ऑफीस, गोखले स्मारक–मदिर, कॉमनवेल्थ विमा कपनीची इमारत ए सो (हुजुरपागा) ची सरस्वती विलास बिल्डींग, महाराष्ट्र वर्क्स, सेवासदन सोसायटीची इमारत या प्रमुख इमारती या पेठेत आहेत. सराफी, कापड, स्टेशनरी इत्यादीची मोठमोठी दुकाने व बँका, इन्शुरन्स कपनी यामुळे या रस्त्याला खूपच महत्व प्राप्त झाले आहे.

नानावाडा, नूतन मराठी विद्यालय, कै शेट दगडू हलवाई दत्तमदिर व बालाजी मदिर ही या पेठेतील इतर महत्वाची व प्रेक्षणीय स्थळे आहेत

## वेताळ पेठ (गुरुवार पेठ)

गुरुवार पेठ हे या पेठेचे पूर्वीचे नाव असून सध्या ती वेताळ पेठ या नावाने ओळखली जाते श्रीमत नानासाहेब पेशवे याचे कारकिर्दीत शिवाजीपत खाजगीवाले यानी ही पेठ वसविली येथे सोनार लोकांची जास्त वस्ती आहे. या पेठेतील वेताळाच्या मदिरामुळे या पेठेस वेताळपेठ हे नाव पडले. या मदिरात वेताळाची शेंदूर लावलेली मोठी व ओबडधोबड मूर्ति आहे एका कोपऱ्यात वेताळाच्या पादुका असून जवळच्या कोनाड्यात नदादीप जळत असतो. शुक्रवार या वेताळाच्या दिवशी या मदिरात गर्दी होते. या मदिरातील घटेबद्दल नवसासबधीची एक गोष्ट सागितली जाते पेशव्यानी जेव्हा तोफा ओतल्या तेव्हा 'आम्ही देवळात घटा बाधू आमच्या तोफा उत्तम होऊ देत' असा वेताळास नवस केला होता. पेशव्याच्या तोफा अपेक्षेप्रमाणे उत्तम झाल्या व पेशव्यानी वेताळाच्या देवळात ही घटा बाधली

तसेच जैन लोकानी शकराचार्यांची व पेशवे सरकारची परवानगी घेऊन या पेठेत एक पारसनाथाचे मदिर बाधले आहे. मदिराच सभोवती तट आहे व बदोबस्तही कडक आहे त्यामुळे हे मदिर चटकन लक्षात येत नाही.

## शुक्रवार पेठ


शुक्रवार पेठ ही सर्वात मोठी पेठ असून फुले–मार्केट व तुळशीबाग ही ठिकाणे याच पेठेत येतात. बाळाजी बाजीराव याच्या काळात शिवाजीपत खाजगीवाले यानी ही पेठ वसविली. 'तुळशीबाग' हे प्रेक्षणीय राममदिर नानासाहेब पेशवे यानी बाधलेले आहे. 'तुळशीबाग' या नावावरुनच पूर्वी येथे तुळशीची मोठी बाग असणार हे लक्षात येते. आता मात्र तेथे अशी बाग नाही शुक्रवार पेठेत असलेले मार्केट इ स. १८८५ साली सुमारे २ लक्ष रु. खर्चून बाधण्यात आलेले आहे या मार्केटची मध्यावर असलेली मुख्य इमारत गोलाकार असून मागील बाजूस ओटच्यावर दुकाने आहेत. या जुन्या मार्केटच्या मागील पटांगणात पुणे महानगरपालिकेने इ. स. १९६७ साली सुमारे दहा लाख रु. खर्चून मडईची नवीन इमारत बाधली आहे. ठहाणे दुकानाची सोय असलेल्या या मडईची इमारतही प्रशस्त व सर्वदृष्टीने सोयीची आहे या विस्तिर्ण अशा महात्मा फुले मार्केटमुळे शुक्रवार पेठेचे महत्व वाढले आहे. यासच रे मार्केट किवा नवी मडई असेही म्हणतात

सार्वजनिक काका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गणेश वासुदेव जोशी यानी इ स. १८७० मध्ये या पेठेत सार्वजनिक सभा स्थापन केली व त्यातर्फे इमारत बाधली त्यावेळी प्रजेचे मत इग्रज सरकारच्या कानावर घालण्याच्या राजकीय उद्देशाने स्थापन झालेल्या या सभेच्या दिवाणखान्यात हल्ली निरनिराळ्या सभा भरतात गाडीखाना येथील क्षयरोग प्रतिबधक उपचार केंद्रात बी. सी जी. ची लस टोचण्यात येते व महारोग, कातडीचे रोग यावरही उपचार केले जातात. कुत्रे चावल्यावर 'अँन्टी रॅबिक' व्हॅक्सिन देऊन उपचार केले जातात.

## शनिवार पेठ

शनिवार वाड्यामुळे ही शनिवार पेठ इतिहासात अजरामर झाली आहे. याशिवाय अमृतेश्वराचे देऊळ, ओंकारेश्वराचे देऊळ, व पाजर पोळ ही प्रेक्षणिय स्थळे या पेठेत आहेत सुमारे सतराव्या

With Best Compliments From :-



# M/s. BHARAT PRECISION WORKS

GANESH BAUG, MUNDHWA, PUNE.

*EXPERIENCED IN HIGHLY PRECISIONED TOOL ROOM & TURNING, GRINDING, MILLING JOBS & FABRICATION WORKS.*

PHONE : 77 06



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

शतकात मुसलमानांनी 'मुर्जुंदाबाद' या नावाने ही पेठ वसविली पुढे श्रीमत बाजीराव पेशवे यानी या पेठेस शनिवार पेठ हे नाव दिले.

पेशव्यांचे राहण्याचे ठिकाण असल्यामुळे शनिवार वाडा इतिहासात प्रसिद्ध झाला आहे. मराठी साम्राज्याची सुत्रे काही काळ याच वाड्यातून हलली. अनेक मोठमोठ्या स्वाऱ्याचे मनसुबे याच वाड्यात रचले गेले. मराठी सत्तेचे वैभवही याच वाड्याने पाहिले. छत्रपती शाहू महाराजांच्या आज्ञेवरुन या वाड्याचे बांधकाम झाले. शाहू महाराजांचे उजवे हात असलेले पराक्रमी थोरले बाजीराव पेशवे याना शाहू महाराजांनी आपणास योग्य वाटेल अशा स्थळी वाडा बांधून रहावे अशी आज्ञा केली. थोरले बाजीराव यानी हीच जागा शनिवार वाड्यासाठी का निवडली या पाठीमागेही एक उद्बोधक व गमतीदार गोष्ट सांगितली जाते

थोरले बाजीराव पेशवे एक दिवस घोड्यावरून रपेट करीत असताना या ठिकाणी आले. येथे त्याना एक सृष्टी नियमांविरुद्ध चाललेला चमत्कार दिसला. एक ससा कुत्र्याचा पाठलाग करीत होता व कुत्रा जीव तोडून पळत होता अखेरीस सशाने कुत्र्याला पकडले व चीत पाडले. त्या सशाचे शौर्य पाहून बाजीराव स्तभीतच झाले व त्यानी मनाशी विचार केला की आपल्यालाही मोगल बादशहासारख्या बलाढ्य शत्रुशी युद्ध करायचे आहे ज्या जागेत सशासारख्या लहानशा प्राण्याला कुत्र्याला नामोहरम करण्यात यश मिळाले ती जागा आपल्यालाही यश देईल या विचाराने त्यांनी वाड्यासाठी हीच जागा मुक्रर केली.

१० जानेवारी १७३० रोजी या बांधकामास सुरवात झाली व दोन वर्षात हे बांधकाम पूर्ण झाले. हा वाडा बांधण्यास १६११० रु खर्च आला. त्यावेळी हा भव्य वाडा तीन चौकी व दुमजली होता. सवाई माधवरावांच्या वेळेस मुख्य इमारत सहा मजली होती सुमारे ५ एकर जागेत हा वाडा बांधण्यात आलेला आहे या वाड्याच्या तटास दिल्ली दरवाजा, गणेश दरवाजा, मस्तानी दरवाजा, खिडकी दरवाजा व जांभूळ दरवाजा असे पाच दरवाजे आहेत. तटास दोनशे फूट लांबीच्या दोन व दिडशे फुट लांबीच्या दोन अशा एकूण चार भिंती आहेत. तटास असलेल्या नऊ बुरुजापैकी चार चारी कोपऱ्यात व पाच तटाच्या भिंतीत आहेत. तटाची उंची २० फुट आहे. वाड्यातील दिवाणखान्यास सुंदर नक्षीकाम केलेले आहे पुणे महानगरपालिकेने या वाड्यासमोरील पटांगणात कलात्मक व नक्षीदार कारंजे बसविलेले आहेत.

या पेठेतच फार प्राचिन असे दगडी शंकराचे मदीर म्हणजेच ओंकारेश्वराचे मदीर आहे. पानशेत पुरामळे या मदीराची बरीच पडझड झालेली आहे. येथुन जवळच ओंकारेश्वर स्मशानभूमि असून तेथे कै. अण्णासाहेब पटवर्धन यांची समाधी आहे. नदीकिनाऱ्यावर असलेले हे देऊळ प्रेक्षणीय आहे.

थोरले बाजीराव यांची बहीण भिऊबाई हिने बांधलेले शंकराचे मदीर म्हणजेच अमृतेश्वराचे देऊळही याच पेठेत आहे.

शनिवारवाड्या समोरच भारतीय स्वातंत्र्ययुद्धात बलिदान केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ पुणे महानगरपालिकेने उभा केलेला हुतात्मा स्तभ आहे. ८ आक्टोबर १९६२ रोजी हा स्तंभ उभा करण्यात आला आहे. इ. स. १८५४ साली धनिक लोकानी बांधलेल्या पांजरपोळात निराश्रीत, लुळे पांगळे पशु–पक्षी पाळण्यात येतात

## रविवार पेठ

या पेठेचे पूर्वीचे नांव 'मालकमपुरा' असे होते. बाळाजी बाजीराव याच्या कारकिर्दीत महाजन व्यवहारे जोशी यानी ही पेठ वसविली. या पेठेतील मोती चौकात सराफ आळी आहे. तेथे सोने, चांदी, मोती, जवाहीर याची दुकाने व पेढ्या आहेत. तांब्या-पितळेच्या भांड्याची, लोखंडी सामानाची व इतर सर्व प्रकारची घाऊक विक्रीची दुकाने या पेठेत असल्यामुळे ही पेठ म्हणजे पुण्यातील व्यापाऱ्याचे एक केंद्र आहे सरदार नारायणराव नातू यांनी बांधलेले सोमेश्वराचे देऊळ हे या पेठेतील एक प्रेक्षणीय स्थळ आहे. इ. स. १८३० साली हे देऊळ बांधलेले असून मदिराचा गाभारा शुद्ध काळ्या दगडाचा आहे. त्यापुढे पाच खणी सभामंडप व दोन्ही बाजूस सोपे आहेत. मध्ये असलेल्या हौदातील पाण्यावर दरवर्षी कार्तिक पौर्णिमेस फुलाचे उत्तम नक्षीदार गालीचे काढले जातात कार्तिक महिन्यातच येथे फार मोठी यात्रा भरते देवळाच्या आजुबाजूस असणाऱ्या दुकानदारानी आपापसात वर्गणी काढून मदीराचा जीर्णोद्धार केला आहे

दारुवाला पुलाजवळ श्री वल्लभ सांप्रदायी लोकांचे विठ्ठल मदीर असून या मदिरातील मूर्ति पोरबदराहून आणलेली आहे. सवत् १९२४ मध्ये शेट हरीभाई देवराम याचे वशज नानाभाई यानी हे मदीर बांधले आहे.

पुण्यातील सर्वात मोठी जुम्मा मशीद याच पेठेत आहे १५००० रु. वर्गणी जमवून ही मशीद बांधण्यात आलेली आहे या मशिदीसमोर सुंदर कारंजे व मोठा हौद असून मशिदीत मध्यभागी प्रार्थनेचा मोठा हॉल आहे. ही मशिद इ. स. १८३९ मध्ये बांधण्यात आलेली आहे.

दाऊदी बोहरा लोकाचा इ. स. १७३० साली बांधलेला जमातखाना येथे आहे. त्यावेळी हा जमातखाना लहान होता या लोकाचे धर्मगुरु मुल्लाजी हे सुरतेस असतात व त्याचा अधिकारी येथील व्यवस्था पहातो त्या धर्मगुरु करीता हा जमातखाना बांधण्यात आलेला आहे. लोखंड, शिसे, जस्त, कागद, कांच वगैरेच्या व्यापारामुळे या लोकाची खूपच प्रगती झालेली आहे आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे आता या लोकांनी या जमातखान्याची इमारतही भव्य आणि प्रशस्त केली आहे. त्याचे धर्मगुरु येतात त्यावेळी दिव्याच्या रोषणाईने ही इमारत झगमगत असते.

# BUCKAU - WOLF

## New India Engineering Works Ltd.

**Sugar Machinery Manufacturers**

P O BAG No. 22, PIMPRI,
POONA-411 018

*Company is licensed and engaged in following lines*

1. Complete Sugar Plants
2. Sophisticated types of a wide range of Centrifugal Machines for Suger Industry
3. Industrial Boilers.
4. Closed system compost plants.
5. Steam Tube Calciners (Drier Plant)
6. Dry Process Cement Plant Machinery
7 Peclaimers and other material handling equipment- Mining Machinery

TELEPHONE 83265-66
CABLE DEVCORP
TELEX : 145267 BWPN IN




मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## सदाशिव पेठ

सदशिव भाऊनी ही पेठ वसविली येथे असलेल्या मोठमोठ्या बागा मोडून तेथे ही वसाहत करण्यात आलेली आहे. या पेठेतील खुन्या मुरलीधराची मूर्ति अतिशय सुबक व नाजूक आहे या देवाचे नाव 'खुन्या' असण्यामागे एक गोष्ट सांगितली जाते. ज्या वेळी गद्रे यांनी ही मूर्ति आणली त्यावेळी नाना फडणविसांना ही सुंदर मूर्ति आपल्या बेलबागेत असावी असे वाटले व त्यानी तसे श्री गद्रे याना कळविले गोडीत सांगूनही गद्रे ऐकेनात त्यावेळी फडणविसानी सत्तेचा उपयोग करुन २५-३० घोडेस्वार गद्रयावर पाठविले. गद्रयाचे लोक व घोडेस्वार याच्यात चकमक होऊन कित्येकजण मृत्यूमुखी पडले व कित्येकजण जखमी झाले. तेव्हापासून या मुरलीधरास 'खुन्या' हे नाव पडले.

इ. स. १८०९ मध्ये धाकट्या बाजीरावानी या पेठेत विश्राम-बाग वाडा' बांधला. या वाड्यास दोन लक्ष रु. खर्च आला. व ६ वर्षे हे बांधकाम चालले होते. या वाड्याजवळ असलेल्या बागेस विश्राम नावाचा माळी होता त्यावरुन ह्या बागेस व वाड्यास 'विश्रामबाग व 'विश्रामबाग वाडा' हे नाव पडले. हिराबागेत नेहरु स्टेडियम आहे. हे स्टेडियम आदर्श व नमुनेदार असून पॅव्हेलिअनमध्ये अद्यावत सुखसोयींनी युक्त अशा २० खोल्या आहेत

पेशवे पार्क हे पुण्यातील नागरिकांचे एक आवडते मनोरंजनाचे ठिकाण आहे येथे प्राणी संग्रहालय असून बोटींगची सोय आहे. येथे लहान मुलांसाठी छोटी आगगाडीही आहे. या बागेत गजारोहणाची सोय आहे.

## श्री सिध्दीविनायक मंदिर, सारसबाग

श्रीमत नानासाहेब पेशव्यानी पर्वतीचा परिसर सुशोभित करण्यासाठी हे कृत्रिम तळे खोदले. हे काम १७५० मध्ये सुरु झाले व ते १७५३ मध्येही चालू होते एक दिवस श्रीमत नानासाहेब पेशवे यांनी ही कामातील दिरगाई पाहिली व ते संतप्त झाले. राग व्यक्त करण्यासाठी ते स्वत हत्तीवरुन उतरून तळ्याची भिंत रचू लागले हे पाहून कामगार शरमिंदे झाले व त्यानी कामाचा वेग वाढविला. या तलावाचे क्षेत्र सुमारे पचवीस एकराचे होते या तलावाच्या मध्य-भागी सु. २५००० चौ फूट आकाराचे बेट बागबगीचा करण्यासाठी राखून ठेवण्यात आले होते. या बेटावर नंतर सुंदर बाग करण्यात आली व श्रीमत पेशव्यानी या बागेला सारसबाग हे नाव दिले.

याच बागेत श्रीमत सवाई माधवराव पेशवे यानी इ स. १७८४ मध्ये एक छोटे मंदिर बांधून त्यात श्री सिद्धीविनायक गजानन याची स्थापना केली. हे त्याचे उपास्य दैवत होते हे मंदिर तळ्यातला गणपती म्हणूनही ओळखले जात होते.

पर्वती, सारसबाग व तलाव ही पुणेकराची देवदर्शनाची व फिरावयास जाण्याची ठिकाणे झाली. मूळची मूर्ति इ. स. १८८२ मध्ये भंगली. सध्याची मूर्ति नंतर बसविण्यात आलेली आहे या तलावात श्रीमंत पेशवे व त्याचे मुत्सद्दी सल्लागार नौकाविहाराच्या निमित्ताने जात व गुप्त खलबते आणि चर्चा करीत. यावेळी मुद्दाम हबशी, मराठी व हिंदी अजिबात न समजणारे, ठार बहिरे किंवा मुके नावाडी लोक ठेवले जात. ऐतिहासिक बखरीतही या गोष्टीस आधार सापडतो. पेशवे, नाना फडणीस व महादजी शिंदे याच्यात येथे झालेल्या अनेक गुप्त मसलतीचा इतिहासात उल्लेख आहे या नंतर इंग्रज राजवट आली आणि गेली. स्वातंत्र्य प्राप्ति नंतर इ. स. १९५० मध्ये येथील व्यवस्था बघण्यासाठी श्री देवदेवेश्वर संस्थान सार्वजनिक विश्वस्त निधीची स्थापना झाली. या विश्वस्तानी १६ जानेवारी १९६९ रोजी मंदिर नवे, सुंदर आणि भव्य करण्याचा तसेच परिसर, कपाऊंड वॉल व कमानी इ. करण्याचा निर्णय घेतला. श्री सारसबाग मंदिराची पुनर्रचना करताना ते भव्य सुंदर दिसावे परंतु क्लिष्ट नक्षीचे किंवा भडक दिसू नये, तेथे गांभीर्य, उदात्तता, कलात्मकता याचा साक्षात्कार व्हावा, साधेपणातील सौंदर्य नजरेत भरावे, धार्मिक वृत्ती जागृत व्हावी, अशी विश्वस्तांची अपेक्षा होती व सध्याचे सिद्धीविनायक मंदिर पाहिल्यावर या अपेक्षा बव्हंशी पूर्ण झाल्या आहेत हे कोणाच्याही लक्षात येते.

या मंदिराचे शिखर उभट, निमुळते व चौकोनी आहे. मुळचे २० फूट उंचीचे शिखर या शिखराच्या आत तसेच ठेवण्यात आलेले आहे. हे शिखर पूर्वीच्या शिखरापेक्षा सोळा फूट अधिक आहे या मंदिरात लहान मोठ्या आकाराच्या अष्टकोष्ट कमानी आहेत. सुक्ष्म रितीने पाहिल्यास या कमानीमध्ये धनुष्यबाण व नाग या हिंदू संस्कृतीच्या प्रतीकाचा मुद्दाम उपयोग केला आहे हे दिसून येते हे या कमानींचे वैशिष्ट्य आहे. या मंदिरातील खांब, छप्पर, कमानी या सर्वात आतून भक्कम पोलादी गर्डर्स वापरलेले आहेत. या मंदिरात मध्ये गर्भागार असून तीन सभामंडप आहेत. तिन्ही सभामंडपात संगमरवरी रुमाली फरशी बसविण्यात आली आहे गर्भागारातही आतमध्ये सर्वत्र गुलाबी रंगाचा संगमरवरी दगड बसविलेला असल्यामुळे मंदिरात प्रसन्न वातावरण निर्माण झाले आहे

सारस बागेतील मुद्दाम राखलेली हिरवळ, फुलझाडे व कारंजी यामुळे ही बाग प्रेक्षणीय व रम्य झाली आहे. येथे अंबीलओढा वसाहत, विजयानगर कॉलनी, लोकमान्य नगर वगैरे भागात आधुनिक तऱ्हेची वसाहत आहे.

## नवी पेठ

सदाशिव पेठेजवळच नवी पेठ हा भाग आहे

*With Best Compliments From :*



# THE CENTRAL PULP MILLS LIMTED

1183, SHIVAJINAGAR,
FERGUSSON COLLEGE ROAD,
PUNE-411005,

***INDIA***

मु–द–क–वी, सुरूपार्थ प्रकाशन, पनवेल

## पर्वती

पुण्याच्या नैऋत्येस 'पर्वती' ही टेकडी आहे. पर्वतीच्या पायथ्याशी एक चौरस जागा आहे. त्यास 'वेताळाचा चबुतरा' असे म्हणतात. पर्वती गावची ही ग्रामदेवता आहे. येथे एक पाढरे निशाण असून शेंदूराने माखलेले अनेक देव तेथे आहेत इथून पुढे 'मारीरबुवा' चे स्थान आहे पर्वतीची उची सुमारे २१०० फूट आहे. पर्वतीवर जाण्यासाठी असलेल्या पायऱ्या हत्ती, घोडा व उट यानाही चढता यावे अशा भरपूर लाबी रुदीच्या बनविलेल्या आहेत अशा या १०८ पायऱ्या आहेत. सुमारे ३२ पायऱ्या चढून वर गेल्यानतर सतीची समाधी लागते. महादेव दीक्षित याची धर्मपत्नी पार्वतीबाई हिच्या जाज्वल्य पतिनिष्ठेचे स्मारक म्हणून ही सतीची समाधी बाधलेली आहे ७५ व्या पायरीवर एक दगडाचा नदी लागतो त्याच्या डाव्या बाजूस तालमीची खोली होती पेशव्यांच्या काळ त या जागचा उपयोग तोफखान्यासाठी करीत असत. दगडी नदीपासून वर चढून गेल्यावर घड्याळखाना लागतो, तेथे तासावर कालगणना करतात. यापुढे उजव्या बाजूस पर्वतीवरील मुख्य दैवत श्री देवदेवेश्वर याचे महाद्वार लागते. देवदेवेश्वराच्या प्राकारात दरवाज्यालगत उजव्या बाजूस एक बळदाचे तोड दिसते. तेथून जमिनीतून शनिवारवाड्यापर्यंत जाण्यासाठी भुयार खोदलेले आहे असा उगीचच समज आहे. येथे एक १०॥ फूट × ६ फूट अशी चिरेबदी खोली आहे. हे साठवणाचे अबार होते. महाद्वारातून आत गेल्यावर समोर नदीचे देवालय दिसते. नदीच्या पुढे एक बांधीव हौद व दगडी कारंजे आहे. देवदेवेश्वराच्या देवालयास अष्टकोनी तटबदी असून ती दुमजली आहे दुसऱ्या मजल्यात गच्च्या काढलेल्या आहेत उत्तरेच्या बाजूस असलेल्या तिमजली गच्च्यांना अबार म्हणतात तटबदीच्या तळमजल्यात कमानी आहेत पूर्वेस गवाक्ष आहे. देवदेवेश्वराच्या पाठीमागे तट असून तेथून पुण्याचे विहगम दृश्य दिसते. मुख्य देवालयाच्या चार कोपऱ्यात चार देवतांची लहान देवळे आहेत श्री सूर्यनारायण, श्री गणपती, श्रीदेवी व श्री विष्णु अशी ही चार देवालये आहेत, मुख्य देव श्री देवदेवेश्वर व ही चार दैवते म्हणजे शिवपचायतन. यातील देवीच्या देवळात मूळ देवी जी पर्वती किंवा पर्वताई हिची स्थापना केलेली आहे. या देवीच्या स्थापनेबद्दलची कहाणी मोठी मनोरजक आहे. पर्वतीच्या टेकडीपलीकडे 'जळकी वाडी' होती. तेथे नौवलोजी तावरे या नावाचा पाटील रहात होता त्याच्या आईचे नाव 'सकराऊ' होते तिचे वक्षस्थळ सडल्याने ती हैराण झाली होती, एके दिवशी एक दिव्य स्त्री रात्री स्वप्नात तिच्यासमोर प्रकट झाली व म्हणाली, 'या डोगरावर निवडुगात माझे स्थान आहे. तेथील जागा साफ कर माझी रोज पूजा कर व माझा अगारा स्तनास लाव म्हणजे तू दुःखमुक्त होशील' सकाळी जागी होताच आईने हा दृष्टांत नौलोजीस सांगितला नौलोजींने डोगरावर जावून देवीचे ठिकाण शोधून काढले तेथील परिसर स्वच्छ केला व तेथे लहानसा मडप घातला. रोज देवीची पूजा करून तो तीर्थ आणि अगारा आईला आणून देऊ लागला. यामुळे सकराऊ खरोखरच बरी झाली. तिची प्रकृती सुधारली व ती टवटवीत दिसू लागली एकदा श्रीमत बाळाजी बाजीरावसाहेब यांच्या मातोश्री काशीबाई या कोथरूड येथील मस्तानी बागेत रहावयास आल्या होत्या पर्वतीच्या पलीकडेच ही बाग होती. तेथून पर्वतीवरील मडप त्यांच्या दृष्टीस पडला, वर जात येत असलेली माणसेही दिसली. या टेकडीवर माणसाची वर्दळ कशी असा त्याना प्रश्न पडला व त्यांनी चौकशी केली तेव्हा त्याना श्री पर्वताई भवानीचे माहात्म्य समजले श्रीमत काशीबाई साहेबांच्या पायाला काही दुखणे झाले होते. त्यानी देवीला नवस केला की, 'माझ्या पायाचे दुखणे बरे झाले तर तुझे देवालय बाधिन' काशीबाई नित्यनेमाने देवीचा अगारा व तीर्थ सेवन करू लागल्या त्यांचा पाय पूर्णपणे बरा झाला. त्यांनी श्रीमंत नानासाहेब पेशव्यांना देवीचे देवालय बाधण्याची आज्ञा केली. श्रीमतानी आईचे आज्ञेप्रमाणे देवालय बाधून श्री देवदेवेश्वर शभुमहादेव याची स्थापना प्रमुख देवालयात केली श्रीमत नानासाहेब पेशवे यानी २३ एप्रिल १७४९ रोजी शुभमुहूर्तावर मूळ मूर्तिची स्थापना केली. या कर्नाटकातील कारागिराचे कौशल्य दाखविणाऱ्या मूर्ति श्रीमतांनी छत्रपती शाहू महाराजाकडून मागवून घेतल्या होत्या असे सांगितले जाते. श्री देवदेवेश्वर, शकर, श्री पार्वती, श्री गणपती यांच्या सोन्याच्या मूर्तिना पेशवे फार जपत असत. अनेक वेळा या मूर्ति पेशव्यांच्या जवाहिरखान्याबरोबर सिंहगडावर नेण्यात आल्या होत्या. तरीही इग्रजांनी २ मार्च १८१८ रोजी सिंहगड जिंकला त्यावेळी लुटल्या. परतु नतर देवीच्या मूर्ति व नदीचे कवच अशा काही वस्तू इग्रजांनी पर्वती सस्थानास परत केल्या श्री पार्वती व श्री गणपती या सोन्याच्या मूर्ति दि १५ जुलै १९६२ रोजी चोरीस गेल्या आता येथे असलेल्या मूर्ति चादीच्या असून त्याना सोन्याचा मुलामा दिलेला आहे श्री शिवाची मूर्ति पद्मासन घातलेली असून चतुर्भुज आहे. या मूर्तिच्या डाव्या मांडीवर पार्वतीची मूर्ति असून उजव्या मांडीवर द्विभुज वरद गणपतीची मूर्ति आहे. गाभाऱ्यात मधोमध काळ्या पाषाणाचे शिवलिंग आहे. मुख्य देवालयाच्या शिखरावर मध्यभागी एक मोठा व त्याच्या चारही बाजूस चार असे पाच सुदर कळस आहेत.

## सदरेतील गणपती

देवदेवेश्वराच्या गाभाऱ्यात उजव्या बाजूला एक सगमरवरी पाषाणाची श्री गजाननाची सुदर मूर्ति आहे. श्री देवदेवेश्वराची स्थापना करण्यात आली तेव्हा पुण्याहवाचनाचे वेळी नुसती सुपारी ठेवून गणपतीचे आवाहन न करता प्रत्यक्ष मूर्तिवरच आवाहन करून पुण्याहवाचन करण्यात आले तीच ही मूर्ति आहे या गणपतीला 'सदरेतील गणपती' असे सबोधले जाते. या देवालयाची रचना व दिशासाधन अप्रतिम आहे देवाचा गाभारा, त्यापुढे सभामडप, कारजे, नदीचे देवालय व पुढे महाद्वार आहे गाभाऱ्याच्या डाव्या बाजूस जामदारखान्याची खोली आहे श्री देवदेवेश्वराच्या आवारात प्रत्येक श्रावणी सोमवारी व महाशिवरात्रीस यात्रा भरते.

# हार्दिक शुभेच्छा !

# एस्. जी. गोखले अँड कंपनी (मंडप)

## मंडप आणि फर्निचर काँट्रॅक्टर्स

१३७५, शुक्रवार पेठ
नातू बाग,
पुणे — ४११००२.

फोन नं. ४४१४१६ व
४४४२७७

# पुणे विद्यापीठ

## पुणे विद्यापीठाची प्रकाशने

| | | किंमत |
|---|---|---|
| १ | प्राचीन मराठी कोरीव लेख (१९६३)<br>शं गो तुळपुळे | ५०–०० |
| ३ | आधुनिक वैद्यक शास्त्राचा इतिहास (१९७२)<br>आ. श्री. पराजपे | ३५–०० |
| ५. | मराठी शाहीर व शाहिरी वाङ्मय (१९७४)<br>य न केळकर | ७–०० |
| ७. | रविन्द्र त्रिदल (१९७५)<br>गोपीनाथ तळवलकर | ५–०० |
| ९ | स्वातंत्र्याचा अद्यतन संदर्भ (१९७३)<br>अच्युतराव पटवर्धन | २-५० |
| ११ | हेगेल जीवन आणि तत्वज्ञान (१९६६)<br>दि के. वेडेकर | १५–०० |
| १३ | मराठी नाट्य समीक्षा (१९६८)<br>रा. श. वाळिंबे | १६–०० |

| | | किंमत |
|---|---|---|
| २. | रससिद्धांत का सामाजिक मूल्यांकन (१९७४)<br>दुर्गा दिक्षित | १५–०० |
| ४ | भारतीय तत्वज्ञानाची रूपरेषा (१९६९)<br>भा. ग. केतकर | २२–०० |
| ६. | वाङ्मयीन विद्वत्ता (१९७६)<br>द. का. संत | १२–०० |
| ८. | रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्वमिमासा (१९७३) ग. बा सरदार | ७–०० |
| १० | यंत्रशास्त्र आणि ध्वनिशास्त्र याची मूलतत्वे (१९६४)<br>रा. द गोडबोले | २५–०० |
| १२. | महामानव रवीन्द्रनाथ (१९७४)<br>वा भ. बोरकर | ६–५० |

**वरील सर्व व विद्यापीठाची इतर प्रकाशने पुस्तक विक्रेते, शैक्षणिक संस्था आणि विविध ग्रंथालये यांना २५ ते ४५ टक्के कमिशन देऊन प्रकाशन विभागात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तरी या संधीचा फायदा सर्वांनी घ्यावा**



मु–द–क–वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## पेशवे वाडा व श्रीमंत नानासाहेब पेशव्यांची समाधी

श्री देवदेवेश्वराच्या देवालयाच्या अष्टकोनी तटबंदीत दक्षिण बाजूस तटातूनच खाली उतरण्यास जिना आहे या दगडी जिन्यावरुन खाली उतरल्या बरोबर पेशव्याचा वाडा दिसतो ही इमारत अकरा खण तिघई व मागील बाजूस चौसोपी आहे. हा वाडा इ. स. १७५५ मध्ये बांधण्यात आलेला आहे. या इमारतीच्या बालेखणात एक उत्तम दिवाणखाना आहे. पूर्वी खासे मंडळीकरिता याचा वापर करीत असत. या वाड्यात होम-शाळा होती या जागेस सहाणेची खोली म्हणतात. इ स. १७६१ मध्ये श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे येथेच निधन झाले. आता येथे त्यांची समाधी बांधण्यात आलेली असून श्रीमंताच्या पादुकांची रोज पूजा करण्यात येते. या वाड्यात सणवार, कुलधर्म व नानासाहेबांची पुण्यतिथी साजरी केली जाते.

## श्री कार्तिकस्वामीचे मंदिर

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या वाड्याच्या मागच्या बाजूस श्री कार्तिक स्वामीचे मंदिर आहे या देवाची स्थापना श्रीमंत नानासाहेबांच्या कारकिर्दीत श्रीमंत राघोबादादा यांनी केली आहे. निजामाने केलेल्या दंग्यात ही मूर्ति भंगली म्हणून १४ मार्च १७६६ रोजी तिची पुन्हा स्थापना करण्यात आली पुन्हा १७८७ च्या सुमारास ही मूर्ति भंगली. इ स १७९१ साली वीज पडून देऊळ जळाले एकूण या देवावर फार संकटे आली. इ स. १८६९ साली हल्ली असलेली काळ्या पाषाणाची मूर्ति स्थापन करण्यात आली आहे. ही मूर्ति मयूरारुढ असून षण्मुख व चतुर्भुज आहे. या देवाच्या दर्शनाला फक्त पुरुषच जात असत. आता मात्र हे मंदिर स्त्री-पुरूषाना खुले आहे.

## श्री विष्णु मंदिर

श्री कार्तिकस्वामी मंदिराच्या दक्षिणेस सुमारे २०० मीटर अंतरावर श्री विष्णूचे प्रशस्त व अत्यंत रमणीय मंदिर आहे. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी श्री देवदेवेश्वर व श्री शिवपंचायतन यांच्या स्थापनेच्या वेळीच हे देऊळ बांधले. परंतु राजकीय अडचणीमुळे श्री विष्णूची स्थापना मात्र खूपच उशीरा झाली श्रीमंतानी उत्तर हिंदुस्थानात असलेल्या शिंदे व होळकर या सरदाराना नेपाळच्या राजाकडे पत्र पाठवून गंडकी शिळा मागवून घेण्याची आज्ञा केली. त्या राजाने पेशव्यांच्या पत्राकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे श्रीमंताना राग आला व त्यांनी शिंदे होळकराना त्या राज्यावर हल्ला करण्याचा हुकूम दिला या संकटाची बातमी समजताच नेपाळच्या राजाने श्रीमंतांकडे विनंती केली, 'आम्ही मूर्ति पुण्यास पोहोचती करतो आपण येऊ नये.' नेपाळच्या राजाने शिळा काढून मूर्ति तयार करविली व पुण्यास पोहोचती केली १३ जून १७५८ रोजी पर्वतीस नानासाहेबांनी विष्णूची स्थापना केली विष्णूचे जे माधवरुप आहे त्याचीच ही माधवमूर्ति आहे, ही मूर्ति ४॥ फूट उंचीची असून लक्ष्मी यंत्रावर उभी आहे. विष्णुमूर्ति चतुर्भुज असून शंख, चक्र, गदा, पद्म यानी युक्त आहे. गळ्यामध्ये वैजयंती माला व यज्ञोपवीत असून ही मूर्ति फारच सुरेख व हास्यवदन आहे. देवालयासमोर संगमरवरी पाषाणाची गरुडमूर्ति आहे. श्री विष्णूच्या उजव्या बाजूस सिंहासनाच्या शेजारी गंडकी शिळेची रांगणारी श्रीकृष्णाची मूर्ति आहे. उजव्या हातात लाडू घेतलेली ही लडीवाळ मूर्ति त्रिंबकरावमामा पेठे यानी श्रीमंतांना नजर केलेली आहे. तसेच चिंतामण रावअप्पा सांगलीकर यानी श्रीमंताना नजराणा म्हणून दिलेल्या मोठी सहाण व पूजेची घंटा या वस्तूही या देवालयात आहेत.

## श्री विठ्ठल मंदिर

श्रीमंत पेशवे याच्या वाड्याजवळ श्री विठ्ठल रखुमाईचे मंदिर आहे. या मूर्ति पर्वती संस्थानचे एक सेवेकरी श्री. गणेश गोविंद मुद्गल यांचे घरातील आहेत. हे मंदिर १९३१ च्या सुमारास बांधले गेले असून मूर्तिची स्थापना दि ११ जून १९३१ रोजी झाली.

## श्री रमणा गणपती

पर्वती टेकडीच्या पायथ्याशी रमणा या नावाचे मोठे आवार आहे. या रमण्यास पूर्वी सभोवार ५ दरवाजे असलेली तटबंदी होती. श्रावण महिन्यात या ठिकाणी ब्राह्मणांना दक्षिणा वाटत असत. या आवारातील गणपती मंदिरास रमणा गणपती म्हणतात. श्री. मेघानी यानी दि. २७ फेब्रुवारी १९६३ रोजी या मंदिराचा जीर्णोद्धार केला

## पर्वती रमणा

पर्वतीच्या दक्षिणेस पायथ्याशी एका बांधकामाचे अवशेष दिसतात. यालाच पर्वती रमणा असे म्हणतात. येथेही श्रावण महिन्यात विद्वानाना दक्षिणा वाटीत असत व विद्वानांच्या मेळाव्यास रमणा म्हणत असत या दक्षिणा पद्धतीची सुरवात संभाजी राजाच्या कारकिर्दीत झाली.

इ स. १७४० नंतर नानासाहेब पेशव्यांची कारकिर्द सुरु झाल्यानंतर हा दक्षिणेचा आकडा तीस हजारावरुन सोळा ते अठरा लाख रुपयापर्यंत वाढत गेला शृंगेरी, कांजीवरम्, श्रीरंगपट्टम, कुंभकोणम, तंजावर या दक्षिणेकडील शहरातून तसेच बनारस, कनौज, ग्वाल्हेर या उत्तरेकडील नगरातूनही ब्राह्मण या दक्षिणेसाठी येत असत या विद्वानामध्ये ज्योतिषी, वैय्याकरणी, पंडीत, कवी, वेदांती, तर्कशास्त्रज्ञ व वैद्य असत. या सर्वांची गुणवत्ता पारखून त्यांना दक्षिणा दिली जाई. या दक्षिणा पद्धतीचा परिणाम म्हणजे पुणे हे विद्येचे व विद्वानाचे माहेरघर म्हणून ओळखले जाऊ लागले. माऊन्ट एलफिन्स्टन यानी इ. स. १८२१ साली लिहीलेल्या आपल्या रिपोर्टांत असे स्पष्टपणे म्हटले आहे की, ' विद्येला उत्तेजन मिळावे या उद्देशाने

PHONE : 82726

WITH BEST
COMPLIMENTS
FROM

# S. N. GHARPURE

ENGINEERS
CONTRACTORS
DESIGNERS
PLUMBERS



Shops & Office Building
Unit No. 8, C-Block
M. I. D. C. CHINCHWAD,
PUNE 411019.

मु-द-का-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

मुद्दाम पेशव्यानी हा दक्षिणेचा देकार सुरु केला इ. स १७९७ मध्ये कॅ. मूर याने पुण्याला भेट दिली त्यावेळचा एक उल्लेखनीय प्रसंग त्याने नमुद करुन ठेवला आहे. तो लिहीतो, 'जेथे आम्ही उभे होतो तेथे एक आनंदी चेहेऱ्याचा माणूस उभा होता. त्याच्या अपेक्षेप्रमाणे त्याला पाच, सात, ते दहा रुपये मिळणार होते तो सुरतेहून आलेला होता. एवढ्या थोड्या रकमेसाठी एवढ्या लाबून येणे आपल्याला कसे परवडते असे विचारले असता तो म्हणाला "यापेक्षा जास्त लाभदायक असे कोणतेच काम असू शकणार नाही शिवाय वाटेत सर्व ठिकाणी आदरातिथ्य मिळत गेले. मित्रांच्या व नातेवाईकांच्या भेटी झाल्या. वाटेतली तीर्थक्षेत्रे पहाता आली. शिवाय पेशव्याकडून मिळणारी थोडीशी रक्कमही तो मानाची देणगी समजत होता.

पर्वतीवर इ. स. १७५५ साली श्रीमंत नानासाहेब पेशव्यानी वाडा बांधला. मराठे इतिहासातील काही अजरामर घटनाची साक्ष पर्वती देते पानिपतावर गेलेल्या भाऊसाहेब पेशव्याना मदत करण्याकरिता श्रीमंत नानासाहेब पेशवे मोठ्या सैन्यासह निघाले होते वाटेतच पानिपतच्या पराजयाची दु खद बातमी त्यांना समजली व त्यांचा धीर पूर्णपणे खचला त्याच्या निकटच्या सरदार मडळींनी त्यांना हळूहळू पर्वतीवर आणले पर्वतीवर वाड्याच्या होमशाळेत १७६१ साली नानासाहेबांचे निधन झाले ३० ऑगस्ट १७७३ या दिवशी शनिवार वाड्यात नारायणराव पेशव्याचा खून झाला या दिवशी सकाळी नारायणराव पेशवे पर्वतीवर गेलेले होते रघुजी आंग्रे हा पुण्यास पर्वतीजवळ उतरला होता नारायणरावानी त्यांची भेट घेतली असता त्याने कटाची कल्पना नारायणरावाना दिली होती. या दिवशी दुपारचे भोजन पेशव्यानी पर्वतीवर केले व लगेच ते शनिवार वाड्यात आले तेथेच त्याचा खून झाला. गगाबाईस मुलगा झाला तर त्याची मुज मी पर्वतीवर करीन असा नवस नाना फडणवीस यानी श्रीपर्वतीस केला होता त्याप्रमाणे तिला मुलगा झाला. नानानी त्याची मुज पर्वतीवर मोठ्या थाटात केली. तरुण पेशवा सवाईमाधवराव हाही पर्वतीवर जात येत असे दुसरे बाजीराव पेशवे यानीही पर्वतीवर एक वाडा बांधण्यास सुरुवात केली होती. परतु तो पूर्ण होऊ शकला नाही. इ स १८१८ मध्ये खडकीला चालू असलेली इग्रज व मराठे याच्यातली लढाई दुसरे बाजीराव यानी पर्वतीवरील उत्तरेच्या खिडकीतून पाहिली युद्धाची धुमश्चक्री व तोफाचे आवाज यानी त्याचे मनोधैर्य खचले व त्यानी पुण्याहून पलायन केले. नतर इग्रजानी पर्वतीवरील जामदारखाना लुटला पर्वतीवरील पायऱ्याच्या मार्गाने हत्तीही वर जात यत असत इग्लडचा राजपुत्र प्रिन्स ऑफ वेल्स हा येथे हत्तीवरुन चढून गेल्याचा शेवटचा दाखला इतिहासात सापडतो.

## श्री साई मंदिर

स्वारगेटापासून सुमारे फर्लांगाच्या अतरावर पुणे-सातारा रोडवर रस्त्याच्या डाव्या बाजूस साईबाबाचे मदिर असून तेथे साईभक्ताची नेहमी गर्दी असते दर गुरुवारी येथे भजन-पूजन आरती इत्यादी कार्यक्रम होतात.

## अरण्येश्वर

पुणे-सातारा रोडवर स्वारगेटपासून सुमारे ४ फर्लांग अतरावर अरण्येश्वराचे देऊळ आहे. या देवळात अरण्येश्वराची व व श्री गुरुदत्तात्रयाची मूर्ति आहे देवळाच्या भिंतीवर विविध रगाची भित्तीचित्रे व पौराणिक चित्रे चित्रीत केली आहेत.

## पद्मावती मंदिर

अरण्येश्वरापासून जवळच पद्मावतीचे मदिर असून येथेही भाविकाची नेहमी गर्दी असते

## शंकरमहाराज समाधी

श्री शकरमहाराज हे एक सिद्ध पुरुष होते व त्याची समाधी पुणे-सातारा रस्त्यावर आहे. श्री शकरमहाराज नवसास पावतात अशी भाविकाची श्रद्धा असल्यामुळे येथे नेहमी गर्दी असते.

## विठ्ठलवाडी

पुण्याजवळच नदीकाठी हे पुरातन देवालय असून तेथे विठ्ठलरुक्मिणी याच्या विलोभनीय मूर्ति आहेत समोरच नदीच्या पात्रात श्री शकराचे देऊळ असून पावसाळ्यात ते पाण्याखाली असते आषाढी व कार्तिकी एकादशीस येथे यात्रा भरते.

## रास्ता पेठ

आनदराव लक्ष्मणराव रास्ते यानी इ. स १७७९ साली ही पेठ वसविली. या पेठेत असलेल्या शिवाच्या देवळावरुन या पेठेस 'शिवपुरी' हे नाव पडले या पेठेत असलेला वाडा बाधण्यासाठी नऊ वर्षे लागली व नऊ लक्ष रुपये खर्च आला आज इतक्या वर्षानतरही वाडा अतिशय चांगल्या स्थितीत आहे. हा वाडा दोन चौकी आहे वाड्याभोवती एक उच मोठा तट आहे. वाड्याचे काम लाकडी आहे. वाड्याजवळील बागेत शिवमदिर आहे. शिराळशेट हे या पेठेतील एक मुख्य ठिकाण आहे. १८० वर्षापूर्वी होऊन गेलेल्या या सज्जन व धनिक सावकाराची जत्रा श्रावण महिण्यात भरते

## गणेश पेठ

सवाई माधवराव पेशवे याच्या कारकिर्दीत जिवाजी पत खाजगीवाले यानी ही पेठ वसविली. शहराचे एक ग्रामदैवत असलेल्या 'डुल्या मारुती' चे देऊळ या पेठेत आहे. 'डुल्या' नावाबद्दलच्या आख्यायिकेनुसार १७६१ मध्ये पानीपतावर मराठे व अफगाण याच्यात युद्धाची धुमश्चक्री चालू असताना अचानक मारुती डोलू लागला व त्यात 'मराठ्याचा पराभव झाला' ही अत्यत दु खद वार्ता ऐकावयास मिळाली. त्या वेळेपासून या मारुतीचे नाव 'डुल्या मारुती' असे

*With Best Compliments From*

## M/s. J. D. PANSE

**Decorators & Painters**

1152, Sadashiv Peth, Poona 30

Phone – Res – 50346
Offi – 444365

With best compliments from -

## MODERN CAFE

**Boarding, Lodging & Restaurant**

Opp Engineering College Hostel,
Shivajinagar, Pune - 411005,
Phone - 55777 Resi 41777

***Prop. Shri. Gunduram M. Shetty***

*With Best Compliments From*

## Dandekar Industries

**Manufacturers of**

- **Precision Components**
- **Jigs and Fixtures**
- **Special Tools**

Office :
704, Sadashiv Peth,
Pune - 411030
Phone - 446151

Works
A-8 F-2, Block
M I D C Pimpri,
Pune - 411018
Phone C/o 82517

*With Best Compliments From :*

## Hemal Udyog

A - 25 'H' BLOCK, M I D C Pimpri,
Pune-411018

**Specialists in :**
Machine Components



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

पडले, या मारुती समोर विठ्ठल–रखुमाईचे मदिर आहे व या मंदिरात ज्ञानेश्वरमहाराज व तुकाराम महाराज यांच्या सगमरवरी दगडात बनविलेल्या मूर्ति आहेत. या पेठेतील दगडी नागोबास नागपचमीच्या दिवशी फार मोठी यात्रा भरते

## नानाची पेठ

मारवाडी, गुजराथी वगैरे व्यापारी लोकांची या पेठेत जास्त वस्ती आहे या पेठेत खूपच बैलगाड्याचे तळ आहेत या पेठेत निवडुग्या विठोबाचे देऊळ आहे. ही विठोबाची मूर्ति निवडुगाच्या जगलात सापडली म्हणून या देवास निवडुग्या विठोबा असे नाव पडले. श्री पुरुषोत्तम अबादास गुजराथी यानी आजचे हे भव्य देऊळ बाधले आहे. या पेठेत एक घोडेपीरही आहे. 'अग्यारी' हे पारशी लोकांचे देऊळ याच पेठेत आहे

## नारायण पेठ

इ. स. १७७३ मध्ये नारायणराव पेशव्यांनी ही पेठ वसविली. या पेठेत गायकवाडवाडा आहे. इ स. १९०५ मध्ये हा वाडा कै. लोकमान्यानी गायकवाड सरकारकडून विकत घेतला. या वाड्यात गणेशोत्सव मोठ्या धूमधडाक्याने साजरा होतो. ह्या वाड्यात टिळकाचा पुतळा व इतर अनेक प्रेक्षणिय तैलचित्रे आहेत. एके काळी 'केसरी' चे ऑफीसही येथेच भरत होते.

पूर्वीचा लकडीपूल आणि आत्ताचा सभाजीपूल येथेच आहे. इ स. १७६१ मध्ये बाळाजी बाजीराव पेशवे यांनी हा लाकडी पूल फक्त ६ दिवसात बाधवून घेतला. त्यामुळे यास लकडीपूल असे नाव पडले. इ. स १८४० साली मुळा नदीला मोठा पूर आला व त्यावेळी हा पूल मोडून वाहून गेला. तेव्हा इग्रज सरकारने काही पैसे खर्च करून व काही वर्गणी जमवून हा पूल दगडी बाधविला आधीचा पूल ३७ फुट रुद असल्याने गैरसोयीचा होत होता. परतु इ. स. १९५२ मध्ये हा पूल वाढवून त्याची रुदी ७६ फुट केल्यामुळे होत असलेली गैरसोय टळली आहे सिमेट क्रॉक्रिटचे बाधकाम असलेल्या या पूलाची लांबी ५०० फुट असून या पुलास नऊ मोठमोठ्या कमानी आहेत

रास्ता पेठेजवळच नागेश पेठ ही लहानशी पेठ आहे या पेठेत आयुर्वेद महाविद्यालय व शेठ ताराचद रामनाथ आयुर्वेदिय हॉस्पीटल ही महत्वाची ठिकाणे आहेत.

## भवानी पेठ

नाना फडणविसानी मोठमोठ्या व्यापाऱ्याना राहण्याकरिता व वखारीकरिता ही पेठ वसविली या पेठेतील भवानी देवीच्या देवळामुळे या पेठेस भवानी पेठ असे नाव पडले त्यापूर्वी हा भाग बोरवन म्हणून ओळखला जात असे. याच पेठेत विठोबाचे देऊळही आहे. नवरात्रात येथे जत्रा भरते. या पेठेत लाकडाच्या व्यापाऱ्यांची दुकाने आहेत.

मीठगज पेठेत साळी, माळी व कोष्टी इ. जमातीचे लोक रहातात. पूर्वी येथे मिठाचे मोठमोठे गज पडलेले असत म्हणून या पेठेस मीठगज पेठ असे नाव पडले

सवाई माधवरावाच्या कारकिर्दित मालोजी राजे भोसले यानी वसविलेली घोरपडे पेठही येथे आहे या पेठेतील घोरपड्याचा वाडा मात्र सध्या अस्तित्वात नाही. हल्ली येथे मुसलमान, चाभार, महार वगैरे लोक राहतात. या भागात पुणे महानगरपालिकेने वसविलेले आल्हाददायक घोरपडे उद्यान आहे

## गणेशखिंड

या भागात पुणे विद्यापीठ आहे विद्यापीठाच्या सर्व इमारती भव्य आणि सुशोभित आहेत. विद्यापीठ परिसरात असलेली उद्याने नेहमी फुलानी बहरलेली असतात. पूर्वीच्या गव्हर्मेंन्ट हाऊस जवळ राजभवनाची आधुनिक सुखसोयीनी सुसज्ज अशी इमारत आहे. पावसाळ्यात पुण्यात आलेले असताना मुबई राज्याचे गव्हर्नर या राजभवनातच वास्तव्य करीत

## श्री. चतुःशृंगीचे मंदिर

शहरापासून सुमारे २ मैलावर गणेशखिंड मार्गावर हे देवालय असून येथे नेहमी भाविकांची गर्दी असते. नवरात्रात येथे मोठी यात्रा भरते. येथील निसर्गसौदर्य फारच सुदर आहे पेशवेकालातील अनेक राजकीय खलबताचो साक्ष हे मदिर देते

## एरंडवणे

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी कॉलेज फॉर वुईमेन हे महाविद्यालय एरडवणे, येथे आहे. कोथरुड भागात औद्योगिक वसाहत असून लहानमोठे अनेक कारखाने आहेत.

सभाजीपूल ओलाडून पुढे गेल्यानतर डेक्कन जिमखाना हा पुण्यातील एक महत्वाचा भाग लागतो एम् ई एस कॉलेज, कमलानेहरु पार्क येथेच आहेत

## शिवाजी नगर

येथे मध्य रेल्वेचे स्टेशन असल्यामुळे या भागाचे महत्व वाढले आहे. एके काळी लहानशा खेड्यासारखे स्वतत्र असलेली ही वस्ती आता पुणे शहराचा एक अविभाज्य घटक बनली आहे वेधशाळा, (सिमला ऑफीस), आकाशवाणी केंद्र, प्रा औद्योगिक विद्यालय, सभाजी उद्यान, ख्रिस्त प्रेम सेवा सघ, टेलिफोन एक्सचेंज बिल्डिंग, इजिनिअरिंग कॉलेज, शेतकी कॉलेज, श्रीकाशीविश्वनाथ मदिर, श्री सिद्धेश्वर मदिर, जगलीमहाराजाचे देऊळ ही पुण्यातील प्रसिद्ध

*With Best Compliments From*



## Divgi Metalwares Private Limited

9-A, Yerandwana, Karve Road
Poona-411004

Manufacturers of

**Precision Gears, Shafts, Gear Boxes, Thread Rolls & Turned Components**

With best compliments from :

Phone-441377

## MANGAL PLASTICS

Narali Baug Estate, Gultekadi Road,
Poona-411009

*Manufacturers of*

Low and High Density Polythene Bags, Tubing and Sheeting, P V C Sheeting, Injection Molded Articles

Partners — A. S Dharmadhikari
M S. Dharmadhikari

*With Best Compliments From .*

Phone 5887

## Ajay Engineering Works

Yashomala 1194/27-A, Shivajinagar, Pune-5
Established in 1968

*Factory* 15/A Poona-Bombay Road,
Bhale Estate, Wakadewadi, Poona-411003

= Products =

**Air Cleaners, Fuel and Lub. Oil Filters Shells, Fabrication and Job Work**

*With Best Compliments From*

## Meelan Hospital Steel Furniture

Audyogik Vasahat, Plot No 11,
Gultekadi, Pune-9



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

स्थळे याच भागात आहेत. या शिवाय या भागात निरनिराळ्या कचेऱ्या असल्यामुळे हा भाग गजबजलेला असतो. काँग्रेसभवनाची भव्य इमारतही याच भागात आहे.

## संभाजी उद्यान

जगलीमहाराज रोडवर असलेले हे उद्यान प्रशस्त आणि नयनमनोहर आहे. विविध रगाची फुले असलेली फुलझाडे, कारजी आणि सर्वत्र पसरलेली हिरवळ डोळ्यांना तृप्त करते लहान मुलाना खेळण्यासाठी स्वतत्र विभागही या उद्यानात आहे. येथे मत्स्यालय तसेच महाराष्ट्र सरकार ग्रामोद्योग मधुपालन केंद्र आहे सुप्रसिद्ध कवी व नाटककार कै राम गणेश गडकरी याचा पुतळा या उद्यानात आहे. सभाजी उद्यानाच्या कोपऱ्यावर महाराणी लक्ष्मीबाई यांचा अश्वारुढ पुतळा आहे. मुलाला पाठीशी बाधून, हातात तलवार घेऊन ब्रिटीश सैन्याशी तोंड देण्यास उभ्या ठाकलेल्या महाराणी लक्ष्मीबाईचा पुतळा अगावर रोमांच उभे करणारा आहे. सभाजी उद्यानाजवळच बालगधर्व रगमदिर आहे सरकता रगमच, अद्ययावत आणि शास्त्रशुद्ध रचना, रगीत तालीमीसाठी स्वतत्र छोटे नाट्यगृह, कलावताना उतरण्याची व्यवस्थित सोय, वातानुकुलीत प्रेक्षकगृह इ वैशिष्ट्यामुळे हे रगमदिर म्हणजे पुण्याचे वैभव ठरले आहे.

## पांचालेश्वराचे देऊळ

इजिनिअरीग कॉलेजच्या हॉस्टेलच्या मागच्या बाजूस शिवाजीनगर स्टेशनजवळ खडकामध्ये कोरलेले पाचालेश्वराचे देऊळ आहे. सुमारे ७०—८० फूट लाब व २० फूट रुंद अशी ही जागा कोरलेली असून मध्ये शकराचा गाभारा, पाठीमागे प्रदक्षिणा घालण्यासाठी जागा व पुढे सभामडप असे हे मदिर आहे. मदिरात जाण्यामाठी पायऱ्या असून समोरच्या बाजूस विहीर आहे

## मुंढवा

मुढव्यास पेपर मिलचा कारखाना फार जुना आहे. अलिकडे या भागात अनेक प्रकारचे लहानमोठे कारखाने निघाल्यामुळे हा भाग गजबजून गेला आहे

कोरेगाव पार्क या भागात मोठमोठे उद्योगपती व श्रीमत लोकांची वस्ती आहे कॅनाट रोडवर जनरल पोस्ट ऑफीसची भव्य आणि प्रशस्त इमारत आहे पोस्ट ऑफीसमागेच टेलिग्राफ ऑफिस आहे अतुर फाउडेशन नेहरु मेमोरियल हॉल हा पुण्यातील महत्वाचा हॉल या भागात आहे

गारपीर या मुसलमान अवलियाची कबर पुण्यातील मुसलमानाचे एक श्रद्धास्थान आहे. त्याच्या भक्तांनी वानवडी येथे झालेल्या गोळीबारातुन सापडलेल्या गारगोट्या आणून त्याची कबर बांधून काढली असे सांगितले जाते या भागात कलेक्टर कचेरी व स्टेट बँक या भव्य इमारती आहेत. ब्रिटीश गोथिक पद्धतीने बांधलेले डेव्हिड ससून जनरल हॉस्पीटलही येथे आहे. हे हॉस्पीटल आधुनिक सोयींनी सज्ज असून याच्या जवळच बी. जे. मेडिकल कॉलेजच्या टोलेजग इमारती आहेत.

## बंडगार्डन

बडगार्डन रोडच्या एका टोकास रस्त्यास लागून सरळ नदी—किनाऱ्यापर्यंत ही बाग पसरलेली आहे. तऱ्हेतऱ्हेची फुलझाडे व फळाची झाडे, कारजी, समोरुन वाहणारी नदी आणि नदीवर बाधलेले धरण याच्यामुळे या बागेचे सौंदर्य वाढले आहे पावसाळ्यात या धरणावरुन धबधब्यासारखे कोसळणारे पाणी चित्ताकर्षक दिसते. बडगार्डनने पुण्याच्या सौंदर्यात निश्चितच भर टाकली आहे.

## येरवडा येथील तुरुंग

हा तुरुग बडगार्डनपासून सुमारे एक मैलावर आहे येथे मोठी प्रिंटीग प्रेस आहे. तुरुगातील कैदी व कामगार या प्रेसमध्ये काम करतात.

बडगार्डनच्या समोरील टेकडीवर महात्माजीनी जेथे राहून २१ दिवसाचा इतिहासप्रसिद्ध उपवास केला ती पर्णकुटी आहे. महात्मा गाधी ज्यावेळी पुण्यास येत त्यावेळी ते येथेच राहात पर्णकुटी प्रेक्षणिय आहे.

## हडपसर औद्योगिक वसाहत

अनेक लहानमोठ्या कारखान्यानी सजलेल्या या वसाहतीत सर्वप्रथम कारखाना काढण्याचा मान किर्लोस्कर न्यूमॅटिक क लि या कपनीकडे जातो

## शिंद्यांची छत्री

इ. स. १७९४ साली ज्या ठिकाणी महादजी शिंदे या ग्वाल्हेर सस्थानाच्या सस्थापकाचे निधन झाले त्या ठिकाणीच त्यांचे स्मरणार्थ ही छत्री बाधलेली आहे

क्वीन्स गार्डन रोडवर कौन्सिल हॉलची भव्य इमारत आहे येथे असलेली कर्नल फायरी यांची इमारत सरकारने विकत घेतली व त्यात आवश्यक त्या सुधारणा व सोयी करुन घेऊन हा कौन्सिल हॉल तयार केला. या हॉलच्या प्रवेशद्वाराजवळ आणि इतरत्र मुबई प्राताचे माजी गव्हर्नर, पेशवे आणि सस्थानिकाची मोठमोठी चित्रे लावलेली आहेत. या हॉलच्या सभोवती आखीव आणि रेखीव बाग आहे

## दि एम्प्रेस गार्डन

पूर्वी सोल्जर्स गार्डन या नावाने ओळखली जाणारी ही बाग खरोखरच मिलिटरी अधिकाऱ्याच्या ताब्यात होती. आता येथे सर्व

हार्दिक शुभेच्छा !!!

# श्री ज्ञानेश्वर वेल्डींग वर्क्स

## मोटार रिपेअरिंग गॅरेज

डिझेल ट्रकचे संपूर्ण काम केले जाते

खात्रीपूर्वक दुरुस्ती

★

१५-२ धनकवडी, पुणे-सातारा रोड, पुणे-९.

फोन : ४५०९५

प्रो. भगवानराव बापूराव मुळके



# M/s Diamond Clock Mfg. Co-pvt. Ltd.

1180, BUDHWAR PETH, PUNE-411 002.

Manufacturers of famous

**'Diamond' & 'Faremaster' brands of**

*TAXI AND AUTO RICKSHAW FARE METERS*

* Repairing of all types of waters & clocks.
* Manufacturing of Brass Hardware fittings.
* Export of faremeters to Bangladesh, Pakistan, Afghanistan, Ceylon, Egypt. & Abu-dhabhi.

PHONE · 443145

Gram . HOROLOGER

प्रकारची दुर्मिळ फुले, फळे व वनस्पती याचा संग्रह आहे. तसेच त्याबद्दलची माहितीही मिळू शकते येथे उत्तम बि-बियाणें, व फुलझाडांच्या कुंड्या विकतही मिळतात

## सोपान बाग

रावबहादूर नारायणराव बोरावके यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ पुणे— सोलापूर मार्गावर ही बाग वसविली आहे फुला-फळानी बहरलेली आणि अगदी आधुनिक पद्धतीने केलेली बागायती शेती येथे पहावयास मिळते या बागेत दुर्मिळ वनस्पती, फळझाडे तसेच द्राक्ष, ऊस, चिकू वगैरेचीही लागवड केलेली आहे.

## खडकी

येथे असलेल्या अनेक लहानमोठ्या कारखान्यांमुळे या भागाचे महत्व वाढले आहे येथे स्वतंत्र रेल्वे स्टेशनही आहे. इ स. १८२४ पासून येथे सैन्य ठेवण्याची व्यवस्था करण्यात आलेली असून आताही लष्करी दल असते.

## पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन

इ स १८५६ साली पुणे नगरपालिकेची स्थापना झाली सुरुवातीस नगरपालिकेचा कारभार सरकारच्या नेतृत्वाखाली होत असे. या पद्धतीत हळूहळू सुधारणा होऊन १९३८ पासून नगरपलिकेचा कारभार सपूर्णपणे लोकनियुक्त सभासदाकडून होऊ लागला. अशा रितीने १९५० पर्यंत नगरपालिकेच्या इतिहासात अनेक स्थित्यतरे झाली १९४९ साली मुबई सरकारने दी बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल म्युनिसिपल कॉर्पोरेशन्स ॲक्ट, १९४९ हा कायदा पास केला. १५ फेब्रुवारी १९५० रोजी पुणे शहर नगरपालिका व पुणे सबर्बन म्युनिसिपालिटी या दोन्ही नगरपालिकांच्या एकत्रित विभागासाठी 'पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन ' ची स्थापना केली असल्याचा जाहिरनामा काढण्यात आला १-८-१९५० रोजी मुबई सरकारने एका जाहिरनाम्याद्वारे पुण्याभोवतालच्या १८ खेड्याचा भाग कॉर्पोरेशनच्या हद्दीत समाविष्ट करून बृहत पुण्याची स्थापना केली. बोपोडी, धावोरी पर्वती, धनकवडी, एरंडवणे इ. हीच ती खेडी होत. आता कॉर्पोरेशनची भव्य इमारत नदीपलिकडे शिवाजीनगर भागात उभी असून त्यातर्फे पुणे शहराचा कारभार व्यवस्थित रित्या चालविला जात आहे स्थायी समिती, स्थापत्य समिती, आरोग्य समिती इ. निरनिराळ्या समित्या पुणे शहराचे वाढते स्वरुप लक्षात घेऊन आपापली जबाबदारी ओळखून कामे करीत आहेत.

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय

इ स १८७५ च्या सुमारास या सग्रहालयाची स्थापना झाली १९३० मध्ये या सग्रहालयाचे पुनरुज्जीवन होऊन त्याच्या कार्यास जास्त जोमाने सुरवात झाली. मार्च १९६५ अखेरपासून हे संग्रहालय शिवाजीनगर भागातील स्वत च्या इमारतीत आले आहे. हस्तकौशल्य, शेती, उद्योगधदे, जगल व भूगर्भशास्त्र अशा विभागात सग्रहालयाची माडणी करण्यात आली असून येथील ग्रथालयात शास्त्रीय व उद्योगधदेविषयक सुमारे १०,००० पुस्तके आहेत. खनिज विभागात तेलाच्या खाणी, लोखड, पोलाद व इतर भारतीय खनिजाचे नमुने माडण्यात आले आहेत तर उद्योगधंदे विभागात तेले, साबण, चिनीमातीची भांडी' रबर इ. उद्योगधद्यासबधी माहिती देणारे साहित्य माडण्यात आले आहे शेती व वनविभागात शेतीची अवजारे, धान्याचे व बियांचे नमुने. कीड व त्यावरील उपाय, विविध प्रकारची लाकडे, जगल-सपत्ती वगैरेंचे नमुने आहेत. असेच आणखी हस्तकौशल्य, इतिहास आणि शिक्षणविभागही येथे आहेत. शिक्षण विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने, चित्रपटदर्शन इ. कार्यक्रम करण्यात येत असतात. मे महिन्यात वासतिक शास्त्रीय व्याख्यानमाला चालविण्यात येते. सग्रहालयाकडून जनतेस शास्त्रीय व औद्योगिक विषयावरील माहिती विनामूल्य पुरविण्यात येते. हे सग्रहालय ही महाराष्ट्र राज्य सरकारच्या एका स्वतंत्र कायद्याने चालणारी सस्था असून सग्रहालयाची एकूण मालमत्ता सुमारे ५ लाख आहे.

## महाराष्ट्र साहित्य परिषद

या परिषदेतर्फे महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी ' मराठी साहित्य समेलने ' भरतात. या समेलनामुळे मराठी माणसाच्यात मराठी वाङमयाबद्दल खूप उत्सुकता निर्माण झाली आहे या परिषदेतर्फे मराठीच्या ' प्राज्ञ ' ' विशारद ' व ' आचार्य ' अशा परिक्षा घेतल्या जातात व प्रमाणपत्रे दिली जातात. या परीक्षा महाराष्ट्रात लोकप्रिय झाल्या आहेत ' महाराष्ट्र साहित्य पत्रिका ' नावाचे एक त्रैमासिकही या परिषदेतर्फे काढले जाते परिषदेचे ग्रथालय असून टिळकपथावर प्रशस्त इमारत आहे. परिषदेच्या 'अतिथीनिवासात' परिषदेच्या पुण्याबाहेरील सभासदाची राहण्याची व्यवस्था केली जाते

## भारत इतिहास संशोधक मंडळ

कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे व कै. श्रीमंत खडेराव चिंतामण मेहेंदळे यांनी ७ जुलै १९१० रोजी या सस्थेची स्थापना केली. मडळाने छत्रपती शिवाजीमहाराजाविषयी ११ ग्रथ प्रसिद्ध केले आहेत भारताच्या इतिहासाच्या व सस्कृतीच्या अभ्यासाला उपयोगी पडणारी साधने गोळा करणे व ती जतन करून त्यातील निवडक साधने प्रसिद्ध करणे हा मडळाचा उद्देश आहे. आत्तापर्यंत मडळाने १५ ते २० लाख कागद, ५ ते ६ हजार नाणी, १२०० चित्रे जमवली असून त्यातील बरीच नाणी दुर्मिळ आहेत. मडळाची प्रदर्शन-शाळा प्रेक्षणीय असून ग्रथालयांत इतिहासविषयक उत्कृष्ट ग्रथाचा उत्तम संग्रह आहे. मडळातील काही हस्तलिखित ग्रथ पाचशे वर्षाहूनही जास्त जुने आहेत मडळातर्फे मे महिन्यात शेवटच्या आठवड्यात

# हार्दिक शुभेच्छा !

भाजीपाला व फुलझाडे यांचे

※ बी-बियाणे ※

गेली ९९ वर्षे प्रसिद्ध

बियांचा सचित्र मोठा कॅटलॉग मोफत मागवा

# विष्णु सदाशिव आणि कंपनी

बियांचे व्यापारी, स्टेशन रोड, पुणे-१.

फोन २२६७६

*With Best Compliments From :*

※

**MAHARASHTRA METAL MFG. CO.**

619/A-2, B, POONE-SATARA ROAD.

MANUFACTURERS OF .

ॐ **BRAND QUALITY**

***Brass Utensils***

PHONE { 48411 41979




मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

३ दिवस संमेलन भरते व त्यावेळी संशोधक निबंध वाचन, व्याख्याने, परिसंवाद आयोजित केले जातात.

## मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज

इ. स. १९३४ साली या संस्थेची स्थापना झाली. महाराष्ट्रातील आर्थिक प्रश्नांबाबत सरकारला अभ्यासपूर्ण निवेदने पाठविणे, सरकारच्या औद्योगिक धोरणाचा व कायदेकानुचा महाराष्ट्रातील व्यापार व उद्योग यांच्या हिताच्या दृष्टीने विचार करून चेंबर सदस्याना मार्गदर्शन करणे, सदस्यांच्या व्यावसायिक अडीअडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करणे इ. कामे ही संस्था करते. भारत सरकार व महाराष्ट्र सरकारने चेंबरला मान्यता दिलेली असून अनेक सरकारी व निमसरकारी समित्यावर चेंबरच्या प्रतिनिधींना निमंत्रण असते. महाराष्ट्रातील व्यापारी-कारखानदाराना संघटित करून त्यांच्या तक्रारींना वाचा फोडण्यासाठी लहान-कारखानदार परिषद, यंत्रमाग कारखानदार परिषद, अशा अनेक परिषदा संस्थेने भरविल्या आहेत. आर्थिक व औद्योगिक विषयाना वाहिलेले 'संपदा' हे मासिक या संस्थेतर्फे प्रकाशित होते. अनेक मान्यवर उद्योगपतींनी संस्थेची पदाधिकारपदे भूषविली आहेत.

## पुणे सेवासदन सोसायटी

कै. रमाबाई रानडे व कै. श्री. गोपाळकृष्ण देवधर यांनी इतर सहकाऱ्यांच्या सहाय्याने इ. स. १९०९ साली या संस्थेची स्थापना केली. स्त्रियांना प्राथमिक, दुय्यम व विद्यालयीन वगैरे बौद्धिक तसेच धार्मिक, शास्त्रीय, वाङ्मयात्मक, वैद्यकिय, औद्योगिक, नर्सिंग व प्रथमोपचार वर्ग इत्यादिंचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली. विधवा व परित्यक्ता यांना स्वावलंबी बनवून मानाचे जिवन जगता यावे यासाठी संस्था कार्यरत असते. केवळ ५ स्त्रियासह सुरु झालेल्या या संस्थेचा आज खूपच विस्तार झाला आहे. संस्थेचे स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेज, हायस्कूल, प्रॅक्टिसिंग स्कूल, मुलींचे वसतीगृह अनाथालय, रुग्णोपयोगी-साहित्य विभाग, विद्यार्थिनीसाठी कॅन्टिन, स्टोअर्स, महिला विजय प्रेस इत्यादि विभाग असून स्त्रियांसाठी व्याख्यानमालाही आयोजित केली जाते. संस्थेच्या सोलापूर व नागपूर येथे शाखा असून या संस्थेचे कार्य पाहून इतरानाही प्रेरणा मिळते.

## पुणे मराठी ग्रंथालय

पुणे मराठी ग्रंथालय ही पुण्यातील एक जुनी संस्था असून संस्थेमध्ये स्त्रियांसाठी व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र खोल्यांची सोय असल्यामळे विद्यार्थीवर्गाचा फायदा झाला आहे. ग्रंथालयाच्या संग्रहालय व वाचनालय अशा दोन शाखा असून संग्रहालयात सुमारे आठ हजार व ग्रंथालयात सुमारे पाच हजार ग्रंथ आहेत. वाचनालयाची वर्गणी सर्वांना परवडेल अशी असल्यामुळे सामान्य जनता या ग्रंथालयाचा चांगला फायदा घेत आहे.

## वसंत व्याख्यानमाला

इ. स. १८७५ मध्ये कै. न्या. म. गो. रानडे यांनी ही माला स्थापन केली व १९०७ साली लोकमान्य टिळकांनी या मालेचे पुनरुज्जीवन केले. या संस्थेमुळे श्रोत्यांना व्यासंगी विद्वानांच्या व्याख्यानांचा लाभ घडतो.

## पुणे नगर वाचन मंदिर

७ फेब्रुवारी १८४८ रोजी लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांच्या प्रयत्नाने या संस्थेची स्थापना झाली. सुरवातीस ही संस्था बुधवार वाड्यात होती. १८७९ मध्ये बुधवार वाडा जळाला तेव्हा संस्थेचे ५००० ग्रंथही भस्मसात झाले. न्यायमूर्ति रानडे यांनी संस्थेचे पुनरुज्जीवन केले. सध्या संस्थेची दुमजली इमारत असून ३०,००० इंग्रजी व मराठी पुस्तकांचा संग्रह संस्थेत आहे. संस्थेचे सुमारे २५०० वर्गणीदार आहेत. संस्थेतर्फे विद्वानांची भाषणे आयोजित करण्यात येतात व कालिदास दिन, कोजागिरी उत्सव हे कार्यक्रमही साजरे केले जातात.

## सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी

कै. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी १२ जून १९०५ रोजी या संस्थेची स्थापना केली. निःस्वार्थी वृत्तीने व सार्वजनिक प्रश्नांचे काळजीपूर्वक अध्ययन करून राष्ट्रकार्यासाठी वाहून घेणारे कार्यकर्ते तयार करणे या उद्देशाने संस्थेची स्थापना झाली आहे. मुंबई, मद्रास, प्रयाग व नागपूर येथे संस्थेच्या शाखा आहेत. पुण्यात सोसायटीची एक लायब्ररी असून पुस्तकांचा मोठा संग्रह तेथे आहे.

## अनाथ महिलाश्रम, पुणे

अनाथ, परित्यक्ता व संकटग्रस्त अशा हिंदू महिला व मुलामुलींना आश्रय देऊन योग्य मार्गाला लावण्याच्या उद्देशाने इ. स. १९३५ साली या संस्थेची स्थापना झाली. संस्थेची मराठी सातवीपर्यंत प्राथमिक शाळा असून भरतकाम, हातमाग, शिवणकाम हे शिक्षणही येथे दिले जाते. १९६१ च्या महापुरानंतर पुनर्जन्म होऊनही आज संस्था अखंडीतपणे मदतकार्य करीत आहे. संस्थेने वर्किंग गर्ल्स होस्टेल सुरू केले असून येथे माफक पैशात, नोकरी करणाऱ्या स्त्रियांना सुरक्षितता मिळत असल्यामुळे ते खूपच उपयुक्त ठरले आहे. संस्थेचा स्त्रियांचा उद्योगविभागही आहे.

## भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे

संशोधकांच्या सोयीसाठी व सर आर. जी. भांडारकर यांच्या स्मरणार्थ म्हणून या संस्थेची स्थापना झाली. संस्थेजवळ २०,००० संस्कृत व प्राकृत हस्तलिखिते असून ती योग्य संशोधकांना संशोधनासाठी देण्यात येतात. संस्थेच्या ग्रंथालयात २५००० ग्रंथ असून

Please Conatct

# P. T. C. SANGHVI CO.

*Manufacturers of* --
Industrial Quality

**Copper, Brass and Aluminium Sheets/Strips/Circles**

AND

RE-ROLLERS OF SUPERIOR QUALITY
STAINLESS STEEL STRIPS OF 304 TYPE

OFFICE & WORKS ·
110, Shivaji Nagar, Poone-411005.

Phone 56578, 56579

Gram · SANGHVICO

*With Best Compliments From :*

# L. D. BHAVE & CO.

'BHARAT GAS' DISTRIBUTORS

**For**

BHARAT PETROLIUM CORPORATION
LIMITED

629-A, Shivajinagar, Pune-411004.

Phone : 53817



मु–द–क–वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

त्यापैकी ३००० ग्रंथ जुने व दुर्मिळ आहेत. संस्थेचे संशोधनकेंद्र पुणे विद्यापीठास जोडण्यात आले आहे. ऑल इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्सचे अहवाल व कामकाजवृत्त इत्यादि साहित्य विकण्याची एजन्सी या संस्थेस देण्यात आली आहे. संस्थेने प्रदीर्घ प्रयत्नांनी महाभारताची एक संशोधित आवृत्ती तयार केली आहे. संस्थेचे आठ ग्रंथ प्रकाशित झाले असून इतरही अनेक महत्त्वाची प्रकाशने संस्थेने केली आहेत.

## राजा केळकर संग्रहालय

श्री. दिनकर केळकर यांच्या छंदातून या संग्रहालयाचा जन्म झाला. या संग्रहालयात हिंदुस्थानच्या सर्व भागातील दिव्यांचा संग्रह आहे. हा कलात्मक दिव्यांचा विभाग फार मोठा असून श्री. केळकर यांनी त्याच्यावर एक उत्कृष्ट असे पुस्तक लिहीले आहे. ग्रामीण चित्रे, तांबूल, वज्री, गडवे व सध्येच्या पळ्या यांचाही येथे अपूर्व असा संग्रह आहे. याशिवाय इतर संग्रहालयात असणारे इतर विभाग येथेही आहेत. संग्रहालयाच्या बाल्यावस्थेत पुणे महानगरपालिकेने व आता महाराष्ट्र सरकारने हे संग्रहालय चालविण्याचा भार उचलला आहे. अशा तऱ्हेने एका व्यक्तीच्या प्रयत्नांनी व चिकाटीने हे संग्रहालय निर्माण झाले असून ते सर्वांसाठी खुले असते. निरनिराळ्या शाळांतील विद्यार्थीवर्ग हे संग्रहालय पहाण्यासाठी नेहमी येत असतो. पुण्यात येणारे प्रवासीही हे संग्रहालय पाहिल्याशिवाय परत जात नाहीत. वास्तुकलेच्या व चित्रकलेच्या विद्यार्थीवर्गांना या संग्रहालयाचा खूपच उपयोग होतो. संग्रहालयात विविध कलांवरील पुस्तके उपलब्ध आहेत. या संग्रहालयावर व संग्रहालयाच्या विशिष्ट भागावर रंगीत अनुबोधपटही निघाले आहेत. हे संग्रहालय म्हणजे पुण्याचे भूषणच आहे.

## नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी, खडकवासले

इ. स. १९५४ मध्ये दि नॅशनल डिफेन्स ॲकॅडमीची स्थापना झाली. भूसेना, नाविकदल आणि विमानदल अशा तिन्ही शाखेतील अधिकाऱ्यांना एकत्र शिक्षण देणाऱ्या मोजक्या संस्थांत या संस्थेचा समावेश होतो. १५ ते १७॥ वर्षांमधील पात्र उमेदवारांनाच येथे प्रवेश दिला जातो. येथील शिक्षणक्रम ३ वर्षांचा असून लष्करी शिक्षणाबरोबर उमेदवारास साधारणतः पदवीपर्यंतच्या दर्जाचे शिक्षण मिळते. प्रयोगशाळा व वर्कशॉपशिवाय वाचनालय, सभागृह, पदार्थसंग्रहालय, हॉस्पीटल, स्मारकमंदिर, स्टेडियम, ग्लायडिंग क्लब, सेलिंग क्लब व शिल्पकलापूर्ण इमारती यामुळे या संस्थेचे महत्व वाढले आहे.

## पूना प्रेस ओनर्स असोसिएशन

इ. स. १९३९ साली प्रेस ओनर्स, प्रकाशक, बाईंडर्स, कागदव्यापारी या सर्वांनी मिळून ही संस्था स्थापन केली. कागद-नियंत्रण, किमान वेतन कायदा, इंडस्ट्रियल डिस्प्युटस् ॲक्ट, विक्री कर वगैरे कायद्यांबाबतच्या सभासदांच्या तक्रारींची सरकारी अधिकाऱ्यांकडून दाद लावून घेणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. संस्थेचे 'मुद्रण साहित्य भांडार' असून 'मुद्रकभवन' नावाची स्वतःची इमारत आहे.

## दी नॅशनल केमिकल लॅबोरेटरी

इ. स. १९५० साली पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते रसायनशास्त्रविषयक संशोधन करणाऱ्या या प्रयोगशाळेचे उद्घाटन झाले. 'ज्ञानाची प्रगती व रसायनशास्त्राद्वारे लोककल्याण' हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. या लॅबोरेटरीचे इनऑरगॅनिक, बायोकेमिस्ट्री, पॉलिमर केमिस्ट्री, केमिकल इंजिनिअरिंग, सिंथेटिक ऑरगॅनिक केमिस्ट्री असे नऊ विभाग असून प्रत्येक विभागात अनेक उपविभाग व गटागटाने अगर व्यक्तिशः संशोधन करणारे शास्त्रज्ञ आहेत. संशोधन कार्यासाठी लागणारी लहान मोठी यंत्रसामुग्री उभारण्यासाठी या प्रयोगशाळेत अद्ययावत् अशी यंत्रशाळाही आहे. काचेची उपकरणेही येथे एका स्वतंत्र उपविभागात तयार केली जातात. संशोधित वस्तूचे थोड्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी 'पायलट प्लँट' म्हणून एक छोटा कारखानाच येथे उभा करण्यात येतो. प्रयोगशाळेच्या ग्रंथालयात सुमारे ४० हजार ग्रंथ असून नियमितपणे येणाऱ्या ७०० नियतकालिकांचा रसायनशास्त्राच्या विद्यार्थ्यांना फार मोलाचा उपयोग होतो. आतापर्यंत संस्थेने निरनिराळ्या शास्त्रीय नियतकालिकामध्ये सुमारे १००० पेक्षा जास्त निबंध प्रकाशित केलेले आहेत. जगातील रसायनशास्त्रविषयक संशोधन करणाऱ्या संस्थांपैकी ही एक अग्रगण्य संस्था आहे.

## हिंगणे स्त्री शिक्षण संस्था

या संस्थेने आतापर्यंत प्रशंसनीय असे समाजकार्य केले आहे. अनेक विधवा, परित्यक्ता, निराधार कुमारिकांना स्वतःच्या पायावर उभे करून आपले उरलेले आयुष्य मानाने कंठण्यास संस्थेने मदत केली आहे. संस्थेने सातारा व वाई येथे कन्याशाळा चालविल्या आहेत. सध्या सुमारे २५०० मुलामुलींच्या शिक्षणाची सोय संस्थेच्या निरनिराळ्या शाखांतून होत आहे. यापैकी सुमारे ७०० मुला-मुलींच्या वसतीगृहाची सोयही संस्थेने केली आहे. महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी या संस्थेची स्थापना केली.

## कर्वे समाज सेवा संस्था

महर्षिंच्या पुण्यतिथीच्या दिवशी ९ नोव्हेंबर १९६२ रोजी अनेक थोर मंडळींच्या खटपटीने या संस्थेची स्थापना झाली. संस्थेत समाजकार्य विषयाचे दोन अभ्यासक्रम शिकविले जातात. संस्थेने खडकीजवळ चिखलवाडी येथेही समाजकल्याणकेंद्र सुरु केले आहे. या संस्थेच्या कामाचा व्याप सध्या खूपच वाढला आहे.

## पुणे अंधजन मंडळ

२ ऑक्टोबर १९५२ रोजी या संस्थेची स्थापना काही अंधांनी स्वतः काही डोळस हितचिंतकांच्या सहाय्याने केली व तेच ती चालवित

आहेत. संस्थेत कापड विणणे, खडू तयार करणे व वेतकाम वगैरेचे शिक्षण दिले जाते. संस्थेतर्फे १९६० पासून एक उद्योगगृह चालविले जाते.

## डेव्हिड ससून अनाथ पंगु गृह

स्व. सरदार विनायक वासुदेव यांनी १८६३ साली या संस्थेची स्थापना केली. अनाथ व अपंग यांची राहणं, कपडेलत्ते, जेवणखाण, औषधोपचार इ. सोय करून त्यांचे आयुष्य सुसह्य करण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. जातीधर्माचा विचार न करता सर्व अपंगांना या संस्थेत प्रवेश दिला जातो. गेली अनेक वर्षे ही संस्था अनाथ पंगु-दीन व निराश्रित जनतेची निरपेक्ष सेवा करीत आहे.

## पुणे जिल्हा कुष्ठरोग निवारण समिती व डॉ. बंदोरावाला कुष्ठ रुग्णालय, कोंढवा

पुणे जिल्ह्यातील कुष्ठ रोगासंबंधीचे प्रश्न सोडविण्यासाठी इ. स. १९५० मध्ये या संस्थेची स्थापना झाली. संस्थेने कोंढवा येथील कुष्ठरुग्णालय सरकारकडून चालविण्यास घेतले व आता हे एक आदर्श रुग्णालय बनले आहे. या रुग्णालयात कुष्ठरोग्यांसाठी वैद्यकिय चिकित्सा, शल्य चिकित्सा, पुनर्वसन इ सोई उपलब्ध आहेत विणकाम, कुक्कुटपालन, दुग्धालय, मोचीकाम व्यवसाय पुरवून रुग्णाचे मन इतरत्र गुंतविण्याचा प्रयत्न केला जातो. रुग्णालयाची कुष्ठरोगी मुलांसाठी एक प्राथमिक शाळाही आहे.

## आनंदाश्रम

प्राचीन विद्या व प्राचीन ग्रंथ यांच्या रक्षणासाठी कै महादेव आपटे यांनी १८८७-८८ मध्ये संस्थेची स्थापना केली. संस्थेत सुमारे आठ हजार संस्कृत हस्तलिखित ग्रंथ असून संस्थेने काही ग्रंथ छापले आहेत काही विद्यार्थी व संन्यासी यांच्या राहण्याजेवण्याची सोयही संस्थेत करण्यात येते

## पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे

भारतातील एक अग्रगण्य विद्यापीठ असा पुणे विद्यापीठाचा लौकिक आहे. इंग्रज अमदानीपासून पुणे शहराला 'एक महत्वाचे शैक्षणिक केंद्र' म्हणून मान्यता प्राप्त झाली होती. पुणे जेव्हा मुंबई विद्यापीठात होते तेव्हाही पुण्यातील मोठमोठी महाविद्यालये आणि संशोधन संस्था यांना मुंबई विद्यापीठात महत्वाचे स्थान होते इ स. १९४७ मध्ये मुंबई विधानसभेने पुणे विद्यापीठाचे विधेयक संमत केल्यानंतर या विधेयकाचे पुणे विद्यापीठ कायद्यात रूपांतर झाले. १५ एप्रिल १९४८ या दिवशी पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणून नामदार मु. रा. उर्फ बाबासाहेब जयकर यांची मुंबई सरकारने नेमणूक केली आणि पुण्याच्या भांडारकर प्राच्य-विद्या संशोधन मंदिराच्या परिसरात असलेल्या निझामाच्या अभ्यागतगृहात विद्यापीठाचे कार्यालय त्याच दिवशी सुरु झाले. दि. १५ एप्रिल १९४८ पासून १ जून १९४९ पर्यंत विद्यापीठाचे कार्यालय भांडारकर इन्स्टिटयूटच्या अभ्यागतगृहातच (निझाम गेस्टहाऊस) होते.

पुणे विद्यापीठाची सध्याची इमारत १०८ वर्षाची जुनी असून इटालियन वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना असलेली ही इमारत पुण्यातील एक ऐतिहासिक वास्तू आहे या इमारतीची 'ओल्ड गव्हर्नमेंट हाऊस' अशी सरकार दप्तरी नोंद आहे. १६ लाख रु खर्चून ही इमारत बांधण्यात आली. १८६४ साली या बांधकामाला सुरवात झाली व १८७१ साली पूर्ण झाले. दक्षिणेच्या पठारावरील करड्या रंगाचा अग्निजन्य खडक वापरून ही इमारत 'इटालियन गॉथिक' पद्धतीने बांधण्यात आली ही इमारत पूर्वी मुंबईच्या गव्हर्नराचे पावसाळी निवासस्थान म्हणून वापरली जात होती इमारतीचा दर्शनी भाग दक्षिणोत्तर ३०० फूट लांबीचा असून उत्तरेकडील भागात तळमजल्यावर दरबार व भोजनगृह होते. दक्षिणकडील भागात गव्हर्नराचे कार्यालय व निवास होता. १९४९ साली पुणे विद्यापीठास सुमारे ४११ एकर जमिनीचा परिसर देण्यात आला व विद्यापीठ चे कार्यालय ह्या इमारतीत आणण्यात आले.

पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. एम. आर. जयकर यांनी विद्यापीठाची धुरा आठ वर्षे अत्यंत जबाबदारीने सांभाळली व खूपच प्रगती घडवून आणली ते निवृत्त झाल्यानंतर सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ रँग्लर डॉ आर. पी. परांजपे हे विद्यापीठाचे कुलगुरू झाले

विद्यापीठात पहिले पदव्युत्तर विभाग १९५० मध्ये स्थापन झाले. संस्कृत, मराठी, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, राज्यशास्त्र, गणित व संख्याशास्त्र यांचा त्यात समावेश होता. आज पदव्युत्तर विभागाची संख्या २२ असून सर्व विभागांमध्ये मिळून सतराशेच्या वर विद्यार्थी उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत काही शाखांना विद्यापीठ अनुदान मंडळाकडून विशेष सहाय्य मिळत आहे याखेरीज भांडारकर प्राच्य-विद्या संशोधन मंदिर आणि गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था या दोन संलग्न प्रगत अध्ययन केंद्रात झालेले संशोधनकार्य अखिल भारतात उल्लेखनिय ठरले आहे पदव्युत्तर विभागामधून पी एच. डी. पदवीसाठी संशोधन केले जाते व आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या विषयात ही पदवी संपादन केली आहे


विद्यापीठान्तर्गत अध्यापनाव्यतिरिक्त बाहेरील सामान्य प्रौढ जनतेमध्ये ज्ञानप्रसार करण्याच्या उद्देशाने "बहिःशाल शिक्षण मंडळ" स्थापन करण्यात आले आहे यातर्फे बहिःशाल शिक्षण व्याख्यानासाठी निवडक गावी बहिःशाल शिक्षणकेंद्रे स्थापन करण्यात येतात व सामान्य जनतेसाठी अत्यंत उपयुक्त अशी व्याख्याने आयोजित करण्यात येतात निवासात्मक पद्धतीची 'बहिःशाल शिक्षण शिबीरे' ही भरविण्यात येतात.

मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

PADMAJA/M

# अक्षय सुखाच्या चिरंतन ओळी





महाबँकेच्या आवर्त ठेव योजनेच्या तुमच्या
पासबुकाच्या प्रत्येक पानावरील या ओळी म्हणजे
तुमच्या भविष्यातील अक्षय सुखाची ग्वाहीच!
या योजनेमध्ये तुम्ही दरमहा पाच रुपयापासून
बचत करु शकता

**महाबँक आवर्त ठेव योजना म्हणजे बचतीचा उत्तम मार्ग!**

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कार्यालय : पुणे

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा

# FILTROPUMPS

FP

1098/10, Model Colony, Pune 411016

AUTHORISED

**Distributors for Kirloskar Filters**

**Dealers For Kirloskar Drill Roads**

Phone : 57515

---

हार्दिक शुभेच्छा !!!

'ड्रायक्लिनिंग' च्या क्षेत्रात नावाजेलले !

## सुपर ड्रायक्लिनर्स

पुण्यात ७ शाखा

स्वारगेट जवळ भव्य फॅक्टरी
स्वारगेट, पुणे-९

---

टेलीग्राम – पॉली प्रॉडक्ट्स्

दूरध्वनी – ४४०९२९
४४३२३५

## पॉलिमर प्रॉडक्टस्

पूना स्मॉल स्केल को-ऑपरेटिव्ह इंडस्ट्रियल इस्टेट,
प्लॉट क्र. ४. गुलटेकडी, पुणे ४११ ००९

आमची उत्पादने

* स्पीडॉमीटर्स
* मिनिएचर गिअर बॉक्सेस
* अवर मीटर्स
* गिअर्स
* व्हॅक्युम इंडिकेटर्स व स्विचेस
* मिनिएचर राईट अँगल ड्राईव्हनस्

---

केस गळणे, अकाली पांढरे होणे अशा केसाबाबतच्या तक्रारीबरोबर जागरणामुळे डोळे लाल होणे, डोळ्यांत आग होणे, डोळे दुखणे, असे डोळ्याचे त्रास कमी करण्याकरता, तसेच पित्तामुळे दुखणारे डोके थांबवण्याकरता, केसातील कोंडा, चाई असे चर्मरोग दूर करण्याकरता, मेंदूच्या थंडाव्यासाठी व शांत झोपेसाठी

माका केळी आवळा हिरडा

व शुद्ध खोबरेल या पासून औषधी वनस्पतीचे मूळचे गुणधर्म जसेच्या तसे ठेवून बनवलेले * औषधी तेल म्हणून सरकारमान्यता मिळालेले सुगंधरहित शुद्ध आयुर्वेदिक, औषधी तेल भृंगार्क

भृंगार्काचा नियमित वापर करा. आपल्या डोक्याचा त्रास दूर करा !

निर्माते – शिवादेश उद्योगालय,

गुरुकुटी प्लॉट न. २७/२ वाकडेवाडी, पुणे – ४११००३


मु–द–क–वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

परकीय विद्यापीठांची माहिती देणारे व व्यवसायासंबंधी माहिती पुरविणारे एक महत्त्वाचे खाते विद्यापीठ चालविते. विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठातून प्रवेश मिळवून देण्यात येतो.

पुणे विद्यापीठाच्या विद्यमाने विविध व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात. या व्याख्यानमाला हे पुणे विद्यापीठाचे खास वैशिष्टच असून, महाराष्ट्राच्या वैचारिक व सांस्कृतिक जीवनात या मालातील व्याख्यानाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. विद्यापीठाच्या सुसज्ज ग्रंथालयात सुमारे २ लाख पुस्तके आहेत. विद्यापीठाशी सलग्न महाविद्यालयाची सख्या ११६ असून सशोधन केंद्राची सख्या १४ आहे.

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

लोकमान्य बाळ गगाधर टिळक याचे शैक्षणिक स्मारक म्हणून टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची ६ मे १९२१ रोजी स्थापना करण्यात आली. विद्यार्थीजीवनात राष्ट्रीय वृत्तीची जोपासना होऊन विद्यार्थी स्वावलबी कसा बनेल, कठीण परिस्थितीवर मात करण्याची झुजार वृत्ती त्याच्यात कशी निर्माण होईल, पदवी मिळविल्यावर नोकरीच्या मागे न लागता स्वतत्र व प्रतिष्ठित जीवन तो कसा जगेल याची काळजीपूर्वक दक्षता हे विद्यापीठ घेते. प्रारभी 'वाङ्मय शाखा', व्यापार शाखा, स्थापत्य शाखा, आयुर्वेद शाखा स्थापल्या. या सस्थेतर्फे बालमुकुद सस्कृत महाविद्यालय चालविले जाते सस्कृत विशारद व पारगत या पदव्यांच्या अध्यापनाची व्यवस्था महाविद्यालयात केली जाते. महाविद्यालयातर्फे सस्कृत विद्या पदविका व भारतीय विद्या पदविका यांचे वर्गही चालविले जातात

'आयुर्विद्या पारगत' हा विद्यापीठाचा दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम असून अध्यापनाची व्यवस्था टिळक आयुर्वेद महाविद्यालयात करण्यात आली आहे.

सस्थेतर्फे १९२० साली टिळक महाविद्यालय सुरू करण्यात आले १९३१ मध्ये ब्रिटीश सरकारने बेकायदेशीर सस्था म्हणून बद केलेल्या ह्या कॉलेजचे १९७५ मध्ये पुनरुज्जीवन करण्यात आले. येथे 'व्यवसाय विशारद' हा तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम शिकविला जातो

शालेय स्तरावर सस्कृत, इग्रजी, गणित या विषयाच्या निरनिराळ्या दर्जाच्या परीक्षा वर्षातून दोन वेळा विद्यापीठ घेत असते. एस्. एस्. सी. परीक्षेस पूरक म्हणून या परीक्षा विद्यार्थी वर्गात मान्य व लोकप्रिय झाल्या आहेत या परीक्षांचा लाभ महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थी घेतात.

विद्यापीठ वाडा या नावाची विद्यापीठाच्या मालकीची इमारत पुणे शहरात सदाशिव पेठेत आहे. गुलटेकडी येथील विद्यापीठाच्या परिसरात एकदर चार इमारती आहेत व त्यापैकी एका इमारतीत मुख्य कचेरी आहे विद्यापीठातर्फे सशोधनात्मक ग्रथ प्रकाशित केले जातात. आतापर्यंत ब्रह्मसूत्र, कौशिकसूत्र, देवीकोष, शायरे आझम इ. मौलिक ग्रथ प्रकाशित झाले आहेत. विद्यापीठाचे हे शुद्ध शैक्षणिक कार्य पक्षातीत आणि सर्व समावेशक आहे.

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी म्हणजेच पूर्वीची 'पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन' होय. ती शैक्षणिक क्षेत्रात सर्वात जुनी अशी सस्था होय सस्थेच्या स्थापने पासून म्हणजे इ. स. १८६० सालापासून शिक्षणाचा प्रसार व्हावा या हेतूने ती शैक्षणिक कार्याला सातत्याने उत्तेजन देत आली आहे. इ स १९४५ सालापूर्वी सस्थेने पुण्यात तीन प्रशालांची व दोन प्राथमिक शाळाची स्थापना केली तसेच पुण्याबाहेरही ( सासवड आणि बारामती ) दोन प्रशाला काढल्या इ. स. १९२३ मध्ये सस्थेचे पुनर्नामाभिधान करण्यात येऊन सस्थेचे नाव 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' असे ठेवण्यात आले. आधुनिक काळास अनुरुप अशी सस्थेची घटनाही करण्यात आली. सस्थेच्या सध्या पुण्यात तीन माध्यमिक शाळा, दोन प्राथमिक शाळा, दोन महाविद्यालये व सासवड आणि बारामती येथे प्रत्येकी एक माध्यमिक शाळा आहेत.


## आबासाहेब गरवारे कॉलेज

आबासाहेब गरवारे कॉलेजचे पूर्वीचे नाव 'एम. ई. एस. कॉलेज ऑफ आर्टस् अँन्ड सायन्स' (महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कला व विज्ञान महाविद्यालय ) असे होते. १९४५ साली स्थापन झालेल्या एम. ई. एस. कॉलेजच्या रुपाने सस्थेचे फार दिवसाचे रमणीय स्वप्न साकार झाले अवघ्या ७७ विद्यार्थ्यांचे पाथेय बरोबर घेऊन निरनिराळ्या विद्याशाखात विद्यार्थ्यांची सोय करीत करीत आज मितीला ह्या महाविद्यालयाने केलेल्या प्रवासाचा आलेख लक्षणीय आहे. इ स १९५५ साली महाविद्यालयाचे कर्वे पथावरील या सुरेख व भव्य वास्तूत स्थलांतर झाले. महाविद्यालयाच्या परिसरात मुख्य इमारत, मुख्य सभागृह, विद्यार्थी विश्राम केंद्र, तीन वसती गृहे, प्रयोग शाळा, ग्रथालय, प्राचार्य, उपप्राचार्य याची निवासस्थाने इत्यादि इमारती आहेत. मा. आबासाहेब गरवारे यानी या महाविद्यालयास पाचलाख एकावन्न हजार रु. देणगी दिल्यामुळे दि. ६ ऑगस्ट १९७२ रोजी महाविद्यालयाचे नाव आबासाहेब गरवारे महाविद्यालय असे ठेवण्यात आले.

## मुलांचे हायस्कूल (भावे स्कूल)

इ. स. १८६० साली श्री. महागावकर यानी इग्रजी शिक्षणाचे वर्ग सुरु केले. इ. स. १८७४ रोजी श्री भावे यांनी या वर्गाची पुनर्रचना केली व त्याना शाळेचे स्वरुप दिले. इ. स. १८९३ मध्ये सस्थेने नानावाड्यासमोरील बोळातील थत्ते याचा वाडा विकत घेतला. पुढे १९२२ मध्ये शाळेचे सदाशिव पेठेतील पटवर्धन वाड्यात स्थलातर झाले. इ स १९२८ मध्ये पेरुगेटाजवळ शाळेची स्वतत्र इमारत

# मच्छिमार आणि गरवारे



**समृद्धिच्या शिडात भरले वारे..**

मच्छिमारी उद्योगाचे नांव निघताच गरवारे नायलॉन्सची आठवण येते. गरवारे नायलॉन्सने मच्छिमारी जाळ्यांसाठी मजबूत आणि टिकाऊ नायलॉन सूत तयार केले आणि मच्छिमाराच्या जीवनात एक क्रांतीच घडवून आणली.

GARWARE

गरवारे

**गरवारे नायलॉन्स लि.**

मार्केटिंग डिव्हीजन  ॲक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट मुंबई ४०० ०२१

Adt-1 613 Mar

सुमारे तीस हजार रु• खर्चून बांधण्यात आली. इ. स १९३५ साली मुलींची शाळा या शाळेपासून वेगळी काढण्यात आली. या शाळेच्या आवारातच भावे प्राथमिक शाळा असून ही शाळाही 'भावे स्कूल' म्हणूनच ओळखली जाते. सध्या मुलांच्या शाळेत सुमारे २६०० विद्यार्थी व मुलींच्या शाळेत सुमारे २२०० विद्यार्थिनी आहेत ही शाळा पुण्यातील एक महत्वाची माध्यमिक शाळा आहे

## डेक्कन जिमखाना हायस्कूल (विमलाबाई गरवारे हायस्कूल)

इ. स. १९२२ मध्ये डेक्कन जिमखान्याच्या भाजेकर पॅव्हेलियनमध्ये सुरू करण्यात आलेल्या प्राथमिक शाळेचे 'डेक्कन जिमखाना हायस्कूल' मध्ये रुपांतर झाले. सध्या या शाळेत सुमारे २५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहे.

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ कॉमर्स

इ. स १९६१ साली या महाविद्यालयाची स्थापना झाली. एम ई. एस. कॉलेज ऑफ आर्टस अँन्ड सायन्स या संस्थेतच हे कॉलेज सुरू करण्यात आलें व १९६७ साली वेगळे करण्यात आले. अॅडव्हान्स अकौंटिंग, इंडस्ट्रियल मॅनेजमेंट हे विषय बी. कॉमला शिकविले जातात. हे पुण्यातील एक प्रसिद्ध कॉमर्स कॉलेज आहे.

## डेक्कन एज्युकेशन सोसायटी

आपल्यावर ज्या वेळी परकियांचे वर्चस्व होते त्यावेळी राष्ट्रीय आशाआकांक्षा फलद्रूप करण्यासाठी अखिल राष्ट्राला उपयुक्त ठरेल अशा तऱ्हेचे राष्ट्रीय शिक्षण देशातील विचारवंताना अभिप्रेत होते व असे शिक्षण परकीय शिक्षक वा मिशनरी मंडळी याच्याकडून मिळणे कदापि अशक्य होते अशा परिस्थितीत पुण्यातील स्वदेशाभिमानी आणि कर्तबगार असे चिपळूणकर, टिळक, आगरकर, नामजोशी व आपटे हे नवशिक्षणाचे अग्रदूत एकत्र आले व त्यांनी १ जानेवारी १८८० रोजी 'न्यू इंग्लिश स्कूल' सुरु करून आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक राजकिय जिवनाची मुहूर्तमेढ रोवली. इ. स. १८८० या एका वर्षातच शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ३५ वरून ३३६ वर गेली. त्यावेळच्या अलौकीक भाग्याच्या विद्यार्थ्यांना स्फूर्तीच्या अखंड निर्झरापाशी बसून आकठपान करण्याची दुर्मिळ संधी मिळाली. संस्थेच्या चालकांमध्ये 'कॉलेज' सुरू करण्याची योजना मूळ धरू लागताच सोसायटी स्थापन करण्याची आवश्यकता निकडीने भासू लागली व इ. स. १८८४ मध्ये 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना झाली. २ जानेवारी १८८५ रोजी फर्ग्युसन कॉलेजचे उद्घाटन होऊन संस्थाचालकांचे एक चिरवांछित ध्येयस्वप्न साकार झाले. प्रारंभापासूनच फर्ग्युसन कॉलेज भरभराटीची प्रसादचिन्हे दाखवित आले. या कॉलेजचा पहिला बी. एस्सी. पदवीधर म्हणजे रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे (फर्स्ट क्लास) रँ. र. पु. परांजपे यांनी आपल्या असामान्य बुद्धीमत्तेने कॉलेजच्या शैक्षणिक किर्तीत मोलाची भर टाकली. इ. स. १९०४ मध्ये काणे प्रयोगशाळा व इ. स १९०९ मध्ये विद्यार्थीनीसाठी आगरकर वसतीगृह बांधण्यात आले १९०१ ते १९३० या तीस वर्षात सोसायटीच्या शाखांची सर्व बाजूनी द्रुतगतीने वाढ झाली. १९१९ साली सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयाची स्थापना झाली. मुंबई येथेही १९५४ साली बॉम्बे कॉलेजची (किर्ती कॉलेज) स्थापना झाली.

भारतीय शिक्षणाचा इतिहास जेव्हा रचला जाईल तेव्हा त्यांत डेक्कन एज्युकेशन सोसायटीने केलेल्या आघाडीवरच्या प्रयत्नांच्या जिवत आणि स्फूर्तिदायक कहाणीसाठी एक पर्व राखून ठेवलेले असेल.

## न्यु इंग्लीश स्कूल, रमणबाग

इ• स १ जानेवारी १८८० रोजी टिळक आगरकर यांनी अप्पा बळवत चौकातील मोरबादादाच्या वाड्यात ही प्रशाला सुरू केली. केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील खाजगी शिक्षण संस्थाची मुहूर्तमेढ या संस्थेच्या रुपाने रोवली गेली. स्थापनेपासून सतत सात वर्षे शाळेने पहिली किंवा दुसरी जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळविली. शाळेचा व्याप वाढू लागला तेव्हा जून १९४६ पासून १) न्यू इंग्लिश स्कूल, नानावाडा (आता टिळक रोड) व २) न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग असे दोन स्वतंत्र विभाग करण्यात आले• विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुसज्ज प्रयोगशाळा, संपन्न ग्रंथालय, मानसोपचार केंद्र, व्यायाम शाळा, व्यवसाय मार्गदर्शन इत्यादी विभाग या शाळेत आहेत शाळेत सुमारे २००० विद्यार्थी शिकत आहेत.

## फर्ग्युसन कॉलेज

एल्फिन्स्टन् कॉलेजचे तत्कालिन प्राचार्य वुइल्यम वर्डस्वर्थ ह्यांच्या हस्ते २ जानेवारी १८८५ रोजी या कॉलेजचे उद्घाटन झाले कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल वामन शिवराम आपटे हे होते. त्याच्यानंतर प्रि आगरकर, प्रि. गोळे, रँ. परांजपे, प्रि कानिटकर, रँ. महाजनी, डॉ. कर्वे–प्रि कोगेकर या मंडळींनी ते पद भूषविले. इ. स. १८९५ साली फर्ग्युसन कॉलेज सध्याच्या भव्य इमारतीत आले. या महाविद्यालयात आर्टस् व सायन्स या दोन शाखा असून अनेक विषय शिकविण्याची सोय आहे. महाविद्यालयाचे 'बाई जेरबाई वाडिया ग्रंथसंग्रहालय' म्हणजे कॉलेजचे भूषणच आहे. कॉलेजच्या कार्यक्षेत्रात एन्. सी सी. शिक्षणाचा विभागही आहे. विवाद–सभा, वाङ्मय मंडळे, शास्त्रचर्चा मंडळे व कलामंडळे इत्यादी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील असतात. येथील विद्यार्थ्यांनी निकालाची परंपरा उत्कृष्ट राखलेली असून आंतर महाविद्यालयीन व आंतरविद्यापीठ क्रिडा स्पर्धेतही येथील विद्यार्थी चमकतात. महाविद्यालयाच्या आवारात वसतीगृहे, प्राध्यापकांकरीता निवास, विद्यार्थीनीकरीता स्वतंत्र वसतीगृह, क्रिडांगणे, तालीमखाना इ सोई आहेत.

हार्दिक शुभेच्छा!!!

फोन } ऑफिस ४४ ०६ ९७
डेअरी ४४ २० ४२

# पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.

१८८५, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

पुणे शहरातील ग्राहकांना प्लास्टिकच्या पिशव्यांतून निर्जन्तुक व सकस दूधाचा नियमित पुरवठा करणारी अग्रेसर व विश्वासार्ह संस्था.

योग्य भाव, उत्तम, निर्जन्तूक व सकस दूध, नम्रसेवा व नियमितपणासाठी या संस्थेचे ग्राहक व्हा.

शा. शं. लोखंडे
व्यवस्थापक

शां. चि. शहा
उपाध्यक्ष

अ. ना. मोहोळ
अध्यक्ष

*With Best Compliments From*

# Deccan Embroidery Manufacturing Co.

MANUFACTURERS OF

Scissors' Brand Sewing Thread.

Depots at Bombay, Calcutta, Delhi, Hyderabad.

Mills & Office—39/1 A. Wellesley Road, Sangam Bridge
Pune 411001.

*With Best Compliments From :*

# NICHROME METAL WORKS

**46, Dr. Ambedkar Road, Poona 411001 (India).**

Gram — Nichrome

Phone 24287


मु-द-कं-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स

डेक्कन एज्युकेशन सोसायटीने इ. स १९४३ साली या महाविद्यालयाची स्थापना केली. बी. कॉम., एम कॉम. व पी. एच. डी पर्यंतच्या अभ्यासाची सोय येथे आहे महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध असून त्यात सुमारे २० हजार ग्रंथ आहेत. कॉलेजचे क्रिडांगण प्रशस्त असून त्यामध्ये सर्व देशी व विदेशी खेळ खेळण्याची सोय आहे. वसतीगृह, व्यायामशाळा, सहकारी उपहारगृह व सहकारी भांडार या गोष्टी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत. महाविद्यालयातील निकालांची परंपरा उत्कृष्ट असून निरनिराळी मंडळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सतत प्रयत्नशील असतात.

## अहिल्यादेवी हायस्कूल फॉर गर्ल्स

डेक्कन एज्युकेशन सोसायटीतर्फे स्थापण्यात आलेले हे हायस्कूल सोसायटीचे संचालक व निपुण आणि कर्तव्यदक्ष शिक्षकवर्ग यांच्यामुळे प्रगती पथावर आहे. शालांत परीक्षेपर्यंतचे शिक्षण या हायस्कूलमध्ये देण्यात येते. सध्या या शाळेत सुमारे १६०० विद्यार्थीनी शिकत आहेत. शाळेचो स्पृहणीय निकालांची उज्वल परंपरा, विद्यार्थीनींकडे देण्यात येणारे वैयक्तिक लक्ष यामुळे संस्थेची यशोमंदिराकडे होणारी वाटचाल अधिकाधिक वेगाने होत आहे.

## शिक्षण प्रसारक मंडळी

आजच्या 'शिक्षण प्रसारक मंडळीची' स्थापना दि. ५ फेब्रुवारी १८८८ रोजी झाली म्हणजे या दिवशी आधीच पाच वर्षे नावलौकिकास आलेल्या नूतन मराठी विद्यालयाच्या चालकांनी व हितचिंतकांनी एक सभा घेऊन ही संस्था स्थापन केली या संस्थेतर्फे आज पुणे, मुंबई व सोलापूर या तीन ठिकाणी एकूण सतरा संस्था चालविल्या जातात. संस्थेच्या स. प. महाविद्यालय, पुणे; रामनारायण रुईया महाविद्यालय, मुंबई; पोदार महाविद्यालय, मुंबई; नूतन मराठी विद्यालय, पुणे; हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर; टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे या शिक्षण संस्थानी तर फारच नावलौकिक मिळवला आहे. या संस्थेत उत्कृष्ट विद्यार्थ्यांची व उत्कृष्ट शिक्षकाची परंपराच निर्माण झाली आहे. समाजाची व राष्ट्राची शैक्षणिक सेवा करण्याचे कार्य हे मंडळ अविरतपणे करीत आहे.

## नूतन मराठी विद्यालय

१ जानेवारी १८८३ रोजी रा. रा. कृष्णाजी उकिडवे, रा रा. कृष्णाजी डोंगरे, रा. रा. रामचंद्र देव, रा. रा. दामोदर करबेळकर व दामुअण्णा कुलकर्णी या सर्वांनी निबंधमालाकार विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या स्मरणार्थ या विद्यालयाची स्थापना केली. ८० मुलांनीशी सुरू झालेल्या शाळेत महिन्यातच ३५० विद्यार्थी दाखल झाले. कै. म. म. द. वा पोतदार यांच्या कारकीर्दीत शाळेला विशेष असे स्वतंत्र रूप व प्रतिष्ठा प्राप्त झाली पुणे बोर्डाच्या एस. एस्. सी. परीक्षेत या विद्यालयाचे ४।५ विद्यार्थी पहिल्या तीसात असतातच. याशिवाय वक्तृत्व, चढाओढ, आतरशालेय क्रिकेट सामने इत्यादि विषयात नूतन मराठी विद्यालयाचे विद्यार्थी नेहमीच आघाडीवर असतात.

## सर परशुरामभाऊ महाविद्यालय

१४ जून १९१६ रोजी या महाविद्यालयाची स्थापना झालेली असून हे महाविद्यालय म्हणजे महाराष्ट्रातील एक अग्रेसर शिक्षण संस्था आहे या महाविद्यालयाचे पूर्वीचे नाव 'न्यू पूना कॉलेज' असे होते १९२८ साली जमखिंडीचे श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धन यांनी वडिलाच्या स्मरणार्थ महाविद्यालयास २ लक्ष रुपयांची देणगी दिली व महाविद्यालयास 'सर परशुरामभाऊ कॉलेज' असे नामाभिधान प्राप्त झाले विद्यार्थ्यांची संख्या, त्याचे परीक्षेतील यश, ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडांगण इ. साधनसभार व व्यासंगी प्राध्यापकवर्ग या दृष्टीने महाविद्यालय यशस्वी ठरले आहे. महाविद्यालयाची स्वतंत्र भव्य इमारत असून मुलाची व मुलींची वसतीगृहेही आहेत. महाविद्यालयाचे देवी रमाबाई सभागृह, व्याख्यानमाला, प्रयोगशाळा, अभ्यासशाळा, प्रशस्त मैदान, पोहण्याचा तलाव या गोष्टी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्नशील आहेत. आज महाविद्यालयात सुमारे ३००० विद्यार्थी विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

## टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे

इ स. १९४१ साली 'शिक्षण प्रसारक मंडळी' ने हे प्रशिक्षण महाविद्यालय स्थापन करून एक धाडसी पाऊल टाकले. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून फक्त सात वर्षानंतर येथे एम्. एड् परीक्षेचा अभ्यासक्रम शिकविण्याची व्यवस्था करण्यात आली. मुंबई राज्यातील बिनसरकारी संस्थेने चालविलेले हे पहिलेच प्रशिक्षण महाविद्यालय असून महाराष्ट्रातील एक अग्रेसर महाविद्यालय आहे या महाविद्यालयाशी संबधित असे याच शिक्षण संस्थेचे मूक-बधिर विद्यालय आहे या विषयाच्या प्रशिक्षणाची सोय याच एकमेव महाविद्यालयाने केली आहे. एम्. एड्. व पी एच्. डी. साठी अपंग मुलांच्या शिक्षणासबंधी संशोधन करण्याचीही या महाविद्यालयात उत्तम सोय आहे महाविद्यालयाचे अद्यावत ग्रंथालय आहे. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असूनही महाविद्यालयाने गेल्या पंचवीस वर्षात प्रशंसनीय प्रगती केली आहे

## मॉडर्न एज्युकेशन सोसायटी

१५ फेब्रुवारी १९३२ रोजी या संस्थेची स्थापना झाली. प्रि. व्ही. के. जोग, प्रि. कृ. म. खाडये व प्रि. के. रा. कानिटकर हे संस्थेच्या संस्थापकांपैकी होत. सोसायटीने पुण्यात इ. स. १९३२ मध्ये 'नौरोसजी वाडिया कॉलेज व १९३९ मध्ये सर कुस्टो वाडिया इन्स्टिट्यूट व इ. स. १९५२ मध्ये मुंबईत 'रुपारेल कॉलेज' स्थापन

## With Best Compliments From :-

# M/s. FABROCRAFTS

♣ Engineers ♣ Fabricators ♣ Erectors

Plot No. 25, Baramati Co-op. Industrial Estate,
Bhigwan Road, Baramati, Dist Poona.

★

**CONTACT FOR :—**

*SUGAR MACHINERY, CEMENT MACHINERY*
*STRUCTURAL FABRICATION*

---

स्थापना १६।१२।१९३५

# बारामती कृषि उत्पन्न बाजार समिती, बारामती

बारामती, जि. पुणे

## गुळ, कापूस, भूसार व जनावरांची अग्रगण्य बाजारपेठ

शेतीमालाचे दैनंदिन व्यवहारात सुयोग्य नियमन करून, शेतकरी, ज. क. एजंटस् व खरेदीदार
यांच्या बाजारांतील हितसंबंधांचे समान संरक्षण करणारी एकमेव संस्था.

१) श्री गणपतराव गुलाबराव पवार, सभापती
२) श्री. शशिकान्त शिवलाल शाह, उपसभापती
३) ,, गणपतराव विठ्ठलराव तावरे, सदस्य
४) ,, सिद्धेश्वर गजानन मुळे, सदस्य
५) ,, नानासाहेब जिजाबा गावडे ,,
६) ,, तानाजीराव बाजीराव जराडे ,,
७) ,, सुभाषचंद्र बाळकृष्ण जगताप ,,
८) ,, दशरथ बाबासाहेब घुमाळ ,,
९) ,, अरविंद गुलाबराव बाबळे
१०) ,, साहेबराव संभाजी चादगुडे ,,
११) ,, उत्तमराव गणपतराव घाडगे ,,
१२) ,, सतीश नामदेवराव खोमणे ,,
१३) ,, प्रकाश मल्हारराव देवकाते ,,
१५) ,, रामलिंग बाबूराव सालपे ,,
१५) ,, तुकाराम दादासाहेब झावरे ,,
१६) ,, धोंडिबा आबाजी सातव ,,

श्री पु. दि. गोरे, सचिव

केले. याच संस्थेचे मुंबईतील रुपारेल महाविद्यालयाच्या आवारातच 'न्यू लॉ कॉलेज' हीं आहे. पुण्यात सुमारे २५०० व मुंबईत सुमारे ३५०० विद्यार्थी या सोसायटीच्या संस्थांमधून शिकत आहेत पुणे व मुंबई येथे सोसायटीची एकूण ५० लक्ष किमतीची स्थावर मालमत्ता आहे श्री. वाडिया, श्री. तारापोरवाळा, श्री. गोवर्धनदास रुपारेल यांचे आर्थिक सहाय्य व इतर शिक्षणप्रेमी नागरिकांचे सहाय्य तसेच कार्यकर्त्यांची निष्ठा यामुळे संस्थेची सर्वांगीण प्रगती होत आहे.

## नौरोसजी वाडिया कॉलेज

पुणे विद्यापीठाशी संलग्न असे हे महाविद्यालय असून येथे बी ए., बी. एस्सी व बि. कॉम पर्यंतचें शिक्षण दिले जाते. विद्यापीठाच्या वतीने पदव्युत्तर अध्यापन व संशोधन यात येथील प्राध्यापक भाग घेतात सर्व जातीधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय खुले असून सिलोन व पूर्व आफ्रिका येथूनही शिक्षणासाठी विद्यार्थी येथे येतात. १९३२ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेत आज सुमारे २००० विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत महाविद्यालयाच्या वसतीगृहात सुमारे ३०० विद्यार्थी विद्यार्थीनीची राहण्याची सोय होऊ शकते. ग्रंथालय, प्रयोगशाळा, जिमखाना, एन सी. सी. इ. सर्व व्यवस्था या महाविद्यालयांत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधला जातो महाविद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी हिन्दी सैन्यात वरच्या दर्जाचे अधिकारी, आय ए एस, आय एफ. एस, इंडियन पोलिस, इंडियन फॉरेस्ट, न्यायखाते यात मानाच्या जागी काम करीत आहेत.

## सर कसरो वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीने सर कसरो वाडिया यांच्या अमुल्य सहकार्याने इ. स. १९३८ साली या इन्स्टिट्यूटची स्थापना केली. सध्या या संस्थेत इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी डिप्लोमा, रेडिओ इंजिनिअरींगचा डिप्लोमा कोर्स, मेकॅनिकल ड्राफ्टस्मन, रेडिओ सर्व्हिसिंग इ. सर्टिफिकेट कोर्सेस सिव्हील इंजिनिअरींग व मेकॅनिकल इंजिनिअरींगचा डिप्लोमा कोर्स इ. शिक्षणाची सोय असून संस्थेत सुमारे ६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. येथील वसतिगृहात सुमारे १०० विद्यार्थ्यांची सोय होऊ शकते

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

इ. स. १९३४ साली प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. या संस्थेतर्फे मॉडर्न कॉलेज, मॉडर्न हायस्कूल प्राथमिक विद्यामंदिर, सर ससून डेव्हीड वसतीगृह व गर्ल्स हायस्कूल, या संस्था चालविल्या जातात. विद्यार्थ्यांना स्वावलंबी, कार्यक्षम व सुसंस्कृत नागरिक बनविणे या उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे

## मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲन्ड कॉमर्स

१९ जुन १९७० रोजी या महाविद्यालयाची स्थापना झाली मराठी इकॉनॉमिक्स, पॉलिटिक्स, सायकॉलॉजी, जॉग्रफी हे आर्टसचे विशेष विषय तर फिजिक्स, केमिस्ट्री हे सायन्सचे प्रमुख विषय शिकविण्याची सोय येथे आहे. कॉमर्सच्या ऑप्शनल विषयांपैकी अकौंटिंग ॲन्ड ऑडीटिंग, ॲडव्हान्सड् कॉस्ट अकौंटिंग व स्टॅटिस्टिक्स हे विषय शिकविले जातात. नविन अभ्यासक्रमानुसार या महाविद्यालयात जुनिअर कॉलेजही सुरु झाले आहे. पुणे विद्यापीठानुसार सेमिस्टर पद्धत या महाविद्यालयातही सुरू असून कॉमर्सचा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविण्याचीही सोय अलिकडे करण्यात आली आहे. महाविद्यालयाचे निकाल उत्कृष्ट लागत असून वसतीगृह, ग्रंथालय, एन सी. सी. एन. एस एस. वगैरे उपक्रमही येथे आहेतच.

## मॉडर्न हायस्कूल

ही शाळा म्हणजे महाराष्ट्र राज्यातील एक उत्तम शाळा आहे उत्कृष्ट शिक्षक, अत्युत्तम साहित्य व प्रासादतुल्य इमारत याची सांगड घालून ही शाळा विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधत आहे.

प्राथमिक विद्यामंदिर ही पुण्यातील एक नमुनेदार व उत्कृष्ट प्राथमिक शाळा आहे. संस्थेच्या सर ससून डेव्हीड वसतीगृहात ६७ विद्यार्थ्यांची सोय आहे. पी. ई. एस. गर्ल्स हायस्कूलमध्येही आज सुमारे १२०० मुली शिकत आहे. शिवण, भरतकाम, संगीत, चित्रकला हे विषयही या शाळेत शिकविले जातात संस्थेचे सुमारे ३०० विद्यार्थी संख्या असलेले शिशु विद्या मंदीरही आहे. नॅशनल केमिकल लॅबोरेटरी कॅम्पस् मध्ये के. जी. व प्राथमिक इंग्रजी माध्यमाची शाखाही याच संस्थेची आहे. गणेशखिंड येथेही संस्थेचे एक मॉडर्न हायस्कूल आहे

## डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन

कै. श्री. गंगाराम भाऊ म्हस्के यांनी जानेवारी १८८३ रोजी या संस्थेची स्थापना केली संस्थेच्या कार्यास मात्र १८८५ सालापासून सुरवात झाली. बडोद्याचे कै. श्रीमंत सयाजीराव महाराज पुण्यास आलेले असताना त्यांनी संस्थेला वर्षासन सुरु केले नंतर कोल्हापूर व इतर संस्थानिकांचीही वर्षासने संस्थेस मिळू लागली. त्यामुळे गरीब व हुशार विद्यार्थ्यांना या संस्थेतर्फे शिष्यवृत्त्या देण्यात येऊ लागल्या. संस्थेने १९५४ साली टिळकरोडवर आपली स्वतःची इमारत बांधली व तिला 'म्हस्के स्मारक मंदिर असे नाव दिले.

## श्री शिवाजी मराठा सोसायटी

बहुजन समाजाची सर्वांगीण उन्नत्ती व्हावी या उद्देशाने या संस्थेची इ. स. १९१८ मध्ये स्थापना झाली. संस्था हायस्कूल, प्रायमरी स्कूल, प्रॅक्टिसिंग स्कूल, बालकमंदिर, बोर्डिंग यासारख्या अकरा संस्था चालवित आहे. संस्थेने शेलपिंपळगाव येथे श्री शिवाजी मराठा हायस्कूल, जून १९६५ पासून सुरू केले आहे. व हीच संस्थेच्या ग्रामीण भागात शिक्षण संस्था काढण्याच्या कार्याची सुरवात आहे. आज संस्थेत सुमारे ३००० विद्यार्थी शिकत आहेत.

# कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे

मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-९.

विविध प्रकारचे ६० शेतीमाल नियमित करून आणि १५० ओकरांचे विस्तिर्ण व अत्याधुनिक बाजार आवार उभारून शेतीमाल उत्पादकांचे आर्थिक हितसंरक्षण करणारी महाराष्ट्रातील एक अग्रेसर संस्था

| जी. के. शिंदे<br>बी. ए एलएल. बी.<br>सचिव | शिवाजीराव कोंडे<br>उपसभापती | खासदार अण्णासाहेब मगर<br>बी. एस्सी. (अॅग्री)<br>सभापती |
|---|---|---|

**सदस्य**

| | | |
|---|---|---|
| सु. य. आल्हाट | र. रा. खांदवे | बा. तु. टिंगरे |
| व. फ. चोरघडे | वि. द. दांगट | वि. ज. जाधवराव |
| अ. न. लाठे | धों. मु. शिंदे | आ. द. तापकीर |
| रा. बा. जाबळकर | र. अ. ओसवाल, बी. ए. एलएल. बी | मा. वि. बाफना बी. एस्सी. |
| | बा. सो. काळे | |

फोन : ४४३०४९

---

*With Best Compliments From*

# KULKARNI FOUNDRIES LTD.

MANUFACTURERS
FOUNDERS • ENGINEERS

Regd. Office & Works
Hadapsar Industrial Estate
Poona-411013

Phone : 7601
Gram : 'FOUNDERS' Poone




मु-द-इ-बी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी

शहराच्या पूर्व भागात असलेली ही एक जुनी संस्था आहे. मध्यंतरी अनेक स्थित्यंतरे होऊन रास्तापेठेतील काही मान्यवर नागरिकांनी इ. स. १९२७ साली या संस्थेची स्थापना केली इ. स. १९३८ मध्ये संस्थेने एक 'नाईट हायस्कूल' सुरु केले १९५४ पासून एस. टी. टी. इन्स्टिटयूट सुरु करून संस्थेने प्रगतीचे आणखी एक पाऊल पुढे टाकले. सध्या या संस्थेत सुमारे २००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या शाळेची स्वतंत्र व भव्य इमारत असून संस्थेची एक कमर्शिअल बिल्डिंगही आहे संस्थेतर्फे लॅबोरेटरी, ग्रंथालय, बालवीरपथक, विद्यार्थी भांडार, गुणविकासवर्ग वगैरे उपक्रम चालू असतात.

## महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा

म॰ म. दत्तो वामन पोतदार श्री. शंकरराव देव व आचार्य काकासाहेब कालेलकर यांनी २२ मे १९३७ रोजी या संस्थेची स्थापना केली. दरवर्षी हिंदीच्या व उर्दूच्या मिळून १२ परिक्षा फेब्रुवारी व सप्टेंबर मध्ये या संस्थेतर्फे घेण्यात येतात. संस्थेचे स्वतःचे मुद्रणालय असून त्यातर्फे शालेय परीक्षोपयोगी व इतर पुस्तके प्रकाशित होत असतात. संस्थेचे कॅंप भागात हिंदी माध्यमाचे हायस्कूल व प्रा. शाळा आहे. लो. टिळकांच्या वास्तव्याने पुनीत झालेले राष्ट्रभाषाभवन याच संस्थेच्या मालकीचे आहे संस्थेच्या ग्रंथालयात २०,००० चे वर पुस्तके असून महाराष्ट्रात इतर अनेक ठिकाणी संस्थेची विभागीय कार्यालये, शिक्षणकेंद्रे व ग्रंथालये आहेत.

## अवतार मेहेरबाबा केंद्र

श्री मेहेरबाबा यांचा संदेश सर्वत्र पसरविणे या उद्देशाने या केंद्राची स्थापना झाली. सर्व धर्मीयांना व जातीयांना हे केंद्र खुले आहे. श्री मेहेरबाबा यांच्याविषयी सर्व भाषातील पुस्तके तेथे मिळतात केंद्राचे ग्रंथालयही आहे

## पुणे विद्यार्थी गृह

पुणे विद्यार्थी गृह म्हणजेच पूर्वीचे पुणे अनाथ विद्यार्थी गृह होय. जोरदार राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळात गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे या उद्देशाने इ. स. १९०९ साली या संस्थेची स्थापना झाली कै. वि ग. तथा दादासाहेब केतकर, कै. बाबासाहेब परांजपे, कै. बाळूकाका कानिटकर, कै. रा ज. पटवर्धन, कै. दत्तोपंत आपटे, कै. हरिभाऊ फाटक या कार्यकर्त्यांनी तन मन धन अर्पून संस्थेच्या प्रगतीस मोलाचा हातभार लावला. संस्थेमध्ये सर्वांगीण शिक्षण मिळावे यासाठी संस्थेने बहुविध शिक्षणक्रम आखलेला असून सुतारकाम, मुद्रण, व्यापारशास्त्र यांच्या अभ्यासाचा यात समावेश आहे बौद्धिक त्याबरोबरच तांत्रिक व शारिरिक शिक्षणही येथे दिले जाते. संस्थेत हुशार व गरजू विद्यार्थ्यांची रहाण्याची व जेवणाची व्यवस्था मोफत किंवा अत्यल्प खर्चात केली जाते. या संस्थेतर्फे राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र विद्यालय स्थापन करण्यात आले. इ. स. १९२६ साली कै. दादासाहेब केतकर यांनी संस्थेची नाशिक येथे एक शाखा सुरु केली संस्थेतर्फे १९२० साली 'लोकसंग्रह' नावाचे राष्ट्रीय वृत्तीचे दैनिक वर्तमानपत्र व त्याच्या अनुषंगाने "लोकसंग्रह" छापखाना सुरु करण्यात आला आर्थिक अडचणीमुळे हे वृत्तपत्र बंद पडले. भारतातील पहिले फोटो कंपोझिंग मशीन 'लोकसंग्रह' छापखान्यात आले. सध्या संस्थेची 'महाराष्ट्र मुद्रण शाखा' ही मुद्रणाचे शिक्षण देणारी भारतातील एक मोठी संस्था आहे. संस्थेने 'पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन तर्फे पुस्तकाचे प्रकाशनही सुरु केले. माध्यमिक शाळांसाठी सरकारमान्य क्रमीक पुस्तके, उच्च शिक्षणास उपयुक्त अशी शास्त्र व इंजिनियरिंगची पुस्तके, प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन, समाचार ही मासिके इत्यादी विद्यार्थ्यांना उपयुक्त असे वाङ्मय संस्थेतर्फे प्रकाशित होते मुंबई येथेही संस्थेचे 'विद्याभवन' ही शैक्षणिक शाखा असून मुंबई येथील वसतीगृहात ५० विद्यार्थ्यांची अल्प खर्चात निवास, भोजन व शिक्षण यांची सोय केली आहे. संस्थेचे इंदुमती वाचनालय व ग्रंथालय असून घोरपडे बाग येथे शेती व डेअरीही आहे.

## महाराष्ट्र विद्यालय

१९२१ साली स्थापन झालेल्या या विद्यालयात पाचवीपासून बारावी पर्यंतचे वर्ग आहेत. बौद्धिक शिक्षणाबरोबरच तांत्रीक शिक्षणही या विद्यालयात दिले जाते. या विद्यालयात मुद्रण, रसायन, प्लॅस्टिक, तंत्रशिक्षण, कॉमर्स, ऑप्टिकल वगैरे १० व्यावसायिक विषयांच्या शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. इतर व्यावसायिक विषयांच्या शिक्षणाची सोय असलेली महाराष्ट्रात बहुधा ही एकमेव शाळा असावी.

## अतुर फाऊंडेशन

इ. स. १९६३ साली चॅरिटी ट्रस्ट म्हणून अतुर फाऊंडेशनची स्थापना झाली. विविध परोपकारी, सामाजिक व शैक्षणिक सेवेच्या योजनांद्वारे समाजसेवा करण्याच्या उद्देशाने या फाऊंडेशनची स्थापना झाली. अतुर फाऊंडेशनतर्फे लाल देवळासमोर पंडित जवाहरलाल नेहरू यांचे स्मारक म्हणून 'नेहरू मेमोरियल हॉल' बांधण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्यक्रम व सार्वजनिक सभांसाठी या हॉलचा उपयोग होतो. सुमारे १ हजार लोक बसू शकतील एवढ्या मोठ्या या हॉलला सुंदर व्यासपीठ आहे. फाऊंडेशनतर्फे अखिल भारतीय लेखकाच्या स्पर्धाही ठेवण्यात येतात.

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था

या संस्थेतर्फे एस. एस. सी. नंतरच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाची पुस्तके वाचनासाठी देण्यात येतात लग्नकार्यासाठी व इतर मंगलकार्यासाठी या संस्थेचे कार्यालय माफक भाड्याने देण्यात येते.

PHONE : 44 39 82

# ABHIJIT ENTERPRISES

New 712, Sadashiv Peth, Near Khalkar Talim, Poona-411 030

* Electronic Calculators * Superior-UMS-Calcom
* Lakhi Shredomat * Cassettes-Tapes-Recorders
* Musical-Phone receiver Stands & Novelties

**Prop. S. B. Patwardhan**

---

हार्दिक शुभेच्छा !

# श्री सुवर्ण सहकारी बँक

रजि. ऑफिस ७५९/५१, डे. जि. फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे-४.
फोन ५४५२९, ५८३५४

शाखा —
१) ३१, बुधवार पेठ, पुणे-२. फोन ४४६५१९
२) २०३५, टिळक रोड, पुणे-३०. फोन ४४२६४८
३) श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर फोन ५७

केवळ १० वर्षात खेळते भांडवल ५ कोटी रु च्या वर

वसंत चिचाळकर, मॅनेजर — जे. सी. आगाशे, चेअरमन

---

दूरध्वनि ४४९३६

# विद्या सहकारी बँक लि.

जुन्नरकर दत्तमंदिर इमारत, ५९६, सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ जवळ, लक्ष्मी रोड, पुणे-४११ ०३०.

## प्रगतीचा आढावा

| | | |
|---|---|---|
| १) | अधिकृत भाग भांडवल | ५.०० |
| २) | वसूल भाग भांडवल | ४.९९ |
| ३) | एकूण ठेवी | ८४.०० |
| ४) | एकूण कर्जे | ६१.०० |
| ५) | खेळते भांडवल | ९९.०० |

सभासद २८००

प्रा. वि. अ. जोशी, अध्यक्ष — प्रा. वि. रा. शिरगुरकर, उपाध्यक्ष — जे. जी. नलावडे, व्यवस्थापक



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

संस्थेतर्फे वैदिक पाठशाळा व संगीत भजनवर्ग चालविला जातो किंमती इतकी अनामत रक्कम घेऊन ही संस्था अत्यंत उपयुक्त असे रुग्णसाहित्यही विनामूल्य पुरविते याशिवाय हुशार व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदतही ही संस्था देते.

## शिक्षण प्रसारिणी सभा

इ. स. १९५५ मध्ये श्री. प्र. रा. धुळे, श्री. स. बा. गोखले, श्री. बा. र. आलेगावकर व श्रीमती इंदुताई प्रधान यांनी या संस्थेची स्थापना केली सध्या संस्थेतर्फे वि. रा. वेलणकर हायस्कूल, न्यू नाईट हायस्कूल व श्रीकृष्ण प्राथमिक विद्यालय या शाखा चालविल्या जातात. इ. स. १९६१ मध्ये महापुराचा तडाखा बसला तरीही संस्थेच्या संस्थापकांनी व सेवकांनी संस्था बंद पडू न देता जास्त वेगाने प्रगतीपथावर नेली आहे व नेत आहेत

## अभिनव कला विद्यालय

भारतीय कला प्रसारिणी सभेतर्फे चालविले जाणारे हे विद्यालय 'इन्स्टिटयूट ऑफ मॉडर्न आर्ट' या नावाने १९३५ मध्ये स्थापन झाले या कला विद्यालयात जी. डी आर्ट, पेंटिंग, जी डी आर्ट कमर्शिअल डिप्लोमा, डी. टी. सी. कोर्स, वास्तुचित्रकलेचा आर्किटेक्चर डिप्लोमा कोर्स इ शिकविले जाते. तसेच निसर्गचित्रण वर्ग, बालचित्रकला वर्ग, सरकारी ग्रेड परीक्षावर्ग, सुट्टीचे छंद वर्ग असे वर्गही चालविले जातात. टिळक रोडवर संस्थेची प्रशस्त इमारत आहे.

## महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिती

इ. स. १९३६ साली राष्ट्रभाषा हिंदी व राष्ट्रलिपि देवनागरीचा प्रचार करण्यासाठी या संस्थेची स्थापना झाली. ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नगर, कोल्हापुर, नाशिक, सांगली इ. महाराष्ट्राच्या बारा जिल्ह्यात संस्था हिंदी प्रचाराचे कार्य करीत आहे. राष्ट्रभाषा प्राथमिक, प्रारंभिक, प्रवेश, परिचय, कोविद, रत्न व राष्ट्रभाषा आचार्य या परिक्षा संस्थेतर्फे घेतल्या जातात. फेब्रुवारी व सप्टेंबरमध्ये होणाऱ्या या परीक्षा लोकप्रिय झाल्या आहेत याशिवाय राष्ट्रभारती ग्रंथालय, तुलसी विद्या निकेतन व महाविद्यालय, आनंद वाचनालय, हिंदी साहित्य सदन, भारती वाग्वर्धिनी सभा इत्यादी उपक्रमही संस्था चालविते.

## श्री जैन तत्वज्ञान विद्यापीठ

मुनिराज श्री, जितेंद्रविजयजी महाराजांनी १९४८ साली या विद्यापीठाची स्थापना केली. बालकांना जैन धर्माचे सांगोपांग तत्वज्ञान शिकवून या विद्यापीठातर्फे त्यांच्या परीक्षा घेण्यात येतात. प्रौढ व शिक्षित स्त्रि-पुरुषांनाही व जैन तत्वज्ञान जिज्ञासूनाही या परीक्षांना बसता येते.. या परीक्षा दर वर्षी जुलैमध्ये होतात. बडोदा व जामनगर येथे या संस्थेच्या शाखा आहेत. संस्थेचे पुस्तकालय असून मुलुंड येथे एक विद्यापीठभुवन आहे.

## अग्रवाल समाज पूना आणि श्री महाराजाधिराज अग्रसेनभवन ट्रस्ट

पुण्यातील अग्रवाल लोकांच्या संघटनेची उणीव भरून काढण्यासाठी श्री. हीरालाल भगवानदास सराफ यांनी श्री महाराजाधिराज अग्रसेन यांचे पुण्यस्मरण करुन १९५७ साली या संस्थेची स्थापन केली. श्री महाराजाधिराज अग्रसेनभवन ट्रस्ट या ट्रस्टतर्फे एक भव्य इमारत उभी करण्यात आली आहे.

## तेलगू-मुनूरवार ज्ञातगंगा

तेलगू-मुनूरवार समाजाची सर्वांगीण प्रगती व्हावी या उद्देशाने संस्थेची स्थापना झाली संस्थेचे 'तेलगू मुनुरवार मोफत वाचनालय आहे. संस्था या ज्ञातीच्या शैक्षणिक, सामाजिक व ऐहिक उत्कर्षासाठी सतत प्रयत्नशिल असून संस्था गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना मदत करते.

## बी. जे. मेडिकल कॉलेज

इ. स. १८७८ साली 'दि बयरामजी जीजीभाय मेडिकल स्कूल या नावाने या संस्थेची स्थापना झाली. इ. स. १९४६ पासून या स्कूलचे कॉलेजमध्ये रुपांतर झाले. कॉलेज पुणे विद्यापीठाशी सलग्न असून एम्. बी. बी एस., एम्. एस्. आणि एम्. डी. या अभ्यासक्रमाची सोय येथे आहे. महाविद्यालयाची भव्य इमारत असून रुग्णालयातील शिक्षणासाठी ससून हॉस्पीटलचा उपयोग करण्यात येतो.

## दि कॉलेज ऑफ इंजिनिअरींग

इ स १९५४ साली या महाविद्यालयाचा शतसांवत्सरिक समारंभ साजरा करण्यात आला. या महाविद्यालयाची इमारत, वर्कशॉप, प्रयोगशाळा असून वसतीगृह, व्यायामशाळा व क्रीडांगणही आहे वसतीगृहात सुमारे ४०० विद्यार्थ्यांची व्यवस्था होऊ शकते. पुणे विद्यापीठाशी सलग्न असलेल्या या महाविद्यालयात सिव्हिल इंजिनिअरींग, मेकॅनिकल इंजिनिअरींग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग, टेली-कम्युनिकेशन, मेटलर्जी ह्या विषयांवरील पदवी परीक्षांचे शिक्षण देण्यात येते. या महाविद्यालयातील वर्कशॉप हे भारतातील एक सर्वात मोठे व अद्यावत सामुग्रीने सुसज्ज असे वर्कशॉप आहे.

## श्री शाहू कॉलेज

इ. स. १९६० साली अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेतर्फे या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. सुरवातीस शुक्रवार पेठेतील शिवाजी मराठा हायस्कूलच्या इमारतीत या महाविद्यालयाचे वर्ग भरत असत आता पर्वती रमण्याजवळ या कॉलेजची स्वतःची भव्य वास्तू आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महाविद्यालय प्रयत्नशील असते.

# PEFCO

## Paranjpe Engineering & Foundry Co. Ltd.

E-14 & 15, Bhosari Industrial Area, Pune-411026.

MANUFACTURERS OF -

Graded and Alloy Cast Iron Castings (by centrigugal casting and shell moulding processes) Such as Cylinder liners, Automobile parts, Power Resistors made of Cast Iron/Stainless Steel Grids, Coils etc.

Manufactured to Customers Specifications.

**We solicit enquiries for :–**

Stainless Steel Valves, Stainles Steel Pump bodies and S. G. Iron Castings.

---




# KATLYN

Sand Shot Blasting, Metal Spraying

Fettling, Grinding

OFFICE 638, Narayan Peth, Opp. Natu Haud, Pune-411030.

PHONE : 449 161

WORKS : A-49, H Block, MIDC Pimpri Pune-411018.



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## येरवडा इंडस्ट्रियल स्कूल, येरवडा

बाल गुन्हेगाराची काळजी घेण्याकरिता इ स १८८९ साली ही संस्था स्थापन करण्यात आली. काही काळ या शिक्षण संस्थेचे नियंत्रण येरवडा जेलकडे होते, तर आता ते शिक्षण खात्याकडे सोपविण्यात आले आहे निरनिराळ्या बाल कोर्टाकडून आलेल्या मुलांना या शाळेत प्रवेश दिला जात असून शाळेत ४०० मुलाची व्यवस्था होऊ शकते येथे औद्योगिक शिक्षणावर अधिक भर दिला जात असून सुतारकाम, पुस्तक बाधणी, हातमाग, जस्तकाम, चाभारकाम, वेतकाम, लोकरी व सुती विणकाम, माळीकाम, कोंबड्या पाळणे, शेतकी, स्वैपाकी काम इत्यादी अठरा व्यवसायांचे शिक्षण मुलांच्या मातृभाषेतून दिले जाते.

## पुणे ज्ञानप्रबोधिनी संस्था

इ. स १९६२ मध्ये पुण्यातील कांही शिक्षण तज्ञानी या संस्थेची स्थापना केली. यंत्रशाळा आणि विद्युतकरण प्रयोगशाळा हे प्रबोधिनीचे वैशिष्टच आहे. येथील विद्यार्थी तज्ञाच्या मार्गदर्शनाखाली निरनिराळी यंत्रे तयार करतात व दुरुस्त करतात शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून संस्था सतत प्रयत्नशील असते. या शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या बुद्धीने तयार केलेली यंत्रेही प्रशसनीय आहेत

## महाराष्ट्रीय मंडळ

श्री. शि. वि. दामले यानी आपल्या मित्रांच्या सहकार्याने १९२४ साली या संस्थेची स्थापना केली. सर्व जाती धर्मांच्या लोकांसाठी ही संस्था खुली असून संस्थेची एक व्यायाम शाळा आहे इ. स. १९२५ पासून ही संस्था उन्हाळचात पोहण्याचे वर्ग भरवित असते. संस्थेच्या रायफल क्लबतर्फे बंदुकीचे शिक्षण दिले जाते. नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी, इडियन मिलीटरी अॅकॅडमी, डफरीन वगैरे ठिकाणी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी संस्था परीक्षेच्या तयारीचे वर्गही होते संस्था प्रथमोपचार वर्गही चालविते याशिवाय संस्थेच्या ३ प्राथमिक, एक माध्यमिक शाळा असून इग्रजी माध्यमाची एक प्राथमिक शाळा व एक हायस्कूलही आहे.

## अॅग्लो - उर्दू हायस्कूल फॉर बॉइज अॅन्ड गर्ल्स

इ. स. १९२० साली सरकारने या स्वतंत्र अॅग्लो—उर्दू हायस्कूलची स्थापना केली. शाळेचे वसतीगृहही आहे. १९३७ साली शाळेचे स्वतःच्या भव्य इमारतीत स्थलांतर झाले. 'महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन सोसायटी' या खाजगी संस्थेकडे शाळेची व्यवस्था सोपविण्यात आली असून शाळा उत्तरोत्तर प्रगती करीत आहे

## विद्या प्रसारिणी सभा

इ. स. १९२० मध्ये 'विद्या प्रसारिणी सभा' या संस्थेची स्थापना झाली सध्या या संस्थेचा व्याप खूपच वाढला असून संस्थेची एकूण आठ विद्यालये पुणे व लोणावळा येथे कार्यरत आहेत. संस्थेत एकूण चार हजार मुले मुली शिक्षण घेत आहेत तज्ञ अध्यापक वर्ग व इतर सर्व सोयीमुळे विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती होत आहे. पुण्यात या संस्थेची भारत हायस्कूल व भारत इंग्लिश स्कूल ही दोन माध्यमिक विद्यालये आहेत.

## सेंट मीराज कॉलेज फॉर गर्ल्स

पुणे विद्यापीठास सलग्न असलेले हे कॉलेज फक्त मुलींकरताच आहे. सर्व जातीच्या मुलींसाठी हे कॉलेज खुले असून हुशार विद्यार्थीनींना शिष्यवृत्या दिल्या जातात इग्रजी व मराठी माध्यमातून शिकविण्याची येथे सोय असून विद्यार्थीनींकडे व्यक्तिगत लक्ष दिले जाते.

## कॅम्प एज्युकेशन सोसायटी

कै. बाळकृष्ण सायन्ना व कै. राजन्ना लिंगू यानी मागासलेल्या विद्यार्थ्यांना प्राथमिक व दुय्यम शिक्षण मिळावे या उद्देशाने इ. स. १८८५ साली या संस्थेची स्थापना केली. संस्थेच्या लष्करी भागात असलेल्या हायस्कूलमध्ये सुमारे १९०० विद्यार्थी तर राजा धनराजगिरजी हायस्कूलमध्ये १००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत संस्थेच्या सोलापूरमध्ये असलेल्या मुलींच्या हायस्कूलमध्ये सुमारे ११०० मुली शिक्षण घेत आहेत. याशिवाय संस्थेच्या पुण्यात दोन प्राथमिक शाळाही आहेत.

## श्री. ना. दा. ठाकरसी महिला महाविद्यालय

इ. स. १९१६ मध्ये कै महर्षी कर्वे यानी या महाविद्यालयाची स्थापना केली श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाद्वारे हे महाविद्यालय चालविले जाते. येथे वाङमय शाखेचा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविण्याची सोय आहे. येथील अभ्यासक्रमातील विषयात उत्कृष्ट गृहजीवन आणि सुलभ व्यवसाय या दोन्हीतील समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे

## श्री. ना. दा. ठाकरसी कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर विमेन

मुंबई येथील श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठा तर्फे इ. स १९६४ मध्ये या कॉलेजची स्थापना झाली डी. एड., बी. एड आणि एम्. एड. या परीक्षाच्या अध्यापनाची सोय या महाविद्यालयात असून कॉलेजचे वसतीगृहही आहे

## सरदार दस्तुर नौशेरवान गर्ल्स हायस्कूल

इ स. १८९३ साली दस्तूर नौशेरवान दस्तूर जमस्प असतना ह्याच्या स्मरणार्थ हे हायस्कूल स्थापन करण्यात आले. पोहोणें, नाचणे, साहित्यसेवा, फ्रेंचभाषा इ. विषयांचे शिक्षण या संस्थेत दिले जाते.

भू-प्रवास 23 ...

## *Cummins Means Power*

We offer World Famous and Most dependable

***Cummins Diesel Engines***

In 60 to 1600 HP Range for Earthmoxing, Construction, Marine and Industrial Applications and also for

# POWER GENERATION

# Kirloskar Cummins Limited

**KOTHRUD, POONA 411029.**

---

हुतात्मा राजगुरुच्या पवित्र परिसरातील, स्वकर्तृत्वाने प्रगती पथावर वाटचाल करीत असलेली पुणे जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील कांदा बटाटा व जनावरे या नियंत्रीत मालाची अग्रगण्य प्रसिद्ध बाजारपेठ खेड ही आहे. शेतकऱ्यांच्या स्वकष्टाने पिकविलेल्या मालास योग्य वाजवी मोल मिळवून देणे आणि व्यापारी, ग्राहक यांना त्यांच्या पैशाचा योग्य मोबदला मिळवून या दोघांचा दुवा म्हणून काम करणारी—

# कृषि उत्पन्न बाजार समिती खेड (जि. पुणे)

नोटिफिकेशन – १६–८–१९५०

**मुख्य बाजार आवार - खेड** | **दुय्यम बाजार आवार - चाकण**

**नियमित शेतीमाल - कांदा, बटाटा, भुईमुग शेंग, मिरची (हिरवी व लाल), बाजरी, मूग, उडीद इ. भुसार माल. जनावरे - गाय, बैल, म्हैस, रेडे, शेळ्या व मेंढ्या इ.**

| | | |
|---|---|---|
| मा भगवान गेनूजी अडगडे उपसभापती | मा मारुतराव तुकाराम बारणे सभापती | मा. प्रभाकर गणपत तोत्रे सदस्य |
| मा धोंडीभाऊ शकरराव चांभारे सदस्य | म. वडू विठोबा गिलबिले सदस्य | मा. नारायण बाबूराव पवार |
| मा. नारायणराव बाबूराव बोगे ,, | मा. लक्ष्मणराव धोंडिबा शिंदे ,, | मा. सुदाम काशिनाथ घनवट ,, |
| मा. विठ्ठल भाऊसाहेब मुळूक ,, | मा. लक्ष्मण नामदेव बनकर ,, | मा. पृथ्वीराज चुनिलाल बोथरा ,, |
| मा. महादेव बाळाजी सातव ,, | मा. सिताराम सहादू ,, | मा. हरकचंद कचरदास भनसाळी ,, |
| मा. वामनराव धाकूजी ठाकूर ,, | श्री एस बी. थिगळे | ,, तालुका सह अधि. खेड ,, |
| ,, जिल्हा शेतकी अधि. जि. प. पुणे | | |




मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## सरदार दस्तूर होशंग बॉइज हायस्कूल

इ. स १९१२ साली डॉ. दस्तूर होशंग ह्यांच्या स्मरणार्थ या संस्थेची स्थापना झाली शारिरीक व बौद्धिक शिक्षणा बरोबरच विद्यार्थ्यांच्या आध्यात्मिक व नैतिक पातळीबद्दलही शाळा सदैव जागरूक असते शाळेत झोरोॲस्ट्रिअन धर्मावर व तत्वज्ञानावर व्याख्यानें दिली जातात.

## औद्योगिक विद्यालय

मुंबई राज्य सरकारतर्फे १९५५ साली या विद्यालयाची स्थापना झाली. घोले रोडवर संस्थेची स्वतःची इमारत असून कर्मशाळा व लोहशाळाही आहे. विद्यार्थ्यांना टेक्निकल विषयाचे शिक्षण देण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेत सुतारकाम विभाग, जोडकाम विभाग, यंत्रशाळा, प्रयोगशाळा, संग्रहागार, सचकशाळा व लोहशाळा इ. विभाग आहेत.

## स्कायलाइन इन्स्टिट्यूट ऑफ रेडिओ ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स

१९४७ साली स्थापन झालेल्या या संस्थेत एक वर्षाचा सरकारमान्य अभ्यासक्रम शिकविला जातो. आपापला व्यवसाय सांभाळून हा शिक्षणक्रम शिकता यावा म्हणून सोयीस्कर अशा सकाळच्या किंवा रात्रीच्या वेळी हे वर्ग भरण्याची सोय आहे. एक वर्षाचा फुलटाईम व दोन वर्षाचा पार्टटाईम अभ्यासक्रम आहे. स्त्रियासाठी स्वतंत्र वर्ग व कामगारासाठी शनिवार रविवारचे वर्ग भरविले जातात पुण्यातच संस्थेची एक शाखाही आहे.

## दि डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट ॲन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट

इ. स. १९३१ साली भाषाशास्त्र व इतिहास या दोन विषयांबद्दल संशोधन करण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या ग्रंथालयात सुमारे एक लाख ग्रंथ व परकिय नियत-कालिकांचा संग्रह आहे. संस्थेच्या म्युझियममध्ये अश्मयुगीन वस्तु, जुनी नाणी, चित्रे, नकाशे, ऐतिहासिक कागदपत्रे, संस्कृत व मराठी हस्तलिखिते इ. साहित्य आहे. संस्थेत शास्त्रीय उपकरणांनी सुसज्ज अशी ध्वनीशास्त्राची प्रयोगशाळा आहे संस्थेत नवीन संशोधन शाखा सुरु होत आहेत.

## दि कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर

इ. स १९०८ साली या महाविद्यालयाची स्थापना झाली. हे महाविद्यालय महाराष्ट्र सरकारच्या शेतकी खात्यातर्फे चालविले जाते शेतीसंबंधी संशोधन करणे व विद्यार्थ्यांना शेतीचे तात्त्विक व व्यावहारिक शिक्षण देणे हा संस्थेचा उद्देश आहे. गुरांची निगा व जोपासना ह्या विषयाचे शिक्षण येथे देण्यात येथे. सुसज्ज प्रयोगशाळा, शेते व बागा इ. ची व्यवस्था या कॉलेजमध्ये आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात १२००० हून जास्त ग्रंथ असून एम. एस. सी व पी. एच. डी. या परीक्षांसाठीही हे महाविद्यालय शिक्षण देते

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

इ स. १९४१ साली स्थापन झालेल्या या संस्थेने पहिल्या पंधरा वर्षात ग्रामीण भागात सुमारे ३७, शाळा काढल्या. त्या स्कूल बोर्डाच्या ताब्यात दिल्यानंतर संस्थेने खेडोपाडी माध्यमिक शाळा काढावयास सुरवात केली. सध्या मंडळाच्या ३० चे वर माध्यमिक शाळा आहेत

## क्वीन मेरीज टेक्निकल स्कूल फॉर डिसेबल्ड इंडियन सोल्जर्स, खडकी

इ. स १९१७ साली या शाळेची स्थापना झाली. सध्या संस्थेची स्वतःची इमारत १८१७ साली खडकी येथे ज्या ठिकाणी लढाई झाली त्याच ठिकाणी आहे. लढताना जायबंदी अगर अवयव गमवावयास लागल्यामुळे नोकरीस अपात्र ठरलेल्या सैनिकांना येथे हातमाग, पॉवरमाग, होजीअरी, निटींग, शिंपीकाम, इलेक्ट्रिसिटी, ऑईल इंजिन, सुतारकाम, रंगारीकाम, छपाईकाम वगैरे व्यवसायाचे शिक्षण मोफत देण्यात येऊन विक्री होणाऱ्या मालावर मजूरीही देण्यात येते. या शाळेत १०० विद्यार्थ्यांची सोय होऊ शकते.

## न्यू एज्युकेशन सोसायटी

कै. व्य ग काळे, कै. ल. म सत्तूर, कै. प्र. के अत्रे इ. मंडळींनी 'न्यू एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली व तिच्यातर्फे स्त्रिशिक्षणासाठी 'आगरकर हायस्कूल' ची स्थापना करून कै. आगरकरांचे चिरंतन स्मारक उभारले. 'आगरकर हायस्कूल' आता स्वतःच्या भव्य इमारतीत भरत असून मुलींच्या शैक्षणिक, बौद्धिक, व सर्वांगीण उन्नतीकडे लक्ष दिले जाते. इ. स १९४७ मध्ये संस्थेने सरदार रास्ते यांच्या मातोश्रीच्या नावाने एक प्राथमिक शाळा सुरु केली. १९५३ पासून संस्थेने पूर्व प्राथमिक विद्यालय सुरू करून मॉंटेसरी ते मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणाची सोय केली संस्थेच्या मल्टीपरपज हायस्कूल फॉर फाईन आर्टस् मध्ये विद्यार्थिनींना चित्रकला, संगीत इ ललीत कलाचे शिक्षण दिले जाते संस्थेच्या चार शाखांत सध्या सुमारे ३२५० विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत

## श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल

इ. स. १९३२ साली इंग्रजी माध्यमाच्या या शाळेची स्थापना झाली. शाळेचे वसतीगृह असून त्यात ३०० विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होऊ शकते या शाळेत शिकणारे विद्यार्थी लष्करी अधिकारी व्हावेत तसेच ते उत्तम नागरीक होऊन त्यांच्यात देशाभिमान, कर्तव्यनिष्ठा, मानवता, सत्यप्रेम वगैरे गुण वृद्धीस लागावेत अशा उद्देशाने येथे शिक्षण दिले जाते. पोहणे, घोड्यावर बसणे, मुष्टीयुद्ध इ. प्रकारही येथे शिकविले जातात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा प्रयत्नशील असते.

# TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, POONA

The Tilak Maharashtra Vidyapeeth offers the following Educational Courses -

1) **PARANGAT (M A)** Post Graduate Degree : 2 years course in Economics, Politics, Sociology, Philosophy & History.
2) **SPECIAL FEATURE** This is an interdisciplinary course, which gives students wide and comprehensive out look.
3) **VISHARAD (B A.) AND PARANGAT (M A)** (courses in Sanskrit) instruction in Sanskrit imparted on Modern and traditional Lines
4) **ONE YEAR DIPLOMA** courses in Indology & Sanskrit studies Courses are conducted on Sundays.
5) **ONE YEAR DIPLOMA** courses in Office Management & Salesmanship

## IMPORTANT PUBLICATIONS

1) Brahmasutravrittee by Lokamanya Tilak
2) Kaushik Sutra Darila Bhashya, Part I
3) Shixakalatil Va Peshavatil Stree Jeeva by Dr Mrs. Sharda Deshmukh (Sponsored by Govt of Maharashtra)
4) Lokashahi Samajvad Parisanvad (collection of lectures by Eminent Experts on the Subject)
5) Shaire-Azam Mirza Galib - by Dr Vidyadhar Gokhale
6) Vaidiki Sanskriteeche Pailu - by Dr C. G. Kashikar
7) Tilak Yashornava (3 Parts) - by Dr M S Ane
8) ससन्दर्भनिघण्टु सहिता दशोपनिषद् – सपादक डॉ. गणेश माधव कुरुलकर

For details contact Registrar, Tilak Maharashtra Vidyapeeth, Gultekadi, Poona 411009 (Phone - 440856)



**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड यांजकडून हार्दिक शुभेच्छा!**

किती प्रकारे आम्ही आपली सेवा करू शकतो खूप वर्षापूर्वी २० व्या शतकाच्या सुरवातीसच म्हणाना. शेतीची सुधारलेली अवजारे, आम्ही आपल्या सेवेत हजर केली. कडबा कापण्याचे यंत्र, लोखंडी नांगर इत्यादिंचा उपयोग शेतीची उन्नती करण्यास झाला.

तदनंतर आम्ही खूपच प्रगती केली आहे. आता आम्ही विविध अवजारे आणि वस्तू तयार करतो खाली दिलेल्या यादीवरून तुमच्या ध्यानात ही गोष्ट येईलच. तुम्हाला केव्हा काय पाहिजे ते फक्त कळवा. आपली सेवा करण्यास आम्हाला आनंदच वाटेल.

**पंप्स्** शेतीसाठी पाणी पुरवठ्या करिता, नागरी पाणी पुरवठ्या करिता, बूस्टर सर्व्हिस करिता, प्रोसेसिंग प्लांटस् करिता, अग्निशामक यंत्रणेकरिता, सांडपाणी वाहून नेण्याकरिता, साखर कारखान्याकरिता खाणीतील पाण्याचा उपसा करण्याकरिता.

**व्हॉल्व्हज्** स्लुईस व्हॉल्व्हज्, गेट व्हॉल्व्हज्, रिफ्लक्स व्हॉल्व्हज्, फूट व्हॉल्व्हज्, ग्लोब व्हॉल्व्हज् इत्यादी.

**मशीन टूल्स** व्हर्टिकल टरेट लेथस्, ड्रिलिंग मशिन्स, की–वे मिलिंग मशिन्स, रोटरी सरफेस ग्राइंडिंग मशिन्स.

**कॉम्प्रेसर्स** हर्मेटिकली सील्ड कॉम्प्रेसर्स –रेफ्रिजरेटर्स एअर कंडिशनर्स, वॉटर कूलर्स इत्यादी करता

# किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड

उद्योग भुवन, टिळक पथ, पुणे - ४११००२

**प्रादेशिक विक्री** – अहमदाबाद, पुणे, बंगलोर, भुवनेश्वर, इंदोर, जयपूर.

**शाखा** सिकंदराबाद, कलकत्ता, नवी दिल्ली, मद्रास.




मु–द्र–क–वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवे

## हिज हायनेस चिंतामणराव पटवर्धन हायस्कूल फॉर गर्ल्स (हुजूरपागा)

ही मुलींची शाळा सर्वांत जुनी आहे. या शाळेचा इतिहास म्हणजे ९० वर्षातील स्त्री शिक्षणाचा इतिहास आहे. इ स १९६० साली ही शाळा मल्टी–परपज हायस्कूलच्या गटात समाविष्ट झाल्यापासून संगीत, वादन, चित्रकला, टायपिंग, शॉर्टहँड इत्यादी विषयही शिकविले जातात. शाळेच्या वसतीगृहात इतर देशातील मुलीही राहण्यासाठी येतात. बालिका वस्तुभांडार, सुसज्ज वाचनालय, क्रीडा विभाग इ. कार्यही उत्कृष्टपणे चालले आहे. आंतर शालेय वक्तृत्वस्पर्धेतही या शाळेतील विद्यार्थीनी चमकतात. याच शाळेची प्राथमिक शाळाही आहे.

## स्पायसर मेमोरियल कॉलेज

'सेवन्थ डे अॅडव्हेन्टीस्ट चर्च' या तर्फे ही शिक्षणसंस्था चालविली जाते. विद्यार्थ्यांनी किमान एक तरी धंदे शिक्षण घेतले पाहिजे असा येथे नियम असून छापखाना, बांधणीविभाग, यंत्रशाळा, सुतारकाम, बेकरी स्टोअर्स या गोष्टी विद्यार्थीच चालवितात. संस्थेच्या एकूण ७० एकर जमिनीची व २० इमारतींची देखभाल विद्यार्थ्यांकडूनच ठेवली जाते. येथे भक्तिमार्गाचीही उपासना केली जाते. येथील काही विद्यार्थ्यांना अमेरिकन विद्यापीठातही प्रवेश मिळाला आहे.

## टिळक आयुर्वेद महाविद्यालय

टिळक महाविद्यालय या १९२१ साली स्थापन झालेल्या शिक्षण संस्थेत वाङमय, स्थापत्य, व्यापार व वैद्यक या चार शाखा सुरू करण्यात आल्या. परंतु नंतर वैद्यकातील आयुर्वेद शाखेस खूपच प्राधान्य मिळाले व आज 'टिळक आयुर्वेद महाविद्यालय' हे स्वतंत्र आयुर्वेद महाविद्यालय प्रसिद्ध झाले आहे. या महाविद्यालयात मिश्र वैद्यकाचा साडेचार वर्षांचा अभ्यासक्रम शिकविला जातो. महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत असून विद्यार्थ्यांकरीता दोन व विद्यार्थीनींकरीता एक अशी वसतीगृहे आहेत. महाविद्यालयातर्फे आयुर्वेद संशोधनाचे कामही चालू असून आयुर्विद्या नावाचे शास्त्रीय मासिकही प्रसिद्ध होते.

## आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अष्टांग आयुर्वेद विद्यालय

या विद्यालयात शुद्ध आयुर्वेदाचे शिक्षण दिले जाते. या विद्यालयाच्या प्रात्यक्षिकासाठी एक धर्मार्थ हॉस्पीटल चालविले जाते या विद्यालयाचे प्रिन्सिपॉल वैद्य हरिभाऊ बाळकृष्ण परांजपे यांनी आपले जीवन या शुद्ध आयुर्वेदाच्या कार्यासाठी वाहून घेतले

## दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स, पुणे केंद्र

सभासदात तांत्रिक ज्ञानाचा प्रसार करणे, तांत्रिक विषयावर लिखाण करण्यास प्रोत्साहन देणे, तांत्रिक ज्ञानासंबंधी आवड निर्माण करणे, तांत्रिक विषयावरील वाचनालये उपलब्ध करणे इ. कार्ये ही संस्था करते. इ स. १९५२ मध्ये या पुणे केंद्राची स्थापना झाली सिव्हिल, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, केमिकल, मायनिंग, मेटालर्जिकल, इलेक्ट्रॉनिक्स, टेलेकम्युनिकेशन इ. इंजिनिअरिंगमधील सर्व शाखांचे ही संस्था प्रतिनिधीत्व करते.

## गोखले अर्थशास्त्र संस्था

ना. गोखले यांच्या इच्छेप्रमाणे भारतातील राज्यशास्त्रीय व अर्थशास्त्रीय प्रश्नाबाबत संशोधन करण्याच्या उद्देशाने १९३० साली या संस्थेची स्थापना झाली. आर्थिक व्यवहारांची तपशीलवार माहिती गोळा करून ती शास्त्रीय पद्धतीने संकलित करण्याचे कार्य संस्था करते संस्थेत 'सर दोराबजी टाटा कृषिअर्थ शास्त्रीय विभाग, जनसंख्या संशोधन विभाग व वनअर्थशास्त्र विभाग' हे प्रमुख विभाग आहेत. या संस्थेतर्फे 'अर्थविज्ञान' नावाचे त्रैमासिक निघते.

## सरस्वती मंदिर संस्था

इ. स. १९२० साली या संस्थेची स्थापना झाली. शिक्षणसंस्था काढून शिक्षण व वाङमय यांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेची पूना नाईट हायस्कूल, पूना इंग्लिश स्कूल व मराठी शाळा ही तीन अपत्ये असून आज सुमारे ३५०० विद्यार्थी—विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

## अब्दुल वाहेद ॲन्ड मोलेदिना स्कूल

१८९१ साली एका लहानशा अरबी शाळेच्या रूपात या आज भव्य दिसणाऱ्या शाळेची स्थापना झाली, इ स १९३३ साली या शाळेचे हायस्कूलमध्ये रूपांतर झाले आता या शाळेचा खूपच विस्तार झालेला असून प्राथमिक शाळा, दुय्यम शाळा, व्यापारी शाळा, टेक्निकल शाळा, प्रिंटिंग प्रेस अशा विविध स्वरूपात शाळेचे कार्य चालू आहे. आज या संस्थेत सुमारे १००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत

## प्रेमलीला विठ्ठलदास कन्याशाळा

मुंबईच्या श्री ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठातर्फे ही शाळा चालविली जात असून १९६६ मध्ये या शाळेची स्थापना झाली. ना दा. ठाकरसी महिला प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्रॅक्टिसिंग स्कूल म्हणून सुरू झालेल्या या शाळेमुळे कर्वे रोड ते कोथरूड भागातील मुलींच्या शालेय शिक्षणाची सोय झाली आहे.

## जनता शिक्षण संस्था

इ. स. १९५२ मध्ये ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली. सध्या जेजुरी, वडगाव, निंबाळकर, चाकण, औंध, दापोडी, आंबके इत्यादी ठिकाणी संस्थेच्या शाखा ज्ञानप्रसाराचे कार्य करीत आहेत. जेजुरी येथे संस्थेचा केशवराव जेधे स्मारक मंदिर हॉल आहे.

हार्दिक शुभेच्छा

# बारामती व्यापारी असोसिएशन



बारामती, जि. पुणे



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स

महाराष्ट्रात व्यापारी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी कै. प्रा. ग. कृ. भोपटकर यांनी १९१८ साली या संस्थेची स्थापना केली. जी. सी. डी, डी कॉम, आय. सी डब्ल्यू. ए. कॉस्टिंग, जी. डी सी. एस., सी. ए. आय. आय. बी (बँकिंग) या विषयांचे मार्गदर्शन ही संस्था करते. संस्थेचा 'इंडस्ट्रियल इंजिनिअरींग अँन्ड मॅनेजमेंट हा शिक्षण-क्रमही आहे. संस्थेची जिजामाता बागेसमोर स्वतंत्र वास्तु आहे.

## मॅक्सम्युल्लर भवन

जर्मन भाषेचे शिक्षण देणारी ही पुण्यातील एक महत्वाची संस्था आहे. येथे शिक्षकांना जर्मन भाषेचे शिक्षण देण्यात येत असून संस्थेला जोडूनच वसतीगृह आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांसाठी असलेले वर्ग जोरात चालू असतात. याशिवाय संगीत नृत्य जलसे, चित्रपट, प्रदर्शने, व्याख्याने इ. सांस्कृतिक कार्यक्रमही संस्था आयोजित करते.

## शेठ ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय हॉस्पीटल

टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रात्यक्षिकासाठी म्हणून १९२५ साली एक लहानसे रुग्णालय सुरु करण्यात आले व नंतर याचेच उदार धनिकांच्या देणग्यांमुळे भव्य ताराचंद हॉस्पीटलमध्ये रुपांतर झाले. सध्या या हॉस्पीटलमध्ये शल्य–मंदिरे, पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, क्ष किरण विभाग, आकस्मिक रुग्ण विभाग इ. सर्व विभाग आहेत.

## इंडियन रेडक्रॉस सोसायटी

लढाईत जखमी झालेल्यांना मदत करण्याच्या उद्देशाने इ. स. १९२० साली या संस्थेची स्थापना झाली नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तसेच इतर साथीच्या वेळीही संस्था आपद्ग्रस्तांना मदत करते. संस्थेची स्वतःची इमारत असून शिशुसंगोपन केंद्रही चालविले जाते १९६१ साली पुरामुळे पुण्यावर आलेल्या आपत्तीच्या वेळीही संस्थेने आपद्ग्रस्तांना खूपच मदत केली. संस्था दुष्काळपिडीतांना जुने कपडे, दुधाची भुकटी, गोठवलेले दुध, बिस्किटे, तांदूळ इत्यादी पुरविते. संस्थेची स्वतःची रक्तपेढी 'पुणें रेडक्रॉस ब्लड बँक डॉं नौरोजी बदोरवाला भवन' या नावाने ओळखली जाते. येथे ग्लुकोज सोल्युशन व ग्लुकोज सलाईन तयार करण्यांत येते, पुण्यात ही रक्तपेढीं अत्यंत उपयुक्त असे कार्य करीत आहे.

## श्री गाडगे महाराज आकुल धर्मशाळा

पूर्ण महाराष्ट्रात भक्तीची व ज्ञानाची गंगोत्री पोहोचविणारे संत म्हणून गाडगेमहाराजांची सर्वत्र प्रसिद्धी आहे. श्री. बाबांनी सोमवार पेठेत लोकांच्या सोयीसाठी एक धर्मशाळा बांधली आहे. त्यांच्या निर्वाणा नंतरही धर्मशाळेचे कार्य उत्कृष्टपणें चालू आहे. दर महिन्याला पाच सहाशे गरीब यात्रेकरू या धर्मशाळेचा फायदा घेतात. या धर्मशाळेत मोफत वाचनालयही आहे. काहीही गाजा-वाजा न करता धर्मशाळा, सदावर्ते, पाणपोया, आश्रमशाळा, वसतीगृहे, अनाथालये इ. संस्था स्थापन करुन श्री गाडगे बाबांनी समाजावर अनंत उपकार केले आहेत.

## दि स्कूल ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग, खडकी

अधिकारी, तंत्रज्ञ व कुशल कामगार ह्या तीन प्रकारचे लष्करी इंजिनिअरिंगचे शिक्षण या संस्थेत देण्यात येते. मिलिटरी इंजि-निअरिंगबद्दल संशोधन करणें हाही या संस्थेचा एक उद्देश आहे.

## वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑप. मॅनेजमेंट

इ. स १९६७ मध्ये ही संस्था स्थापन झाली. सहकारी क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन विविध प्रशिक्षण वर्गांचे संस्थेत आयोजन केले जाते. उत्तम व्यवस्थापकीय तंत्र आणि कौशल्य यांचे सहकारी उद्योग व्यापारातील प्रमाण वाढविण्यास मदत करणे हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. सहकारी तत्वे आणि व्यवहार यासंबधीचे कार्यहीं या संस्थेत होते.

## पुणे भारत गायन समाज

इ स. १९११ साली गायनाचार्य कै. भास्करबुवा बखले यांनी या संस्थेची स्थापना केली ही संस्था सरकारमान्य असून अनेक गायनपटूंनी संस्थेच्या प्रगतीस हातभार लावला आहे.

## इंडियन मेडिकल असोसिएशन

१९४८ साली इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पुणें शाखेची स्वतंत्र मारत बांधण्यात आली. संस्था पुण्याचे आरोग्य, नदी सुधारणा, प्लेगची साथ; वैद्यकीय मदत इत्यादी बाबतीत उपयुक्त कार्य करीत आहे.

## गांधी मेमोरियल लेप्रसी फाऊण्डेशनचे आरोग्य शिक्षण केंद्र

समाजात कुष्ठरोगाविषयी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी व आरोग्यविषयक प्रश्नांसंबधी जागृती निर्माण करण्यासाठी या संस्थेची स्थापना झाली या केंद्रातर्फे कुष्ठरोग्यांना सर्व प्रकारचे मार्ग-दर्शन दिले जाते. तसेच शाळा, कॉलेजे, मंडळे इ. ठिकाणीही ज्ञान प्रसाराचे कार्य केले जाते.

## ससून मित्रमंडळ

रुग्णाइताच्या सेवेसाठी ससून मित्रमंडळाची स्थापना करण्यात आली आहे रुग्णांना एकलकोंडेपणा वाटू नये, त्यांची औषधपाण्याची गरज तातडीने पूर्ण करता यावी म्हणून मंडळ प्रयत्नशील असते. या मित्रमंडळाने रुग्णांसाठी एक ग्रंथालयही चालविले आहे.

फोन नं. ८२०७१

# हार्दिक शुभेच्छा !

*

# हॉटेल मयूर

## राहण्याची व जेवणाची उत्तम सोय

पुना-बॉंबे रोड, जयश्री थिएटर समोर, चिंचवड

**पूना-४११०१९.**

रजिस्टर न. २४०८९ रजि. तारीख १४-३-१९६०

## इंदापूर तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लिमिटेड

इंदापूर, जि. पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | ३१०००० | गंगाजळी व निधी | ३८६२१३ |
| सभासद संख्या | १५८ | खेळते भांडवल | १०२९८४६ |
| ऑडिट वर्ग | 'अ' | उलाढाल | ४०८०४९२ |

संघाच्या शाखा :- १) बावडा २) लासुर्णे ३) भिगवण ४) उदमास वाडी

### वैशिष्ट्ये

- शेती उपयुक्त रासायनिक खते, किटक नाशक औषधे, प्रमाणित बी-बीयाणे याचा पुरवठा करणे
- शेती उपयुक्त मशिनरी, ऑईल इंजिन्स, इलेक्ट्रिक मोटर व सुटे भाग यांचा शेतकऱ्यांना रोखीने व भूविकास बँकेच्या दाखल्यावर पुरवठा करणे
- नियंत्रित मालाचे वाटप • एकाधिकार योजनेखाली ज्वारी, कापूस वगैरे शेतमालाची खरेदी
- औषधे, कापड व जीवनोपयोगी वस्तूंची रास्त दराने विक्री
- शासनाच्या कृषि उत्पन्न वाढ मोहिमेत सक्रीय भाग घेऊन सर्वतोपरी सहाय्य करणे

संघाने नविनच जिनिंग फॅक्टरी बांधून चालू कापूस हंगामात १०,००० क्विंटल कापूस जिन करून महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई यांना दिलेला आहे

**व्यवस्थापक मंडळ**

मा. तात्याराम शिंदे, चेअरमन
मा. भगवानराव यशवंतराव काळे, व्हा चे.
मा दत्तात्रय पांडुरंग जाधव, सदस्य
मा गणपतराव सिताराम पाटील, सदस्य
मा मच्छिंद्र धोंडिबा पाटील
मा गणपतदास मगनदास शहा ,,
मा कालीदास हरिश्चंद्र देवकर सदस्य
मा विश्वासराव गोपाळराव पाटील ,,
मा. नारायण नागू पवार, ,,



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## पुणे पांजरपोळ संस्था

सर जमशेटजी जीजीभाई यानी १८५५ मध्ये या संस्थेची स्थापना केली. संस्थेने सुरवातीपासून जीवदया, गोरक्षण, गोपालन व गोसंवर्धन ही कार्ये स्विकारली आहेत. संस्थेची भोजापूर गोशाळा पुण्यापासून सुमारे तेरा मैलावर आहे.

## मॉडर्न टेक्निकल सेंटर

या संस्थेतर्फे टर्नर, बेंच फिटर, मशिनिस्ट जॉब इन्स्पेक्टर, स्कूटर मेकॅनिक, मेकॅनिकल ड्राफ्टस्‌मन या शिक्षणक्रमाचे वर्ग चालविले जातात व त्या कोर्सेसचे संपूर्ण थिअरी व प्रॅक्टिकलचे शिक्षण देण्यात येते. सदरहू संस्था ही प्रत्येकाच्या अंगी त्याने घेतलेल्या शिक्षणक्रमाची प्रात्यक्षिक पात्रता निर्माण करते व विद्यार्थी पुढे कोणत्याही क्षेत्रात गेल्यास त्याचे कार्य तो यशस्वीपणे करू शकतो. शिक्षणक्रम पूर्ण केल्यावर या संस्थेतर्फे परीक्षा घेतल्या जाऊन यशस्वी विद्यार्थ्यांना 'कारागीर' म्हणून प्रमाणपत्र दिले जाते.

## उदासीन बाबा शारदाश्रम आश्रम (श्री रामटेकडी तीर्थ)

त्रेतायुगात राम-लक्ष्मणानी काही काळ या भागात वास्तव्य केले होते असे म्हणतात त्यानंतर उदासीन संत जयमुनि व संत समर्थ रामदास यांच्याही वास्तव्याने हे ठिकाण पुनीत झाले आहे या शांत व रमणीय स्थानाचे बाबा शारदा रामजी याना आकर्षण वाटले व त्यानी बारा वर्षे या टेकडीवर कठोर तपश्चर्या केली या तपश्चर्येनंतर त्याना साक्षात्कार झाला या टेकडीवर भव्य शिवमंदीर असून इतरही अनेक मंदीरे आहेत. ही सर्व मंदीरे सुबक व कलात्मक असून देवताच्या दर्शनाने मन प्रसन्न होते. याशिवाय भव्य वृक्ष व लतामंडप यामुळे या ठिकाणास सौंदर्य प्राप्त झाले आहे.

## मिटिऑरॉलॉजिकल ऑफीस

शिवाजीनगर भागात सरकारच्या वातावरणशास्त्र खात्याच्या तांत्रिक विभागाची ही मुख्य कचेरी आहे. हवामानाचे अहवाल, शेतकीविषक वातावरण, भूकंप, पर्जन्य नोंदणी, ऋतुभाकीते इत्यादींचे नियंत्रण या कचेरीमार्फत होते. येथे असलेल्या उपकरण साहित्य व पुरवठा विभागास प्रयोगशाळेची व कारखान्याची जोड आहे

## महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ

या संस्थेचे सध्याचे ऑफीस पुणे येथे असले तरी या संस्थेची स्थापना १९६० साली बारामती येथे झाली. द्राक्ष बागायतदारास तांत्रिक सल्ला, खते इ उपलब्ध करून देणे, द्राक्ष पिकावर संशोधन करणे द्राक्षपिकाची व्यवस्था, उत्पादन मालाची वाहतूक, विक्री इत्यादी सर्व अडचणींचा विचार करणे यासाठी या संस्थेची स्थापना द्राक्ष बागायतदारांनी केली आहे

## पारखे उद्योग समुह

गुरुदेवता आणि मातृदेवता यांच्या कृपाशीर्वादानेच भारत एन्व्हलप्स, पेपको, सेन्ट्रल पल्प मिल्स आदि उद्योग जन्माला आले, वाढीला लागले व आजच्या सुप्रतिष्ठित अवस्थेला पोहोचले निरलसपणे प्रयत्न केले इतकाच आमचा त्यातला भाग, ही पारखे परिवाराची श्रद्धा आहे.

काही हजारावर सुरू झालेली पारखे समुहाची उलाढाल आता सालीना बारा कोटी रुपयावर गेली आहे. निरनिराळ्या व्यवसायात १८ कोटी रुपयाच्यावर गुंतवण झाली आहे या व्यवसायानी १८०० च्यावर प्रत्यक्ष रोजगारी आणि ८००० चे वर अप्रत्यक्ष रोजगारी निर्माण केली आहे.

केवळ कागदी पाकिटे बनविणारा एक गृह उद्योग, कागदाबाबतचे परावलंबित्व कमी करण्यासाठी कागदनिर्मिती करण्यास सरसावला, विस्तारासाठी यंत्रसामुग्री बनवू लागला, कागदाला कच्चा माल अपुरा पडेल म्हणून कागदी लगद्याचे निर्मितीचा कारखाना उभारला आणि आता त्या लगद्यासाठी हवा असणारा बांबू लागवड करण्याची योजना आखू लागला.

मालासाठी घोडा, घोड्यासाठी घोडदौड, घोडदौडीतून मार्गक्रमण. ही घोडदौड विजयापर्यंत गेलीच पाहिजे. दुर्दम्य महत्वाकांक्षेचा असा प्रवास म्हणजेच...... पारखे उद्योग समूह !

## किर्लोस्कर ऑईल इंजिन्स

इ. स १९४६ साली या कारखान्याची स्थापना झाली. अल्पावधीतच किर्लोस्कर इंजिन्स इतकी लोकप्रिय झाली की या कारखान्याला आपले उत्पादन अनेक पटीनी वाढवावे लागले. छोट्या ३ अश्वशक्तिच्या इंजिनापासून रेल्वेला लागणारी ३९० अश्वशक्तिची इंजिनेही या कारखान्यात तयार होतात. पहिले स्वदेशी मरिन इंजिन बनविण्याचा मान याच कारखान्याने मिळविला भारतातील ओरिसा, मद्रास, केरळ या राज्यात मरिन इंजिनाना मागणी असून इतर इंजिने परदेशातही निर्यात केली जातात.

## किर्लोस्कर न्युमॅटिक कं. लि. पुणे

इ. स १९५८ साली या कंपनीची स्थापना झाली. एअर कॉम्प्रेसर्स, रॉकड्रिल्स, न्यूमॅटिक टूल्स, रेफ्रिजरेशन, एअर कंडिशनिंग कॉम्प्रेसर्स, पॉवर ट्रान्समीशन मशिनरी इ तयार करण्याचा हा कारखाना आहे कंपनी परदेशी कंपन्यांशी तांत्रिक सहकार्याचे करारही करते. रेफ्रिजरेशन व एअर कंडीशनिंग कॉम्प्रेसर्स शीतगृहे व बर्फाचे कारखाने या मध्ये वापरले जातात. आगगाडीच्या ब्रेकसाठी लागणारे कॉम्प्रेसर्सही येथे तयार करण्यात येतात.

# "भारत वैभव" मासिकास हार्दिक शुभेच्छा !

आंतरराष्ट्रीय बालक वर्षाच्या निमित्ताने, पिंपरी-चिंचवड नगरपालिकेने

नगरपालिकेच्या सर्व शाळातील, बावीस हजार मुलांसाठी—

* सर्व मुलाना मोफत पुस्तके, वह्या व शैक्षणिक साहित्य.
* सर्व मुलामुलीना मोफत गणवेश
* सकस, पूरक व पुरेसा दररोज विनामूल्य आहार.
* विनामूल्य रोगप्रतिबंधक उपाय योजना (ट्रीपल, पोलीओ, बी. सी जी. वगैरे)
* बालक वर्षानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन (प्रदर्शने. स्पर्धा, सहली, मेळावे वगैरे)
* बाल भवनाच्या विविध योजना.

नवी पिढी कर्तबगार, बलवान, ज्ञानसंपन्न, आरोग्य संपन्न होण्यासाठी
पिंपरी–चिंचवड नगरपालिका सतत प्रयत्नशील आहे.

डॉ. श्री. श्री. घारे, अध्यक्ष

श्री. सदाशिवराव धावडे मास्तर, उपाध्यक्ष
डॉ. घ. चां. चोबे, सभापती, आरोग्य समिती
श्री कृ श. कदम, सभापती, वाहनव्यवहार समिती

श्री. मधुकर बा. पाटील, मुख्याधिकारी
,, प्रल्हाद बा. जाधव, सभापती, बांधकाम समिती
,, धनराज टे. ओच्छानी, सभापती, नियोजन समिती

---

दुर्बल घटकांचे बाबतीत राज्य सरकारच्या धोरणाचा पुरस्कार करणारी
महाराष्ट्रातील अग्रेसर बँक

# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे-२.

मुख्य कचेरी लक्ष्मी पथ, पुणे-४११ ००२.

दूरध्वनि ४४५९१८, ४४५९१६, ४४५९१७

तारेचा पत्ता सेन्कोबँक

दि. २५-५-७९ अखेर आर्थिक स्थितीचे बोलके आंकडे (रुपये लाखात)

| | |
|---|---|
| वसुल भाग भांडवल | २१८-४९ |
| ठेवी | ३०३७-७१ |
| निधी | २९१-८७ |
| कर्जे | ३०३८-७२ |
| खेळते भांडवल | ४०३२-५७ |

## आमची वैशिष्ट्ये

* पुणे जिल्ह्यात एकूण १०१ शाखांचा विस्तार
* चालू, बचत, आवर्तक याशिवाय मुदत ठेव, आपोआप मुदतवाढ मासिक उत्पन्न ठेव, शिक्षण ठेव या बचतीच्या आकर्षक फलदायी योजना,
* बँकिंगच्या सर्व सुविधा
* व्याजाचा आकर्षक दर
* सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय
* सोने-तारण कर्ज व्यवहाराची सोय

शेती, बिगरशेती, लघु उद्योग वगैरे व्यवसायांना कर्जपुरवठा करून राष्ट्रीय उत्पादन वाढविण्यात अग्रगण्य असणाऱ्या या बँकेची मुख्य कचेरी अगर नजिकच्या शाखेत गुंतवणुक करून राष्ट्रीय कार्यास हातभार लावा.

व वि. इनामदार, प्रभारी सरव्यवस्थापक — द ता. ढमढेरे, उपाध्यक्ष — साहेबराव सातकर, अध्यक्ष

सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाची व जिव्हाळ्याची एक अग्रगण्य जिल्हा बँक




मु–द–क–वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## गरवारे नायलॉन्स्, पिंपरी–पुणे

हिंदुस्थानात नॉयलॉन सुताचा पहिला कारखाना काढण्याचा मान गरवारे यानी मिळविला आहे विविध प्रकारच्या प्लॅस्टिकची निर्मिती त्यानी सुरू केली गारफिल धागे टिकाऊ, हलके व केमिकलसच्या परिणामास प्रतिकार करणारे असल्यामुळे त्याचा वापर मोठया प्रमाणावर होत आहे. मासेमारीसाठी व पॅरॅशूटसाठी लागणाऱ्या विशिष्ट सुताची भारताची गरजही हा कारखाना भागवितो. नॉयलॉन मोनो फिलॅमेन्टस्चे उत्पादनही भारतात गरवारे यांनीच प्रथम केले. (आपल्या देशातील अनेक उद्योगधंदे प्लॅस्टिक मालांकरीता गरवारे यांच्यावर अवलबून आहेत) कापड व होजिअरी याना लागणारे तलम सुत, कन्व्हेयर बेल्टस्, फायर होस, दोर यांना लागणारे विशिष्ट प्रकारचे ताकदवान नॉयलॉन सुत, ब्रश धद्यास लागणारे ब्रीसल्स व ब्रशबॅक्स या सर्वांचा पुरवठा गरवारे करतात.

## साठे बिस्किट ॲण्ड चॉकोलेट कं. लि.

साठे बधू यांच्या मातुश्री श्री. सिताबाई साठे यानी अगदी लहान प्रमाणात घरी बिस्किटे तयार करण्याच्या स्वरूपात या व्यवसायाची सुरवात १९२० साली केली. आज हा कारखाना म्हणजे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील एक महत्वाचा टप्पा ठरला आहे. हिंदुस्थानात कोको चॉकोलेटच्या निर्मितीच्या धद्यास याच कारखान्यात प्रथम सुरवात झाली. १९४९ साली या व्यवसायाचे जॉइंट स्टॉक कपनीत रुपांतर करण्यात आले आज पुणे आळदी रस्त्यावर कारखान्याच्या अद्यावत व एअरकंडिशन्ड इमारती असून तेथे अनुभवी तज्ञांकडून अद्ययावत् पद्धतीने उत्पादन चालु आहे. येथे तयार होणारी बिस्किटे, कोको व चॉकोलेट याचा दर्जा कायम राखून त्याच्या किमती खाली आणण्याबद्दल चालक नेहमी प्रयत्नात असतात. मालाची निर्यात करुन जास्तीत जास्त परकिय चलन मिळविण्यासाठीही कारखान्याचे व्यवस्थापक प्रयत्नशील असतात कै. ग. रा साठे यांच्या १९६१ साली झालेल्या अचानक निर्वाणामुळे भारतातील व्यापारीवर्ग हळहळला त्यांचे स्मारक म्हणून साठे फौंडेशन ट्रस्टची स्थापना करण्यात आली आहे. आज कारखान्याचे स्वरूप पाहिल्यावर आपणास एक खरोखरच शुन्यातून निर्माण झालेले जग दिसते.

## दि व्हाईट क्लाऊड पेपर मिल्स

फिल्टर कागद तयार करणारा भारतातील हा पहिला कारखाना १९६३ पासून सुरु झाला. श्री. मेहरजी अे. करकरिआ यानी या मिल्सची स्थापना करुन व संशोधनपूर्वक वेगवेगळया प्रकारच्या दर्जेदार फिल्टर कागदाची निर्मिती करुन देशास फिल्टर कागदाच्या बाबतीत स्वावलबी बनण्याचा पाया घातला आहे औषधी कारखाने, रग, व्हॉर्निश, रेझिन, सिथेटिक्स, सौंदर्य प्रसाधने इत्यादी उद्योगाला लागणारे निरनिराळया प्रकारचे फिल्टर पेपर येथे उत्तम दर्जाचे तयार केले जात असल्यामुळे भारतातील अनेक उद्योग या कागदासाठी 'दि व्हाईट क्लाऊड पेपर मिल्स' वर अवलबून आहेत.

## बकाउल्फ न्यू इंडिया इंजिनिअरिंग वर्क्स लि.

अवजड मशिनरी व साखर धद्यास लागणारी मशिनरी बनविणारी ही एक सुविख्यात कपनी आहे. इ. स. १९५७ मध्ये बकाउल्फ या जर्मन कपनीच्या भागीदारीत पिंपरी येथे 'बकाउल्फ न्यू इंडिया इजिनिअरिंग वर्क्स लि. ही कपनी सुरु झाली रोटेरियन श्री. दारा दामनिया हे या कपनीचे पहिले भारतीय मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. १९७७ पासुन ते हे पद साभाळीत आहेत. या कपनीच्या स्थापनेपूर्वी साखर धद्यास लागणारी मशिनरी परदेशातून आयात करावी लागत असे. सुरवातीस कपनीने या मशिनरिच्या व्हॅक्यूम पॅन्स, इव्हापोरेटर्स ज्यूस हिटर्स या भागाचे उत्पादन सुरु केले नतर कपनीने 'सेन्ट्रीफ्यूगल' मशीनचे उत्पादन सुरु केले असून आतापर्यन्त ११८० उच्च दर्जाची 'सेन्ट्रीफ्यूगल' मशीन्स देशात पुरविली आहेत. त्यानतर बकाउल्फने आधुनिक अशा 'का शुगर मिल' च्या निर्मितीस प्रारभ केला व ग्राहकाना पूर्ण समाधान देणाऱ्या व वेगवेगळ्या आकाराच्या एकूण २०० मिलस्' पूरविल्या. प्रगतीचे पुढचे पाऊल टाकून कपनीने सपूर्ण साखर कारखाना उभारुन देण्यास सुरवात केली आहे येथे तयार होणारी साखर कारखान्याची मशिनरी निर्यातही केली जाते.

श्री. दामनिया यांचा दिर्घोद्योग, चिकाटी व Sincerity कंपनीबद्दलची आस्था या गोष्टींचा कपनीच्या प्रगतीत मोलाचा वाटा आहे.

## स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि खडकी

सुरवातीला रबरी खेळणी, रबरी फुगे इत्यादी तयार करणाऱ्या या कारखान्यात आज सर्व प्रकारच्या इलेक्ट्रीक केबल्स, डिलिव्हरी होजपाईप्स, सायकलीचे पेडल्स, इजेक्शन बाटल्यांची बुचे, सर्जिकल हॅंडग्लोव्हज इ. विविध रबरी वस्तु तयार होतात वाढत्या मागणीमुळे याच कारखान्याने 'श्री रबर प्रॉडक्टस' हा कारखाना पिंपरी येथे काढला आहे. श्री रबर मध्ये बाटल्याची बुचे व कॉम्बॅट बूटस्, रेकी बोटस्, ऑईलसील्स इ. सरक्षणखात्यास लागणाऱ्या वस्तु तयार होतात. विविध प्रकारची पादत्राणेही येथे तयार होतात.

## आपटे मोटार स्कूल

श्री. त्रिबक रामचद्र आपटे यानी या सस्थेची स्थापना केली. शाद्धशुध्द शिक्षण व सर्वांना परवडेल अशी फी यामुळे या सस्थेचा सारखा विकास होत आहे श्री. आपटे यानी मोटार ड्रायव्हिंग व मोटार मेकॅनिक्स या विषयावर पुस्तके लिहीली आहेत. ही सस्था महाराष्ट्रात व कर्नाटकात या क्षेत्रातील सर्वांना परिचयाची आहे सध्या सस्थेचा सर्व कारभार श्री वासुदेव त्रिबक आपटे बघतात.

## दि पेटन्ट टिफिन कॅरिअर संघवी कपनी

या कपनीने बनविलेले टिफिन कॅरिअर्स फारच लोकप्रिय झाले. व नतर कपनीने गृहोपयोगी स्टेनलेस स्टीलची भांडी, इडस्ट्रिअल क्वालिटी ब्रास, कॉपर, झिक व ॲल्युमिनिअमची सर्कलस व शीटस्

बनविण्यास सुरवातीच्याकाळी संघवी शिक्क्याची घाटदार भांडी फारच लोकप्रिय झाली आहेत सिरिंज बॉक्सेस, हॉस्पीटल स्टर्लायझर्स किडनी ट्रेज व सर्जिकल ट्रेज इत्यादी वैद्यकीय उपकरणही येथे बनविली जातात.

## संघवी उद्योग समूह

संघवी नॉन-फेरस मेटल इंडस्ट्रीज मध्ये रासायनीक द्रव्ये व औषधे साठविण्याकरिता लागणारी खास प्रकारची अॅल्यूमिनियम कॅनिस्टर्स व कन्टेनर्स ( बरण्या ) चे उत्पादन केले जाते. तर संघवी मेटल कार्पोरेशन मध्ये तांबा, पितळ, जस्त, अल्युमिनियम सर्कल्स व शीटस्चे उत्पादन केले जाते.

## देसाई बंधू

अस्सल रत्नागिरी हापूस, पायरी आंब्याचे व्यापारी म्हणून देसाई बंधूनी पुण्यात नाव कमावले आहे. याशिवाय काजू, आमसुले, आंबावडी, फणसपोळी, मावा व आंबा हा उत्कृष्ट कोकणी मालही येथे मिळतो.

## छायारहित दिव्यांचे निर्माते ए. जी. जोशी आणि कं.

कल्पकतेने, चिकाटीने व सतत संशोधन करून जोशी बंधूनी हे शॅडलेस लॅम्प्स् तयार केले आहेत. हॉस्पीटलमध्ये वर टांगण्यासारखे, सगळीकडे वळविता येण्यासारखे किंवा भिंतीवर लावण्यासारखे, छायारहित दिवे आवश्यक असतात. फिलिप्स कंपनीने या कंपनीचे दिवे घाऊक खरेदी करण्याचा करार केला आहे. या कल्पक उत्पादनामुळे खूपच परदेशी हुडणावळ वाचली आहे. मालाचा दर्जा उत्कृष्ट असल्यामुळे अनेक हॉस्पीटलमध्ये हे दिवे वापरले जातात

## मॉडर्न मोटार स्प्रे पेन्टिंग वर्क्स

मोटारीचे कुशनिंग पेंटिंग व बॉडीरिपेअरिंगच्या कामाबाबत या कारखान्याचा लौकीक असून काम समाधान कारक व वक्तशीर करून दिले जाते. श्री. पाषाणकर यांच्या या कारखान्यात अपघातात सापडलेल्या मोटारी लवकर दुरुस्त करून दिल्या जातात.

## बँक ऑफ महाराष्ट्र

१६ सप्टेंबर १९३५ रोजी या बँकेची स्थापना झाली श्री. काळे, श्री. वर्दे, श्री. साठ व श्री. पवार या चौघांच्या प्रयत्नातून या बँकेचा जन्म झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. किताब इमारतीतील लहानशा जागेत फक्त ४ कर्मचाऱ्यासह ही बँक सुरू झाली. काटकसरीला उत्तेजन देऊन, लोकांना बचतीची सवय लावून त्याद्वारे महाराष्ट्रात उद्योगधंद्याचा विकास घडवून आणण्याचे ध्येय बँकेच्या संस्थापकानी उराशी बाळगले होते. १० लाख रु. भागभांडवलानिशी सुरु झालेली ही बँक प्रगती पथावर वाटचाल करीत होती. बँकेने १९४६ साली सेफ डिपॉझिट व्हाल्टची सुविधा उपलब्ध करून दिली बँकेने सुरुवातीपासूनच लहान उद्योजकाना कर्ज देण्याचे धोरण अवलंबिले होते. बँक ऑफ नागपूर लि. बँक ऑफ कोकण लि. भारत इंडस्ट्रियल बँक लि. इ. लहान बँका या बँकेत विलीन करण्यात आल्या आज बँकेत एकूण सुमारे ५०० कोटी रु ठेवी असून बँकेने ३५० कोटी रु कर्ज दिले आहे. बँकेच्या ५६२ शाखा असून त्यापैकी साठ टक्के शाखा ग्रामीण व अर्ध ग्रामीण विभागात आहेत बँकेने आतापर्यंत १५ खेडी दत्तक घेऊन सुधारली आहेत. आज बँकेची लोकमंगल ही भव्य वास्तू उभी आहे.

## विद्या सहकारी बँक

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या प्राध्यापकांनी या बँकेची स्थापना केली. प्रा वि. अ. जोशी व प्रा- श्री. ग. बापट हे या कल्पनेचे मुख्य प्रवर्तक आहेत या बँकेने आधुनिक व्यवस्थापन शास्त्रातील अनेक तत्वे प्रत्यक्ष अमलात आणलेली आहेत बँकेने तीन वर्षाच्या अल्प कालावधीत भागधारकाना नऊ टक्के लाभांश दिला आहे. सभासद संख्या तीन हजारापेक्षा जास्त असून ठेवींची संख्या अठ्याहत्तर लाखापेक्षा जास्त आहे. बँक 'अ' वर्गात गणली जात असून बँकेचे खेळते भांडवल ९३ लाख रुपये आहे. बँकेची शैक्षणिक कर्ज योजना ही एक वैशिष्ट्यपूर्ण व नाविन्यपूर्ण योजना आहे.

## सुवर्ण सहकारी बँक

तरुण व धडाडीचे कारखानदार श्री. आगाशे बंधू यांच्या प्रयत्नामुळे २२-९-१९६९ रोजी बँकेची स्थापना झाली. अवघ्या दोन वर्षात बँकेने एकाच दिवशी म्हणजे ३-१-१९७१ रोजी पुण्यामध्ये बुधवार पेठ व टिळक रोड येथे शाखा उघडल्या. पहिल्या वर्षापासून आजतागायत बँकेने भागधारकांना डिव्हीडंड दिलेला आहे बँकेने अवघ्या १० वर्षाच्या आत ५ कोटी रु. च्या वर खेळते भांडवल जमा करण्याचा विक्रम केला आहे. बँकेस अ वर्ग मिळाला असून बँकेचे मॅनेजर श्री. वसंत चिंचळकर यांचा बँकेच्या प्रगतीत महत्वाचा वाटा आहे.

## फिल्ट्रोपंपस्

श्री एस. एल. मनोहर, मेकॅनिकल व अॅटोमोबाईल इंजिनिअरींगचा कोर्स करून १२ वर्षे किर्लोस्करमध्ये सर्व्हिस केल्यानतर कंपनीच्या सेल्स व सर्व्हिस कामासाठी परदेशी प्रवास करून आल्यावर स्वयप्रेरीत होऊन त्यानी वरील कारखाना सुरू केला. कारखान्यात अॅटोमोबाईल अॅप्लीकेशन, मरीन पंप, एअर फिल्टर वगैरे तयार होतात सुमारे २० कामगारांच्या सहाय्याने व २ लाख रू भांडवलावर त्यानी कारखाना प्रगतीपथावर ठेवला आहे.

## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

४।९।१९१७ रोजी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या बँकेची स्थापना झाली. कै. तात्यासाहेब केळकर हे या बँकेचे पहिले अध्यक्ष होते. या साठ वर्षात बँकेने आश्चर्यजनक प्रगती केलेली असून आजमितीस बँकेचे वसूल भाग भांडवल २०४.६८ लाख आहे. ठेवींच्या बाबतीत या बँकेचा महाराष्ट्रातील सर्व जिल्हा बँकात पहिला क्रमांक लागतो. बँक सहकारी संस्थाना निरनिराळ्या कारणासाठी तसेच

शेतकऱ्यांना जोडधदा म्हणून दुभती जनावरे खरेदी करण्यासाठी कर्ज देते सध्या बँकेच्या १०१ शाखा असून सध्या या बँकेची धुरा मा. साहेबराव माधवराव सातकर हे अध्यक्ष या नात्याने व श्री. दत्तात्रय तात्याबा ढमढेरे हे उपाध्यक्ष या नात्याने वाहात आहेत.

## पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.

'पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ' ही संस्था १९५० पासून काम करीत आहे. लोकाना लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तू रास्त दरात व उत्तम दर्जाच्या मिळाव्यात या उद्देशाने या संस्थेची स्थापना झाली सध्या कात्रज येथील दुध प्रकल्पामधून प्लॅस्टीक पिशवीतून दूध पुरविण्यासाठी लागणारे 'फिल्पॅक' हे यत्र बसविण्यात आले आहे. त्यानतर अल्पावधीतच असेच दुसरेही यत्र बसविण्यात आल्यामुळे सध्या प्रतिदिनी वीस हजार लिटर दूध प्लॅस्टीक पिशवीतून पुरविले जाते.

## उद्यान कार्यालय, पुणे

व्रतबध–विवाहादि धार्मिक आणि मगल समारभ आणि इतर सामाजिक व कौटुबिक समारभ करणारी ही पुण्यातील एक प्रसिद्ध संस्था आहे. या कार्यालयात कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने व्रतबध-विवाहादि समारभाची उत्कृष्ट व्यवस्था केली जाते. या इद्रतुल्य प्रासादात दोन भव्य मगल कार्यालये, भव्य अतिथी निवास, चारशे सुखासनाचे सभागृह, स्थिर व चलत चित्रण व्यवस्था इ. आहे. श्री. शकरराव थत्ते व सौ. पुष्पा थत्ते यांनी ही वास्तु व हा व्यवसाय नावारूपास आणला आहे.

## एस्. जी. गोखले (मंडप)

श्री सदाशिव गोपाळ गोखले व श्री. प्रभाकर गोखले या पिता पुत्राचा हा प्रसिद्ध व्यवसाय आहे. कलापूर्ण, सुदर व प्रसगाला योग्य असे माडव घालण्याचे याचे कसब व कौशल्य सपूर्ण महाराष्ट्राला परिचित झालेले आहे १९७४ साली रायगडावर तीनशेवा शिवजयती समारभ झाला त्या वेळी पूर्ण सभामडपावर मांडव घालण्याचे अवघड कार्य यानी प्रशसनीयपणे पार पाडले. पुण्याच्या नेहरू स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट व टेनिसच्या मॅचच्या वेळी तेथे माडव घालण्याची जबाबदारी त्यानी आजवर अनेकदा चागल्या प्रकारे पार पाडली आहे.

## कुलकर्णी फाउंड्रीज प्रायव्हेट लि.

हडपसर औद्योगिक वसाहतीत पहिल्या प्रथम याच फाउंड्रीने आपल्या उत्पादनास सुरवात केली. दर्जायुक्त कामाची खात्री देणारी या भागातील सर्व अद्यावत साधनानी सुसज्ज अशी ही फाऊंड्री आहे फाऊंड्री इक्विपमेन्टमध्ये ४० ते ५० तऱ्हेच्या वेगवेगळ्या मशिन्सचे उत्पादन या फाऊंड्रीने केले असून ही इक्विपमेन्टस् समाधानकारकरित्या काम देतात असा त्यांच्याबद्दल लौकीक प्रस्थापित झाला आहे. श्री. डी. जी. कुलकर्णी यानी या फाऊंड्रीची स्थापना केली.

## शिवादेश उद्योगालय

शिवादेश उद्योगालयातर्फे भृगार्क हे सुगधरहित शुद्ध आयुर्वेदिक औषधी तेल तयार केले जाते. माक्याच्या ताज्या वनस्पतीपासून आयुर्वेदिक पद्धतीने व त्याच्या जोडीला नवीन विज्ञानाची जोड देऊन हे तेल तयार केले जाते. केस गळणे थाबवणे, केस काळेभोर होण्यासाठी व केसांच्या इतर अनेक तक्रारींवर तसेच मेंदूच्या थडाव्यासाठी, शात निद्रेसाठी व डोळ्याचा त्रास कमी करण्यासाठी या तेलाचा उपयोग होतो.

## नवलखा उद्योग समूह

नवलखा उद्योग समूहाचे १९ उद्योग सध्या कार्यरत आहेत. नवलखा अँग्रो इक्विपमेन्टस मध्ये पिकावर औषधे मारण्याचे स्पेअर्स व डस्टर्स बनविले जातात नूतन वेअर हौसिंग क. प्रा. लि. च्या गुदामात मालाचा स्टॉक करण्याची सोय आहे कामधेनु पेस्टीसाईडस ही भारतातील एक महत्वाची पेस्टीसाईडस् बनविणारी कपनी आहे. कामधेनु केमिकल फर्टीलायझर इडस्ट्रीजमध्ये एन. पी. के. मॅन्युअर मिश्र खते व एन. पी. के. मॅन्युलेटेड मिश्र खते तसेच प्लॅटोव्हीट् ही पिकांची जीवनसत्वे तयार केली जातात नवलाख सीडस् फार्ममध्ये हायब्रीड सीडस्‌चे उत्पादन केले जाते. याशिवाय इतरही अनेक उद्योगधदे या उद्योगसमूहाच्या प्रगतीत आपापला वाटा उचलीत आहेत.

## भोर रबर प्रॉडक्टस्

श्री एम जी. भोर हे पिंपरी–चिंचवड नगरपालिकेचे लोकप्रिय सभासद असून यानी सुशिक्षित बेकार योजनेनुसार भोसरीच्या एम आय. डी. सी एरियामध्ये स्वतःच्या मालकीचा छोटासा कारखाना 'भोर रबर प्रॉडक्टस्' या नावाने १९७३ साली सुरू केला आहे. त्यानी सुमारे ६ लाख रु ची गुतवणूक केलेली असून १६ कामगाराच्या सहकार्याने हा कारखाना चालविला आहे शेतीचे पाण्याचे पाईप, सॅक्शन डिलिव्हर, औद्योगिक रबर पार्टस् येथे बनविण्यात येतात. सिंडीकेट बँक व पश्चिम महाराष्ट्र विकास महामडळाच्या सहकार्याने त्यांनी बरीच प्रगती केलेली असून वार्षिक उत्पादन ४ लाखापर्यन्त वाढविले आहे

## पुना प्रेसिंग्ज प्रायव्हेट लि.

भोसरी औद्योगिक वसाहतीत हा कारखाना असून सदरहू कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. ए एस. गुप्ते हे आहेत. हा कारखाना १९७३ साली सुरु झाला असून प्रेस पार्टस, फिटर्स व शिमस, (Shims) या उत्पादनात हा कारखाना अग्रेसर आहे. सुमारे २५ लाख रुपयाची वार्षिक उलाढाल होत असते.

## अनंत इंजिनिअरिंग वर्क्स

या कारखान्यात नॉन फेरॉस कास्टींग तसेच अॅल्युमिनीयम गन मेटल, फॉस्फर ब्रॉंझ कास्टिंगज् होत असते. इतर कपन्याच्या मागणीनुसार अॅलॉय कास्टिग्ज बनवितात. श्री. मोहन अनत कुलकर्णी हे वरील विषयातील तज्ज्ञ असून कारखान्याचे मालक आहेत.

With Best Compliments From :

Phone : 44 69 40

# United Enterprises

Authorised Dealers
**ASIAN PAINTS**

Sole Distributors
**SILVOCEM CEMENT PAINTS**

Dealers in Primers, Brushes etc.

Partners - Shashikant Patwardhan & Prakash Wahikar

Suyash Chambers. 1149, Sadashiv Peth, Opp Peru Gate Police Chowki, Pune 411 030.

*With best compliments from :*

## M/s. Arje Manufacturing & Trading Company

**Manufacturers & Dealers in**

## Transformer Radiators & Engineering Goods

425/67, Tilak Maharashtra Vidyapeeth Colony,
Gultekadi, Poona – 411009

With best compliments from

## M/s. Vijay Engineering

**55 A/4 Hadapsar Industrial Estate, Poona 411 013**

Manufacturers of

- Precibore Units
- Round Boring Tools (Ifanger type)
- Sip Jig Boring Tools
- Preci- Boring Bars
- Precision Boring Head
- Precision Vices
- Comparator Stand
- Dial Snap Gauges

Phone 7315

*With Best Compliments From :*

## KIRLOSKAR PNEUMATIC COMPANY LIMITED

Pune 411 013.

**LEADING MANUFACTURERS OF A WIDE RANGE OF AIR AND GAS COMPRESSORS, PNEUMATIC TOOLS, AIR CONDITIONING AND REFRIGERATION AND HYDRAULIC TRANSMISSION**

**Phone : 7133 Gram . SANJAY Telex : 0145 - 246, 0145 - 306**



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पुणे

## एस्. एन्. जी.

श्री. एस. एन घारपुरे हे तरुण व उत्साही इजिनिअर असून चिंचवडच्या एम. आय. डी. सी. ब्लॉक मध्ये स्वत ची फर्म व कारखाना आहे. ते या भागातील सुप्रसिद्ध इजिनिअर असून डिझाईन व फेब्रीगेशनची कामेही करतात. ते उत्कृष्ट दर्जाचे कॉन्ट्रॅक्टर आहेत. त्यांनी एम. आय डी. सी एरीयामध्ये निरनिराळ्या तऱ्हेच्या कारखान्याची आधुनिक डिझाईनसह अप्रतिम बांधकामे केलेली आहेत. याचा उत्कृष्ट नमुना एम. आय डी. सी चिंचवड कार्यालयातील गेस्ट हाऊसची इमारत होय. श्री. घारपुरे उत्साही व तळमळीचे कार्यकर्ते आहेत.

## दांडेकर इंडस्ट्रीज

श्री प्रभाकर यशवत दांडेकर, मुळगाव आडे-पाडले, ता दापोली, जि. रत्नागिरीचे राहणारे असून यांचे शिक्षण एस. एस सी पर्यंतच झालेले आहे. सात वर्षे किर्लोस्कर (हडपसर) मध्ये नोकरी केल्यानतर १९७० साली ३००० रु. च्या भांडवलावर वरील मशीन शॉप सुरु केले. ७४ साली कारखान्यात वाढ होऊन आज कारखान्याचे भांडवल ७०,००० रु. आहे. नवनवीन सुधारणा करण्याकडे त्यांचा कल असतो. टेल्कोकडून त्याना मोठ्या प्रमाणात जॉबवर्क मिळते. त्यानी 'मिनी टिलर' ची निर्मिती केली आहे. रोलिंग मिलसाठी या कारखान्यात तयार होणारा पेंट वापरण्यात येतो. सध्या या कारखान्यात २ इंजिनिअर्स व २० कामगार कार्य करतात.

## कामधेनु इंडस्ट्रीज

मे. एल यू. नवलखा यांनी महाराष्ट्रातील शेती, हवामान व पाऊस याचा अभ्यास करून, शेतकी-शास्त्रज्ञांच्या देखरेखीखाली निरनिराळ्या पिकासाठी आवश्यक द्रव्ये, समतोल प्रमाणात असलेली मिश्र खते तयार केली असून ही कामधेनु मिश्र खते शेतकरी वर्गात खूपच लोकप्रिय आहेत सपूर्ण भारत तसेच सिलोन, बर्मा व आफ्रिका या देशातही या मिश्र खताचा खप आहे.

## महाराष्ट्र मेटल मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि.

हनुमतराव व्यकटराव मुंगळे यांनी हा कारखाना सुरु केला याचे मुळ गाव उदगीर. १९३० साली पुण्यात येऊन टेलरींग काम शिकून टेलरींग शॉप सुरु केले नतर मोटर गॅरेज मधील मशीन शॉप चालवावयास घेतले. नतर फाऊड्री सुरु केली व स्वत चे प्रॉडक्शन म्हणून पितळी भांड्याचे उत्पादन सुरू केले भांड्यासाठी त्यानी मुबईचे मार्केट मिळविले आहे.

## भारत प्रिसिजन वर्क्स

श्री. सुरेश शंकरराव हत्तरगी हे एस एस. सी. पास असून याचे मुळ गाव हलकर्णी. मुख्य व्यवसाय शेती. १५ वर्षापासून हा कारखाना चालविला असून येथून भारत फोर्जला सामान पुरविले जाते. हेवी ट्रक्सचे स्पेअर पार्टस्, मशीनींग, ॲटोमोबाईल व ऑईल इजिन्सचे काम येथे होते.

## जनसेवा दुग्धमंदिर

जनसेवा दुग्धमदिर ही सस्था २९ ऑक्टोबर १९४८ धनत्रयोदशी या दिवशी सुरु झाली. कै वा ग उर्फ अप्पासाहेब उपाध्ये यानी लहानशा प्रमाणात हा व्यवसाय सुरू केला. योग्य प्रमाणातच पैसे घेऊन चांगला माल लोकाना देणे म्हणजेच खऱ्या अर्थाने जनतेची सेवा करणे होय या कल्पनेतून 'जनसेवा' या नावाचा उगम झाला आहे सध्या श्री. प्रभाकर वासुदेव उपाध्ये हे या धंद्याची धुरा वाहात आहेत. आज 'जनसेवा' बद्दल उपाध्ये म्हणजे सचोटी, उपाध्ये म्हणजे स्वच्छता, उपाध्ये म्हणजे उत्तम दर्जाचा माल असा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला आहे.

## आर्यन सिनेमा

ज्या चित्रपट गृहाला लोकमान्य टिळकाचे पाय लागले ते आर्यन चित्रपटगृह म्हणजे पुण्याचे भूषणच आहे. १९१४ मध्ये समाज प्रवाहाविरुद्ध जावून कै. बापूसाहेब पाठक यानी हा सिनेमा दाखविण्याचा व्यवसाय सुरू केला. आज मराठी चित्रपट दाखविणारे हे चित्रपटगृह पुण्यातील एक जुने चित्रपट गृह आहे.

## युनिटी गेज ॲन्ड टूल कं.

श्री पोतनीस व श्री. सावत यानी १९७० साली हा कारखाना अगदी लहान प्रमाणावर सुरू केला मालाचा दर्जा व अचूकता यामुळे अल्पावधीतच कारखान्याची खूपच प्रगती झाली आहे. पुरेशी कठीण, अजिबात आकार न बदलणारी गेज येथे बनविली जातात. गेजेसची निर्मिती येथे सुरू केल्यामुळे तेवढे परकीय चलन वाचले आहे.

## अरुद्योग इंजिनिअर्स प्रा. लि.

पुण्याच्या हडपसर औद्योगिक विभागात 'आरुद्योग' हा एक कारखाना आहे. या कारखान्याची स्थापना कै. भीमराव कुलकर्णी यानी केली होती कारखान्यातील मशीन शॉप विभागाची जबाबदारी श्री. यादवाडकर तर इलेक्ट्रोप्लेटिंग विभागाची जबाबदारी श्री. रत्नपारखी सांभाळत आहेत. श्री. अरविंद कुलकर्णी हिशोब विभाग सांभाळत आहेत. दोन अध तरुण ७३ पासून येथे काम शिकून घेऊन काम करीत आहेत.

## देवल भांड्यांचा कारखाना

श्री. वि म. देवल (बी कॉम.) यांनी १९३९ साली हा कारखाना सुरु केला. येथे तयार होणारी चादीच्या मुलाम्याची भांडी टिकाऊ मुलामा, सुबक घाट व उत्तम पॉलिश यामुळे अल्पावधीतच प्रसिद्ध व लोकप्रिय झाली. आता या कारखान्यात स्टिलची भांडीही

WITH BEST COMPLIMENTS FROM:—

# Kirloskar Oil Engines Ltd.

Laxmanrao Kirloskar Road, Khadki, Pune 411 003.

WITH BEST COMPLIMENTS FROM :—

## M/s. Unity Gauge & Tool Co.

101, Rasta Peth, Pune 411 011

Phone – 27697 Gram – Unitguage

— Manufacturers of —

Plain Plug Gauges, Ring Gauges, Snap Gauges
Taper Plug and Ring Gauges

Special Gauges to Suit Customers design

Concentricity & Squareness Checking Centre,
Bench Centres

Comparator Stand

Jigs and Fixtures

Lapping Machine (Both Centreless and Flat Type)

Piston Pins, Dowel Pins, Jig Bushes

हार्दिक शुभेच्छा ! ! !

## अद्योग इंजिनीयर्स

प्रायव्हेट लिमिटेड.

इंडस्ट्रियल इस्टेट, हडपसर, पुणे ४११ ०१३.

A for – अॅक्यूरसी

R for – रिलायबिलीटी

## आम्ही खालील कामे करतो

- प्लेटिंग डेकोरेटिव्ह
- हार्डक्रोम
- अनोडायझिंग
- मेटल फिनिश
- मिलिंग
- प्रेसिंग
- ग्राईंडींग
- सगळे टूलरूम जॉबस्

With Best Compliments From

# WESTERN INDIA ERECTORS LIMITED

Sahyadri Sadan, Tilak Road, Poona – 411 030

*CONSTRUCTION INSTALLATIONS*
*ERECTION..... GLOBAL OPERATIONS*



मुद्रक-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पुणे

तयार होतात गुळगुळीत पृष्ठभाग, सुबक घाट व वाजवी किंमत ही या भाड्याची वैशिष्ट्ये आहेत.

## पुना डिस्ट्रिक्ट मोटार ट्रान्सपोर्ट को-ऑप. सोसायटी लि.

माल वाहतुकीचा धंदा करणाऱ्या मोटार मालकांनी ही संस्था स्थापन केली. सोसायटीने सरकारी धान्य वाहतूक, ऊस वाहतूक वगैरे सरकारी व निमसरकारी कामे केली. सोसायटीने मोटार स्पेअर पार्टसचे दुकान फारच पद्धतशीर व किफायतशीर रितीने चालविले आहे. श्री. आर. व्ही. कुलकर्णी हे या संस्थेचे अध्यक्ष होते

## श्री भवानी मेटल वर्क्स
## औद्योगिक सहकारी सोसायटी लि.

औद्योगिक सहकारी वसाहत वीर सावरकर नगर येथे एकमेव कामगारानी सहकारी तत्वावर चालविलेला हा भाड्याचा कारखाना आहे. या संस्थेने वैशिष्ट्य हे की संस्थेत अठरा कामगार असून सर्वच संस्थेचे सभासद आहेत. प्रत्येकास त्याच्या कामाप्रमाणे पगार मिळत असून महाराष्ट्रातील भांडी बनविणाऱ्या क्षेत्रात हा एक नावलौकिकास आलेला अग्रेसर कारखाना आहे.

## शारदा मेटल वर्क्स

पितळेची लहान मोठी पिंपे बनविणारा हा कारखाना आहे. कारखान्याचे मालक श्री. के. एस. कामत हे मुळ कासरगोडचे राहणारे. शिक्षण अजिबात नसताना, गरीबीमुळे लहान सहान कामे करून, स्वतची प्रगती साधली. १९३५ ते ६१ कामगार क्षेत्रात कार्य केले. गरजु विद्यार्थ्यांना व अनेकाना आजारपणात व संकटात आपुलकीने मदत केली आहे.

## एमएनव्ही सायंटिफिक इंन्स्ट्रुमेंटस् प्रा लि.

बायो-इंजिनिअरींग क्षेत्रातील महत्वाची उपकरणे तयार करणारा पुण्यातील एक लघुउद्योग. १९५० साली या कारखान्याची स्थापना झाली व १९७८ पासून वरील नावाने काम करीत आहे. सुरवातीच्या काळात महाविद्यालये व विश्वविद्यालये याच्या पदार्थ-विज्ञान शाखेला लागणाऱ्या उपकरणांपासून सुरवात करून आज मायक्रोबायॉलॉजी, फर्मेंटेशन इ. अत्याधुनिक शास्त्रात आवश्यक अशी प्रगत उपकरणे तयार करण्याचा उपक्रम यशस्वीपणे चालविला आहे. आजकाल याची उपकरणे शैक्षणिक क्षेत्राशिवाय राष्ट्रीय व खाजगी संशोधन संस्थामधून, देशी व विदेशी औषधे तयार करणाऱ्या कारखान्यातून व प्रयोग शाळेतून वापरली जातात. लहान मोठे फर्मेन्टर्स व शेकर्स संशोधनाच्या गरजेप्रमाणे डिझाईन करून ते अनेक देशी परदेशी औषध कपन्यांना समाधानकारकपणे तयार करून देण्याचे कार्य एमएनव्ही ने केले आहे

## श्री ज्ञानेश्वर वेल्डींग वर्क्स

मालक श्री. भगवानराव बापूराव मुळके हे मुळचे बीडचे. शिक्षण नाही बीडच्या गॅरेजमध्ये मिळालेल्या अनुभवावरून पुण्यात येऊन १९५२ पासून वरील व्यवसाय सुरु केला. आज पुण्यात मोटार दुरुस्ती व्यवसायातील तज्ञ आहेत. डिझल ट्रकचे संपूर्ण काम येथे होत असून ॲक्सिडेंट जॉब्स मध्ये तज्ञ आहेत. सर्वदूर परिचय व कामाची गॅरेंटी असल्याने अत्यंत विश्वासाने भारतातून कामासाठी गाड्या येथे येतात.

## सुराणा मेटल मार्ट

श्री. तेजमल फत्ताजी सुराणा हे मुळचे राजस्थानचे सुमारे ४०।४५ वर्षांपूर्वी पुण्यात येऊन वरील कारखाना सुरू केला व आजमितीस अत्यंत भरभराटीस आणलेला आहे.

## हॉटेल सुजाता

सदाशिव पेठेत हौदाजवळ श्री. गोडसे यानी चालविलेले जुन्या पेशवाई काळातील भोजनाची प्रचिती देणारे पुण्यातीलच काय सबंध महाराष्ट्रातील एकमेव हॉटेल

## मिलन हॉस्पिटल स्टील फर्निचर

श्री. हरीभाऊ पुरुषोत्तम कामत शिक्षण जेमतेम मॅट्रीक. सायकल भाड्याने देणे व दुरुस्त करणे या लहानशा धंद्याने सुरवात केली परंतु पुरामध्ये सर्व वाहून नुकसान झाले. तरीही नंतर जिद्दीने हॉस्पिटल फर्निचरचे सर्व प्रकार बनवावयास प्रारंभ केला सध्या ते या व्यवसायातील तज्ञ म्हणून महाराष्ट्रात ओळखले जात असून नवीन हॉस्पिटल सुरु करणारे डॉक्टर्सही याच्याकडे सल्ल्यासाठी जातात.

## कै. डॉ. म. म. दत्तो वामन पोतदार

पहिल्या दर्जाचे मार्मिक टिकाकार व इतिहास संशोधक या नात्याने यांची कामगिरी प्रसिद्ध आहे. ' मराठी गद्याचा इंग्रजी अवतार ' बोलक्या दगडाची कहाणी इतिहास संशोधन ' श्रोते हो ' ओळख, भाषा समस्या इत्यादी अनेक ग्रंथ त्यानी लिहीले असून अनेक ग्रंथाचे संपादन केले आहे. त्याना नगर येथील इ. १९३९ सालच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला. पुण्याच्या शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष, टिळक विद्यापीठाचे कुलगुरु, भारतीय संस्कृति कोश मंडळाचे अध्यक्ष, खडकी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, भारतीय संगीत प्रसारक मंडळ, पुणेचे अध्यक्ष मराठी ग्रंथालय, पुणेचे अध्यक्ष, वैदिक संशोधन मंडळाचे व संस्कृत, सभा, पुणेचे अध्यक्ष, मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष इत्यादी अनेक मानाची व जबाबदारीची पदे त्यानी भूषविली. १९६१ साली पुणे विद्यापिठाचे कुलगुरु म्हणून त्याची निवड झाली. भारत सरकारने ' महामहोपाध्याय ' तर हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग या संस्थेने ' साहित्य वाचस्पती ' ही पदवी त्याना दिली. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीने त्यांना डॉक्टरेटची सन्माननीय पदवी दिली.

With best compliments from :

# STATFIELD EQUIPMENTS PVT. LTD.

132, B, Ganeshkhind Road, Pune 411 007.

**THE ONLY MANUFACTURERS OF ELECTROSTATIC SPRAY PAINTING EQUIPMENTS IN INDIA,**

हार्दिक शुभेच्छा ! ! !

# हॉटेल सुजाता

११६ जुना / ६४७ नवा, सदाशिव पेठ, हौदाजवळ, पुणे- ३०.

फोन : ४४ ०९ ७२   ४४ ४७ ६९

*With best compliments from :*

# MARK ELEKTRIKS

Plot No. 15, Gultekadi Industrial Estate,

Gultekadi, Pune 411 009.

Phone – 44 20 90

With Best Compliments From :

# B. G. SAPRE & CO.

Phone 22518

Manufacturers of .

*MACHINERY & SPARES FOR PAPER & BOARD MILLS*

45, Dr. Ambedkar Road, Near Sangam Bridge,

Pooña 411 001 (India)



मु-द-कन्वी, पुरुषार्थ प्रकाशन, पुणे

## कै. गुरुवर्य बाबूराव जगताप

शिक्षण-तज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेल्या गुरुवर्यांनीच श्री शिवाजी मराठा प्राथमिक शाळा व हायस्कूलची स्थापना केली. पुणे म्यु. स्कूलबोर्डाचे ते चेअरमन होते. बॉम्बे प्राव्हिन्शिअल एज्युकेशन बोर्डाचे अनेक वर्षे सभासद होते. सरकार नवीन शिक्षण विषयक योजना आखताना गुरुवर्यांचा सल्ला विचारीत असे. श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल व इतर अनेक शैक्षणिक संस्थांशी त्यांचा संबंध होता.

## श्री. बाबूरावजी पारखे

भारत एन्व्हलप्स, पेपको, सेन्ट्रल पल्प मिल्स या सर्व उद्योगाचे कल्पक व संस्थापक आणि विकासाचे सूत्रधार श्री बाबूरावजी पारखे यांचा जन्म १९१२ साली झाला १९२५ साली वडील अचानक निवर्तल्यावर मातोश्री माईसाहेब यानीं आई आणि वडील या दोन्ही नात्यांचे दायित्व आपल्या शिरावर घेतले. ईश्वरावर श्रद्धा ठेवून छोट्या यंत्रावर कागदापासुन पाकिटे बनविण्याचा गृहोद्योग त्यांनी 'भारत एन्व्हलप्स' या नावाने सुरु केला. कागदावर होणारा खर्च कमी करण्याच्या उद्देशाने कागद व्यवसायाचे ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी पदवी घेतलेले बाबूरावजी मुढवा येथील कागद गिरणीत नोकरीला लागले. मोठ्या कष्टाने त्यांनी जपानला जावून कागद निर्मितीचे ज्ञान संपादन केले. त्यावेळी कारखान्याचा व्याप त्यांचे धाकटे बंधू गोपाळराव यांनी सांभाळला. १९४२ साली भारत एन्व्हलप्सचे पेपर अॅन्ड पल्प कन्व्हर्शन्स लि.' मध्ये रुपांतर झाले. त्यानंतर जपानहून मशीन आयात करुन खोपोली येथे 'पेपको मिल' ची स्थापना केली. टुथपेस्टची आवरणें, साबणावरची वेष्टने यापासून मोठमोठ्या खोक्यापर्यंत सर्वत्र पेपकोचा बोर्ड दिसू लागला. एवढ्या वरच बाबूरावजी थांबले नाहीत. कागदाचा लगदा बनविण्याचा जिद्दी विचार त्यांच्या मनात उसळला. डॉ. जी. पी. काणे यांचे तांत्रिक दिग्दर्शन व शासकीय सहाय्य त्यांना मिळाले. श्री. काकासाहेब टकले यानीं 'पेपको' चे व श्री. शंतनुराव किर्लोस्करांनी 'सेंट्रल पल्पचे' चे अध्यक्षपद स्विकारले. आज भारतातील पहिला बांबूच्या लगद्याचा प्रचंड कारखाना सोनगड येथे डौलाने उभा आहे.

सध्या बाबूरावजीचे द्वितीय चिरंजिव श्री प्रकाश आता खोपोली विभागाचें काम पहातात तर तृतीय चिरंजीव श्री. अरुण कुमार हे विक्री विभाग सांभाळतात.

## डॉ. वसंतराव पटवर्धन

इ. स. १९४७ साली महाराष्ट्र बँकेत नोकरीला लागलेल्या डॉ. पटवर्धनानी निरनिराळ्या पदावर काम करीत करीत आज 'महाराष्ट्र बँकेचे चेअरमन' ही सन्मानाची जागा मिळविली आहे. याशिवाय ही नोकरी सांभाळून त्यांनी आपला विद्याव्यासंग व लेखन व्यासंग चालू ठेवला आहे त्यांनी ललीत लेखन केले असून अर्थ-शास्त्रावरही पुस्तके लिहीली आहेत अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा वेगवेगळ्या नात्याने संबंध आहे. पूना रोटरीचे ते सभासद असून बँकिंग संदर्भात त्यांनी परदेशी प्रवासही केला आहे महाराष्ट्र बँकेचे चेअरमन म्हणून सुत्रे हातात घेतल्यावर हजारो माणसांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला ही गोष्ट त्यांच्या लोकप्रियतेची साक्षच आहे.

## श्री. शंतनुराव किर्लोस्कर

उद्योगधंद्यास लागणारी द्रष्टेपणाची दैवी देणगी श्री. शंतनु-रावाना लाभलेली आहे. श्री. शंतनुरावांकडून मार्गदर्शन लाभलेल्या किर्लोस्कर उद्योग समुहाने आज देशात व देशाबाहेरही मानाचे स्थान पटकाविले आहे. अनेक कंपन्यांचे ते डायरेक्टर आहेत. १९६६ मध्ये ते फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रिजचे अध्यक्ष होते. भारत सरकारच्या व महाराष्ट्र सरकारच्या अनेक कमिटयांचे अध्यक्ष किंवा सभासद म्हणून त्यानी बहुमोल कार्य केले आहे व करीत आहेत त्यांनी प. जर्मनीतही किर्लोस्कर कारखान्याची शाखा सुरु केली आहे. किर्लोस्कर उद्योग समुहाचे ११ कारखाने आज देशाच्या औद्योगिक प्रगतीत महत्वाचा वाटा उचलीत आहेत.

## श्री वसंतराव वैद्य

रबर उत्पादनात हिंदुस्थानात अग्रेसर असणाऱ्या स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि या कारखान्याची स्थापना श्री. वैद्य यानी केली. श्री वसंतराव वैद्य यांची मूलगामी संशोधक वृत्ती, दूरदृष्टी आणि सततोद्योग यामुळे स्वस्तिकची सर्वांगिण प्रगती झाली आहे स्वस्तिकची संशोधन प्रयोगशाळा ही भारतातील एक सुसज्ज व परिपूर्ण प्रयोग शाळा मानली जाते. सततोद्योगी वसंतरावांनी रबर धंद्याच्या विकासास स्वतःला वाहून घेतले आहे. याशिवाय अनेक सामाजिक, शैक्षणिक, वैज्ञानिक व संशोधक संस्थांना ते सहाय्य करतात.

## श्री. गजानन विश्वनाथ केतकर

केसरी या पत्राचे संपादकपद श्री. ग. वि. केतकर यांनी काही काळ भूषविले. 'तरुण भारत' व 'मराठा' या इग्रजी पत्राचेही ते काही काळ संपादक होते. गीताधर्म मंडळाची व हिंदू अनाथाश्रमाची स्थापना श्री. केतकर यांनी केली मिठाच्या सत्याग्रहात त्यांना नऊ महिने तुरुंगवास भोगावा लागला. गीताबीज, लोकमान्य टिळकांची भाषाशैली, हिंदुत्वाची मीमांसा, मर्मभेद ही पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत.

## कै. ग. दि. माडगूळकर

कै. ग दि. माडगूळकर हे यशस्वी चित्रपटकथा लेखक होते. त्यांनी वंदे मातरम्, बाळा जो जो रे, पुढचें पाऊल, मानाचे पान, लाखाची गोष्ट, प्रेम आंधळे असते इ. अनेक कथा व चित्रकथा लिहिल्या आहेत. १९६२ साली झालेल्या महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात उत्कृष्ट कथाकार, उत्कृष्ट पटकथाकार, उत्कृष्ट संवादलेखक व उत्कृष्ट गीतकार ही चारही पारितोषिके माडगूळकरांना मिळाली. त्यांची गीतरचना मराठी चित्रपट जगतात अजोड मानली आहे.

# VULCAN-LAWAL

Vulcan–Lawal is an Engineering Company with a wide range of products and systems engineering capabilities covering the Food Industry (Dairy, Fruit, Juices, Breweries & so on) the Chemical and Pharmaceutical Industry, the Foundry Industry, Marine, Leather Tanning and Processing and Engineering & Metal producing industries.

An Indo–Swedish joint venture, it employs over 1000 employees and has a Sales turn over of Rs. 113-million (Rs. 11 3 Crores)

Vulcan–Lawal's products and engineering services enjoy a high reputation in India and the countries it exports to. Some of the products it manufactures are-Centrifugal separators, Heat exchangers, Refrigeration compressors pumps, Dryers & Evaporators.

Vulcan-Lawal also undertakes turnkey jobs for the Vegitable Oil, Dairy, Beverage, Foundry, and other Industries.

❊


VULCAN - LAVAL

Manufacturers of Equipment & Machinery
For

♡ DAIRY INDUSTRY. ♡ FOOD PROCESSING INDUSTRY
♡ BEVERAGE INDUSTRY. ♡ CHEMICAL AND PHARMACEUTICAL INDUSTRY
♡ PACKING AND PACKETTING. ♡ FOUNDRY. ♡ MINING
♡ LEATHER TANNING AND FINISHING

**VULCAN-LAVAL LIMITED**

P. O. Box 735 Bombay 1
P. O. Box 719 Madras 1
P. O. Box 2300 Calcutta 1.
P. O. Box 627 New Delhi 1.
P. O. Box 53 Pune 1




मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पुणे

'गीतरामायण' ही त्यांची रामायणावरील गीतमालिका एक अद्वितीय गीतमालिका आहे. लघुकथालेखक म्हणून त्यांचे नाव प्रथम श्रेणीत अजरामर झाले आहे.

## श्री. एस. एम. जोशी

श्री. एस. एम. जोशी हे महाराष्ट्रातील एक सन्माननीय राजकारणी आहेत. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत शिक्षण घेतलेले, श्री एस. एम. जोशी भारतीय समाजवादी पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते व जनता पक्षाचे अध्यक्ष होते. सयुक्त महाराष्ट्र चळवळीतही ते अग्रगण्य खंदे नेते होते. 'लोकमित्र' दैनिकाचे सपादक पदही त्यानी भूषविले होते ते काही काळ रिझर्व बँकेचे डायरेक्टर होते परंतु अल्पावधीतच त्यानी ते पद सोडले सघटना कौशल्य आणि विधायक वृत्ती हे त्यांचे विशेष गुण आहेत

## श्री. नारायण गणेश गोरे

इ. स. १९२७ पासून श्री. ना ग. गोरे यानी राजकारणात प्रवेश केला. प्रजासमाजवादी पक्षाचे प्रमुख सूत्रचालक म्हणून त्याचे नाव घेतले जात होते. आज ते जनता पक्षाचे कार्यकर्ते असून जनता पक्ष अधिकारावर असताना ते ब्रिटनला इडीयन हायकमिशनर होते विचारवत लेखक व वक्ते म्हणूनही महाराष्ट्र त्यांना ओळखतो.

## डॉ. ग. श्री. खैर

पुणे विद्यार्थी गृहाची पूर्वीचे पुणे अनाथ विद्यार्थीगृह) स्थापना श्री खैर यांनी केली. निर्धन विद्यार्थ्यांचे शिक्षण हेच त्याचे जीवनध्येय होय. 'जगातील समाजक्रांति व हिंदुस्थान' 'पाश्चिमात्य शिक्षण पद्धती' 'जगानची जीवनक्रांती' हे प्रसिद्ध ग्रंथ त्यानी लिहीले आहेत 'प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन' चे सपादक, इटिग्रेशन कमिटीचे सभासद, बोर्ड ऑफ सेकडरी एज्युकेशनचे सभासद या नात्याने त्यानी फार महत्वाचे कार्य केले आहे. १९६० साली त्याना 'राष्ट्रीय शिक्षक' पारितोषिकाचा बहुमान मिळाला

## श्री. त्र्यं. र. देवगिरीकर

इ. स. १९२१ मध्ये ते 'चित्रमय जगत' चे सपादक या नात्याने काम बघू लागले कायदेभगाच्या चळवळीत त्याना तुरुगवास घडला. त्यानतर स्वातत्र्य सत्याग्रहातही त्याना अनेकदा तुरुगवास घडला आयर्लंडचा इतिहास, फिलिपाइन्सचा लढा, गांधीजींचा अहिंसावाद इत्यादी पुस्तके त्यानी तुरुगातच लिहीली. पार्लमेंटमध्ये असताना बार्शी लाइट रेल्वे, डागप्रकरण, सयुक्त महाराष्ट्र चळवळ इ. बाबतीत त्यानी उल्लेखनीय कार्य केले आहे

## श्री. एल. डी. भावे

एक सुप्रसिद्ध व्यवसायिक व सामाजिक कार्यकर्ते म्हणून पुणेकर श्री. भावे यांना ओळखतात बरशेन गॅस या इधनाची ओळख दादासाहेबानीच प्रथम पुण्यास करून दिली स्वतःच्या गुणामुळे त्यांनी स्वतःची आर्थिक उन्नत्ती करून घेतली आणि या सपत्तीचा विनियोग सत्कार्य व सेवाभावी सस्थाना सढळ हाताने मदत करण्यात केला व करीत आहेत. श्री. दादासाहेब भावे, शिक्षण


# I. E. C. PUMPS & TOOLS PVT. LTD.

Manufacturers Of

***Pneumatic Tools ❋ Chemical Dozing Pumps***
***Reciprocating Pumps ❋ Marine Pumps etc***

Registered Office
603, Sadashiv Peth,
Laxmi Road, Pune 411 030
Phone . 445141

Factory
117, 118, 123 H-Block
MIDC, Pimpri, Pune 411 018
Phone . 82348

SALES & SERVICE
**KIRLOSKAR BROTHERS LTD.**
Udyog Bhavan, Tilak Road, Pune 411 002.

Phone 44 17 41

**Poona Pattern Works**
Speciality
WOODEN & METAL PATTERNS

**Poona Centrifugal Liners**
Speciality
FERROUS & NON-FERROUS ALLOY CASTINGS, CENTRIFUGAL CASTINGS & LINERS

**Poona Machine Tools**
Speciality
MANUFACTURING OF SPECIAL PURPOSE MACHINES, SPARE PARTS & JOB WORK

**Poona Engineering & Fabrication Company**
Speciality
INDUSTRIAL FABRICATION, OXANS, FURNACES, PRESS VESSELES ETC.

Survey No 49/2A Parvati Aranyesawar Corner, Poona Auto Works Compound, Pune 9.

Shri. L. G BHALERAO Shri. S. K. LIMAYE Shri A. L. BHALERAO

# चितळे बंधू मिठाईवाले

बाजीराव रस्ता, पुणे ३०. दूरध्वनी ४३२०८ ♧ डेक्कन जिमखाना पुणे ४ दूरध्वनी ५७७५१

लोणी, चक्का, तुप, पेढे, बर्फी, श्रीखंड, गुलाबजाम

# H. Y. T. Engineering Corporation

29/10 D-2 Block M.I.D.C. Chinchwad, Poona 411 019

Manufacturers Of : Universal Mini Lathe H 1 ♧ Precision Mini Drilling Machine Type & EC. 3 ♧ Printed Circuit Board Drilling Machine Type P 3 & PC 3 ♧ Mica Under Cutting Machine

Phone : 82634 Cable : HEMSON

# Khadilkar Industrial Electronics

MANUFACTURERS AND SUPPLIERS OF INDUSTRIAL INSTRUMENTS

Plot No 429 B, Shivajinagar, Near Vishnu Baug Society,
Chatushringi, Pune 411 016. Tel. 52263

# Crown Engineering Works

Phone 82696

Manufacturers Of

*PRESSURE VESSELS & DISH ENDS*

Registered Office & Works : D-2 Block, Plot No. 29/14
MIDC, Chinchwad, Pune 411 019

**To Light the path of the Healing knife ♡**
**Portable Surgical Lights ♡**

**JOSHIS Shadowless Surgical Lights** –

Surgical Lights that match the most advanced operative techniques

**A. G. Joshi & Co**

Sn No 49/1 Parvati, Poona-Satara Road, Tel 441729 443278

With Best Wishes from :-

**A trusted name in Quality Commercial Printing**

*SULEKHA PRINTERS*

759-94, Navandar Nivas, Prabhat Rd, Poona-4 Dial-56268

हार्दिक शुभेच्छा

# सॉ इंजिनियर्स

(श्री शिराळकर)

लाल बहादुर शास्त्री रोड, पुणे.

*With best complimento from*

# HOTEL TRIMURTI

**1512, Dhankwadi, Poona-Satara Rd.**

Poona - 411009

प्रसारक मंडळी, डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कामर्स, मूकबधिर विद्यालय या संस्थांचे अध्यक्ष तर पुणे मराठी ग्रंथालयाचे उपाध्यक्ष आहेत.

### डॉ. श्री. श्री. घारे

डॉ. घारे हे पिंपरी-चिंचवड नगरपालिकचे लोकनियुक्त अध्यक्ष असून ते ही जबाबदारी उत्तमपणे पार पाडीत आहेत. तत्पूर्वी चिंचवड ग्रामपंचायतीतही त्यांनी सरपंच म्हणून काम केले होते. तसेच ते चिंचवड लोकवासियांचे आवडते डॉक्टरही आहेत. पहिली बरीच वर्षे त्यांनी डॉक्टर म्हणून लोकांची सेवा केली. ते अतिशय मनमिळावू व गरीबांचे चाहते आहे. म्हणूनच ते आज सर्वात मोठया व श्रीमंत नगरपालिकेचे अध्यक्ष आहेत.

### श्री. शंकर जगन्नाथ महाशब्दे

पुण्यातील तरुण महत्वाकांक्षी उद्योजकात श्री. महाशब्दे यांची गणना होते. आय. ई. सी. पंप्स ॲन्ड टूल्स या त्यांच्या कारखान्यात मरीन इंजिनकरता लागणारे पंप तयार केले जातात. न्यूमॅटिक टूल्स ही येथे तयार होतात आपल्या कार्यकुशलतेमुळे श्री. महाशब्दे यांनी अल्पावधीतच यश संपादन केले आहे

### श्री. दादासाहेब उर्फ दत्तात्रय तळवलकर

पुण्यातील लघुउद्योगात पॉलीमर प्रॉडक्ट हे नाव आता सर्वांना परिचित झाले आहे. या उद्योगाची स्थापना श्री. दादासाहेब तळवलकरांनी केली आहे. अनेक अडीअडचणीतून यशस्वीपणे मार्ग काढलेल्या या कारखान्यात सीडोमीटर, अवर मीटर्स, व्हॅक्युम इंडिकेटर्स व स्विचेस, मिनिएचर गिअर बॉक्सेस इत्यादी तयार होते. दादासाहेबांच्या स्वतंत्र काहीतरी करण्याच्या जबर इच्छाशक्तीतून या उद्योगाचा जन्म झाला.

### सौ. यमुताई किर्लोस्कर

सुगृहिणी व उत्साही समाजसेविका म्हणून पुणेकर सौ. यमुताईना ओळखतात. सौ. यमुताईनी महिला उद्योग मंडळाची पुण्यात स्थापना केली. या मंडळात गरजू स्त्रियांना तांत्रिक कामासाठी नोकरी दिली जाते. ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्सच्या त्या सभासद आहेत.

### सौ. जयश्रीबाई वसंतराव वैद्य

पुण्यातील एक तळमळीच्या सामाजिक कार्यकर्त्या म्हणून सौ. जयश्रीबाईंचा लौकीक आहे. अनेक सामाजिक संस्थांची अध्यक्षपदे त्या भूषवित आहेत. याशिवाय तीन चार औद्योगिक कंपन्यांच्या त्या संचालिका आहेत.

### श्री. जयंत श्रीधर टिळक

इ. स. १९५० साली श्री. जयंतरावांची केसरीच्या संपादकपदी नियुक्ती झाली. नंतर १९६२ मध्ये विजयादशमीच्या सुमुहूर्तावर त्यांनी केसरीचे दैनिकात रुपांतर केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत व गोवे विमोचन चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा संबंध आहे. श्री. जयंतराव हे पहिल्या प्रतीचे


हार्दिक शुभेच्छा ! ! !

युनायटेड होजिअरी

शनिवार पेठ, पुणे ३०.

'युनायटेड' चे लोकप्रिय ब्रॅन्डस् युनायटेड, कॉटन, नेबुला, अशोक, मर्सराईज डबल लॉक, डेलमान्टे

(सर्व प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध)

दर्जेदार होजिअरीचे उत्पादन करणारा महाराष्ट्रातील अद्ययावत् कारखाना.



WITH BEST COMPLIMENTS FROM :—

AUTOMOTIVE SERVICES

Tilak Road, Poona.

Authorised Dealers for

*TATA DIESEL VEHICLES*

Poona–Satara–Sangli

## KIRAN ENGINEERING WORKS

408/10/14 Gultekadi Road, Veer Savarkar Nagar, Poona 411009
Established in 1964

Partners – 1) Shri Y P Kulkarni 2) Shri N, B Bavkar
3) Shri A R Joshi 4) Shri V. R. Johsi

For Sugar Machinery Spares
Contact – Kiran Engineering Works Phone 441079

---

हार्दिक शुभेच्छा

## श्री. पद्माकर गोपाळराव भिडे

११–अ । ७ कांचन, एरंडवणे, कर्वे रोड, पुणे

---

**Industrial Electronic & Allied Products**

1423, (New) Shukrawar Peth, Poona – 411002, India
THRESEAL FURNICOL DIAMOND B. P. APPARATUS . MICROFILMING

**Managing Partners** – Resi Phones Telegram SEFOTAKE
Madhav Bhate 40860 Patent
Satyawrat Ponkshe 42880 Attorneys, Phone – 41041

---

## HINDUSTAN

**Bakery & Confectionery**

264, Shaniwar Peth, Poona 30

**Prop** – Vinayak Damodar Mahendale

---

## B. K. ENGINEERS

**Manufacturers of** – Standard & Non-standard Gauges Jigs Fixtures & Precision & Machinery Components
**Office & Factory** – 427 / A-2, Gultekadi Industrial Estate, Poona 411009.
Phone – 40655 **Prop** – B S Kadam

---

तार–मुद्रा, पुणे १९५६ पासून फोन – ४४४६३६, ४४४२८

भारत सरकारकडून १५ श्रेष्ठता प्रमाणपत्रे व ताम्रपट मिळालेली

## प्रकाश टाइप फौन्ड्री

२५०–२६१ नारायण पेठ, विजय चित्रमंदिराजवळ, पुणे ४११०३०

---

Space Age Precision Tools Private Limited

T-96, M I D C Industrial Estate, Bhosari, Pune-411026.

Phone - 82031 & 83114

Telex-145-354 Gram SPACEAGE

**Turnkey Material Handling Systems for Core Sector Industries Such As Iron Ore Mining Cerrent Plants, Chemicals, Steel, Coal, Fertilizer or any other Requirements of Bulk and Unitized Handling.**

Regd Office-13/A, Vishwajit Housing Society, Ganesh Khind, Pune 16, Phone-56480

Sales – Office-Navjivan Society, Bldg No. 3, 11th Floor, 14, R. Lamington Road, Bombay 400008.

वक्ते व महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. ते सध्या महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात आहेत.

### श्री. नामदेवराव सदाशिव उर्फ मामासाहेब मोहोळ

महाराष्ट्रातील प्रसिद्ध कॉंग्रेस पुढारी व कुस्तीगीर परिषदेचे प्रवर्तक श्री. मामासाहेब मोहोळ हे मुळचे मुळशी तालुक्यातील आहेत. १९४२ च्या चलेजाव चळवळीत त्यांनी भाग घेतला. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी काही काळ भूषविले. मावळचा मानबिंदू असे यथार्थ नामाभिधान लाभलेले, सर्वांशी आपुलकीने वागून बहुजन समाजाशी एकरूप झालेले ते एक थोर कार्यकर्ते आहेत

### श्री. भाऊसाहेब लक्ष्मणराव शिरोळे

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत श्री. शिरोळे यांनी हिरीरीने भाग घेतला होता. इ. स. १९५७ मध्ये पुणे महानगरपालिकेवर पुन्हा निवडून आल्यावर महापौरपदावर श्री शिरोळे यांची बिनविरोध निवड झाली श्री शिवाजी व्यायाम मंडळाचे अध्यक्षपद, जीजामाता एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्षपद इ अनेक पदे त्यांनी भूषविली असून एक उमदे व धडाडीचे कार्यकर्ते म्हणून पुणेकर त्यांना ओळखतात

### श्री. बाबुराव सणस

लोकोपयोगी कार्याला मुक्तहस्ते मदत करणारी व्यक्ति असा लौकीक सणस यांनी मिळविला आहे. पुण्याचे नगराध्यक्षपद त्यांनी चार वर्षे भूषविले, इ. स. १९५२ मध्ये पुणे कार्पोरेशनच्या मेयरपदी त्यांची निवड झाली. पुण्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत.

### कै. अण्णासाहेब मगर

पिढीजात शेतकरी घराण्यात श्री. मगर यांचा जन्म झाला. १९४२ च्या आंदोलनात त्यांनी भाग घेतला होता. श्री शिवाजी मराठा सोसायटीचे सेक्रेटरी, हवेली तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष इ. महत्वाची पदे त्यांनी भूषविली. श्री. मगर हे पुणे जिल्ह्यातील एक तळमळीचे राजकीय व सामाजिक कार्यकर्ते होते.

### मेजर जनरल (निवृत्त) यशवंत श्रीधर परांजपे

श्री. परांजपे हे आर्मी हेडक्वार्टर्समध्ये स्टाफ कॅप्टन म्हणून जाणारे पहिले हिंदी अधिकारी होते. कमांडिंग ऑफिसर, ब्रिगेडियर, मेजर जनरल इ. मानाचे हुद्दे त्यांनी मिळविले. निवृत्त झाल्यावर पुणे विद्यापिठात 'युद्धाभ्यास' शिकविण्यासाठी विद्यापीठाने १९६३ साली त्यांची नेमणूक केली 'सैनिकाची स्वाक्षरी' हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले आहे.

### श्री. रामभाऊ कुलकर्णी

मोटर ट्रान्सपोर्ट व्यवसायातील हे तज्ञ असून, निरलस व सेवाभावी स्वभावामुळे श्री. कुलकर्णी सुपरिचीत आहेत. पुना डिस्ट्रिक्ट मोटार ट्रान्सपोर्ट को-ऑप. सोसायटी लि. चे. माजी चेअरमन होत.


हार्दिक शुभेच्छा !!!

**भोर रबर प्रॉडक्टस**

डी-१७, एम. आय. डी. सी, भोसरी, पुणे ४११०२६

**卐 उत्पादन 卐**

शेतीचे पाण्याचे पाइप्स    औद्योगिक रबर पार्टस

**विक्री व्यवस्था** – सिंडिकेट पाईप डिस्ट्रिब्यूटर, नागदेवी, मुंबई ३.

*With best compliments from :*

Gram Sparkonix

**SPARKONIX (INDIA)**

Office - 176, Parvati, Pune 411009, Phone - 441968
Works - A - 82, MIDC, Industrial Estate, H Block, Pimpri
Pune 411018, Phone - 83236

Spark Erosion and Special purpose Machines
Geophysical instruments, Optical Measuring instruments
Petrol Gas Generators

मूक, बधीर, कामगार, विद्यार्थी – विद्यार्थीनींसाठी

## मॉडर्न टेक्निकल सेंटर

१४४, नारायण पेठ, दिक्षित गॅरेज समोर, पुणे ३०
फोन – ४६५०३, ४२६२०
सचालक – सी. व्ही पाठक

कोर्सेस · टर्नर, फिटर, जॉब इन्स्पक्टस, मशिनिस्ट, मेकॅनिकल ड्राफ्टसमन्, स्कूटर मेकॅनिक.
वैशिष्ठ्ये सहा महिने व बारा महिने मुदतीचे पार्टटाईम कोर्सेस ♡ सोईस्कर वेळा ♡ मासिक सुलभ फीचे हप्ते ♡ नवीन बॅचेस दरवर्षी एप्रिल, जून, सप्टेंबर व डिसेंबरमध्ये सुरु होतात.

# INDUSTRIAL ASSOCIATES

31, Parvati Industrial Estate, Pune 411 009. Phone 40826, 42818 ♡ Telex PN 333
Mfrs of Machines Tools, Accessories Turned, Pressed, Ground Parts
& Sub Assemblies for I C Engines, Two Wheelers, Tractors, Vehicles.

With Best Compliments From

# ASKO ROADWAYS

Fleet Owners & Transport Contractors, Specialised in Barrel Transport.
Poona Satara Road, Poona 9
Phone 40105 & 42698

# CERAMICA

Phone 442640

Manufacturers of MINIATURE CERAMICS
Plot No 21, Poona Small Scale Industrial Co-op Estate Ltd
Lahane Road, Gultekdi, Poona 411 009

With best compliments from

Phone 40136

# CLEAN ENERGY SYSTEM

24, Gultekadi Industrial Estate
Poona 9.

" सर्व सामान्याच्या जिव्हाळ्याची "

## " दि पूना को-ऑपरेटिव्ह रुपी बँक लि. "

मुख्य कचेरी — ३५३।१ नारायण पेठ, लक्ष्मी रोड, पुणे ३०

शाखा लक्ष्मी रोड, फोन ४४५५९८; भवानी पेठ, फोन २३०४४; बुधवार पेठ, फोन ४४५२१३; मार्केट यार्ड, फोन ४७०६३४; चिंचवड, फोन ८२६१२०; भोर

गरीब, दलीत, दुर्बल घटकांसाठी आमच्या काही कल्याणकारी योजना

१) उच्च शिक्षण तरतूद निधी योजना. २) कोणत्याही शुभकार्याच्या तरतूदीसाठी शुभमगल ठेव योजना.
३) ग्रॅज्युअटी वा निवृत्ती वेतन योजना तसेच ठेवीवर १० टक्के पर्यंत व्याज मिळवा

विनम्र व त पर सेवा

शशीकांत पत्की, जनरल मॅनेजर
श्रीराम यादव, व्हा. चेअरमन
गजानन देव, चेअरमन

# Roopali

BOARDING AND RESTAURANT
F C Road, Poona - 4, Phone - 57421
Prop - J B Shetty.



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पुणे

### सौ. लिला लक्ष्मण भावे

सौ. भावे आदर्श गृहिणी म्हणून सांसारिक जबाबदाऱ्या सांभाळून सामाजिक कार्यात निरलस वृत्तीने भाग घेतात. महिला मंडळाच्या 'कोषाध्यक्ष' म्हणून त्यांनी ६-७ वर्ष काम केले असून केशव ग्राहक सहकारी संस्थेचे अध्यक्षपदही भूषविले. श्री एल. डी भावे यांच्या त्या पत्नी असून त्यांच्या व्यवसायातही त्या भाग घेतात

## हवेली तालुका

पुणे शहराच्या सभोवताली १२-१५ मैल विस्तार असलेला हवेली तालुका आहे. या तालुक्याच्या पूर्वेस दौंड तालुका आहे व दक्षिणेस पुरंदर तालुका आहे या तालुक्यात ऊस, ज्वारी, भुईमुग फळबागा व भाजीपाल्याची लागवड केली जाते. पुणे शहर याच तालुक्यात असल्यामुळे या तालुक्याचे महत्व वाढले आहे या तालुक्यात कमी व अनियमित पाऊस पडतो. मुठा नदीवर १८७४-७५ साली खडकवासल्याचे धरण बांधण्यात आले आहे या धरणाचे पाणी मुख्यत पुणे शहरवासियाना पाणी पुरवठा करण्यासाठी उपयोगात येते.

### सिंहगड

पुण्यापासून १५ मैल अंतरावर हा इतिहास प्रसिद्ध किल्ला आहे. सिंहगड म्हणजेच पूर्वीचा कोंडाणा किल्ला होय. इ. स. १३४० मध्ये या किल्यावरील नाग नाईक याने महमद तघलकाच्या सैन्याशी ८ महिने मुकाबला केला होता. इ. स. १६७० मध्ये शिवरायाचे सरदार तानाजी मालुसरे यांनी हा किल्ला मोठ्या पराक्रमाने मोगलांकडून जिंकला यावेळी झालेल्या लढाईत तानाजी ठार झाले व या किल्यास सिंहगड हे नांव मिळाले. त्यावेळचे छत्रपती शिवरायाचे 'गड आला पण सिंह गेला' हे उद्‌गार इतिहास प्रसिद्ध झाले आहेत. सिंहगडावर तानाजी मालुसरे व छत्रपती राजाराम महाराज यांच्या समाध्या आहेत. अलिकडेच तानाजी मालुसरे यांचा पुतळा बसविण्यात आलेला असून माघ वद्य नवमीस तानाजी मालुसरे यांची पुण्यतिथी साजरी केली जाते.

### थेऊर

अष्टविनायकापैकीं चिंतामणीचे स्थान 'थेऊर' हे पुण्यापासून सुमारे १३ मैलावर आहे. श्रीमत माधवराव पेशवे यांची या देवावर फार श्रद्धा असल्यामुळे ते येथे नेहमी दर्शनास येत असत. त्यांचा येथे असलेला वाडा आता भग्नावस्थेत आहे. श्रीमत माधवरावाचा मृत्यू येथेच झाला व त्यांच्या पत्नी रमाबाई त्यांच्याबरोबर सती गेल्या. येथे स्थापन झालेल्या रमा-माधव स्मृतिमंडळातर्फे कार्तिक वद्य अष्टमीस श्रीमत माधवराव पेशवे व सती रमाबाई यांची पुण्यतिथी साजरी करण्यात येते. या पेशव्यानीच थेऊरच्या प्रसिद्ध चिंतामणी मंदिराच्या ओवऱ्या ४०,००० रु. खर्च करून बांधून दिल्या आहेत. देवळापासून सुमारे १ मैलावर महातोबाचे जुने देवस्थान आहे. येथील नदीचे चंद्राकृती वळण प्रेक्षणिय आहे मोरया गोसावी यानी येथील डोहाजवळ ध्यानधारणा केली आहे.

### देवी रमाबाई महिला सह. औद्योगिक उत्पादन केंद्र लि. थेऊर

गरजू, श्रमिक, मध्यमवर्गीय स्त्रियाना अर्धवेळ किंवा पूर्णपणे काम देऊन त्याना त्या योगे आर्थिक लाभ करुन देणे या उद्देशाने संस्थेची स्थापना झाली आहे. संस्थेचे ९५ सभासद आहेत. सभासदांना औद्योगिक कामाकरिता तसेच घरगुती उद्योग व उपयोगासाठी वस्तूंचा पुरवठा करणे, त्यांनी निर्माण केलेल्या मालाची विक्री करणे व शिवणवर्ग चालविणे, लाकडी खेळणी व बाहुल्या बनविणे इ कामे ही संस्था करते.

### देहू

पुण्यापासून सुमारे १८ मैलावर इंद्रायणी नदीच्या काठी संत तुकारामानी वास्तव्य केलेले देहू हे गाव आहे. येथेच १७ व्या शतकात तुकारामांनी आपली अमर अभंगरचना केली आहे. येथे असलेल्या विठोबा-रखुमाईच्या देवळाबद्दल असे सांगितले जाते की तुकाराम महाराजाचे पूर्वज विश्वंभरबुवा यांना बाराव्या शतकात या मूर्ती सापडल्या आहेत. या मंदिरातच तुकाराम महाराज भजन व कीर्तनात दंग असत. या देवळा शेजारी शिळामंदिर आहे. अभंगाच्या


**M/S DATTATRAYA INDUSTRIES PRIVATE LIMITED** Phone 442724
691-A, Pune Satara Road. Pune 411009
Manufacturers of —

1) 'DI' Metalclad Weatherproof Industrial Plugs, Sockets and connectors-ranging from 5 amps to 1500 amps 2 Pole and Multipole at 250 Volts/500 Volts required for use on most sophisticated Defence Equipments e g Radars, Generating Sets, A. A Gun, Mig Air Crafts, Vaijayanta Tanks, Warship Frigates and Naval Dockyards etc conforming to International Standards and approved by Controllerate of Inspection Electronics Bangalore
2) 'DI' Agri-Horticultural Tools & Implements e. g. Patented 'RAINBOW' 'JALDHARA', GARDEN WHIZ, Adjustable Hose Nozzles, Garden Tools etc

मंतोष हॉटेल

बारामती

हॉटेल जगदीश

मारवाड पेठ, बारामती

अजंठा स्टिल फॅब्रिकेटर्स

दुर्गा टॉकीज जवळ, बारामती

शहा मोतीचंद हिराचंद (वागजकर)

केमिस्ट व जनरल मर्चंट, बारामती

नवरंग क्लाथ स्टोअर्स

बारामती, फोन न. ५१८.

मे. शा. महेंद्रकुमार मोहनलाल

महालक्ष्मी छाप मिश्र खताचे निर्माते, बारामती

मे. शहा मगनलाल केकुचंद

जनरल मर्चन्टस् अँण्ड कमिशन एजटस, बारामती.

मे. शहा जिवराज वेणीचंद

गुळ, साखर, पेंड व भुसार मालाचे व्यापारी, बारामती

वरील सर्वांचे आम्हाला सहकार्य दिल्याबद्दल
आम्ही आभारी आहोत.

# 'पिरॅमिड' सेल्स कॉर्पोरेशन

स्टॉकिस्ट

'पिरॅमिड' ब्रँड पोर्टलॅन्ड सिमेंट

१३९, भवानी पेठ, पुणे ४.

## हंसराज ट्रेडींग कं.

२०१, मुंबई-पुणे रस्ता, चिंचवड, पुणे १९.

'चारमिनार' ब्रँड अॅस्बेस्टॉस, सिमेंटपत्रे व प्रेशर पाईप,
सर्व प्रकारचे बिल्डींग मटेरीयलचे विक्रेते.

## महाराष्ट्र अॅस्बेस्टॉस

'चारमिनार' ए. सी. शीटस् साठी
अधिकृत विक्रेते

२६६, भवानी पेठ, पुणे - २



म-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन,

वहया इंद्रायणीत बुडविल्या गेल्या तेव्हा संत तुकारामांनी या शिळेवर बसून परमेश्वराचा धावा केला व त्या वहया पुन: तरंगून वर आल्या. याशिवाय तुकाराम महाराजांचे जन्मस्थान असलेले जुने घर, गोपाळ पुऱ्यातील तुकाराम पादुका, निर्वाण स्थानावरील अश्वत्थवृक्ष ही भाविकांची श्रद्धास्थानेही येथे आहेत. वारकरी सांप्रदायातील लोकांच्या या पवित्र क्षेत्री संत तुकाराम सदेह वैकुंठास गेले त्या दिवशी म्हणजे फाल्गुन वद्य द्वितीयेस मोठी जत्रा भरते. गावात नळाचे पाणी, वीज, धर्मशाळा वगैरे सोयी असून देहू रोड स्टेशन जवळ मिलिटरीचे महत्वाचे डेपो आहेत.

## चिंचवड

पवना नदीकाठी असलेले चिंचवड पुण्यापासून सुमारे १० मैलांवर आहे. सुप्रसिद्ध गणपतीभक्त मोरया गोसावी यांची येथे समाधी आहे. मोरया गोसावींचे चिरंजीव चिंतामणी देव व त्यांच्या पुढील सहा पिढ्यांचा वंश अशा सात पिढीतील देवमंडळींच्या समाधी येथे आहेत. नदीकाठी नाना फडणीस व हरिपंत फडके यांनी बांधून दिलेले वाडे असून त्यात देवमंडळीचे वंशज राहतात. समाधी जवळ गणपती मंदीर आहे. दरवर्षी मार्गशीर्ष वद्य षष्ठीला येथे मोठी यात्रा भरते.

## पिंपरी-चिंचवड नगरपालिका

१९७० साली पिंपरी चिंचवड नगरपालिकेची स्थापना झाली. या नगरपालिकेचे क्षेत्र ३८ चौ. किलोमीटर असून लोकसंख्या सुमारे १ लाख आहे. पालिकेच्या परिसरात लहान मोठे २६५ उद्योगधंदे असून कामगारांची संख्या ७० हजाराचे वर आहे. या भागातील नागरीवस्ती ही पिंपरी–वाघेरे, पिंपरी कॉलनी, भोसरी, चिंचवड, आकुर्डी निगडी इत्यादी ठिकाणी प्रामुख्याने आहे. त्याचप्रमाणे कारखाने हे ही पालिकेच्या क्षेत्रात येतात. ही पालिका स्थापन झाल्यावर नागरिकांकडून कमीत कमी कर घेऊन जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करून देण्याचे धोरण आखले गेले व त्या दृष्टीने कारभार सुरु झाला त्यामुळे अल्पावधीतच ही पालिका लोकप्रिय झाली असून तिने अखिल महाराष्ट्रात लौकीक संपादन केला आहे. हे घडवून आणण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष कै. अण्णासाहेब मगर यांनी अपार कष्ट घेतले. या विखुरलेल्या परिसरातील नागरिकात सहकार्याची ज्योत उद्दीपित करून व त्याला स्वत:च्या निरपेक्ष वागणूकीची जोड देवून अण्णासाहेबांनी एक व्यावहारिक आदर्श निर्माण केला आहे. जनतेचा विश्वास संपादन करून त्यांनी त्यांच्या अडचणी या नगरपालिकेमार्फत सोडविल्या. बस वाहतुक, पाणी वाटप, रस्ते, अग्निशामक दल' वाचनालये, फिरता दवाखाना, शैक्षणिक इमारती, बाजार, सार्वजनिक बागा, क्रीडांगणे अशा अनेक दूरगामी व सर्वांना उपयुक्त होणाऱ्या योजना त्यांनी राबविल्या.

१९७०-७१ साली फक्त आठ लाखाचे असलेले संस्थेचे अंदाज पत्रक १९७५-७६ साली ६ कोटी २२ लाख रुपयावर गेले ही गोष्ट सांगूनही खरी वाटणार नाही. कार्यक्षम अध्यक्ष, सभासद व कर्मचारी


# कृषि विकास प्रतिष्ठान

## बारामती

卐

### शेतकऱ्यांच्या सेवेसाठी

१) डेअरी, पोल्ट्री, शेळ्या, मेंढ्या यांचे प्रजनन व प्रशिक्षण
२) उत्तम बीजोत्पादन - गहू, ज्वारी, ऊस, चारा पिके.
३) वैद्यकीय व पशुवैद्यकीय सेवा.
४) फळाझाडांची कलमे, रोपे इत्यादी.

बारामती.

With best compliments from :

## SHIRSATH IMPLEMENTS MFG CO.

31-32, Industrial Estate
P. O. Box No 40

卐

BARAMATI — 413102, DIST — PUNE.

## मे. इंडिया ऑटो स्पेअर्स

मोटार कारचे व ट्रॅक्टरचे स्पेअर पार्ट फायदेशीर
भावात मिळण्याचे ठिकाण.

तांदुळवाडी वेस, बारामती.

हार्दिक शुभेच्छा

## श्री. बी. व्ही. गरगटे

बारामती

हार्दिक शुभेच्छा

## मे. फकरुद्दीन सफुद्दीन आणि कं.

बारामती

For Quality Foods &
Comfortable Stay

## SHRI KRISHNA RESTAURANT

BARAMATI (413102)

Estd- 1939

Phone - 260

## मे. छगनलाल निहालचंद मुथा

रॅलीची मिश्र खते - किराणा व्यापारी बारामती, जि पुणे.

卐

## मे. सुरेंद्र ऑटोमोबाईल्स

इंडियन ऑईल डिलर, माळेगाव बु. जि. पुणे

आमचेकडे ४' व्यासापासून ३६'' व्यापर्यंतचे नॉन प्रेशर, प्रेशर पाईप, उत्कृष्ट दर्जाचे मजबूत घडणीचे पाईप तसेच पाण्याच्या टाक्या, सेप्टिक टॅंक व जाळ्या तयार होतात.

## सोमेश्वर सिमेंट पाईप कंपनी प्रा. लि.

बारामती (पुणे) फोन नं. ४७६.

**आमच्या कारखान्यातील सिमेंट पाईप वापरुन पाण्याची बचत करुन भरघोस उत्पन्न काढा.**




मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

यानी अत्यंत कुशलतेने या संस्थेचा कारभार इतका उत्तम केला आहे की ही संस्था भारतातील स्थानिक संस्थांमध्ये आदर्श ठरण्य च्या योग्यतेची झाली आहे

### पाषाण

पुण्यापासून ४ मैलावर रम्य परिसरात हे गाव वसले आहे. या गावी नदीप्रवाहाच्या काठी सोमेश्वराचे देऊळ आहे शाहू महाराजाच्या मातोश्रीने हे मंदिर बांधले आहे इ. स. १७८० मध्ये शिमरामभाऊ चित्राव यानी सभामंडप बांधला आहे. येथे चक्रतीर्थही आहे.

### वाघोली

तुकारामाचे समकालीन रामेश्वरभट्ट वाघोलीकर यांचे हे मुळ गाव असून त्यांची येथे समाधी आहे. पहिल्या बाजीराव पेशव्याचे शूर सरदार पिलाजी जाधवराव यांचा येथे वाडा असून त्याचीही येथे समाधी आहे. या समाधी मंदिराजवळच महादेवाचे सुंदर देऊळ व तलाव आहे. पुण्यापासून नऊ मैलावर पुणे नगर रस्त्यावर हे गाव आहे.

### भोजपुरी

पुण्यापासून ८ मैलावर भोसरी पुणे नाशिक रस्त्यावर हे खेडे आहे येथे असणारी मोठमोठ्या शिलांनी बनलेली कुपणे, उचवटे व थडग्यासारखी दिसणारी ठिकाणे ही प्राचीन कोलू जातीच्या माणसाची स्मारके किंवा समाधीस्थाने असावीत असे म्हटले जाते. या खेड्याच्या आजूबाजूस मोठमोठ्या दगडांच्या ओळीने बनविलेले आवार मात्र गूढप्रद आहे.

### हिंगणे खुर्द

येथे महर्षी धोंडो केशव कर्वे यानी स्त्रियासाठी स्थापन केलेला आश्रम आहे. येथील विठ्ठलवाडीचे देऊळ शिवाजी महाराजांनी बांधलेले आहे. भाऊ मन्साराम नाईक, पुणे यांनी त्या मंदिराचा जिर्णोद्धार केला आहे.

### माळशिरस

येथील यादवकालीन मंदिर प्रेक्षणिय आहे. या महादेवाच्या मंदिरावरील शिल्पकाम उत्कृष्ट आहे. देवळीची लांबी ६० फूट असून ते अष्टवर्तुळाकार आहे. सासवडच्या ईशान्येस १५ मैलावर हे गाव आहे.

### तुळापूर

या गावाचे पूर्वीचे नाव 'नागर गाव' असे होते. भीमा व इंद्रायणी याच्या संगमावर हे गाव वसले आहे येथून जवळच असलेल्या वढू बुद्रूक येथेच औरंगजेबाने संभाजी राजेचा वध केला. येथे संभाजीराजेंचे स्मारकही आहे.

### उरळी कांचन

येथे जगातील प्रसिद्ध असे निसर्गोपचार केंद्र आहे श्री. मणीभाई देसाई हे येथील एक थोर गांधीवादी देशभक्त व समाजसेवक या केंद्राचा कारभार बघतात. पू. महात्मा गांधी येथे काही दिवस वास्तव्यास होते.


*With Best Compliments From*

Time Passes Quality Remains

**Tuljaram Chaturchand Shah (Wagholikar)**

BARAMATI
Dist Poona
Phone No 330.

PHALTAN
Dist Satara
Phone No. 219.

Quality Products We Sell Kirloskar, Philips, Swastik.

देशी विदेशी औषधे, मोटारचे सामान व टायर टयुब्ज, रेडिओ, टी. व्ही , ग्रामोफोन रेकॉर्डस व इले. सामान, स्पोर्टस्चे सामान मिळण्याचे एकमेव ठिकाण.

१) मेसर्स कोठारी ब्रदर्स. बारामती फोन ३६६ व २२९.
२) मे. कोठारी मेडिकल स्टोअर्स. १०६ रविवार, फलटण.
३) मे. कोठारी इलेक्ट्रॉनिक्स, ६४० नारायण, पुणे ३०.

रेडिओ, टी व्ही. टेपरेकॉर्डस् व विद्युत उपकरणांचे पुण्यातील एकमेव दुरुस्ती लॅब.

सर्व प्रकारच्या
फॅशनेबल तयार कपडे व होजिअरीसाठी

**मोता** मेनरोड बारामती
फोन ४०६.

हार्दीक शुभेच्छा

# मे. मोतीचंद फुलचंद शहा

मुंबईकर कापड दुकान

बारामती (पुणे)

फोन न ३६९ पो. बॉक्स न. ३७.

हार्दीक शुभेच्छा

# उडपी निर्मल भुवन

बारामती शहरात अत्यंत माफक दरात उत्कृष्ट भोजन व अुपहारासाठी अेकमेव ठिकाण.

नेहमी ताजे व स्वच्छ पदार्थ तयार मिळतात

प्रो गोपाळ नंदाप्पा शेट्टी

हार्दिक शुभेच्छा

# स्वस्तिक इंडस्ट्रिज

फ्यूअेल इंजेक्शन सर्व्हिस स्टेशन, बारामती.

आमचेकडे सर्व प्रकारचे ट्रॅक्टर व ट्रॅकचे वॉशपंप कॅलिब्रेशन व नोझल रिकंडिशनीगची कामे खात्रीलायक रितीने करून मिळतील

# श्री. छत्रपती टोबॅको स्टोअर्स

उत्तम तंबाखु आणि उत्तम चहा योग्य दरात मिळण्याचे ठिकाण.

शिकारी छाप जर्दा नेहमी वापरा.

बारामती

हार्दिक शुभेच्छा

# गुजरात टोबॅको स्टोअर्स

गुणवडी चौक, बारामती.

बिपिनचंद जर्दा

हार्दिक शुभेच्छा

# मे. आर बी. चौहाण इंजिनियर्स

बारामती

**SWASTIK LABORATORY AND INDUSTRIAL CHEMICALS PVT. LTD**

**Office**
217, Sadashiv Peth
Pune 411030
Phone – 441140

**Factory**
29, Hadapsar Industrial Estate
Pune 411013
Phone – 7175

[Telegram – LABCHEM]

Manufacturers of Laboratory & Industrial Chemicals.

Grams - INDBUREAU, Pune Phone - 440633

**HIRLEKAR PRECISION ENGINEERING PRIVATE LTD.**

Mfrs. of Fine Pitch Gear Mechanisms & Instrument Systems.
Regd. Office & Works - 18/19 Industrial Estate, Gultekadi Poona 9.
Bombay Liassion Office Western India House, Sir P Mehta Rd. Bombay 400001
Tel 251931 Telex 011 -2504.

# खेड तालुका

खेड तालुक्याच्या पूर्वेस शिरुर तालुका असून दक्षिणेस पुणे तालुका आहे. या तालुक्यात बटाटा हे मुख्य पीक असून हे पीक वर्षातून दोनदा घेतले जाते. भाजीपाल्याची व फळझाडांचीही लागवड या तालुक्यात केली जाते.

## खेड

खेड हे खेड तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. येथे इ. स. १८३० मध्ये चडिरामबुवांनी बांधलेले विष्णूचे मंदिर आहे. येथे तुकाईदेवी व सिद्धेश्वराचे मंदिरही आहे. चडिरामबुवांचा मठ येथे आहे. इ. स. १७०७ मध्ये येथेच छत्रपती शाहू व ताराबाई यांच्यातील लढाई झाली.

### श्री. मारूतीराव तुकाराम बारणे

श्री. बारणे यांनी सहकारी क्षेत्रात चांगलाच नावलौकीक मिळविला असून खेड येथील कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून १९७२ पासून आहेत १९७९ पासून सभापतीपदाची धुराही ते सांभाळीत आहेत. मार्केटस मधील सुधारणा व सुखसोयींकडे ते जास्तीत जास्त लक्ष देत असून त्यांना सार्वजनिक कार्याची आवड आहे.

### श्री. भगवान गेनूजी अरगडे

खेड तालुक्यातील काळूस या गावचे राहणारे असून खेडच्या कृषि उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती आहेत. मार्केटच्या सुधारणा सुखसोयी व व्यवस्था याकडे तळमळीने लक्ष देतात.

### श्री. अेस. बी. थिगळे

खेड येथील कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापन झाल्यापासून म्हणजे १९५० पासून या समितीचे सचिव म्हणून कामपाहात आहेत. समितीच्या प्रगतीत त्यांचा खूपच मोठा वाटा आहे.

## आळंदी

पुण्यापासून बारा मैलावर इंद्रायणी काठी असलेल्या या गावी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी समाधी घेतल्यामुळे अखिल महाराष्ट्र-वासीयांचे ते पवित्र स्थान आहे. कार्तिक वद्य एकादशीस येथे फार मोठी जत्रा भरते. लाखाच्यावर माणसे यावेळी येथे जमतात. ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदिरास तीन दरवाजे आहेत उत्तराभिमुख दरवाजाला महादरवाजा व शिंदे दरवाजा म्हणतात चंदुलाल दरवाजा व गायकवाड दरवाजा असे इतर दोन दरवाजे आहेत. श्री ज्ञानेश्वर-महाराजांच्या मातोश्री रुक्मिणीबाई ज्या पिंपळास प्रदक्षिणा घालीत तो सोनपिंपळाचा पार आहे- मंदिराच्या मुख्य सभामंडपाच्या डाव्या बाजूस असलेला मंडप नागपूरकर यांनी बांधला आहे. या मंडपाच्या डाव्या बाजूस एकनाथ महाराज जेथे उतरले होते तो एकनाथाचा पार आहे. मुख्य सभामंडपाच्या पुढे कासवमंडप आहे कासव मंडपाच्या उजव्या बाजूस अजानवृक्षाचा कट्टा आहे. मंदिराच्या प्रांग-णात लक्ष्मीनाथ बुवा, केसरीनाथ व भोजलिंगबुवा यांच्या समाध्या आहेत. समाधीच्या पाठीमागे प्रदक्षिणेच्या वाटेवर मुक्ताबाईचे देऊळ आहे समाधीच्या पाठीमागे विठ्ठल रखुमाईच्या मूर्ति आहेत समा-धीच्या पश्चिमेस सिद्धेश्वराचे मंदिर आहे त्यात शंकराची स्वयंभू पिंड आहे

आळंदी गावात विष्णूचे देऊळ, दत्ताचे देऊळ, रामाचे देऊळ, गोपाळकृष्णाचे देऊळ, विठ्ठल रखुमाईचे देऊळ अशी देवळे आहेत. गावाच्या ईशान्येस ज्ञानेश्वरांनी चांगदेव भेटीच्या वेळी चालविलेली भिंत आहे. पुणे-आळंदी रस्त्यावर ठाकूरदास मोहनलाल आगरवाल यांनी इ. स. १८२० मध्ये आळंदी गावाजवळ दगडीपूल बांधला आहे. लहान पादुकांच्या ठिकाणीच साखरेबुवाची समाधी आहे गावात मध्यभागी जेथे ज्ञानेश्वरमहाराजांच्या आजोबांचे घर होते तेथे तुळशी वृंदावन आहे. पुरंदरचे आंबकर देशपांडे यांनी इ. स. १५७० मध्ये समाधीचे देऊळ बांधले आहे. चक्रतीर्थाजवळ असलेले पुंडलिकाचे देऊळ चिंतामण विठ्ठल माळवतकर यांनी बांधले आहे. हरिहरेन्द्र स्वामींची समाधीही येथे आहे

## चाकण

चाकण येथील जुना भुईकोट किल्ला सध्या भग्नावस्थेत आहे. इ. स. १४४३ मध्ये बहामनी सरदार मलिक–उल्–तुजार याने हे गाव आपले मुख्य ठिकाण केले होते. चाकण हे प्राचीन काळापासून लष्करी ठाणे होते येथे असलेल्या किल्ल्यामुळे या ठिका-णचे महत्व वाढले होते. खेडच्या दक्षिणेस सात मैलावर चाकण आहे.

## चासकमान

खेडपासून ६ मैलावर भीमेच्या काठावर चास हे रमणीय गाव आहे पहिल्या बाजीरावाची मुलगी येथील कृष्णराव महादेव जोशी यांची पत्नी होती. कृष्णरावांच्या मृत्यूनंतर रखमाबाईने नदीस उत्कृष्ट घाट व सोमेश्वराचे देवालय बांधले ३५० दिव्याची सोय असलेली उत्कृष्ट दिपमाळ प्रेक्षणीय आहे. देवळाशेजारील तलावचा तट नक्षीकामाने समृद्ध आहे.

## सिंदे

येथून जवळ असलेल्या भामाचंद्र डोंगरात बौद्धकालीन लेणी आहेत. यापैकी भामाचंद्र महादेव हे मुख्य लेणे आहे.

## कडूस

येथील टेकडीजवळ भैरवाचे भव्य देऊळ व सिद्धेश्वराचेही देऊळ आहे

## निमगाव

भीमेकाठी असलेल्या या गावी गोविंदराव गायकवाडने बांधलेले खंडोबाचे देऊळ आहे

*With Best Compliments From .*

Phone 41172, 41423

Soumachine

## The Southern Machine Industries

(Prop Supanekar Bros.)

Manufacturers Of

**Keys, Cams, Cam-Shafts & Machinery**

Gultekadi Road, Poona - 9

---

With Best Compliments From :

## THE WHITE CLOUD PAPER MILLS

412, Gultekadi Road, Poona - 9.

Pioneer Manufacturers of Quality Filter Papers, Filter Pads & Filter Pulp in India

*IMITATED BY MANY*
*EQUALLED BY NONE*

Phone 441078 Gram : WHITECLOUD

---

*With best compliments from.*

Phone 56611

# PAVA Industries

Mechanical Engineers & Fabricators

Works & Office
**HAPPY COLONY**
Plot No. 728
Kotbrud, Poona - 411 029.

Residence
**1236, SUBHASH NAGAR,**
Shukrawar Peth,
Poona - 411 002

---

WITH BEST COMPLIMENTS FROM —

## M/s Shah Dipchand Dharamchand

Distributors.

Dalima Biscuits Rajapur, (Punjab) Ravalgaon
Bullock Cart Brand Mixtures Ravalgaon Sweets
**BARAMATI**

---

## RAJA INDUSTRIES

65, Navi Peth, Ganjawe Wadi, Pune 411 030

Plastic Moulding Machine
Plastic Bakelit Dies
Press Tools
Machine Parts
Reverside Single Furrow Plough
Manufacturers of Spare parts of imported Rotary Machines
Approved Suppliers of Defence Dept.



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पुणे

## बारामती तालुका

पुणे जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीवरात हा तालुका आहे. या तालुक्याच्या पूर्वेस इंदापूर, पश्चिमेस पुरंदर व उत्तरेस दौंड हे तालुके आहेत.

शिवलिलामृत रचियता कवि श्रीधर, कवि मोरोपंत याचा या कर्मभूमीने अनेक महत्वाच्या ऐतिहासिक घटनाही पाहिल्या आहेत इ. स. १८०२ मध्ये दुसऱ्या बाजीरावाचा बारामतीस तळ पडला तेव्हा यशवंतराव होळकर याचा सरदार फत्तेसिंग याने धुव्वा उडविला इ. स. १८०३ मध्ये जनरल वेलस्ली हा श्रीरंगपट्टमहून परत येताना बारामतीस आला होता. अशा रितीने साहित्यकारण व राजकारण या दोन्ही बाबतीत दोन तीन शतकापासून ही द्वादश मति नगरी प्रसिद्ध आहे सखोल इतिहास पाहू गेले असता बारामतीचा उल्लेख इ. स. ७०० पासून सापडतो कहेक्या जाणे येथील भूमी पुनित केली आहे यादवांचे राज्य येथे काही काळ होते त्यानंतर मुसलमान राजवट आली. शिवाजी महाराजाचे पिता शहाजीराजे हे युद्ध प्रसंगाने बारामतीस आले होते. पेशवेकालिन कित्येक प्रसिद्ध व्यक्तींनी बारामतीस भेटी दिल्या आहेत.

बारामती तालुक्यास पूर्वी भिमथडी असे नाव होते. बारामती नगर पालिकेची स्थापना इ. स. १८६५ मध्ये झाली.

बारामती गावाचे स्वाभाविकपणे दोन भाग पडतात. कऱ्हेनेच. हे भाग पाडले आहेत ही नदी येथे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते पूर्वीपासून हे गाव आठवडयाच्या बाजाराकरिता प्रसिद्ध आहे. उत्तर अक्षांश १८-१०' व पूर्व रेखांश ७४-३९' अशा भौगोलिक मर्यादेत हे गाव आहे पुण्याहून सरळ आग्नेय दिशेस सुमारे ५० मैलावर बारामती आहे, येथील जमीन काळी व त्याखाली मुरमाड असून बागायतीस अनुकूल आहे. संपूर्ण भारतात बागायतीचे गाव म्हणून बारामती प्रसिद्ध आहे, इ. स. १८८६ मध्ये नीरा कॅनॉल काढल्या पासून तर बारामतीचे नशीब उदयास आले आहे. येथून जवळच सुमारे २० मैलावर शंभूमहादेवाचा डोंगर आहे. येथे पाऊस कमी व उन्हाळा जास्त आहे. सरासरी २० इंच पाऊस पडतो. कमाल उष्ण-तामान ११२ डिग्री पर्यंत तर किमान थंडी ४० डिग्री पर्यंत असते.

बारामतीस पहिली शाळा इंग्रज अमदानीत १८४६ साली सुरु झाली. आता बारामतीत सुमारे ८ प्राथमिक शाळा, ३ माध्यमिक शाळा व एक महाविद्यालय आहे. बारामती हे रेल्वे स्टेशन असून येथे कृषि उत्पन्न बाजार समितीही आहे. या मार्केट यार्डात गुरांचा बाजारही भरतो, पेशव्याचे सावकार बाबुजी नाईक यांचा प्रेक्षणिय असा वाडाही बारामतीस आहे. कसबा भागात रमणीय असे शिवाजी उद्यान आहे. अनाथ व बाल गुन्हेगार यांच्यासाठी रिमांड होम आहे. गावात बालाजीचे मंदिर, राम, मारुती, विठोबा व देवी अशी अनेक मंदिरे असून जैन मंदिरही आहे येथील श्री काशीविश्वेश्वराच्या मंदिरात बसूनच श्रीधर कवींनी श्रीशिवलिलामृत ग्रंथ लिहीला असे सांगतात.

गुळ व कापसासाठी प्रसिद्ध असलेल्या बारामतीस वीज, पाणी हॉस्पीटल, वाचनालय इ. सर्व सोयी आहेत.

### कवि श्रीधर

ज्या ग्रंथाच्या पठनाने अथवा वाचनाने माणूस संसारातील सार्‍ी दुःखें विसरतो अथवा येणाऱ्या संकटावर मात करण्यासाठी अंगी बळ व धैर्य यावे म्हणून जो ग्रंथ मनुष्य वाचतो तोच शिवलिलामृत ग्रंथ कऱ्हेच्या काठी बसून कवि श्रीधरांनी निर्मिला. श्रीधरानी आणखी हरिविजय, रामविजय वेदान्तसूर्य, पांडवप्रताप हे ही ग्रंथ लिहीले आहेत. श्री पंढरीमाहात्म्य व मल्हारी विजय ही काव्ये व जैमिनी अश्वमेध, ध्रुव चरित्र हया रचनाही त्यानीच रचल्या आहेत.

### कवि मोरोपंत

कवि मोरोपंतानी बारामतीचे नाव अजरामर केले आहे. मोरोपंत हे विशाल बुद्धीचे, सकल शास्त्र पारंगत असे विद्वान होते. कुशलव आख्यान, सीतागीत, रुक्मिणीगीत, अंबरीश चरित्र, मदालसा आख्यान, मंत्र भागवत, हरिवंश अशी त्याची विपुल व विविध रचना आहे. याशिवाय विश्वेशस्तुती, काशीस्तुती, गंगाप्रार्थना आदी काव्योत्पत्तीही त्यांनीच केली आहे.

### बाबूजी नाईक

छत्रपती शाहू महाराजानी दक्षिणेत येताना सदाशिव नाईक याना बरोबर आणले. त्यांचेच सुपुत्र बाबूजी नाईक. शाहू महाराजानी त्याना बारामती महालाची जहागिरी दिली. बाबूजी नाईक हे पराक्रमी व गुणग्राहक होते तोतया प्रकरणी (सदाशिवरावभाऊ) बाबूजी नाईक हे २१ पचापैकी एक पंच होते. यानी दुसऱ्या बाजीरावास ३५ हजाराचे कर्ज दिले होते. बाबूजी नाईकानी आपल्या वाड्याजवळ श्रीसिद्धेश्वराचे मंदिर बांधले आहे

### कृष्णराव काळे

बाबूजी नाईक यांच्या वाड्याच्या पूर्वेस यांचा वाडा आहे. हे हैद्राबाद निजामाच्या दरबारी पेशव्याचे वकील होते. राघोबादादा व थोरले माधवराव यांच्यात बेबनाव झाला त्यावेळी यांनी आनंद-वल्लीस जाऊन समझोता करण्याचा प्रयत्न केला होता.

### रघुनाथपंत कोशे

बाबूजी नाईकांचे समकालीन. हे पेशव्याच्या सेवेत होते हे स्वत: काव्यही रचीत.

### श्री. शरद पवार

एका थोर सहकारी कार्यकर्त्याच्या पोटी जन्म घेतलेला हा तरुण तडफदार नेता. यानी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविले होते.

### कै. श्री. गणेश गोपाळ शेंबेकर

श्री. शेंबेकर हे नामवंत व भारतीय किर्तीचे कृषितज्ञ होते. डेव्हलपमेंट अॅग्रीकल्चरल असोसिएशनचे ते पहिले चिटणीस होते.

शास्त्रीय संशोधन, शिक्षण व औद्योगिक गरजांसाठी खास उपकरणाची निर्मिती करणारा भारतातील अग्रगण्य कारखाना

: आमची वैशिष्ठ्यपूर्ण उत्पादने :

रोटरी शेकर ▷ लॅबरोटरी फर्मेन्टर ▷ रेसिप्रोकेटींग शेकर ▷ पायलट प्लॅन्ट फर्मेन्टर
इन्क्यूबेटर रोटरी शेकर ▷ पेरीस्टॅल्टीक पंप ▷ अॅटोमॅटीक फॅक्शन कलेक्टर अॅण्ड टायमर
बायो फ्लो पंप ▷ रोलर ड्रम अॅपरेटस्.

**अधिक माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा**

## एमेन्व्ही सायंटिफिक इन्स्ट्रूमेन्टस् प्रा. लि.

तार : '**एमेन्व्ही**' एमेन्व्ही हाऊस, १४ गुलटेकडी इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे ४११ ००९ फोन : ४४१३२३ । २४

---

फोन : ४२८०८

# शारदा मेटल वर्क्स

४९ इंडस्ट्रीयल को-ऑप. इस्टेट, गुलटेकडी, पुणे ९.

**-: वैशिष्ठ्ये :-**

## पितळेची लहानमोठी पिंपे

प्रो. – श्री. के. एस. कामत

---

# नवलखा ट्रान्सलाइन्स प्रा. लि.

३८, शंकरशेठ रोड, पुणे ४११ ००९.

फोन — ४४०५४३ ♡ ४४२८४३

अवजड वजनाची मशिनरी वगैरेची खात्रीलायक वाहतूक करणे
हे काम निश्चितपणे आमचेकडे सोपवू शकता

मुंबई ऑफीस— **नवलखा ट्रान्सपोर्ट**, काझी सैय्यद स्ट्रीट. फोन ३२८८३२

---

# The Poona Motor Goods Transport

*Head Office.*
780, Sadashiv Peth, Pune 30
Phone · 443222

*Branch*
130, B Sadashiv Cross Lane,
Girgaon, Bombay-4. Ph 352538

Daily Parcel Service for Poona to Bombay & Bombay to Poona
Transport Contractor & Fleet Owners
Special Trucks available for Gujarat State.

Prop. – **P. V. Vora**



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पुणे

तीव्र ग्रहण शक्तीचे व दूरदृष्टी असलेले बागाईतदार म्हणून त्यांचा लौकीक होता. सार्वजनिक कार्यात लक्ष घालून त्यांनी बारामतीत खूप सुधारणा घडवून आणल्या.

## कै. सोपानराव तुकाराम जाचक

बारामती नगरपालिकेचे माजी अध्यक्ष व एक अग्रेसर कृषि कार्यकर्ते होते. बारामतीस त्यानी एक खाजगी शाळा काढली व अनेक शिक्षण संस्थाना द्रव्य सहाय्य केले. साधेपणा, निगर्वीपणा व गुण ग्राहकाता यामुळे ते सर्वांना आदरणीय झाले.

## कै. स वा. करंदिकर

बारामती नगरपालिकेचे प्रसिद्ध माजी अध्यक्ष. यानी अनेक सस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला. सहकारी चळवळीचा प्रसार केला. बारामतीत अनेक सुधारणा केल्या.

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती.

२३ जून १९६२ रोजी या महाविद्यालयाचे उद्घाटन झाले. महाविद्यालयात कला, विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखेचे अभ्यास-क्रम शिकविले जात असल्यामुळे परिसरातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची चांगली सोय झाली आहे. येथे देशी व विदेशी खेळांची सोय असून आंतरमहाविद्यालयीन सामन्यात येथील विद्यार्थी चमकतात. ग्रथालय, प्रयोगशाळा व विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी योजना येथे चालू असून वसतीगृहही आहे.

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल, बारामती:

ही बारामतीतील एक अग्रगण्य व ज्येष्ठ शैक्षणिक सस्था आहे. शाळेचा मॅट्रिकचा निकाल नेहमी चागला लागत असून सैनिकी अध्ययन, चित्रकला व टक लेखन हेहीं विषय येथे शिकविण्याची सोय आहे. या शाळेत हवामान खात्याच्या अर्धवेळ ऑब्झर्वेटरीचे कार्यही चालते शाळेत ग्रथालय व प्रयोगशाळाही आहे या शाळेत सुमारे २००० विद्यार्थी शिक्षण घेत असून शाळा प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे

## श्री छत्रपती शाहू हायस्कूल

रयत शिक्षण सस्थेतर्फे इ स. १९५४ पासून हे हायस्कूल चालविले जात आहे या शाळेत शेती विभाग व तांत्रिक विभागही आहे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी शाळा सतत प्रयत्नशील असते.

याशिवाय बारामतीत श्री शाहू बोर्डिंग, मिशन हायस्कूल, महात्मा गाधी बालक मदिर, कृषि उत्पन्न बाजार समिती, लायन्स क्लब, बारामती मर्चंटस् असोसिएशन यासारख्या अनेक सस्था आहेत


स्थापना - २१ जुलै १९५९ फोन न. ४४२५०६

**श्री भवानी मेटल वर्क्स**

**औद्योगिक सहकारी सोसायटी लि. पुणे ९**

औद्योगिक सहकारी वसाहत, वीर सावरकर नगर पुणे ४११००९.

औद्योगिक सहकारी क्षेत्रातील पितळी पिंप, कुकर याचे प्रगतीशील उत्पादन करणारी कामगार सभासदानी यशस्वीरित्या चालविलेली एकमेव अग्रगण्य सहकारी सस्था

" कामगारांनी चालविलेली एकमेव (कारखाना) संस्था "

मालकी — संस्था
बँकर्स — बँक ऑफ महाराष्ट्र
कॅपिटल — ४११ ०९०
वार्षिक उलाढाल — १५७२५०२
कामगार — २१
उत्पादन — पितळीपिंप कुकर इतर

श्री. प्र. मा. लंगोटे
सचिव

श्री. शा. शि. घोडनदीकर
अध्यक्ष

हार्दिक शुभेच्छा

**ट्रक, कार व ऑटोरिक्षाचे शास्त्रोक्त ड्रायव्हींग शिकविणारी ५८ वर्षांची जुनी संस्था**

# आपटे मोटार स्कूल

अलका टॉकीज समोर, पुणे ३०.

टेलीफोन ४४३६१०

Gram- DECAL Phone- 440060

DECAL INDUSTRY

50, Poona Satara Road Poona 411 009

Manufacturer of

Aluminium Anodised, Etched Name Plates, Meter Dials, Pannel Plates, PVC Stickers and Water Transfer Lables

S. B Walvekar Dilip S. Walvekar

Deepak S. Walvekar Pradip S Walvekar

Phone : 42726

With best compliments from :

Surana Metal Mart

Aluminium Brass & Coper Utensils

629/633, Raviwar Peth, Pune 411 002.

'भारत वैभव' पुणे जिल्हा मार्गदर्शक विशेषांकास

हार्दिक शुभेच्छा

सौ. पद्मावती शेंबेकर

प्रभात रोड, गल्ली न. ९

पुणे ४.

हार्दिक शुभेच्छा

फोन : २३८३७ टेलिग्राम कुंदन साडी

२६६२५

मेसर्स नरसय्या सायन्ना कुंदेन

हातमाग साड्यांचे प्रमुख उत्पादक

'कुंदन निवास' ११५० भवानी पेठ,

पुणे ४११ ००२.

With Best Compliments From :

V. S. INDUSTRIES

39/47, Prabhat Road, Lane No 9

Poona 411 004.

Prop. Shri SADANAND SATPUTE

जनता मेटल इंडस्ट्रीज

पुणे - सातार रोड

अ‍ॅल्यु. कास्टींग कढई – ७ आकारात – रु. १० ते २५

अ‍ॅल्यु. तवा – ३ आकारात – रु. ८ ते १४

अ‍ॅल्यु. लेमन क्रशर, पोळपाट लाटणे

बेबी कुकर १ नग ६॥ रु.

बेबी गॅस १ नग ४ रु.

बाजारपेठ - गुजराथ, पुणे, मुंबई, बेंगलोर

टे. न. ४४५५७७

महाराष्ट्रात ४३ वर्षे

पेढे बर्फीसाठी प्रसिद्ध असलेले

एम्. आर. घोडके

आणि कंपनी, पुणे (पेढेवाले)

लक्ष्मीरोड, गणपती चौक, पुणे

With Best Wishes from -

Machinocraft

WORKS

15/2, Dhankawadi, Poona-Satara Road

Poona 411 009.

Phones

Works 42623 Resi 42675



मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## शैलजा गार्डन

डॉ भास्कर सिधये व सौ पद्मा सिधये यांनी बारामती पासून ६॥ मैलावर ऊसाची व द्राक्षाची लागवड केली आहे. त्याना १९६७–६८ साली ऊस स्पर्धेत सुवर्ण पदक व पारितोषिक व ७१-७२ साली द्राक्ष लागवडीबद्दल पारितोषिक मिळाले आहे हा अगदी जागतिक उच्चांकच म्हटला पाहिजे. सौ. सिधये या सार्वजनिक कामातही आवडीने भाग घेतात.

## कृषि विकास प्रतिष्ठान, बारामती

दुष्काळी परिस्थितीत बारामती परिसरातील लोकांचे हाल बघून काही ध्येयवादी तरुण एकत्र आले व या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमचा उपाय शोधू लागले त्यांच्या विचारमंथनातून पाझर–तलावांच्या कल्पनेचा उगम झाला. १९६७ साली तादूळवाडीचा पाझर तलाव उभारण्याचे ठरले. काही परकीय व काही स्थानिक संस्थानी आर्थिक मदत दिली. इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीही मदत केली. तलावाच्या कामावर आठ तास काम करणाऱ्या पुरुषाला ३ पौंड गहू, व स्त्रीला २ पौंड गहू मजूरी म्हणून देण्यात येत असे. १९६८ च्या जानेवारीत हे काम पूर्ण झाले. पावसाळ्यात पाणी वाहू लागले. तलाव भरला. विहिरीही भरल्या. त्यानंतर १९६७ ते ७७ या दहा वर्षात सुमारे १३० पाझर तलाव बांधून पूर्ण झाले सुमारे २५०० विहिरीचे पाणी वाढले. मोफत मदत घेण्यापेक्षा मजुरीच्या रुपाने घेऊन परिसराच्या विकासाचे, दुष्काळी परिस्थितीतून मार्ग काढण्याचे, असेल त्या पाण्याचे साठवण करून योग्य वापर करण्याचे काम उभे राहू शकले. हजारो लोकांना रोजगार मिळाला या कार्याला संस्थेचे स्वरूप देण्यासाठी 'बारामती कृषि विकास प्रतिष्ठान' या संस्थेची १९७१ साली स्थापना झाली. शेतीविकास, पिकाच्या नवीन जातीचा, पीकपद्धती सुधारण्याच्या मार्गांचा प्रसार, संकरीत गायीचा प्रचार व प्रसार करणे, जमीन-सुधारणा, पाण्याच्या योजना राबविणे, परिसरातील लोकांना शिक्षण, आरोग्य इ. सुविधा उपलब्ध करून देणे, इत्यादि उद्दीष्ठे समोर ठेवून स्थापन झालेली ही संस्था सर्व उद्दीष्ठाची पूर्ती करीत आहे. 'प्रतिष्ठान' ने दोन ट्रॅक्टर्स युनिट्स्, नांगर, ट्रॉलीज्, स्पेअरिंग उपकरणे इ. या विभागात ठेवली असून ही सेवा ना नफा ना तोटा या तत्वावर देण्यात येते. शेतीसंबधी परिसंवाद, संमेलने तसेच पीकस्पर्धा आयोजित केल्या जातात. 'प्रतिष्ठान' चा डेअरी विभाग व विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहही आहे. श्री. शरदचन्द्र पवार हे या संस्थेचे अध्यक्ष असून श्री. भिमदेवराव गोफणे, मिस हेजेल स्क्युस व श्री. शिवाजीराव भोसले हे तिथे सेक्रेटरी आहेत

## श्री. बाबूराव शिरसाठ

एक जिद्दीचे कारखानदार म्हणून बारामतीकर बाबूरावांना ओळखतात. बाबूरावांचा जन्म राहूरी येथे झाला. अत्यंत हलाकीच्या परिस्थितीत बालपण सरले आणि कोवळ्या तारुण्यातच कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. हलकी फुलकी कामे करीत ट्रॅक्टर दुरुस्तीत तज्ज्ञ झाले. 'व्होल्टाज्' मध्ये नोकरीस लागले. परंतु कारखानदार होण्याच्या जिद्दीमुळे ती नोकरी सोडली कारखान्यातही सुरवातीस अपयशाचा जबरदस्त तडाखा बसला. परंतु मागील अनुभवातून शहाणपण शिकून त्यांनी नव्या उत्साहाने कारखाना पुन्हा उभारला आज शिरसाठ इंडस्ट्रिज या आकर्षक, सुबक, मजबूत व उच्च दर्जाचे ट्रेलर बनविणाऱ्या कारखान्याने उत्पादनाबाबत शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. बाबूरावांच्या कर्तृत्वाचेच ते प्रतिक आहे.

## फॅब्रोक्राफ्टस्

श्री. अरुण वासुदेव बोरकर यांनी मे १९७१ मध्ये या कंपनीची स्थापना केली. शुगर मशिनरी इक्विपमेंटस् व सिमेंट मशिनरी इक्विपमेंटसचे फेब्रिकेशन येथे केले जाते.

## मोरगाव

कऱ्हेच्या काठी असलेल्या या गावी गणपतीचे सुंदर देऊळ आहे मोरया गोसावी यांचे हे आराध्य दैवत होते. मंदिराजवळील धर्मशाळेची इमारत फारच नक्षीदार व सुबक आहे. भाद्रपद वद्य चतुर्थीस येथे यात्रा भरते.

## सुपे

या गावी हेमाडपंती बांधणीचे महादेवाचे मंदिर होते परंतु तेथे औरंगजेबाने मशीद बांधली आहे.

# तालुका इंदापूर

पुणे जिल्ह्यातील अतिपूर्वेकडील सरहद्दीवरचा हा तालुका. पुण्यापासून सुमारे ८४ मैल दूर तिन्ही बाजूंनी सोलापूर जिल्ह्याची सरहद्द असलेल्या या तालुक्याची उत्तर आणि पूर्व सरहद्द भीमा नदी व दक्षिण सरहद्द निरा नदीने मर्यादित केली आहे पश्चिमेस बारामती व दौंड तालुक्याच्या सरहद्दी येऊन भिडतात. भीमा व निरा या दोन्ही नद्यांचा संगम याच तालुक्यातील नरसिंहपूर गावी झालेला आहे. संगमावर श्री नृसिंहाचे पवित्र स्थान आहे.

इंदापूर हे या तालुक्याचे मुख्य गाव. महाराष्ट्रात लोककल्याणासाठी स्वराज्य निर्माण करणारे राष्ट्रपुरुष श्री छत्रपती शिवाजी राजे यांचे आजोबा श्री मालोजीराजे भोसले यांचे हे जहागिरीचे गाव. येथेच त्यांचा घोड्यावरून पडून अंत झाला असे इतिहास सांगतो. त्यांची समाधी आजही तहसील कचेरीच्या आवारात पहावयास मिळते. या तालुक्याच्या गावी बारामती, पुणे, सोलापूर व अकलूज अशा प्रमुख गावाहून चार दिशांनी हमरस्ते येऊन मिळतात. संपूर्ण तालुका या रस्त्यांनी तालुका गावाशी जोडला गेला आहे. त्यामुळे सरकारी कामे व विकासाची कामे करून घेण्यास सामान्य जनतेला सुलभ झाले आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक गावापासून या चारही रस्त्याना जोडणारे रस्त्यांचे जाळे विणले गेले आहे. तालुक्यातील ९० टक्के गावे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे बसने जोडली गेली आहेत.

लोणीची भवानीमाता, ओझऱ्याची ओझराई, भाडगावचा म्हसोबा, शेळगावची मुक्ताबाई, कळसचा हरणेश्वर, लासुर्णेचा निळकंठेश्वर, पळसदेवचा पळसनाथ, भिगवणचा भैरवनाथ, निमगावचा केतकेश्वर व नरसिंगपूरचा नृसिंह या देवदेवतांची छाया व आशिर्वाद या तालुक्याला लाभले आहेत. इंदापूरचा चाँदखान बाबाचा दरगा हे हिंदू व मुस्लीम बांधवाचे श्रद्धास्थान झाले आहे. निमगावच्या केतकेश्वराची मोठी यात्रा दरवर्षी चैत्र शु ११ ला भरते त्यावेळी कुस्त्यांची दंगल होते महाराष्ट्र केसरी, हिंद केसरी, तसेच अनेक प्रसिद्ध कुस्तीगीर या कुस्त्यात सहभागी होत असतात.

इंदापूर तालुक्यात एकूण ८४ गावे आहेत तालुक्याची लोकसंख्या १,९४,२०४ आहे. साक्षरतेचे प्रमाण ६० ते ७० टक्के आहे. ग्रामपंचायतीची संख्या ८० आहे १९६२ साली स्थापन झालेली ग्रामपंचायत तालुक्याची सर्वांगीण प्रगती व्हावी म्हणून प्रयत्नशील आहे.

इंदापूर गावापासून १० किलोमीटर अंतरावर आधुनिक तीर्थस्थान उभे राहात आहे. तेच उजनी धरण होय पुणे व सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर हे धरण आकार घेत आहे. ज्वारीचे कोठार म्हणून ओळखला जाणारा सोलापूर जिल्हा 'सुजलाम सुफलाम' करण्यासाठी इंदापूर तालुक्यातील २१ गावांनी त्याग केला आहे.

या तालुक्यातील जमीन पावसाच्या पाण्यासाठी सतत आसुसलेली आहे बराचसा भाग दुष्काळग्रस्त असतो. पावसाचे मान कमी तरीपण निरा डाव्या कालव्याने तणसर ते बावडा भाग समृद्ध झाला आहे, या भागातील शेतकरी कपाशी, भुईमुग, ऊस बाजारकी पैशाची व लकरीत ज्वारी, गहू, मका ही अन्नधान्ये बाराही महिने चांगल्या प्रकारे काढीत असल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती आता सुधारू लागली आहे. त्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावले आहे उद्योगधंद्यांनी व माणसांनी हा भाग गजबजलेला दिसतो. याच भागात वालचंदनगर व भवानीनगर हे दोन साखर कारखाने उभे राहीले आहेत. ही इंदापूर तालुक्यातील तीर्थस्थानेच होत.

निमगाव, व्याहळी भागात कळीदार नागवेलीच्या पानाचे खुप मळे पहावयास मिळतात. या पानाची अवीट चव पुणे–मुंबईपर्यंत लोक मोठ्या चवीने चाखताना आढळून येतात. खुप खोल विहीरीतून पाणी उपसून या दुष्काळी भागातील शेतकरी मोठ्या कष्टाने हे मळे फुलवित असतो व थोड्याश्या बागाईत जमिनीत चांगले उत्पन्न काढतो. सध्या चालू असलेले वरसगाव धरण पूर्ण झाल्यावर या तालुक्यातील उपेक्षित भागास फायदा मिळून बरेच क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुणे–शहरापासून दूर असलेल्या या तालुक्याने आपला जिल्हा महाराष्ट्रात शिक्षण–क्षेत्रात अग्रेसर रहावा म्हणून आपला वाटा उचलण्यास कमी केलेले नाही. 'वस्ती तेथे शाळा' या सुत्राप्रमाणे गावे ८४ पण प्राथमिक शाळांची संख्या २३७ झाली आहे. माध्यमिक शाळा १८ तर उच्च माध्यमिक शाळा दोन, व एक महाविद्यालय आहे.



*With best compliments from*

**ALURKAR MUSIC HOUSE**

SWAPNA NAGARI, Karve Road Pune 411 004
Tel 58652, 50394

Gramophone Records · Televisions
Transistors Radio · Cassette Tapes
Electronic Equipments · Stereo Systems

हार्दीक शुभेच्छा



**श्री. रामभाऊ कुलकर्णी**

१०२०, शुक्रवार पेठ, टिळक रोड,
पुणे २.

**Shrikant Engineering Corporation**

41, Gultekadi Industrial Estate, Poona 411 009

**STEEL FABRICATORS & STRUCTURAL ENGINEERS**

Phone Office 445371
Resi 440987

'भारत वैभव' पुणे जिल्हा मार्गदर्शक विशेषांकास
हार्दिक शुभेच्छा

**देवी रमाबाई औद्योगिक सहकारी महिला सोसायटी**

मु पो थेऊर, जि. पुणे




मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

तालुक्यात शिक्षण-संस्था, रस्ते-आरोग्य-केंद्राच्या इमारती, प्राथमिक शाळागृहे, पाझर तलाव, समाज मंदिरे, सहकारी संस्था, उपसा जल सिंचन योजना, दुध पाश्चराईज्ड केंद्र, तालुका खरेदी विक्री संघ कृषि उत्पन्न बाजार समिती, शेतकरी निवास, गावो-गावच्या पाणी पुरवठा योजना इ. अनेक विकासाची कामे झालेली दिसतात.

## इंदापूर

'इंदापूर' हे या तालुक्याचे मुख्य गाव आहे. विजापूरच्या आदिलशाहीचा पहिला सुलतान युसुफ आदिलशहा याच्या ताब्यात इ. स १४९० मध्ये हा गाव होता असे इतिहासात नमूद केले गेले आहे. इ. स. १६४० मध्ये हा भाग शहाजींनी घेतला.

## नरसिंगपूर

भीमा व नीरा यांच्या संगमावर इंदापूरपासून १२ मैलावर हे गाव आहे. निसर्गाने या गावाला उदारहस्ते निसर्ग-लेणे लेवविले आहे. या क्षेत्रस्थानाच्या उत्तरेकडून एखाद्या अनुभव संपन्न गृहिणीसारखी धीरगंभीर भीमा नदी तर दक्षिणेकडून अल्लड बालिकेसारखी चंचलतेने धावणारी निरा नदी वाहते. या पवित्र संगमाजवळच प्राचीन, भव्य आणि अत्यंत सुबक बांधणीचे नृसिंह मंदिर आहे. पूर्वजांच्या कलाप्रियतेची व निसर्गप्रेमाची साक्ष हे मंदिर पटविते. श्री नृसिंहाची वालुकामय मूर्ती वीरासनस्थ आहे श्री नृसिंहाच्या डाव्या बाजूस सुहास्यवदना लक्ष्मीची मूर्ती आहे. या निराभिमेच्या साक्षीनेच श्री नारदमुनींनी प्रल्हादाला मंत्रोपदेश दिला याच ठिकाणी आपले तपाचरण पूर्ण करून प्रल्हादाने ज्ञान मिळविले सरदार विंचूरकर यांनी हे मंदिर बांधले. २० वर्षे हे बांधकाम चालले होते व त्यास ४॥ लाख रु खर्च आला.

## निरवांगणी

इंदापूरपासून १२ मैलावर हे ठिकाण आहे. या महादेवाच्या देवळातील नदी भव्य व प्रेक्षणिय आहे.

## पळसदेव

इंदापूरच्या वायव्येस १५ मैलावर 'पळसदेव' येथे महादेवाचे मंदिर आहे

## वालचंदनगर

उद्योगमहर्षि कै. शेठ वालचंद हिराचंद यांनी 'वालचंदनगर इंडस्ट्रिज लि' या साखर कारखान्याची स्थापना करुन वालचंदनगरची नमुनेदार वसाहत वसविली आहे. येथे कामगारहिताची दक्षता-पूर्वक जपणूक केली जाते. साखरेशिवाय येथे रेक्टिफाईड स्पिरीट, डिनेचर्ड स्पिरीट, शेंगदाण्याचे शुद्ध केलेले तेल, हायड्रोजनेटेड ऑईल व साबण या वस्तू तयार होतात. साखर कारखान्यास लाग-णारी संपूर्ण मशिनरी तयार करण्याचा कारखाना येथे आहे.

## श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, सोमेश्वरनगर

श्री. मुगुटराव साहेबराव काकडे यांच्या प्रयत्नांनी इ. स १९६० मध्ये या कारखान्याची स्थापना झाली आहे. कारखान्यात कामगार पतपेढी असून कामगारासाठी दवाखान्याचीही सोय करण्यात आलेली आहे ग्रामीण भागातील मुलींसाठी इंदिरा गांधी तांत्रिक विद्यानिकेतन काढले असून तेथे टंकलेखन, शिवणकाम, भरतकाम इ चे शिक्षण देण्यात येते. तसेच कारखान्याने 'सोमेश्वर शिक्षण मंडळाची' स्थापना करून 'मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय' ही चालविले आहे. महाविद्यालयात विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवणाचीही सोय होऊ शकते.

## श्री. मुगुटराव साहेबराव काकडे

श्री. मुगुटराव काकडे यांनी तरुणपणीच सहकारी क्षेत्रात हिरीरीने कार्यास सुरवात केली निरा भागातील अनेक सोसायट्या श्री. मुगुटराव काकडे यांच्या श्रमामुळे व सहकार्यामुळे कार्यक्षम झाल्या बारामती तालुक्यातील सहकारी चळवळीच्या कार्यात यश आल्यानंतर त्यांनी जिल्हा पातळीवरील कार्यात लक्ष घातले. जिल्हा सहकारी ख. वि. संघाचे चेअरमन, पुणे सेंट्रल को-ऑप बँकेचे डायरेक्टर, जिल्हा सहकारी बोर्डाचे डायरेक्टर इत्यादी पदे त्यांनी भूषविली आहेत.


# कृषि उत्पन्न बाजार समिती, इंदापूर, जि. पुणे

मुख्य मार्केट यार्ड - इंदापूर सब मार्केट यार्ड - भिगवण, निमगांव केतकी

मार्केट क्षेत्र - इंदापूर तालुका

शेतकरी बंधुनो,

मार्केटमध्ये उघड लिलावाने मालाची विक्री होते लायसेन्सधारक तोलाराकरवी मालाचे चोख वजन होते. बाजार खर्चाची वाजवी आकारणी होते विक्री झालेल्या मालाचे पैसे ताबडतोब मिळतात म्हणून आपला माल विक्रीसाठी मार्केटयार्ड व सब मार्केटयार्डवरच आणा जसा माल तसे मोल म्हणून माल स्वच्छ करून वाळवून विक्रीस आणा व हालका आणि भारी माल वेगवेगळा आणा.

डी. डी देवकर
सचिव

भि ब. सावंत
उपसभापती

हि. त. शाह
सभापती

## मुळशी तालुका

पुणे शहराच्या पश्चिमेस सह्याद्रीच्या कुशीत हा लहानसा तालुका वसलेला आहे या तालुक्याच्या १०३९ चौ. कि मी क्षेत्रफळाच्या परिसरात १३२ गावे वसलेली आहेत.

स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासातील एक महत्वाची घटना येथेच घडली आहे ती घटना म्हणजे मुळशी सत्याग्रह. या सत्याग्रहामुळेच मुळशी हे नाव भारतभर परिचीत झाले. हा सत्याग्रह सेनापती बापट यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९२० ते १९२४ पर्यंत चालू होता. मा. बापट यांना 'सेनापती' ही अजरामर पदवी येथेच मिळाली. अखेरीस या धरणाचे बांधकाम टाटा कंपनीने १९२० साली सुरु केले व पुढील आठ वर्षात पूर्ण केले. येथे झालेल्या सत्याग्रहात पुण्याचे श्री. पिस्कुटे व मुळशीचे श्री. देवरावकाका ढमाले यांच्यासह ६०० लोकांनी भाग घेतला होता. या धरणामुळे पाण्याच्या प्रवाहाची दिशा बदलून वीज निर्मितीसाठी पाण्याचा उपयोग करुन घेतला गेला आहे.

या तालुक्यात ४ इंचापासून २०० इंचापर्यंत पाऊस पडतो त्यामुळे मुख्य पिक भात हेच आहे तालुक्यातून मुळा, मुठा, वळकी व मोसे या नद्या वाहतात. यापैकी मुळा नदीवरच मुळशी धरण असून मोसे नदीवर 'वरसगाव' धरणाचे बांधकाम चालू आहे पावसाळयात भरपूर पाऊस पडूनही उन्हाळयात पिण्याच्या पाण्याचीही टंचाई या तालुक्यात भासते. तालुक्याचे मुख्य ठिकाण पौड हे आहे.

तालुक्यात एकुण १०३६८७ हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी फक्त ६७००० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. पिकाखाली घेता न येणाऱ्या क्षेत्रात फळझाडे लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न चालू असून हापूस, पायरी आंबा, काजू, फणस इ फळझाडांची लागवड करण्यात येत आहे. तालुक्यातील बागायत क्षेत्रात वाढ करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे. तालुक्यात शेतीस पुरक असा दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असून दररोज सुमारे २५ हजार लिटर दुधाचे उत्पादन होत असते. बाकी कोणताच पुरक व्यवसाय या तालुक्यात नाही.

या तालुक्यात एक प्राथमिक आरोग्य केंद्र असून ३ उपकेंद्रे आहेत. पाच कुटुंब कल्याण उपकेंद्रे आहेत. आयुर्वेदिक दवाखाने २ आहेत. या तालुक्यात उद्योगधंद्याच्या दृष्टीने फारशी प्रगती झालेली नसून तालुक्यात एक पेपर मील आहे. या तालुक्यात १३७ प्राथमिक शाळा आहेत.

हा तालुका डोंगराळ असल्याने दळणवळणाचे दृष्टीने फारच गैरसोयीचा आहे. तालुक्यात बऱ्याच गावात वीजपुरवठा करण्यात आला आहे.

अशा या डोंगराळ व मागासलेल्या तालुक्यात एकुण ८६ ग्रामपंचायती कार्यरत असून तालुक्यात विकासाच्या अनेक योजना राबवित आहेत


हार्दिक शुभेच्छा !!!

आकाहारी जेवणाची व राहण्याची उत्तम सोय

**हॉटेल अन्नपूर्णा**

लोणावळा, जिल्हा पुणे

०×० स्वच्छता ०×० टापटीप ०×० उत्तम विश्रांतीस्थान

लोणावळयाची प्रसिद्ध !!! प्रो. मोहनलाल आगरवाल

**मगनलाल चिक्की**

लोणावळयास जाल तेव्हा खरेदी करण्यास विसरू नका.

हार्दिक शुभेच्छा !!!

**लोणावळा औद्योगिक सहकारी वसाहत**

निसर्गरम्य लोणावळयातील प्रगतीपर औद्योगिक केंद्र


मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## मावळ तालुका

वडगाव हे मावळ तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे हा तालुका पुणे जिल्ह्याच्या पश्चिम भागात येत असल्यामुळे या भागात पाऊस भरपूर पडतो. भात हे येथील मुख्य पिक आहे. किल्ले, शिल्पकलापूर्ण अशी लेणी, थंड हवेचे ठिकाण लोणावळा इत्यादीमुळे या तालुक्याचे महत्व वाढले आहे. वडगाव येथे पाटोबाचे मंदिर आहे.

### कार्ले

पुण्यापासून ३५ मैलावर पुणे मुंबई रस्त्यापासून १ मैलावर आणी मळवली स्टेशनापासून २ मैल अंतरावर ही लेणी आहेत. सुमारे २००० वर्षापूर्वीची ही बुद्धकालीन लेणी आहेत. येथे एक चैत्य (प्रार्थनेची जागा) व बाकीचे विहार (रहाण्याची जागा) आहेत. हा चैत्य म्हणजे १२४ फूट लांब व ४५ फूट रुंद असे भव्य सभागृह आहे. येथील शिल्पकला प्रेक्षणिय आहे. या सभागृहात शिलाखंडेने नटविलेले प्रत्येक बाजूस १५ असे एकूण ३० स्तंभ आहेत. चैत्यासमोर एक ४० फूट उचाचा सिंहस्तंभ आहे स्तंभावरील हत्तीच्या व स्त्रि–पुरुषाच्या आकृती प्रेक्षणिय आहेत. कार्ले चैत्याची कमान डौलदार आहे. वैजयंतीचा भूतपाल सेठी हा या लेण्याचा निर्माता आहे असा इतिहासात उल्लेख आढळतो. लेणीतील दगडावर तत्कालीन शिलालेख आहेत. लेणीजवळ पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.

येथे एकवीरा देवीचे देऊळ आहे कोळी व प्रभू यांची ही देवी फार प्राचीन असावी

### भाजे

खडकाळ्यापासून ७ मैलावर व मळवली स्टेशनपासून २ मैलावर ही बुद्धकालीन लेणी आहेत. ही लेणी सुमारे २१०० वर्षापूर्वीपासूनची असून एकूण १८ आहेत. येथील लेण्याच्या शेवटी सूर्यगुफा आहे. येथे इंद्र व सूर्य यांच्या प्रतिमा खोदलेल्या आहेत. ऐरावतावर आरुढ झालेल्या इंद्राच्या हाती अंकुश व गळ्यात पुष्पमाला आहे. दुचाकी रथात सूर्य व त्याच्या दोन बायका उभ्या आहेत एकीच्या हातात छत्र व दुसरीच्या हातात चवरी असून रथाला चार घोडे जोडलेले आहेत. येथील आराव्या क्रमाकाचें लेणे ५९ फूट लांब व २९ फूट रुंद असून महत्वाचे आहे. डॉ. बर्गेसच्या मते हे लेणे जगातील लेण्याच्या इतिहासाच्या दृष्टीने अपूर्व आहे येथून जवळच रविवर्मा प्रिंटीग प्रेस आहे

### बेडसे

कामशेत स्टेशनपासून नैऋत्येस ५ मैलावर ही लेणी आहेत. इ स. पूर्वीच्या पहिल्या शतकातील ही बौद्ध लेणी आहेत. ही लेणी पवनमावळात येतात. येथील खांबावरील हत्ती, घोडे, बैल जोडया व स्त्रिपुरुष यांच्या मूर्ती अप्रतिम सुंदर आहेत येथेही दरवाज्यावर कमानी आहेत. येथील अद्ययावत असे शिल्प सौंदर्य प्रेक्षणिय आहे.

### लोहगड

मळवली स्टेशनेपासून सुमारे ४ मैलावर हा किल्ला आहे. लोहगडाची उंची स. स. पासून १०२४ मीटर आहे. लोहगडाची रचना होऊन फार वर्षे झाली. बहुदा तो सातवाहन कालीन म्हणजे दोन हजार वर्षांपूवाचा असावा. कदाचित तो त्याहूनहा प्राचीन असू शकेल. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव इ. सर्व राजवटी लोहगडाने पाहिल्या आहेत इ. स. १४८९ मध्ये मलिक अहमदच्या निजामशाहीच्या स्थापनेनंतर लोहगडावर मुसलमान राज्यास सुरवात झाली. इ स. १५६४ मध्ये अहमदनगरचा दुसरा बुऱ्हाणशहा काही दिवस लोहगडावर कैदेत होता. इ. स. १६४८ मध्ये शिवाजी महाराजांनी लोहगड घेतला. राजा जयसिंगाशी झालेल्या तहाप्रमाणे त्याना तो सोडावा लागला. परतु इ स १६७० मध्ये त्यानी ता पुन्हा जिंकला पेशवाईमध्ये लोहगड नाना फडणविसाचा कारभार, धोंडोपंत नितसुरे याच्याकडे होता मराठी राज्य बुडाल्यावर १८४५ पर्यंत इग्रज फौज लोहगडावर होती या किल्ल्यास हनुमान, गणेश नारायण व महादरवाजा असे ४ प्रवेश दरवाज आहेत, सध्या किल्ल्यावर किल्लेदाराच्या वाड्याचे अवशेष, लोमेश ऋषींचे तपश्चर्यास्थळ असलेली ऐसपैस गुहा, त्र्यंबकेश्वराचे देऊळ इ. बघावयास मिळते येथे एक अतिशय रुचकर पाणी असलेली विहीरही आहे.

### विसापूर

बाळाजी विश्वनाथ पेशवे यानी हा किल्ला बांधला आहे. किल्ल्यावर अनेक टाकी आहेत.

Trusted Name
In Makers of
Electric clutches and Brakes

**Pethe Engineering Private Limited**

69, S K Bole Road, Dadar,
Bombay 400 028
Phone No 454898

Factory 52/53, Lonavla Industrial Estate,
Nagargaon LONAVLA 410 401.
Tel, 570

## राजमाची

बोरघाटापासून १० मैल गेल्यावर या किल्ल्यावर जाता येते. हा किल्ला १६४८ मध्ये शिवाजीमहाराजांनी घेतला होता. त्यानंतर तो १७१३ मध्ये आग्रे याचेकडे व १७३० मध्ये दुसरे बाजीराव पेशवे याचेकडे गेला. या उळकट किल्ल्याची उची सुमारे २००० फूट आहे, या किल्ल्यावर भैरवाचे एक लहानसे देऊळ व तिन दगडी दिपमाळा आहेत.

## खंडाळा

पुण्यापासून ४२ मैलावर हे थड हवेचे टिकाण आहे. येथून सह्याद्रीच्या पर्वत राजीची रमणीय निसर्गशोभा दिसते. वायव्येस पराह व उल्हास नद्याच्या दऱ्या, दक्षिणेस, भीमडबरी डोंगर, पश्चिमेस उल्हास नदी पर्यन्त सपाट फाटा अशा सभोवतालच्या सौंदयस्थळामुळे खडाळा हे ठिकाण प्रवाशाचे आकर्षणस्थळ झाले आहे. बाबू, जाभूळ, आबा, चिच इत्यादि वृक्षांनी हा परिसर अच्छादलेला आहे. गरिबापासून श्रीमतापर्यन्त सर्वांना आकर्षित करणारे 'खडाळा हे पुणे जिल्ह्यातील एक महत्वाचे स्थळ आहे

## लोणावळा

दऱ्याखोऱ्यांनी व वृक्षराजींनी अलकृत केलेले हे बोरघाटातील एक रम्य स्थळ आहे लोणावळे स. स. पासून सुमारे २००० फूट उचीवर आहे. दरवर्षी उन्हाळ्यात हवा पालट करण्यासाठी शेकडो शहरवासी लोक येथे येतात. अनेक श्रीमतांनी येथे आपले बगले बांधले आहेत. मध्यम वर्गीयासाठी कार्ल्याजवळ हॉलीडे कँपही आहे. लोणावळ्याजवळच वळवण धरणही आहे या धरणाच्या पाण्यावरच खोपोली येथे टाटा यांचा विजनिर्मिती प्रकल्प असून ती विज मुबईत पुरविली जाते.

## कैवल्यधाम लोणावळा

कुवल्यानद स्वामींनी १९२४ साली या सस्थेची स्थापना केली. निरनिराळ्या सस्कृतीतील तात्विक व प्रात्यक्षिक प्रचीतीवादाचा अभ्यास करून त्याची, आपले तत्वज्ञान व साहित्य याच्याशी सांगड घालण्याचा प्रयत्न येथे करण्यात येतो. योगाचे शिक्षण देणाऱ्या या सस्थेत वैज्ञानिक सशोधनाबरोबर दार्शनिक व साहित्यिक सशोधनही केले जाते.

## आर्टीफिसर अॅप्रेंटीसेस नेव्ही, लोणावळा

१५ ते १७॥ वर्षे वयाच्या इतर सर्व अटी पूर्ण करणाऱ्या निवडक तरुणांना लोणावळा येथील या नाविक शाळेत प्रवेश दिला जातो. आर्टिफसर अॅप्रेंटिसेस म्हणून भरती केलेल्या ह्या तरुणांना एजिनरूम-आर्टिफिसर, शिपराईट आर्टिफिसर, इलेक्ट्रिकल आर्टिफिसर, ऑर्डनन्स आर्टिफिसर किंवा एअरक्रॅफ्ट आर्टिफिसर ह्यापैकी एक अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. हा अभ्यासक्रम ४ वर्षाचा असून १॥ वर्षे सामान्य शिक्षण व त्यानतर २॥ वर्षे यापैकी विशिष्ट शाखेचे शिक्षण देण्यात येते.

## डॉ. भा नी. पुरंदरे बहुविध विद्यालय, वळवण, लोणावळा

डॉ. भा. नी. पुरदरे बहुविध विद्यालयाची स्थापना १९६० साली झाली. शेती, सुतारकाम व हस्तकला व्यवसाय इत्यादि बहुविध प्रकार शाळेने सुरू केले शाळेशी सलग्न असे सौ इदुमती पुरदरे वसतिगृह आहे ग्रामीण विभागात स्थापन झालेली ग्रामीण विभागाला साजेशी व ग्रामीण विभागाच्या उत्थानासाठी प्रयत्न करणारी ही शाळा प्रगतिपथावर आहे.

## गुरुकुल

लोणावळ्याच्या निसर्गरम्य परिसरात गुरुकुल हे मुलामुलींचे वसतिगृहयुक्त विद्यालय आहे. शारिरिक विकास, शिस्तबद्ध वागणूक चागल्या सवयी, कर्तव्याची जाणीव, परिश्रमाची आवड, विनयशिलता, स्वाभिमान व सेवा वृत्ती या बहुमोल सद्गुणांचा विकास विद्यार्थ्यांच्यात घडवून आणणे हेच गुरुकुलचे ध्येय आहे

## तळेगांव दाभाडे

पुण्यापासून २० मैलावर हे गांव असून येथे बनेश्वराचे देऊळ व तळ्याकाठी इतर मदिरे आहेत.

## तळेगांव जनरल हॉस्पिटल अॅन्ड कन्व्हेलेसेंट होम

डॉ बि. स. सरदेसाई यानी इ. स. १९२५ साली गरीब व मध्यमवर्गीय लोकासाठी या हॉस्पिटलची स्थापना केली. तळेगाव स्टेशनजवळ एका मोठ्या टेकडीवर हे हॉस्पिटल आहे. येथील हवा क्षयरोग्यांसाठी चागली आहे. म्हणून १९३९ साली जनरल हॉस्पिटलला जोडूनच येथे एक सेनेटोरियम उघडण्यात आले आहे. पुणे-मुबई येथील प्रसिद्ध डॉक्टर व शस्त्रवैद्य येथे नेहमी येत असतात. हॉस्पिटलमध्ये रक्तदान व क्ष किरण तपासणीची सोय आहे. लहान मुलाना औषधोपचार व दुधपुरवठाही करण्यात येतो. हॉस्पिटलचे एक वाचनालय, पोस्ट ऑफिस, सहकारी भाडार इत्यादि आहे.


M/s. Fees & Farm Development Associates

Vadgaon (Maval), Dist. Poona

DEALERS IN FERTILIZERS, PESTICIDES AND SEEDS


मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

## मावळ शिक्षण परिषद संस्था, तळेगांव दाभाडे

इ. स. १९४७ साली या संस्थेची स्थापना झाली व संस्थेतर्फे 'नूतन विद्यामंदिर' ही माध्यमिक शाळा सुरू करण्यात आली. या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून शाळा प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे संस्थेतर्फे मावळ भागात इतर ठिकाणी शाळा काढण्याचे प्रयत्न चालू आहेत.

## नवीन समर्थ विद्यालय

'नूतन महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळ' या संस्थेतर्फे १९१८ साली या विद्यालयाची स्थापना झाली. विद्यार्थ्यांना संस्थेच्या वसतीगृहातच राहून शिक्षण घ्यावे लागते. शास्त्रीय शिक्षण, वाङमयीन शिक्षण, औद्योगिक शिक्षण, धार्मिक शिक्षण, शरीरबलसंवर्धन ही येथील अभ्यासक्रमाची प्रमुख अंगे आहेत. विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत यासाठी ही शाळा सतत प्रयत्नशील असते.

## श्री गणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय

इ. स. १९११ साली पुणे येथे स्थापन झालेली ही संस्था १९५८ पासून तळेगाव- दाभाडे येथे कार्यरत आहे वाचनालय व ग्रंथालयाशिवाय निरनिराळे प्रदर्शने, व्याख्याने, गुणीजनांचे सत्कार आयोजित करणे, व मोठ्याच्या पुण्यतिथ्या साजऱ्या करणे इ. कार्यक्रमही संस्था पार पाडते.

## पैसा फंड काच कारखाना

विद्यार्थी वर्गाला काच धंद्याचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने काच शाळा या सदरात १९०८ साली हा उद्योग सुरु करण्यात आला होता पूर्वी सर्व प्रकारचा काच माल, चिनीमातीचा माल, बांगड्या वगैरे उत्पादन येथे करण्यात येत असे आज येथे मर्क्यूरी व्हेपर बाऊल्स, थर्मास शेल्स, रीफिल्स, राड ट्रॅफिक सिग्नल्स इत्यादींचे उत्पादन केले जाते.

## गारोडी टेकडी

तळेगाव दाभाड्यापासून १० मैलावर ही टेकडी आहे. येथे पहिल्या शतकातील काही बौद्ध लेणी आहेत. एका लेण्यात महादेवाचे लिंग व नदी असून दुसऱ्या लेण्यात कुंभाकार तळाचे स्तंभ आहेत, त्यावर हत्ती, वाघ, सिंह यांच्या आकृती आहेत. चवथ्या लेण्यात एक शिलालेख आहे.

## नवलाख उंबरे

येथील बहीरोबाचे देऊळ व मुसलमानी बाराखान कबर प्रेक्षणिय आहे या खेड्याजवळ ६५ वर्षापूर्वीची भव्य मशीद आहे. खडकाळ्यापासून सुमारे १० मैलावर हे ठिकाण आहे.

## इंदुरी–इंदोरी

इंद्रायणी नदीच्या काठी हा एक मजबूत किल्ला आहे.

## साकर पठार

शिकारीसाठी व सहलीसाठी योग्य असे हे ठिकाण लोणावळ्यापासून ४॥ मैलावर आहे. हे ठिकाण सुमारे ३००० फुट उंचीवर असून येथील गर्द झाडीने व्यापलेले कड अवर्णनीय दिसतात.

# भोर तालुका

महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णकाळ म्हणजे शिवकाळ ! ह्या शिवकालीन इतिहासाचे अनेक शिल्पकार भोर तालुक्यातीलच आहेत. शिवरायाने स्वराज्याची शपथ घेतली तीच मुळी या तालुक्यातील रायरेश्वराच्या डोंगरावरील शिव मंदिरात. शिवरायांनी शपथ घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवून तोरण्यावर तोरण बांधले तो तोरणाही याच तालुक्यात आहे. शिवबाचे शूर साथीदार भुतोंड्याचे–येसाजी कंक, शिन्दचे बाजीप्रभू देशपांडे, कारीचे कान्होजी जेधे आणि इतर अनेक मावळे याच तालुक्यातले. शिवकाळाचे वैभव आजही या तालुक्यात असलेले राजगड, विचित्रगड आदी किल्ले सांगत असतात.

छत्रपती राजाराम राजे यांच्या कारकिर्दीत भोरची जहागिरी पंतसचिव श्री. शंकराजी नारायण यांना देण्यात आली होती. यांनी शेवटी संन्यास घेतला होता. त्यांची समाधी आजही आंबवडे या गावी सुस्थितीत आहे भोर येथील तहसीलदार कचेरीची इमारत, प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत, पंचायत समितीची इमारत, राजा रघुनाथ हायस्कूलची भव्य इमारत, निरा नदीवरील पूल, शहरातील कमान व प्रचंड राजवाडा ही संस्थानी राजवटीची स्मृतीचिन्हे भोरमध्ये पहावयास मिळतात

भौगोलिक दृष्टया हा तालुका डोंगराळ प्रदेशात मोडतो. तालुक्यातून जाणाऱ्या पुणे-बंगलोर रस्त्यामुळे तालुक्याचे पूर्व व पश्चिम असे दोन भाग पडले आहेत. पश्चिम भागातील काही गावे अत्यंत दुर्गम आहेत. वरकस जमीन व कमी पाऊसामुळे या भागात मुख्यतः भात नाचणी, वरी, नागली ही जाड पीके घेतली जातात. पूर्व भागात जमिनी चांगल्या असल्या तरी पावसाचे प्रमाण कमी पडते त्यामुळे बाजरी, ज्वारी आदी मुख्य पिके घेतली जातात. हल्ली या भागात ऊसाच्या पीकाचे प्रमाण वाढले असून काही भागात पेरु, अंजीर या फळांच्या बागाही आहेत.

भोर तालुक्यात आंबवडे येथील झुलता पुल, शंकराजी नारायण यांची समाधी, बनेश्वर येथील निसर्गरम्य परिसरात वसलेले शिवालय रायरेश्वराचे मंदिर, विचित्रगड, शिवरायांची आद्य राजधानी राजगड, भाटघर धरणाचा प्रचंड जलाशय ही स्थळे प्रेक्षणिय आहेत.

या तालुक्यात पाऊस जास्त पडत असल्याने भात हेच येथील मुख्य पिक आहे. भोरचा आंबेमोहोर तांदुळ प्रसिद्धच आहे. जवळच येळवंडी नदीवर जिल्ह्याच्या अग्नेयेकडील दुष्काळी भागास पाणी

मिळावे म्हणून १९२७ साली भाटघरचे प्रसिद्ध धरण बांधण्यात आले आहे. भाटघर धरणाचे पाणी नीरा नदीच्या पात्रातूनच १७ मैल वीर गावापर्यंत वाहात जाते. या धरणाची लांबी ५३२३ फूट असून उंची १६३ फूट आहे. या धरणामुळे भिजणाऱ्या क्षेत्रात बागायत शेती केली जाते. येळवडी व नीरा यांचा संगम भाटघर धरणाजवळच खालच्या बाजूला एक फर्लांगावर होतो. याच धरणाच्या पाण्याचे निरा राइट बँक व निरा लेफ्ट बँक कॅनाल काढले आहेत.

## भोर

तालुक्याचे मुख्य ठिकाण असून शहराची वस्ती सुमारे १२ हजार आहे. शहरात नगरपालिका व तालुका पातळीवरील सर्व शासकिय कार्यालय आहेत भोर शहरानजीक भोर इंडस्ट्रिज लि. हा लेदर क्लॉथ निर्मितीचा कारखाना, आरलॅब्ज लि. हा रंगाचा कारखाना. यशवंत सहकारी सूत गिरणी हा सहकारी क्षेत्रातील सूत निर्मितीचा आदी मोठे व इतर दोन-तीन छोटे कारखाने आहेत त्यामुळे शहरातील लोकवस्तीत कामगार शेतकरी व नोकरवर्ग यांचे वैशिष्टयपूर्ण मिश्रण आढळते.

## राजगड किल्ला

छत्रपती शिवरायांनी मोरोपंत पिंगळे या जाणकाराच्या देखरेखीखाली हा देखणा किल्ला राजगड बांधून घेतला. शिवाजी महाराजांची पहिली राजधानी याच किल्ल्यावर होती. स्वराज्यासाठी या काळात ज्या ज्या मोहिमा आखल्या गेल्या त्या या किल्ल्यावर. हा सर्व काळ शिवछत्रपतींनी मराठी राज्याचे काम येथूनच पाहिले शेवटची काही वर्षे राजधानीचा मान रायगडाकडे गेला असला तरी अफजलखाँ, शाइस्तेखाँ, मिर्झाराजा जयसिंग अशा बलदंड सेनापतींबरोबर राजांनी राजगडावरूनच मुकाबला केला अनेक महत्वाच्या घटना येथे घडल्या. अफजलखानाला मारल्यावर त्याचे मस्तक जिजाबाईसाहेबांना दाखविण्यासाठी इथेच आणून बालेकिल्ल्याच्या नगारखान्याच्या भिंतीत पुरले. राणी सईबाईसाहेबांचे निधन इथेच झाले. राजारामांचा जन्म इथेच झाला. या सर्व ऐतिहासिक घटनांची साक्ष हा किल्ला देतो अगदी तहत इ. स. १९४७ पर्यंत हा किल्ला भोरच्या पंतसचिवांच्या ताब्यात होता हा किल्ला समुद्रसपाटी पासून सुमारे ४५७४ फूट उंचीवर आहे आज पद्मावती, सुवेळा व संजीवनी या माच्या आणि बालेकिल्ला यावर पडक्या इमारती सर्वत्र पसरलेल्या आहेत. फक्त देवळे आणि दिवाणघर हीच काय ती कशीबशी उभी आहे. संजीवनी माचीची चिलखती तटबंदी हे महाराष्ट्रातील सर्व दुर्गांमध्ये अद्वितीय आश्चर्य आहे.

## विचित्रगड

भोरपासून ६ मैलावर सुमारे ३६२५ फूट उंचीवर हा किल्ला आहे.

## रोहिडामल

भोरच्या दक्षिणेस ६ मैलावर रोहिडामल किंवा रोहिरेश्वराचे देऊळ आहे. किल्ल्यात जाण्यासाठी तीन दरवाजे आहेत.


The Yeshwant Sahakari Soot Girni Niyamit, Bhor Unit

At Post · Bhor, Dist Pune

Manufacturers of Best Quality Cotton Yarn 20 S and 2/20 S Cones & Hanks

Established in March 1970

Production from 2-6-1971

| | |
|---|---|
| Share Capital Members | Rs. 26,36 000 |
| Share Capital Government | Rs 51 24,000 |
| Reserves | Rs 69,62 249 |
| Sales 1978-89 | Rs 1,40,81,129 |

A Unit of Yeshwant Sahakari Soot Girni Niyamit, Solapur

I. H BOLLI
Chairman

H M. YELE
Vice-Chairman

V. K SHIVNEKAR
General Manager

भोर तालुका को-ऑप डेअरी युनियन लि. भोर

आमची वैशिष्ट्ये

युनियनच्या वतीने नऊ दूध केंद्रे चालविली जातात ▷ युनियनला दुध पुरवठा करणाऱ्या संलग्न संस्था १२ आहेत.
एकूण दुध संकलन अंदाजे ९००० लिटर्स प्रतिदिनी ▷ भाग भांडवल एकूण १९८१००।—
दुध उत्पादकाना होलसेल प्रमाणात कडबा, कुट्टी व सुग्रास पशु खाद्याचा पुरवठा केला जातो.

सर्वांच्या सहकार्यावर चाललेली ग्रामीण जनतेचा आर्थिक विकास साधणारी आदर्श संस्था

श्री बालिटजी आबाजी डिंबळे
व्हा. चेअरमन

श्री. खाशाबा ना. किंद्रे
व्यवस्थापक

आमदार श्री. संपतराव रा. जेधे
चेअरमन




मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

### बनेश्वर

नरसापूरपासून पाउण मैलावर शिवगंगा ओढ्याच्याकाठी हे मदीर आहे. हे मंदीर पहिले बाजीराव पेशवे यांनी बांधले आहे. शेजारी पेशव्यांच्या वाड्याचे अवशेष आहेत. या ठिकाणी पिण्याचे पाण्यासाठी उत्तम तळे आहे. देवाल यासभोवतालचे केतकीचे बन व गर्द झाडी यामुळे हे ठिकाण रम्य झाले आहे. येथील प्रेक्षणिय भाग म्हणजे चक्रव्यूह यात चक्रव्यूहाच्या खुणाप्रमाणे सर्वत्र पाणी खळविले आहे.

### आंबवडे

भोर संस्थानचे संस्थापक श्री. शंकराजी नारायण यांची समाधी येथे आहे. येथील श्रीनागेश्वराचे देऊळ व पंचगंगा कुंड प्रेक्षणिय आहे

### भोर शिक्षण मंडळाचे राजा रघुनाथराव हायस्कुल, भोर

इ. स. १८९८ मध्ये 'भोर हायस्कुल' या नावाने या शाळेची स्थापना झाली. कै. रघुनाथराव राज यांनी १९३७ साली या शाळेस इमारत बांधून दिली. नुसत्या शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर इतर क्षेत्रातही या शाळेतील विद्यार्थी चमकतात. भोर शिक्षण मंडळाने १९५२ साली ही शाळा चालविण्यास घेतली. आज या शाळेत सुमारे १००० विद्यार्थी विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत

### श्री. माधवराव टापरे

श्री. टापरे हे तरुण व तडफदार कार्यकर्ते १९७९ पासून भोर पंचायत समितीचे सभापती म्हणून काम पहात आहेत. समाजसेवेची लहानपणापासूनच आवड व तळमळ असल्याने भोरमधील जनतेचे ते आवडते नेते आहेत. त्यांचे मुळ नाव महादेव खडूजी टापरे आहे परंतु भोर तालुक्यातील लोक त्यांना 'माधवराव टापरे' म्हणून ओळखतात.

### श्री. वसंत केशव शिवणेकर (बी. ए. (ऑनर्स )

स्वावलंबनाने शिक्षण घेऊन श्री. शिवणेकर आज भोर येथील यशवंत सहकारी सूत गिरणीचे जनरल मॅनेजर पद सांभाळीत आहेत. ते लायन्स क्लबचे चार्टर्ड प्रेसिडेंट आहेत. श्री. शिवणेकर यांना शास्त्रीय संगीत व नाटकाची आवड असून सार्वजनिक कार्यातही गोडी आहे.


# कृषि उत्पन्न बाजार समिती, भोर जिल्हा पुणे

मुख्य बाजार पेठ — भोर

दुय्यम बाजार पेठ — किकवी, नसरापूर

**प्रमुख वैशिष्ट्य : किकवी येथील जनावरांचा भव्य बाजार**

**शेतकऱ्यांनी सदैव संपर्क वाढवावा.**

अ. प. अहिरे, सचिव — अ. रा. शेटे, उपसभापती — रा. गो गुजर, सभापती

# भोर तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि.
## भोर, जि. पुणे

रजि. नं २४१०४ — रजि. ता. ३१-१-१९६१

**विविध सेवेच्या द्वारे समाजाचे सर्व जीवन समृद्ध करण्याचा संघ प्रयत्न करीत आहे**

अधिकृत भाग भांडवल – २,००,०००
वसुल भाग भांडवल – १,६४,९५०
निधी – १,६२,०६३
सभासद – २१३
खेळते भागभांडवल – ५,१३,०००
शाखा : भोर नसरापूर, डेपो : सारोळे आंबवडे, रास्त भाव कापड दुकान, भोर-नसरापूर, किकवी-आंबवडे, स्वस्त धान्य दुकान, भोर-वाझरे-आंबवडे

卐 **आमची ठळक वैशिष्ठ्ये** 卐

१) शेतीमालाची योग्य भावात विक्री करणे
२) शेती उपयुक्त मशिनरी, ऑईल इंजिन्स, इलेक्ट्रीक मोटर्स, शेती औजारे यांचा रोखीने व तगाईवर पुरवठा करणे.
३) ग्राहकोपयोगी व नियंत्रित मालाचा पुरवठा करणे.
४) खते बी बियाणे औषध वगैरे मालाचा पुरवठा करणे.
५) शासनाचे धोरणाप्रमाणे रास्त भाव कापड व जीवनावश्यक वस्तु विक्री करणे.
६) जनावरांचे खाद्याची ग्रामीण भागात विक्री करणे

वसंत बगाराम धारणे, प्रभारी व्यवस्थापक — धर्माजी दिनकर खंडाळे, चेअरमन

मिळावे म्हणून १९२७ साली भाटघरचे प्रसिद्ध धरण बांधण्यात आले आहे. भाटघर धरणाचे पाणी नीरा नदीच्या पात्रातूनच १७ मैल वीर गावापर्यंत वाहात जाते या धरणाची लांबी ५३२३ फूट असून उंची १६३ फूट आहे. या धरणामुळे भिजणाऱ्या क्षेत्रात बागायत शेती केली जाते वेळवंडी व नीरा याचा संगम भाटघर धरणाजवळच खालच्या बाजूला एक फलींगाव होतो. याच धरणाच्या पाण्याचे निरा राइट बँन्क व निरा लेफ्ट बँक कॅनाल काढले आहेत.

## भोर

तालुक्याचे मुख्य ठिकाण असून शहराची वस्ती सुमारे १२ हजार आहे. शहरात नगरपालिका व तालुका पातळीवरील सर्व शासकिय कार्यालय आहेत भोर शहरानजीक भोर इंडस्ट्रिज लि. हा लेदर क्लॉथ निर्मितीचा कारखाना, आरलॅब्ज लि. हा रंगाचा कारखाना. यशवत सहकारी सूत गिरणी हा सहकारी क्षेत्रातील सूत निर्मितीचा आदी मोठे व इतर दोन-तीन छोट कारखाने आहेत त्यामुळे शहरातील लोकवस्तीत कामगार शेतकरी व नोकरवर्ग याचे वैशिष्टयपूर्ण मिश्रण आढळते.

## राजगड किल्ला

छत्रपती शिवरायानी मोरोपंत पिंगळे या जाणकाराच्या देखरेखीखाली हा देखणा किल्ला राजगड बांधून घेतला. शिवाजी महाराजाची पहिली राजधानी याच किल्ल्यावर होती. स्वराज्यासाठी या का... आखल्या गेल्या त्या या किल्ल्यावर. हा सर्व काळ शिवछत्रपतींनी मराठी राज्याचे काम येथूनच पाहिले शेवटची काही वर्षे राजधानीचा मान रायगडाकडे गेला असला तरी अफजलखाँ, शाइस्तेखाँ, मिर्झाराजा जयसिंग अशा बलदंड सेनापतींबरोबर राजांनी राजगडावरूनच मुकाबला केला अनेक महत्वाच्या घटना येथे घडल्या. अफजलखानाला मारल्यावर त्याचे मस्तक जिजाबाईसाहेबाना दाखविण्यासाठी इथेच आणून बालेकिल्याच्या नगारखान्यच्या भिंतीत पुरले. राणी सईबाईसाहेबाचे निधन इथेच झाले, राजारामांचा जन्म इथेच झाला. या सर्व ऐतिहासिक घटनांची साक्ष हा किल्ला देतो. अगदी तहत इ. स. १९४७ पर्यंत हा किल्ला भोरच्या पंतसचिवांच्या ताब्यात होता हा किल्ला समुद्रसपाटी पासून सुमारे ४५७४ फूट उंचीवर आहे आज पद्मावती, सुवेळा व संजीवनी या माच्या आणि बालेकिल्ला यावर पडक्या इमारती सर्वत्र पसरलेल्या आहेत. फक्त देवळे आणि दिवाणघर हीच काय ती कशीबशी उभी आहे. संजीवनी माचीची चिलखती तटबंदी हे महाराष्ट्रातील सव दुर्गांमध्ये अद्वितीय आश्चर्य आहे.

## विचित्रगड

भोरपासून ६ मैलावर सुमारे ३६२५ फूट उंचीवर हा किल्ला आहे.

## रोहिडामल

भोरच्या ... किंवा बा...रोत्राचे देऊळ आहे. किल्ल्यात जाण्यासाठी तीन दरवाजे आहेत.


# The Yeshwant Sahakari Soot Girni Niyamit, Bhor Unit

At Post Bhor, Dist Pune

Manufacturers of Best Quality Cotton Yarn 20 S and 2/20 S Cones & Hanks

Established in March 1970 — Production from 2-6-1971

| | |
|---|---|
| Share Capital Members | Rs. 23,36 000 |
| Share Capital Government | Rs 51 24,000 |
| Reserves | Rs 69 62 249 |
| Sales 1978-89 | Rs 1,40,81,129 |

A Unit of Yeshwant Sahakari Soot Girni Niyamit, Solapur

I. H BOLLI, Chairman — H M. YELE, Vice-Chairman — V. K SHIVNEKAR, General Manager

# भोर तालुका को-ऑप डेअरी युनियन लि. भोर

आमची वैशिष्ट्ये

युनियनच्या वतीने नऊ दूध केंद्रे चालविली जातात ▷ युनियनला दुध पुरवठा करणाऱ्या सलग्न संस्था ३२ आहेत.

एकूण दुध संकलन अदाजे ९००० लिटर्स प्रतिदिनी ▷ भाग भांडवल एकूण १९८३००।—

दुध उत्पादकाना होलसेल प्रमाणात कडबा, कुट्टी व सुग्रास पशु खाद्याचा पुरवठा केला जातो.

सर्वांच्या सहकार्यावर चाललेली ग्रामीण जनतेचा आर्थिक विकास साधणारी आदर्श संस्था

श्री बालिटजी आबाजी डिंबळे, व्हा. चेअरमन — श्री. लाशाबा ना. किंद्रे, व्यवस्थापक — आमदार श्री. संपतराव रा. जेधे, चेअरमन

### धनेश्वर

नरसापूरपासून पाउण मैलावर शिवगंगा ओढ्याच्याकाठी हे मंदीर आहे. हे मंदीर पहिले बाजीराव पेशवे यांनी बांधले आहे. शेजारी पेशव्यांच्या वाड्याचे अवशेष आहेत. या ठिकाणी पिण्याचे पाण्यासाठी उत्तम तळे आहे. देवाल ासभोवतालचे केतकीचे बन व गर्द झाडी यामुळे हे ठिकाण रम्य झाले आहे. येथील प्रेक्षणिय भाग म्हणजे चक्रव्यूह यात चक्रव्यूहाच्या खुणाप्रमाणे सर्वत्र पाणी खेळविले आहे

### आंबवडे

भोर संस्थानचे संस्थापक श्री. शंकराजी नारायण याची समाधी येथे आहे. येथील नागनाथेश्वराचे देऊळ व पंचगंगा कुंड प्रेक्षणिय आहे

### भोर शिक्षण मंडळाचे राजा रघुनाथराव हायस्कुल, भोर

इ. स. १८९८ मध्ये 'भोर हायस्कुल' या नावाने या शाळेची स्थापना झाली. कै. रघुनाथराव राज यांनी १९३७ साली या शाळेस इमारत बांधून दिली. नुसत्या शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर इतर क्षेत्रातही या शाळेतील विद्यार्थी चमकतात. भोर शिक्षण मंडळाने १९७२ साली ही शाळा चालविण्यास घेतली. आज या शाळेत सुमारे १००० विद्यार्थी विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

### श्री. माधवराव टापरे

श्री. टापरे हे तरुण व तडफदार कार्यकर्ते १९७९ पासून भोर पंचायत समितीचे सभापती म्हणून काम पहात आहेत. समाजसेवेची लहानपणापासूनच आवड व तळमळ असल्याने भोरमधील जनतेचे ते आवडते नेते आहेत. त्यांचे मुळ नाव महादेव खंडूजी टापरे आहे परंतु भोर तालुक्यातील लोक त्यांना 'माधवराव टापरे' म्हणून ओळखतात.

### श्री. वसंत केशव शिवणेकर (बी. ए. (ऑनर्स )

स्वावलंबनाने शिक्षण घेऊन श्री. शिवणेकर आज भोर येथील यशवंत सहकारी सूत गिरणीचे जनरल मॅनेजर पद सांभाळीत आहेत. ते लायन्स क्लबचे चार्टड प्रेसिडेंट आहेत. श्री. शिवणेकर यांना शास्त्रीय संगीत व नाटकाची आवड असून सार्वजनिक कार्यातही गोडी आहे.


# कृषि उत्पन्न बाजार समिती, भोर जिल्हा पुणे

मुख्य बाजार पेठ — भोर

दुय्यम बाजार पेठ — किकवी, नसरापूर

**प्रमुख वैशिष्ट्य : किकवी येथील जनावरांचा भव्य बाजार**

**शेतकऱ्यांनी सदैव संपर्क वाढवावा.**

अ. प. अहिरे — सचिव

अ. रा. शेटे — उपसभापती

रा. गो गुजर — सभापती

# भोर तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि.

## भोर, जि. पुणे

रजि. नं २४१०४

रजि. ता. ३१-१-१९६१

**विविध सेवेच्या द्वारे समाजाचे सर्व जीवन समृद्ध करण्याचा संघ प्रयत्न करीत आहे**

अधिकृत भाग भांडवल – २,००,०००

वसुल भाग भांडवल – १,६४,९५०

निधी – १,६०,०६३

सभासद – २१३

खेळते भागभांडवल – ५,१३,०००

शाखा : भोर नसरापूर, डेपो : सारोळे आंबवडे, रास्त भाव कापड दुकान, भोर- नसरापूर, किकवी-आंबवडे, स्वस्त धान्य दुकान, भोर-वाझरे-आंबवडे

卐 आमची ठळक वैशिष्ट्ये 卐

१) शेतीमालाची योग्य भावात विक्री करणे

२) शेती उपयुक्त मशिनरी, ऑईल इंजिन्स, इलेक्ट्रीक मोटर्स, शेती औजारे यांचा रोखीने व तगाईवर पुरवठा करणे.

३) ग्राहकोपयोगी व नियंत्रित मालाचा पुरवठा करणे.

४) खते बी बियाणे औषध वगैरे मालाचा पुरवठा करणे.

५) शासनाचे धोरणाप्रमाणे रास्त भाव कापड व जीवनावश्यक वस्तु विक्री करणे.

६) जनावराचे खाद्याची ग्रामीण भागात विक्री करणे

वसंत बगाराम धारणे — प्रभारी व्यवस्थापक

धर्माजी दिनकर खंडाळे — चेअरमन

## वेल्हे तालुका

पूर्वी भोर तालुक्यात 'वेल्हे महाल' या नावाने हा तालुका समाविष्ट केलेला होता. आता मात्र तो स्वतंत्र वेल्हे तालुका आहे. या भागात पाऊस जास्त पडत असल्याने भात हेच येथील मुख्य पिक आहे. येथील आंबेमोहोर तांदूळ प्रसिद्ध आहे. वेल्हे तालुक्याच्या भागात उत्तम प्रतीच्या आंब्याची व फणसाची लागवड करण्यात येते.

### तोरणा किल्ला

तोरणा किल्ला घेऊनच शिवरायांनी स्वराज्याचे तोरण बांधले. या किल्ल्याची उंची सुमारे ४६०६ फूट आहे. या किल्ल्यास 'प्रचंडगड' असे म्हणतात. नरसापूर वेल्हे रस्त्याने गेल्यास वेल्ह्या-जवळ या किल्ल्याची सुरवात होते.

## शिरुर तालुका

शिरुर तालुक्याच्या दक्षिणेस पुणे व दौंड हे तालुके असून दक्षिणेस खेड तालुका आहे. हा तालुका दुष्काळी आणि मागास समजला जातो. या तालुक्यात सुमारे ८० गावे आहेत. रब्बी ज्वारी हे या तालुक्यातील महत्वाचे पीक आहे.

### शिरुर

'शिरुर' या गावास 'घोडनदी' असेही म्हणतात. येथील हवा चांगली आहे हेच तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे.

### रांजणगाव

शिरुरपासून सुमारे १० मैलावर हे अष्टविनायकांपैकी एक स्थान आहे. हे गणपती मंदिर सुमारे २५० वर्षांपूर्वी चिंचवडच्या चिंतामणी देव यांनी बांधले असे समजतात. येथे चतुर्थीस गणपती भक्तांची गर्दी असते

### पाबळ

घोडनदीपासून पश्चिमेस २२ मैलावर हे गाव आहे. पहिल्या बाजीराव पेशव्यांची 'मस्तानी' हिची कबर या गावात आहे. कानू राजपाठक यांनी १४ व्या शतकात बांधलेले नागेश्वर महादेवाचे देऊळ येथे आहे. देवळाजवळच सुंदर स्तंभ उभारलेला आहे.

### तळेगाव ढमढेरे

शिरुर तालुक्यातील हे गाव शिरुरच्या नैऋत्येस २० मैलावर आहे. येथील वेल नदीच्या तिरावर, गणपती, टाकळेश्वर, नाथ सिद्धेश्वर व उत्तरेश्वर ही प्रमुख मंदिरे आहेत. येथे बहिरावाचेही एक देवालय आहे. उत्तरेश्वराचे देवालय महाजन यांनी बांधलेले आहे सिद्धेश्वराचे देवालय भव्य आणि प्रेक्षणिय आहे.

### मलठण

येथे सुमारे तीनशे वर्षांपूर्वीचे महादेवाचे सुंदर देऊळ आहे. शिरूरपासून सुमारे १० मैलावर हे गाव आहे.

## आंबेगाव तालुका

पुणे–नाशिक रस्त्याच्या पूर्वेस आणि पश्चिमेस विस्तार असलेल्या या तालुक्याचे क्षेत्रफळ ४०१५ मैल आहे. या तालुक्यात सुमारे १०० गावे आहेत. भात, गहू, ज्वारी, बाजरी व बटाटा ही येथील मुख्य पिके आहेत. भाजीपाला व फळझाडांची लागवडही या भागात वाढत आहे.

### घोडेगाव

'घोडेगाव' हे आंबेगाव तालुक्याचे मुख्य गाव असून येथे महादेवाचे देऊळ आहे

### भीमाशंकर

खेडच्या वायव्येस ३० मैलावर भीमाशंकर हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक स्थान आहे येथील महादेवाचे जुने मंदिर नाना फडणविसांनी बांधलेले आहे या मंदिरात मोठा नंदी व मोठी घंटा आहे. हे ठिकाण स. स. पासून सुमारे ३४४८ फूट उंच आहे. या भागाच्या सभोवती बाराही महिने हिरवे असणारे दाट जंगल असते. मंचरपासून घोडेगाव-आंबेगाव मार्गे येथे जाण्यास मार्ग आहे. भीमा नदीचे हे उगम स्थान असून एका लहानशा झऱ्याच्या रूपात ती येथे प्रकट होते. (येथे महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते) भीमा नदी मैदानात उतरल्यावर तिला इतर अनेक नद्या मिळतात व ती मोठी होत जाते येथून भीमाशंकर दरीचा रमणीय देखावा दिसतो.

### मंचर

आंबेगाव तालुक्यातील हे महत्वाचे गाव आहे. येथे हेमाडपंती पद्धतीचे एक तळे आहे. या तळ्याच्या पश्चिमेकडील भिंतीवर शिलालेख कोरलेला आहे.

### अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर

रयत शिक्षण संस्थेने मंचरला पुणे जिल्ह्यातील एक थोर कार्यकर्ते कै. अण्णासाहेब आवटे यांच्या नावे कॉलेज उघडून त्यांच्या कार्याचे चिरंतन स्मारक उभारले आहे. इ. स. १९६६ साली या महाविद्यालयाची स्थापना झाली. कॉलेजची प्रगती समाधानकारक रीत्या चाललेली आहे.

### अवसरी बुद्रुक

या लहानशा गावी भैरवाचे मोठे देऊळ असून समोर दीपमाळा आहेत.

### आंबेगाव

येथे खडकाच्या लहानशा दरीतून वाहणारी घोडनदी फार सुंदर दिसते

## जुन्नर तालुका

पुणे जिल्हयाच्या उत्तर टोकास जुन्नर तालुका असून जुन्नरच्या दक्षिणेस खेड तालुका आहे. या तालुक्यात पाऊस जास्त पडत असल्याने भात हेच मुख्य पिक आहे.

### जुन्नर

मीना व कुकडी या नद्यांच्या दरम्यान वसलेले जुन्नर हे ऐतिहासिक दृष्टया महत्वाचे शहर आहे. पुण्यापासून सुमारे ५६ मैलावर स. स. पासून सुमारे २००० फुट उंचावर हे शहर आहे. या शहराच्या आसपास १५० लेणी आहेत जुन्नर जवळच्या मानमोडी डोंगरात बौद्धकालीन लेण्याचे तीन समूह आहेत. यापैकी भिमाशंकर गटात १० चैत्य प्रकारची लेणी आहेत. यातील बैठी स्त्रीमूर्ति व छतावरील रंगीत चौकटी व वर्तुळे प्रेक्षणीय अंबिका गटात १९ जैन लेणी असून त्यात सिंहावर अधिष्ठित झालेली अंबिका आहे. सातकर्णी स्तंभ हे या गटातील मुख्य लेणे आहे. येथे चक्रेश्वरी आदिनाथ, नेमिनाथ व क्षेत्रपाल या मूर्ति आहेत. भूतलिंग गटात १६ लेणी आहेत. गजलक्ष्मी, गरुड व नागराज हे बुद्धाच्या प्रभावाने एकत्र आल्याचे येथे दाखविले आहे. जुन्नरच्या या सर्व लेण्यात मिळून ३९ लेख आहेत. शिवनेर गटाचीही ६२ लेणी येथे आहेत.

जुन्नरच्या परिसरात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत. इसवी सनाच्या पहिल्या २।४ शतकात जुन्नरला फार महत्व प्राप्त झाले होते जुन्नर ही ख्रिस्ती शतकापूर्वी ९० व्या वर्षी एका दाक्षिणात्य राजाची राजधानी होती. गुजराथ, माळवा व राजस्थान यांच्यावरही सत्ता गाजविणारा क्षत्रप नहपान याची राजधानी जुन्नर हीच होती. घाटावरच्या लोकांचा पश्चिम किनाऱ्यावरील बदराशी जो व्यापार चाले तो ही जुन्नरमार्गेच होत असे

जुन्नर शहरात अतिप्राचीन असे एकही देऊळ नसले तरी लहान मोठी अशी एकूण साठ देवळे आहेत. गणपती, पाताळेश्वर उत्तरेश्वर, ठाकूरद्वार, पचलिंग ही हिंदूची मुख्य देवळे असून जैनाची पारसनाथाची दोन मदिरे आहेत. जुम्मा मशीद, हाफीजबाग व सौदागर गुबज ही स्थळेही प्रेक्षणीय आहेत. जुम्मा मशिदीत हिंदू देवळाचे खांब वापरलेले दिसून येतात.

### शिवनेरी

शिवनेरी किल्ला सातवाहनानी निर्माण केला. त्यानतर चालुक्य, राष्ट्रकुट याच्या अधिपत्याखाली शिवनेरी आणि त्याच्या भोवतालचा प्रदेश होता. इ. स. ११७० ते १३१८ पर्यन्त शिवनेरीवर यादव घराण्याची सत्ता होती त्यानतर महाराष्ट्रावर यावनी शासन सुरू झाले. इ. स. १४४३ मध्ये मलिक उत्तुजार नामक बहामनी सरदाराच्या स्वाधीन शिवनेरी झाला. नतर तो कधीकधी निजामशाहीत तर कधी आदिलशाहीत होता इ. स. १६३० साली आदिलशाही शासनामध्ये विजयराव सिधोजी विश्वासराव हा शिवनेरीचा किल्लेदार होता त्यावेळी शहाजीराजेवर कोसळत असणाऱ्या आपत्तीमुळे शहाजी राजांनी आपली पत्नी जिजाऊ साहेबाना शिवनेरीचे किल्लेदार विश्वासरावाच्या आश्रयास आणून ठेवले. गडावरील शिवाई देवीच्या कृपेमुळेच १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवरायांचा जन्म झाला पुढे मात्र शिवनेरी स्वराज्यात दाखल होण्यास १७१६ साल उजाडावे लागले.

शिवनेरी किल्ला सुमारे ३३४२ फूट उच आहे. शिवरायाचे जेथे जन्म झाला ती इमारत आहे 'शिवकुंज' या इमारतीत महाराष्ट्र शासनाने जिजाऊ साहेब आणि बालक शिवप्रभू याचे पचरसी धातूचे पुतळे उभारले आहेत. किल्ल्यावर अंबरखाना आणि गगाजमना नामक जोड टाकी आहे. किल्ल्यावर कोळीचौथरा नावाचे ठिकाण आहे. याच चौथऱ्यावर इ. स. १६५० मध्ये मुगलांनी या प्रदेशातील हजारो कोळी लोकांची डोकी उडवली.

### ओझर

अष्टविनायकापैकी 'विघ्नहरेश्वरा' चे हे स्थान जुन्नरपासून ६ मैलावर आहे. कुकडी नदीकाठी असलेल्या या देवळ भोवती तट आहे. मदिराच्या प्रांगणात दोन दीपमाळा आहेत.

### पूर

कुकडी नदीच्या उगमस्थानी असलेले हे गाव जुन्नर पासून १३ मैलावर आहे. हेमाडपती बांधणीचे उत्कृष्ट शिल्पकलापुर्ण असे एक मदिर येथे आहे. हरगौरी, गणपती, नागोबा, भैरव, वराह अवतारातील विष्णु, नवग्रह या देवाच्या आकृती या देवळातील दगडावर कोरलेल्या आहेत

### आळे

या गावी ज्ञानेश्वर महाराजांच्या रेड्याची समाधी आहे. इ स. १८५९–१८६३ मध्ये कै आनदराव शेटे यानी या समाधीवर दगडी देऊळ बाधले आहे. जुन्नर–पैठण रस्त्यावर हे गाव आहे. चैत्र वद्य एकादशीस येथे यात्रा भरते.

### माणकेश्वर

या गावी एका हेमाडपती देवळाचे अवशेष पहावयास मिळतात. हे देऊळ मुसलमानानी पाडल्याचे या गावातील लोक सागतात. या मदिरातील २–३ खाब देवळाच्या सुदरतेबद्दलची खात्री पटवितात

### राजूर

या गावी उभी धोंड व सतीची शिला अशा दोन शिला आहेत येथून प्रेक्षणिय निसर्गसौंदर्य दिसते.

### ओतूर

या गावी केशव चैतन्याची समाधी व कपर्दिकेश्वराचे मदिर आहे.

### नारायणगाव

बाळाजी विश्वनाथ पेशवे यानी बाधलेला नारायणगड किल्ला येथेच आहे. जुन्नरच्या दक्षिणेस १० मैलावर हे गाव आहे.

## विद्यामंदिर नारायणगांव

प्रि सवनीस यांच्या प्रयत्नांनी व नारायणगावच्या ग्रामस्थांच्या सहकार्याने विद्यामंदिराची उभारणी झाली. इ. स. १९५५ सालापासून या विद्यामंदिरास मल्टी परपज स्कूल म्हणून मान्यता मिळाली आहे.

## संत हरिभाऊ मोंडवे यांची समाधी

२०० वर्षांपूर्वी एक सतश्रेष्ठ हरिबुवा यानी येथे समाधी घेतली आहे. 'ज्ञानसागर' हा ग्रंथ व लाखो अभंग त्यांनी लिहिले आहेत.

## चावंड

जुन्नरपासून १० मैलावर हा पडिक किल्ला आहे

## जीवधन

जुन्नरपासून १६ मैलावर हा किल्ला आहे

## पारूंडे

या गावी एक जुने ब्रह्मनाथाचे मंदिर आहे.

## वेल्हे

या गावी ६० फूट विस्ताराची हेमाडपंथी विहिर आहे. या विहिरीला दोन्ही बाजूंनी पायऱ्या असून कोनाड्यालाही शिल्पकाम आहे.

# पुरंदर तालुका

पुणे शहराच्या आग्नेय दिशेस असलेल्या तालुक्याने ४२६.८ चौरस मैलाचा परिसर व्यापलेला आहे तालुक्यात सुमारे ८० गावे आहेत. तालुक्याच्या पश्चिम भागात ४० ते ६० इंच तर पूर्व भागात १० ते १५ इंच पाऊस पडतो. तालुक्यातील मुख्य उद्योग धंदा शेती असून भाजीपाला व फळझाडांची लागवड या भागात केली जाते. या भागात मेंढपाळाचा धंदाही चालतो

## पुरंदर

पुरंदर तालुक्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागात शिवकालीन पुरंदर किल्ला आहे पुण्याच्या दक्षिणेस ३५ मैलावर स. स. पासून सुमारे ४५६० फूट उंचीवर हा किल्ला आहे. मध्ययुगीन काळापासून या किल्ल्याचे अस्तित्व असावे. या किल्ल्याला इ. स. १६६५ मध्ये मोगलांनी वेढा दिला असता, शिवरायांनी आग्र्याला जाण्याचे कबूल केले किल्ल्यावर केदारेश्वराचे मंदिर आहे किल्ल्यावर पुरंदरेश्वर, भिलीदखाना, खडा दरवाजा, बहामनी हॉल व बहामनी मशीद ही ठिकाणे आहेत

## सॅनिटोरिअम फॉर लेप्रसी पेशंटस-वीर

मीरा नदीकाठी वीर धरणाजवळ 'धोड उड्डाण' येथे श्रीनाथ म्हस्कोबाचे एक जागृत देवस्थान आहे जवळच असलेल्या देवदेऱ्या भाल्याने निर्माण झालेल्या झऱ्याचे पाणी कुष्ठरोगावरही गुणकारी


हार्दिक शुभेच्छा

**मे. मोर्वेकर**

**निरा, ता. पुरंदर, जि. पुणे**

**कृषि उत्पन्न बाजार समिती, निरा**

मुख्य मार्केट यार्ड निरा, ता. पुरंदर.
सब मार्केटयार्ड सासवड, ता. पुरंदर

मालाचे चोख वजन — वाजवी बाजार खर्च.
विक्री झालेल्या मालाची ताबडतोब रक्कम
जसा माल तसे मोल

जे. एन. कुम्भार — सचिव
रा. मो. शहा — उपसभापती
आ ज. जगताप — सभापती

हार्दिक शुभेच्छा

卐

**भैरवनाथ दूध व्यावसायिक सहकारी संस्था म.**

पुरंदर तालुक्यातील गाईचे दूध संकलन करणारी
एकमेव संस्था

बा स. जगताप
चेअरमन

हार्दिक शुभेच्छा

**वाघापूर विविध कार्यकारी सहकारी**

सोनायटी, वाघापूर, ता. पुरंदर

भाग भांडवल १००१५ — सभासद संख्या १६५
गुंतवणूक ९११५ — १०।६।७९ चा नफा १४२५

श्री ज्यं. पुरंदरे — सचिव
श्री. सा. दा. कुंजिर — चेअरमन




मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल

आहे अशी लोकांची श्रद्धा आहे या श्रद्धेतूनच इ. स. १९३५ साली या संस्थेचा जन्म झाला. कुष्ठ रोगापासून मुक्त झालेल्या व पंगु किंवा विद्रुप झालेल्या स्त्रि-पुरुषांना समाज सामावून घेत नाही. अशा लोकांसाठी संस्थेने कुष्ठरोगी पुनर्वसन शाखा इ. स. १९६७ पासून सुरू केली आहे. अनेक थोरामोठ्यांच्या सहाय्याने संस्था हे परोपकाराचे कार्य करीत आहे.

### सासवड

पुरंदर तालुक्याचे मुख्य ठिकाण सासवड हे आहे. पुण्याच्या दक्षिणेस १६ मैलावर कऱ्हा नदीच्या काठी हे गाव वसले आहे येथे संगमेश्वराचे मंदिर असून ज्ञानेश्वर महाराजांचे बंधू सोपानदेव यांची समाधी येथे आहे. पेशव्यांचे देशावरील मूळ ठिकाण सासवड हेच होय त्यांचा एक वाडा येथेही होता. तसेच सरदार पुरंदरे व हरिपंत बोकील यांचे वाडेही याच गावात आहेत.

### हायस्कूल सासवड

इ. स. १९०६ मध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीतर्फे ही शाळा सुरू करण्यात आली, आचार्य प्र. के. अत्रे हे या शाळेचे विद्यार्थी होते. इ स. १९५४ साली या संस्थेने शाळेसाठी स्वतःची इमारत बांधली. पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण विभागात या शाळेचे वैशिष्टचपूर्ण स्थान आहे. या शाळेत सुमारे ७३० विद्यार्थी शिकत आहेत.

### जेजुरी

सासवडपासून १० मैलावर आणि पुण्यापासून ३२ मैलावर पुणे-निरा रस्त्यावर जेजुरी हे खंडोबाचे प्रसिद्ध देवालय आहे या गावी मल्हारी मार्तंडाची दोन देवळे आहेत. गावाजवळ सुमारे २५० फुट उंचीवर मुख्य मंदिर आहेत खंडोबाच्या देवळास जाण्यासाठी पूर्व पश्चिम व उत्तर बाजूनी पायऱ्या आहेत उत्तरेस मुख्य रस्ता आहे. पायऱ्यांवर अधून मधून कमानी व दीपमाला आहेत. बाणाबाईचे देऊळ खाली व म्हाळसाचे वरती आहे. टेकडीच्या पायथ्याशी दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी ३७ एकर क्षेत्राचे दगडी तटबंदीचे तळे बांधले आहे. त्यात गणपतीचे देऊळ आहे. वायव्येस अहिल्यादेवी होळकर यांनी इ.स. १७७० मध्ये बांधलेले २० एकर क्षेत्राचे दुसरे तळे आहे. तळ्याच्या व गावाच्या मध्ये मल्हारराव होळकर यांच्या स्मरणार्थ महादेवाचे देऊळ बांधले आहे. चैत्र शुद्ध पौर्णिमेस व सोमवती अमावस्येस जेजुरीला मोठी यात्रा भरते.

### अहिल्यादेवी विद्यामंदिर, जेजुरी

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यामंदिर' जनता शिक्षण संस्था पुणे या संस्थेतर्फे चालविले जाते. या शाळेमुळे आजुबाजूच्या १५ खेड्यातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली आहे विद्यामंदिरास जोडूनच 'अहिल्यादेवी वसतिगृह' नावाचे वसतिगृह आहे. सरकारमान्य अशा या वसतिगृहात सुमारे २५ विद्यार्थ्यांची अल्प खर्चात सोय होऊ शकते.

### पुर

सासवड पासून ६ मैलावर 'पुर' हे गाव आहे. येथे काळभैरव आणि नारायणेश्वर ही मंदिरे आहेत.

## दौंड तालुका

पुण्याच्या पूर्व भागात असलेल्या या तालुक्याच्या दक्षिणेस इंदापूर व बारामती हे तालुके असून पश्चिमेस हवेली व उत्तरेस शिरुर तालुका आहे. या तालुक्यात पाऊस खूपच कमी पडत असल्यामुळे रब्बी, ज्वारी हेंच येथील प्रमुख पीक आहे.

### दौंड

दौंड हे दौंड तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी महादजी शिंद्यांनी बहिरोबा व विठोबाची मंदिरे बांधली आहेत

### कुरकुंभ

पाटस पासून सुमारे ७ मैलावर हे गाव आहे. येथे गावात एक व टेकडीवर एक अशी फिरंगाई देवीची दोन देवळे आहेत.

### पाटस

येथील नागेश्वर महादेवाचे देऊळ प्रेक्षणिय आहे.

### कडेगाव बेट

हे श्री नारायण महाराजांचे श्री दत्तात्रयाचे स्थान आहे,


" शेतकरी सुखी तर जग सुखी "

**कृषि उत्पन्न बाजार समिती, दौण्ड, जि. पुणे**

-• संचालक मंडळ •-

मा. रामचंद्र माधवराव जगताप, उपसभापती. मा. फक्कडराव भेंडूजी कदम, सभापती.

| सदस्य | सदस्य | सदस्य |
|---|---|---|
| मा. जगन्नाथ भुजंगराव कदम | मा. महादेव अप्पाजी खुटवड | मा. मारुतराव विठ्ठलराव भागवत |
| मा. मिश्रिलाल दगडूलाल बोगावत | मा. चंदरराव बबनराव शितोळे | मा. वसंतराव यशवंतराव तोरणे |
| मा. पन्नालाल जिवराज पगारिया | मा. मेघराज सोभाचन्द मुनोत | मा. महादेव जानोबा जाधव |
| मा. नानासाहेब तात्याबा पवार | मा. तुकाराम गणपत दळवी | मा. प्रेमसुख किसनदास कटारीया |
| मा. रामदास जनार्दन दिवेकर | मा. निवृत्ती आबा कुल | मा. तालुका सह. अधिकारी ता दौण्ड |

मा. काशिनाथ भाऊसाहेब क्षीरसागर, सचिव

USE ARPLUGS !
for more efficient use of
your pneumatic tools

1 Minimum time required for connecting tools to and disconnecting them from the Air Supply
2 Automatic Opening and Closing of the Air Supply no operation of the Valve necessary
3 Easy manoeuvring of Tools. Air Hose is free to swivel round its axis without the danger of uncoupling or leakage

AR Stands for
M/s ARUDYOG ENGINEERS PVT LTD
18/6 Hadapsar Industrial Estate
Pune 411 013 Phone 7222
LESS DOWN TIME
MORE PRODUCTIVE USE OF YOUR TOOLS

GMS/7/79/1

मसाल्याचे दूध व दुधाचे पदार्थ
आणि सर्व तऱ्हेची मिठाई
व खारा माल याकरिता
उपाध्ये यांचे
जनसेवा दुग्ध मंदिर
लक्ष्मी रोड, गोखले हॉलसमोर, पुणे-३० (४११०३०)
स्थापना-१९४८ • फोन ४४३११८ घरचा ४४३७४८
पदार्थ बसून खाण्याची व विकत मिळण्याची सोय

खास मध्यमवर्गीयांसाठी
घरगुती समारंभाकरिता हॉल उपलब्ध
आदर्श केटरिंग सेंटर
श्री प्रसाद बंगला, बाळूकाका कानिटकर रस्ता,
७२७ ब (नवा) सदाशिव पेठ, पुणे ३० (४११०३०)
संपर्क द्वारा जनसेवा दुग्धमंदिर फोन:४४३११८
Padma

REFBK-0023109

# —: अपंग सेवार्थ :—

## मु—द--क--वी, पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल.

### ★ महाराष्ट्र वैभव — मार्गदर्शक

ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, कृषि, शैक्षणिक, औद्योगिक, व्यापारी, धार्मिक, प्रेक्षणिय स्थळे, प्रवासिक वगैरे सर्वांगिण माहितीयुक्त मार्गदर्शक

वरील उद्देशांच्या दृष्टीकोनातून राष्ट्र व जिल्ह्याच्या विकासात ज्या संस्थानी व व्यक्तींनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे त्याचे परिचय-दर्शन यात घडेल

विशेष महत्वाचे प्रवास व सर्व साधारण माहितीकरीता हे मार्गदर्शक अत्यत उपयुक्त असून शाळा, कॉलेज, विद्यापीठ. वाचनालय, शैक्षणिक व इतर संस्था, हॉटेल्स व प्रवासी केंद्रे याना संग्रह योग्यच आहे.

### ★ भारत वैभव मराठी मासिक

( भारताचा महान वैभवशाली मार्गदर्शक )

- ¤ ¤ मराठी भाषेतील एक अत्यत दर्जेदार व वैभवशाली मासिक
- ¤ ¤ साहित्य, नाट्य, काव्य व कथा
- ¤ ¤ आध्यात्मिक विषयावरील अधिकारी व्यक्तींचे विचार.
- ¤ ¤ अपंग समस्या.
- ¤ ¤ गुन्हेगार सुधारणा—विचार प्रवर्तक लेख.
- ¤ ¤ चालू राजकीय घडामोडी
- ¤ ¤ क्रिडा, मनोरंजन

वगैरे सर्वांगिण आधुनिक विषयाने परिपूर्ण असलेले व भारतीय संस्कृतीचा प्रचार व प्रसार करणारे उत्कृष्ट मासिक.

- ¤ ¤ हे मार्गदर्शक प्रदेश व जिल्हानिहाय आहे.
- ¤ ¤ भारताचा त्रोटक गत इतिहास, स्वातंत्र्याची महान यशस्वी दिव्य संग्राम गाथा, भौगोलिक परिस्थिती, प्रांत, भाषा-धर्म-चालीरिती याचा बदलता आढावा, सामाजिक व शैक्षणिक प्रगती, औद्योगिक व व्यापारी उत्कर्ष, विज्ञान संशोधन, राजकीय घडामोडी, प्रेक्षणीय स्थळे वगैरे सर्वंकष माहिती यात मिळेल.
- ¤ ¤ भारताच्या उत्कर्षात ज्या संस्थानी व व्यक्तींनी उल्लेखनीय कार्य केले आहे त्याचा परिचय
- ¤ ¤ माहिती मिळविण्याचे कार्य जवळ जवळ पूर्ण होत आले असून लवकरच प्रकाशित होईल
- ¤ ¤ अनेक भाषातून हे मार्गदर्शक प्रकाशित होईल.

### ★ विश्व वैभव—( विचार-दर्शन व विश्व परिचय )

**उत्कृष्ट छपाई, आकर्षक कव्हर, उत्तम सजावट, सर्वंकष माहिती असलेल्या मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशनाच्या कोणत्याही अंकात आपली जाहिरात असणे हे अत्यंत अभिमानास्पद असेल व वाचून आपणांस आनंदच होईल.**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :—**

संपादक : " मु-द-क-वी, पुरुषार्थ प्रकाशन ", फोन नं. : २०९९

" मातृ पितृ छाया " १३, मिडल क्लास हौसिंग सोसायटी, पनवेल—४१०२०६ (म. रेल्वे) (जि. कुलाबा) नवी मुंबई, भारत.

( Regd. No. M. H. 831 ) भारत वैभव विशेषांक सप्टेंबर ते डिसेंबर १९७९

# MUDKAVI

UNIVERSAL

DISABLES
&
KRIPPLES

ADVISORY

VANGUARD

INDIA

# M - U - D - K - A - V - I

मु द-क-वी पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल, जि. कुलाबा ४१०२०६ भारत. ( श्रीसमर्थ प्रिंटिंग प्रेस, स्टेशन रोड, ठाणे ४००६०१ )